# दासबोध परिचय (भावार्थसह)

## श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा) : पाठ्यपुस्तक दुसरे



'श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन' प्रकाशन विभाग, श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड जि. सातारा

**प्रकाशक / संयोजक :** ‘श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन’ (श्री.दा.अ.) श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड यांच्या वतीने.
(या पुस्तकातील दासबोध समासांचा सारांश श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड या संस्थेने प्रकाशित केलेल्या प्रा.के.वि.बेलसरे यांनी संपादन केलेल्या आवृत्तीतून घेण्यात आला आहे. ही अनुमति दिल्याबद्दल उभयतांचे ऋणी आहोत.)

# ✻ अनुक्रमणिका ✻

सांप्रदायिक मंगलाचरण
अभ्यासक्रमातील समासाचा सारांश, ओव्या, भावार्थ, तळटीपांमध्ये अवघड शब्दांचे अर्थ आणि प्रश्नपत्रिका.

| स्वाध्याय क्रमांक | दशक - समास क्रमांक | समासांची नांवे | एकूण ओवी संख्या | महिना | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | १८-४ | देहदुर्लभनिरूपण | ४० | जानेवारी | १ ते ६ |
| २. | ३-२,३-३, ३-४, ३-५ | स्वगुण परीक्षा | २२३ | फेब्रुवारी | ६ ते ३१ |
| ३. | २-१, २-१० | मुर्खलक्षण, पढतमूर्खलक्षण | ११५ | मार्च | ३१ ते ४५ |
| ४. | २-५, २-६, २-७ | रजोगुण, तमोगुण, सत्त्वगुण | १७१ | एप्रिल | ४५ ते ६५ |
| ५. | २-८, २-९ | सद्विद्या निरूपण, विरक्तलक्षण | ७५ | मे | ६५ ते ७५ |
| ६. | ११-१०, १५-२ | नि:स्पृहवर्तणुक, नि:स्पृहव्याप | ५५ | जून | ७५ ते ८४ |
| ७. | ३-६, ३-७, ३-८ | त्रिविधताप | १७२ | जुलै | ८४ ते १०५ |
| ८. | ४-४, ४-५, ४-६ | पादसेवन, अर्चन आणि वंदनभक्ती | ८४ | ऑगस्ट | १०५ ते ११७ |
| ९. | ८-६ | दुश्चित निरूपण | ५४ } | सप्टेंबर | ११७ ते १२५ |
| १०. | ११-५, १९-९ | राजकारणनिरूपण | ५८ } | सप्टेंबर | १२५ ते १३४ |
| ११. | १८-७, १८-८ | जनस्वभाव निरूपण, अंतर्देव निरूपण | ४५ | ऑक्टोबर | १३४ ते १४१ |
| १२. | ९-४ | जाणपणनिरूपण | ४४ | नोव्हेंबर | १४१ ते १४८ |
| | एकूण २६ समास | | एकूण ओव्या ११३६ | | |

दैनंदिन दासबोध वाचनानंतर म्हणावयाच्या ओव्या, आरत्या, प्रार्थना, पृष्ठांक : १४८ ते १५१

## अभ्यासार्थींसाठी सूचना :

१) ज्यांनी दासबोध प्रवेश हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे त्यांनी या पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय आपल्या **पूर्वीच्याच समीक्षकांकडे पाठवावेत.** २) कोणत्या महिन्यात कोणते स्वाध्याय सोडवावयाचे ते वरील तक्त्यात पहावे. ३) अभ्यासार्थींसाठी महत्त्वाच्या व्यावहारिक सूचना मलपृष्ठावर दिल्या आहेत त्या बारकाईने वाचून त्यांचे पालन करावे. ४) सज्जनगड मासिकातून मार्गदर्शन लेख येतात, ते वाचावे.
सज्जनगड मासिकाची वार्षिक वर्गणी २०० रु. (कायम ग्राहक वर्गणी १५०० रू.-१० वर्षे) आहे.
वर्गणी पाठविण्याचा पत्ता : व्यवस्थापक “सज्जनगड” मासिक,
समर्थ सदन, १७९ सोमवार पेठ, सातारा - ४१५ ००२.

**मुद्रक :**
**डॉ. गणेश दात्ये**
गणेश ऑफसेट प्रा. लि.
६९२, बुधवार पेठ, पुणे - ४११ ००२.

प्रथमावृत्ती : डिसेंबर १९८२
**ओवी+भावार्थ एकत्र आवृत्ती १ :** श्रीगणेशचतुर्थी, १९ सप्टेंबर-२०१२

**संयोजक :** श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन
पटवर्धन बाग, एरंडवणे, पुणे ४११ ००४.
संपर्क : **अध्यक्ष, श्री. दिलीप कोठारी** (९८२२३७५८६६)

## परिचय पाठ्यपुस्तक व भावार्थच्या एकत्रित आवृत्तीच्या निमित्ताने

## * प्रास्ताविक *

**प्रिय अभ्यासार्थी,** आपण एक वर्षाचा दासबोध प्रवेश हा पत्रव्दारे दासबोध अभ्यासाचा एक स्तर पूर्ण केला आहे. आपले अभिनंदन.

दासबोधातील २०० समासांपैकी फक्त १२ समासांचा अभ्यास आपण केला आहे. हे निवडक १२ समास व्यक्तिमत्वविकासाचे मूलभूत असे आहेत. आपण दासबोधाचा पहिला समास वारंवार वाचीत राहावे अशी विनंती आहे. त्यातील फलश्रुतीच्या ओव्यांमधून आपणांत काय काय बदल होणे समर्थांना अपेक्षित आहे, त्याची उजळणी होत राहून ती गोष्ट एक प्रकारे आपल्याला आत्मपरिक्षण करण्यास प्रेरणा देणारी ठरेल. प्रमाणे त्याच प्रवेश (भावार्थसह) च्या पुस्तकातील पान ७२ वरील स्वयंमूल्य मापनाचे २५ प्रश्न ही एक मोजपट्टी आहे. त्याचा वारंवार वापर करून प्रगतीच्या दिशेन वाटचाल करणे सोपे होते याचा जरूर अनुभव घ्यावा. दासबोध हा केवळ धार्मिक वा तत्वज्ञानाचा ग्रंथ नव्हे. प्रत्येकाने तो अभ्यासावा असा जीवन शिक्षणाचा ग्रंथ आहे. स.भ.कै. अप्पा वैद्य (१९०३-१९९६) यांना हे खरे जाणवले की ज्याप्रमाणे शाळेमध्ये शिक्षक विद्यार्थ्याला पाठ्यपुस्तकातील धडे शिकवितात त्याच पध्दतीने ग्रंथराज दासबोधातील समासरूपी धडे सर्व सामान्य लोकांना शिकविले पाहिजेत. कठीण शब्दांचे अर्थ सांगितले पाहिजेत. शाळेमुळे जसा साक्षरतेचा प्रसार होतो. त्याप्रमाणे दासबोध अभ्यासातून आध्यात्मिक साक्षरतेचा प्रसार समाजात झाला पाहिजे. तरच लोकांच्या वृत्तीत कायमस्वरूपाचा बदल घडून त्यांच्या आचरणांत तो उतरू लागेल.

या विचाराने प्रेरित होऊन मे १९६५ मध्ये कै. अप्पांनी शिवथरघळींत पहिला दासबोध अभ्यास वर्ग घेतला आणि हा 'मे' मधील दासबोध अभ्यासवर्ग आजतागायत अव्याहतपणे चालू आहे. सध्या हा वर्ग चाफळ च्या श्रीराम मंदिरात १६ मे ते २० मे या कालावधीत होतो. त्याचे सविस्तर निवेदन एप्रिल च्या सज्जनगडच्या अंकात येते. या वर्गाचा लाभ सर्वांनी घ्यावा.

या अभ्यास वर्गातूनच पुढे १९७९ पासून पत्रव्दारा दासबोध अभ्यास हा उपक्रम सुरू झाला आहे. त्यातुन पुढे अनेक गावांतून अनेक ठिकाणी साप्ताहिक दासबोध अभ्यास वर्ग आणि दासबोध अभ्यास मंडळे सुरू झाली आहेत. अभ्यासार्थींना प्रत्यक्ष अभ्यासासाठी तसेच प्रेरणा म्हणूनही हे वर्ग खूप उपयोगी ठरत आले आहेत. अभ्यासार्थींनी अशा मंडळाची चौकशी जरूर करावी तसेच नवी नवी मंडळेही जरूर सुरू करावीत. कोणत्याही वर्गात अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे वर्गाचे संचालक हे सुध्दा स्वत: शिक्षण घेण्यासाठीच एक अभ्यासार्थी म्हणूनच उपस्थित असतात.

पत्रव्दारा दासबोध अभ्यास उपक्रमांत अभ्यासार्थी वा समीक्षक यांची भूमिका आपले दासबोधावर प्रभुत्व आहे किंवा असावे अशी नसून 'दासबोधाने आपल्या जीवनावर प्रभुत्व

गाजवावे' अशीच असते, असली पाहिजे.

हे सर्व थोडे विस्ताराने यासाठी लिहिले आहे की आपण प्रथम वर्षाचा अभ्यास पूर्ण केला आहे. पुढील दोन वर्षे (आणि नंतर शक्यतो समीक्षक म्हणून आणखीन तीन वर्षे) आपल्याला अभ्यास करावयाचा आहे. त्या सर्व अभ्यासांत मनन चिंतन आणि या अभ्यासाचा दैनंदिन जीवनातील संदर्भ यावरील आपले लक्ष दृढ असावे. केवळ माहितीवजा ज्ञान किंवा पांडित्य हे या अभ्यासात अपेक्षित नाही.

पहिल्या वर्षी दरमहा एकच समास अभ्यासासाठी होता. आता या वर्षी परिचयच्यास्तरावर एकूण २६ समास आपण अभ्यासणार आहोत. 'महिन्याला एक स्वाध्याय' यांत महिनाभर त्या समासांचे वारंवार वाचन मनन अपेक्षित आहे.

डिसेंबर २००९ मध्ये प्रवेश स्तराच्या पुस्तकाचे पाठ्यपुस्तक व भावार्थ प्रवेश यांची एकत्रित आवृत्ती प्रथम काढली. त्याची उपयुक्तता लक्षात आल्यावर १५ मे २०११ च्या श्री.दा.अ. च्या षण्मसिक सभेत परिचय व प्रबोध स्तराची पुस्तकेही अशीच एकत्र करून काढावी, असे ठरले. त्या प्रमाणे २०१२ मध्ये प्रबोधचे भावार्थसह पुस्तक काढले. आता परिचयचे भावार्थसह पुस्तक काढण्यांत येत आहे. भावार्थसह पुस्तकाची ही पहिली आवृत्ती असली तरी पूर्वी परिचय पाठ्य पुस्तकाच्या १९ आवृत्या आणि भावार्थ परिचयच्या सुमारे ६ आवृत्या निघाल्या आहेत. भावार्थसह हे पुस्तक, या दोन पुस्तकांचे एकत्रीकरणच आहे. हे एकत्रीकरण करताना अभ्यासार्थींच्या सोयीचे दृष्टीने काही बदल श्री.दा.अ. चे निष्ठावान कायकर्ते, श्री.म.वि. जोशी यांनी सुचविले व तसे ते या पुस्तकांत घेतले आहेत. प्रत्येक स्वाध्यायाचे प्रास्ताविक स्वरूप त्या त्या स्वाध्यायांतच सुरूवातीस घेतले आहे. कठीण शब्दांचे अर्थ त्यांना क्रमांक देऊन शक्य तो त्या त्या पानावर लगेच खाली घेतले आहेत.

मे २०१२ च्या षण्मासिक सभेत ठरल्या प्रमाणे मुखपृष्ठावर श्रीसमर्थ सेवा मंडळाचे 'श्रीसमर्थ रामदास, प्रभू रामचंद्रांचे कृपाप्रसादाने लेखन करीत आहेत' . हे चित्र घेतले आहे. त्या संदर्भात सेवामंडळाचे पूर्ण सहकार्य आम्हास लाभले, त्या बद्दल सेवामंडळाला मन:पूर्वक धन्यवाद !

समर्थ भक्तांच्या उत्स्फूर्त देणग्यांमुळेच स्वस्तपुस्तक योजना कार्यान्वित आहे. या एकत्रित पुस्तकाचे मूल्य पूर्वी इतकेच (पाठ्यपुस्तक रु. ६/-, + भावार्थ रु. १२/-) = रु. १८/- ठेवले आहे. सर्व अभ्यासार्थींचे वतीने देणगीदारांचे आभार. श्रीसमर्थचरणी त्यांची सेवा रूजू आहेच, गणेश ऑफसेट प्रा.लि.चे संचालक डॉ. गिरीश दात्ये आणि त्यांचे सर्व सहकारी हे सर्व कार्य समर्थसेवा या भावनेने तळमळीने करतात. त्यांचे मन:पूर्वक आभार. अनेक समर्थ भक्तांच्या आणि श्रीसमर्थ सेवा मंडळ सज्जनगड यांच्या सहकार्यानेच श्री.दा.अ. चे काम चालू आहे, त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानून हे प्रास्ताविक संपवतो.

**दिलीप कोठारी**

**अध्यक्ष श्री.दा.अ.**

# ।। जय जय रघुवीर समर्थ।।

# श्रीदासबोध

## सांप्रदायिक मंगलाचरण

गणेशः शारदा चैव सद्गुरुः सज्जनस्तथा। आराध्यदैवतं गुह्यं सर्वं मे रघुनंदनः।।१।।
गणेश शारदा सद्गुरु। संत सज्जन कुळेश्वरू। सर्वही माझा रघुवीरू। सद्गुरूरूपें।।२।।
माझें आराध्य दैवत। परमगुह्य गुह्यातीत। गुह्यपणाची मात। न चले जेथें।।३ ।।
यो जातो मरुदंशजो क्षितितले संबोधयन् सज्जनान्। ग्रंथं यो रचयन् सुपुण्यजनकं श्रीदासबोधाभिधम्।
यः कीर्त्या पठनेन सर्वविदुषां स्वांतापहारिः सदा। सोऽयं मुक्तिकरः क्षितौ विजयते श्रीरामदासो गुरुः।।४।।
शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचें। वशिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें।
कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा। नमस्कार माझा सद्गुरू रामदासा।।५।।
मला वाटते अंतरी त्वा वसावें। तुझ्या दासबोधासी त्वां बोधवावे।
अपत्यापरी पाववी प्रेमग्रासा। महाराजया सद्गुरो रामदासा।।६।।

## दासबोध परिचय – स्वाध्याय १ ला द. १८ स. ४ (देहदुर्लभनिरूपण)

**स्वाध्याय सारांश :** या स्वाध्यायासाठी एकच समास 'देहदुर्लभनिरूपण' हा निवडला आहे. 'देहे परलोकीचे तारू किंवा' 'देहे ब्रम्हांडाचे फळ। देहे दुलभचि केवळ' अशासारखी अत्यंत अर्थपूर्ण वचने या समासात आहेत. देहाची महति ज्यांना कळेल त्यांच्याच हातून आयुष्याचा नाश न होता काही भल्या गोष्टी घडतील. 'जनीं जनार्दन' पहावयास याच समासामध्ये सांगितले असून त्या जनार्दनास संतुष्ट करण्याचा उपदेश केला आहे.

ग्रंथाच्या आरंभी मानव देहाचे महत्त्व वर्णन करून झाले आहे. या समासामध्ये तोच विषय जरा भिन्न प्रकारे मांडला आहे. या जगामध्ये माणसाने जे जे काही कमावले व निर्माण केले ते सारे मानवदेहाच्या सहाय्याने घडवून आणले. त्यामध्ये जसे चांगले तसे वाईट देखील आढळते. एकीकडे ग्रंथलेखन, तीर्थाटन, श्रवणमनन, उपासना, साधनमार्ग, अनुष्ठाने, अवतार, भुक्ती आणि मुक्ती या चांगल्या गोष्टी आढळतात. तर त्याचबरोबर दुसरीकडे पाप, पाखांड, बंड, विषयभोग, रोग, स्वैराचार, स्वार्थ, अपकीर्ती, भ्रम व भ्रष्टाकार या गोष्टीदेखील देहाच्या सहाय्यानेच केलेल्या अनुभवास येतात. आपण पाहायचे ते असे कीं, देहामुळे आत्माराम प्रगट होतो पण मानवदेह दुर्लभ आहे. तो सहजासहजी मिळत नाही. म्हणून त्याला हरिभजनाला लावून आपण पावन व्हावे. आत्म्यासाठी देह झिजवावा. जनी जनार्दन आहे हे ओळखून जनतेला संतुष्ट करावे. ज्या शरीरात उदंड विचार प्रगटतो, ज्या शरीराकडून आत्मारामाच्या ज्ञानाचा प्रसार होतो, ते पुण्यशरीर असते. ते पूजा करण्यास अधिकारी होय. सूक्ष्म संकल्पनांना देहरूप फळ येते. सहसा कोणाचे अंतःकरण दुखवू नये.

**प्रास्ताविक :** जीवात्मा हा अनंत काळाचा प्रवासी आहे. त्याच्या संकल्पांना देहरूप फळ येत. भवसागरातून पार होण्यासाठी मानव देहरूपी नौकाच उपयुक्त आहे. पशुपक्षीरूपी अनंत देह आहेत पण विवेकरूपी देणगी केवळ मानवालाच ईश्वराने दिली आहे. ही ईश्वराची सर्वश्रेष्ठ भेट लाभली असल्याने मानवाने देह परमार्थी लावून याचे सार्थक करावे; हे मोठ्या प्रभावीपणाने श्रीसमर्थ येथे सांगत आहेत. या समासात 'देह्याकरिता' हा शब्द वारंवार आला आहे. त्याचा अर्थ 'देहामुळेच' असा घ्यावा.

**।।श्रीराम।।**

**देह्याकरितां गणेशपूजन। देह्याकरितां[१] शारदावंदन। देह्याकरितां गुरु सज्जन। संत श्रोते।।१।।**
देहामुळेच गणेशपूजन, शारदावंदन करता येते. गुरू, सज्जन, श्रोते हे देहामुळेच असतात. (आत्मयाचे अस्तित्व देहामुळेच जाणवते.)

**देह्याकरितां कवित्वें चालती। देह्याकरितां अधेनें[२] करिती। देह्याकरितां अभ्यासिती। नाना विद्या ।।२।।**
देह आहे म्हणूनच काव्यलेखन, अध्ययन, अनेक विद्यांचा अभ्यास होऊ शकतो.

**देह्याकरितां ग्रंथलेखन। नाना लिपीवोळखण। नाना पदार्थशोधन। देह्याकरितां ।।३।।**
ग्रंथलेखन, लिपी समजून वाचन, विज्ञानाचे संशोधन देहामुळेच साध्य होते.

**देह्याकरितां माहाज्ञानी। सिद्ध साधु ऋषी मुनी। देह्याकरितां तीर्थाटणीं। फिरती प्राणी।।४।।**
देहामुळेच महाज्ञानी, सिध्द, साधु, ऋषिमुनी होतात. तीर्थाटन देहामुळेच घडते.

**देह्याकरितां श्रवण घडे। देह्याकरितां मननीं पवाडे। देह्याकरितां देहीं आतुडे[३]। मुख्य परमात्मा ।।५।।**
देहामुळे श्रवण घडते, मनन घडते, परमात्म्याची प्राप्ती देहामध्ये देहामुळेच घडते.

**देह्याकरितां कर्ममार्ग। देह्याकरितां उपासनामार्ग। देह्याकरितां ज्ञानमार्ग। भूमंडळी।।६।।**
कर्म, उपासना, ज्ञानमार्ग हे या जगात देहामुळेच प्राप्त होतात.

**योगी वीतरागी[४] तापसी[५]। देह्याकरितां नाना सायासी[६]। देह्याकरितां आत्मयासी। प्रगटणें घडे ।।७।।**
नाना सायास करणारे योगी, विरक्त, तापसी देहामुळेच होतात. आत्मा देहामुळेच प्रकट होऊ शकतो.

**येहलोक आणी परलोक। देह्याकरितां सकळ सार्थक। देहेंविण निरार्थक। सकळ कांहीं।।८।।**
उहलोक किंवा परलोक, यांचे सार्थक देहामुळेच घडते. देहच नसेल तर कशास काही अर्थ रहात नाही.

**पुरश्चर्णें अनुष्ठानें। गोरांजनें[७] धूम्रपानें। सीतोष्ण पंचाग्नी साधणें। देह्याकरितां ।।९।।**
पुरश्चरणे, अनुष्ठाने, अग्नि, गोरांजने, स्वत:ला उलटे टांगून धूर पिऊन तप करणे, चार बाजूला विस्तव आणि वर सूर्याचे ऊन अशा अवस्थेत तप करणे हे सर्व देहामुळेच होते.

**देह्याकरितां पुण्यसीळ। देह्याकरितां पापी केवळ। देह्याकरितां अनर्गळ[८]। सुचिस्मंत[९]।।१०।।**

(१) देह्याकरितां - देह असल्याकारणाने. (२) अधनें - अध्ययन. (३) आतुडे - सापडतो. (४) वीतरागी - विरक्त. (५) तापसी - तपस्वी. (६) सायासी - दीर्घोद्योगी. (७) गोरांजने - अग्निकाष्ठ भक्षण करणे

पुण्य अगर पाप करणे, स्वेच्छाचारी किंवा पवित्र असणे देहामुळेच शक्य आहे.

**देह्याकरितां अवतारी। देह्याकरितां वेषधारी। नाना बंडें पाषांडें करी। देह्याकरितां ॥११॥**

अवतारी किंवा वेषधारी देहामुळेच शक्य. प्रचलिताविरूध्द बंड करणे पाखंडी होणे हे देहामुळेच.

**देह्याकरितां विषयभोग। देह्याकरितां सकळ त्याग। होती जाती नाना रोग। देह्याकरितां ॥१२॥**

विषयांचा उपभोग किंवा त्यांचा त्याग; अनेक रोग होणे किंवा ते नाहिसे होणे हे देह असल्यामुळेच घडते.

**देह्याकरितां नवविधा भक्ती। देह्याकरितां चतुर्विधा मुक्ती। देह्याकरितां नाना युक्ती। नाना मतें ॥१३॥**

नवविधाभक्ती, चतुर्विधा मुक्ती ( सलोकता, समीपता, स्वरूपता, सायुज्यता ) आणि नाना युक्त्या देहामुळेच होतात.

**देह्याकरितां दानधर्म। देह्याकरितां नाना वर्म। देह्याकरितां पूर्व कर्म। म्हणती जनीं ॥१४॥**

दानधर्म, नाना रहस्ये ज्ञात होणे, लोक ज्यांना पूर्व कर्मे म्हणतात, ती देहामुळेच.

**देह्याकरितां नाना स्वार्थ। देह्याकरितां नाना अर्थ। देह्याकरितां होईजे वेर्थ[१०]। आणी धन्य ॥१५॥**

नाना प्रकारचे स्वार्थ, किंवा अर्थ देहामुळेच. मनुष्याचे जीवन धन्य होणे किंवा ते व्यर्थ जाणे हे देहामुळेच घडते.

**देह्याकरितां नाना कळा। देह्याकरितां उणा आगळा। देह्याकरितां जिव्हाळा। भक्तिमार्गाचा ॥१६॥**

विविध कला जाणणे, श्रेष्ठ किंवा कनिष्ठ होणे, भक्तीमार्गाबद्दल प्रेम असणे देहामुळेच शक्य.

**नाना सन्मार्गसाधनें। देह्याकरितां तुटती बंधनें। देह्याकरितां निवेदनें। मोक्ष लाभे ॥१७॥**

अनेक प्रकारचे सन्मार्ग किंवा साधने यांनी मुक्ती मिळविणे आणि आत्मनिवेदनाच्या भक्तीने मोक्ष मिळणे देहामुळेच.

**देहे सकळांमधें उत्तमु। देहीं राहिला आत्मारामु। सकळां घटीं पुरुषोत्तमु। विवेकी जाणती ॥१८॥**

सर्वांमध्ये (मानव) देह उत्तम आहे कारण त्यामध्ये आत्माराम आहे हे विवेकी माणसालाच कळते.

**देह्याकरितां नाना कीर्ती। अथवा नाना अपकीर्ती। देह्याकरितां होती जाती। अवतारमाळिका ॥१९॥**

नाना प्रकारची किर्ती किंवा अपकीर्ती देहामुळेच प्राप्त होते. अवतारमालिका होतात आणि विलीन होतात त्या सर्व देहामुळेच.

**देह्याकरितां नाना भ्रम। देह्याकरितां नाना संभ्रम। देह्याचेन उत्तमोत्तम। भोगिती पदें ॥२०॥**

नाना भ्रम किंवा संभ्रम देहामुळेच. देहामुळेच उत्तम श्रेणी भोगणे शक्य.

---

(८) अनर्गळ – उच्छृंखल (९) सुचिस्मंत – पवित्र. (१०) वेर्थ – व्यर्थ.

**देह्याकरितां सकळ कांही। देह्याविण कांहीं नाहीं। आत्मा विरे ठाईं ठाईं। नव्हताच जैसा ।।२१।।**
देह असल्यामुळेच हे सगळे होते. तोच नसता तर काहीच नाही. आत्मा गुप्तपणे म्हणजे जणू नसल्याप्रमाणेच ठिकठिकाणी असतो.
**देहे परलोकीचें तारूं। नाना गुणांचा गुणागरु। नाना रत्नांचा विचारु। देह्याचेनी ।।२२।।**
मानवी देह हे जीवाला भवसागरातून पैलतीराला नेऊ शकणारे तारू म्हणजे जहाज आहे. ते अनेक गुणांची खाण आहे. अनेक रत्नांची महती त्यामुळेच कळते.
**देह्याचेन गायेनकळा। देह्याचेन संगीतकळा। देह्याचेन अंतर्कळा।। ठाईं पडे ।।२३।।**
गायनकला, संगीत, शरीरान्तर्गत रचनेचे ज्ञान शरीरामुळेच शक्य.
**देहें ब्रह्मांडाचें फळ। देहे दुल्लभचि केवळ। परी या देह्यास निवळ। उमजवावें ।।२४।।**
ब्रम्हांडरूपी जो वृक्ष, त्याला प्राप्त झालेले फळ म्हणजेच मानवी देह. तो अत्त्यंत दुर्लभ आहे. (पाप पुण्याची समता झाली तरच ही देहप्राप्ती) असे असल्याने त्याची महती नीट ध्यानात घेतली पाहिजे.
**देह्याकरितां लाहानथोर। करिती आपुलाले व्यापार। त्याहिमधें लाहानथोर। कितीयेक ।।२५।।**
देहामुळेच लहान/मोठे व्यवहार होतात. प्राण्यांमध्येही काही लहान किंवा मोठे असतात. आपल्या योग्यतेनुसार व्यवहार घडतात.
**जे जे देहे धरुनी आले। ते ते कांहीं करून गेले। हरिभजनें पावन जाले। कितीयेक ।।२६।।**
जो जो माणूस देहधारण करून येतो तो काहीतरी उलाढाल करून जातोच. (पण) त्यात हरिभक्ती करून कित्येक जन पावन होतात.
**अष्टधा प्रकृतीचें मूळ। संकल्परूपचि केवळ। नाना संकल्पें देहेफळ। घेऊन आलें ।।२७।।**
अष्टधा प्रकृतीचे (पाच भूते व त्रिगुण) मूळ (अहम-मूळमाया) संकल्परूप आहे. तोच मूळ संकल्प भिन्न प्रकारचे देहामध्ये दिसून येते.
**हरिसंकल्प मुळीं न होता। तोची फळी पहावा आतां। नाना देह्यांतरीं तत्वता । शोधिता कळे ।।२८।।**
प्रत्येक देहामध्ये मीपणाचा हरिसंकल्प मूलत:च आढळतो.
**वेलाचे मुळीं बीज। उदकरूप वेली समज। पुढें फळामधें बीज। मुळींच्या अंशें ।।२९।।**
वेलाच्या मूळामध्ये बीज असते. उदकरूप वेलावर फळे येतात. त्या फळांमध्येही मूळबीज (बीजाचे गुण) असतात.
**मुळाकरितां फळ येतें। फळाकरितां मूळ होतें। येणेंकरितां होत जातें। भूमंडळ ।।३०।।**
मुळामुळे फळ येते, फळामुळे (बीजरूप) मूळ होते. अशा प्रकारे सर्व सृष्टीचा व्यापार चालला आहे.
**असो कांहीं येक करणें। कैसें घडे देह्याविणें। देहे सार्थकीं लावणें।। म्हणिजे बरें ।।३१।।**
असो. काहीही करावयाचे झाले तरी (देह हे साधन) हवाच. हा देह सार्थकी लावणे हे हिताचे आहे.
**आत्म्याकरितां देहे जाला। देह्याकरितां आत्मा तगला। उभययोगें उदंड चालिला। कार्यभाग ।।३२।।**
आत्मा धारण करण्यासाठी देह झाला व देहामुळेच अंतरात्मा टिकून राहीला. दोघांच्या संयोगामुंळे सृष्टी

चालली आहे.

**चोरून गुप्तरूपें करावें। ते आत्मयासी पडे ठावें। कर्तुत्व याचेन स्वभावें। सकळ कांहीं ।।३३।।**

आपण चोरून, गुप्तरूपाने काहीही केले तरी ते अंतरात्म्यास कळतेच. (कारण देहातच त्याचे वास्तव्य असते.) साहजिकच देहाचे सारे कर्तृत्व अंतरात्म्याचेच असते.

**देह्यामधें आत्मा असतो। देहे पूजितां आत्मा तोषतो। देहे पीडितां आत्मा क्षोभतो। प्रत्यक्ष आतां ।।३४।।**

आत्मा देहातच असल्याने देहाचे पूजन केले तर आत्मा संतुष्ट होतो. देहास दु:ख दिले तर आत्मा क्षोभतो असा प्रत्यक्ष अनुभव येतो.

**देह्यावेगळी पूजा पावेना। देह्याविण पूजा फावेना। जनीं जनार्दन म्हणोनी जना। संतुष्ट करावें ।।३५।।**

देहच नसेल तर पूजा करता येणार नाही. देहाच्या अभावी आत्म्याला पूजा पावणारही नाही. जनामध्ये जर्नादन भरून राहिला आहे म्हणून लोकांना संतुष्ट करावे.

**उदंड प्रगटला विचार। धर्मस्थापना तदनंतर। तेथेंच पूजेस अधिकार। पुण्यशरीरीं।।३६।।**

ज्या देहामध्ये उदंड विचार प्रकट होतो तो पुण्यवान असतो. तोच आत्मज्ञानाचा प्रसार करू शकतो. असेच शरीर पूजनीय असते.

**सगट भजन करूं येतें। तरी मूर्खपण आंगीं लागतें। गाढवासी पूजितां कळतें। काये त्याला ।।३७।।**

आपण सरसकट सर्वांचेच भजन/पूजन करू लागलो तर मूर्खपणा पदरी येतो. गाढवाची पूजा केली तर त्याला काय कळणार?

**पूज्य पूजेसी अधिकार। उगेचि तोषवावे उतर। दुखऊं नये कोणाचें अंतर। म्हणिजे बरें ।।३८।।**

जे पूजेचे खरोखर अधिकारी असतात त्यांचेच पूजन करावे. उतरांना मान देऊन तोषवावे. कोणाचेही अंत:करण दुखवू नये हे श्रेयस्कर. (असा हा व्यावहारीक विचार आहे.)

**सकळ जगदांतरींचा देव। क्षोभतां राहाव्या[११] कोठें ठाव। जनावेगळा जनास उपाव। आणीक नाहीं ।।३९।।**

सर्व लोकांच्या अंतरातील देव जर आपण क्षुब्ध केला तर मग आपणास राहावयाला जागाच मिळणार नाही. माणसांवाचून माणसाला आश्रय मिळत नाही.

**परमेश्वराचे अनंत गुण। मनुष्यें काये सांगावी खूण। परंतु अध्यात्म ग्रंथश्रवण-। होतां, उमजे ।।४०।।**

परमेश्वराच्या गुणांना अंतच नाही ते शब्दांत वर्णन करून कसे सांगता येणार ? (मानवी वाचा तेथे तोकडी पडते) परंतु अध्यात्म ग्रंथांचे श्रवण केल्यास ईश्वरीगुण थोडेफार समजतात.

(११) राहाव्या - राहाण्यासाठी.

इति श्रीदासबोधे गुरूशिष्यसंवादे देहेदुल्लभनिरूपणनाम समास चतुर्थ।।४।।

# दासबोध परिचय : प्रश्नपत्रिका १ ली

(दासबोध द. १८ स. ४ ''देहदुर्लभनिरूपण''वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या ओव्या समासातून शोधून पूर्ण करा.

(१) देहधारी असल्यामुळेच मानवाला ग्रंथ-लेखन, लिपी परिचय इ. करता येते.

(२) देहाच्या सहाय्यानेच श्रवण, मनन खूप करून परमात्मा आपलासा करून घेता येतो.

(३) ब्रह्मांडाचे अतिविकसित फळ म्हणजे देह.

प्र. २ खालील काव्यपंक्तींचा कल्पना-विस्तार सुमारे पाच ओळीत करा.

(१) देह्याकरितां होईजे वेर्थ। आणि धन्य।। (२) देहे परलोकीचें तारूं।

प्र. ३ ''जनी जनार्दन'' पहावयास सांगणाऱ्या समर्थांनी अशा उपदेशातसुद्धा व्यवहारवाद योग्य प्रकारे प्रगट केला आहे, तो नेमका कोठे? ओव्या लिहा.

प्र. ४ सर्व समासाचा सारांश सुमारे दहा ओळीत लिहा.

## स्वाध्याय २ रा (दशक ३ मधील समास २, ३, ४ व ५ वर आधारित)

**स्वाध्याय सारांश :** ३ ऱ्या दशकातील २ ते ५ या समासांमध्ये समर्थांनी एका करंट्याचे सुंदर शब्दचित्र रेखाटले आहे. एकच चरित्र त्या चार समासांमध्ये असल्याने त्यांचा एकत्रित गटच अभ्यासार्थ ठेवला आहे. त्या समासात एकच कथा असली तरी ती अनेक गोष्टी सांगून जाते. मानवावर कोसळणाऱ्या विविध प्रकारच्या संकटाचे स्वरूप त्यांत वर्णिले आहे. (१) स्वनिर्मित संकटे. (२) मानवनिर्मित संकटे. (३) निसर्गनिर्मित संकटे. (४) प्रारब्ध. या प्रकारच्या संकटांचे दर्शन करंट्याच्या चरित्रामध्ये समर्थांनी आपणास सहेतुकपणे घडविले आहे. अविवेकाच्या आधीन झालेला मनुष्य स्वत:च्या हातांनी स्वत:वर संकटे कशी ओढवून घेतो ते तेथे पहावे. अनेकदा विवाह करणे, व्यसनाधीन होणे इ. प्रसंग वर्णिले आहेत. घरामधील कुटुंबीय मंडळीतील धूसफूस, संसारातील उद्वेग आणि राज्यकर्त्याकडून झालेली सुलतानशाही, पत्नीला भ्रष्ट करण्याचा प्रकार ही मानवनिर्मित आपत्तीची उदाहरणे तर आवर्षण, अन्नान्नदशा होणे, वृद्धावस्थेतील दैना ही निसर्गनिर्मित संकटांची उदाहरणे या समासात आहेत. विवेकाने दूरदृष्टीने आणि सारासार विचाराने यातील काही संकटांवर मात करता येते, हे समर्थांना दासबोधात सांगावयाचे आहे.

## द.३ स.२ स्वगुणपरीक्षा (अ)

स्वगुणपरीक्षेचे चार समास आहेत. त्यांमध्ये श्री समर्थांनी त्यांच्याभोवती वावरणाऱ्या समाजामधील सामान्य संसारी माणसाच्या जीवनाची रूपरेषा आपल्यासमोर मांडली आहे. श्री समर्थांचा काळ मोठा

आणीबाणीचा काळ होता. अनेक राजकीय आणि धार्मिक समस्या आ वासून समोर उभ्या होत्या आर्थिकदृष्ट्या बहुजनसमाज बेताच्याच अवस्थेत होता. स्वार्थी माणसे नीति, न्याय बाजूस सारून आपला स्वार्थ साधून घेत होती. सामान्य संसारी माणूस एक प्रकारचे आकुंचित व साचेबंद जीवन जगत होता. प्रत्येकाच्या जीवनात अगदी त्याच घटना घडत होत्या असे नाही. परंतु संसारातून सुख मिळविण्यासाठी प्रापंचिक माणूस जी धडपड करतो तिची दिशा सगळीकडे एकच असते. कुटुंबसंस्थाच पाहा. कुटुंबामध्ये नवरा, बायको, मुलगे, मुली, त्यांचे विवाह, पैसा, आजार, लौकिक, रोग, मृत्यू आणि म्हातारपण यांच्या पायी निर्माण होणाऱ्या समस्या श्री समर्थांच्या काळी आणि आजच्या काळी मूलत: सारख्याच आहेत. उदा. लग्नाच्या आधी आईबापांवर प्रेम करणारा आज्ञाधारक मुलगा लग्नानंतर एकदम बदलतो, ही गोष्ट जशी त्या काळी तशी आज देखील अनुभवास येते. दुसरी बायको केल्यानंतर घरामध्ये होणाऱ्या कटकटी किंवा व्यसनापायी होणारी हानी किंवा म्हातारपणी होणारी दैना, इत्यादी प्रापंचिक समस्या आज देखील तशाच आढळतात. श्री समर्थांना मानवी जीवनाचे किती खोल ज्ञान होते, हे पुढील चार समासांवरून पाहून घ्यावे. तात्पर्य असे की, प्रापंचिक माणूस मूलत: स्वार्थी असतो. त्याच्या स्वार्थाची अंगे तीच असल्याने त्यातून जन्म पावणाऱ्या समस्या सर्व काळी समाजात सारख्याच असतात. स्वार्थ साधण्याचे मार्ग मात्र त्या त्या काळच्या विज्ञानप्रगतीवर आणि एकंदर सामाजिक परिस्थितीवर अवलंबून राहतात. उदा. रोगाला उपचार करण्याच्या पद्धती किंवा पैसे मिळविण्याचे मार्ग बदलत जातात. असो. या समासामध्ये अगदी बाळपणापासून दुसरे लग्न होईपर्यंत सामान्य माणूस कसे जीवन जगतो त्याचे वर्णन आढळेल.

**प्रास्ताविक :** या चार समासांमध्ये श्रीसमर्थ, एका करंट्याचा जीवनवृत्तान्त हेतुपुर:सर सांगत आहेत. ज्याच्याकडे मुळात साधनसंपत्ती आहे पण ती योग्य प्रकारे उपयोगात आणण्याचा विचार नाही तो करंटा. मानवी जीवनात दु:खे असतात पण काही दु:खे स्वत:च्या करणीनेच तो ओढवून घेतो. ती विवेकाने वागून टाळता येऊ शकतात. प्रारब्धामुळे प्राप्त होणारी दु:खे भोगावीच लागतात. निसर्गनिर्मित संकटे, समाजनिर्मित संकटे ही थोडीफार टाळता येऊ शकतात. मनुष्य जन्मभर सुखासाठी धडपडत असतो पण अंतकाळपर्यंत दु:खे त्याच्या पाठीशी लागतातच. दु:खमय संसार सुखरूप करण्यासाठी ईश्वरभक्ती हे साधन आहे. तसेच विवेकाने संसार केल्यास दु:खे सुसह्य होऊ शकतात हाही बोध या स्वाध्यायातून मिळू शकतो.

**।। श्रीराम ।।**

**संसार हाचि दु:खमूळ। लागती दु:खाचे इंगळ[1]। मागां बोलिली तळमळ। गर्भवासाची ।।१।।**

संसार हा (अशाश्वत असल्याने) दु:खाचा उगम आहे. त्यामध्ये दु:खाचे चटके बसतात. गर्भवासामध्ये असताना कशी तगमग होते हे यापूर्वी सांगीतले.

**गर्भवासी दु:ख जालें। तें बाळक विसरलें। पुढें वाढों लागलें। दिवसेंदिवस ।।२।।**

गर्भवासातील दु:ख मूल पुढे विसरते व दिवसानुदिवस ते वाढू लागते.

**बाळपणीं त्वचा कोंवळी। दु:ख होतांचि तळमळी। वाचा नाही तये काळीं। सुखदु:ख**

(१) इंगळ - निखारा.

**सांगावया ।।३।।**

बालपणी त्वचा कोवळी असते. थोड्याशा दु:खानेही बालक तळमळू लागते. पण बोलता न आल्यामुळे सुख:दु:ख त्याला सांगता येत नाही.

**देहास कांहीं दु:ख जालें। अथवा क्षुधेनें पीडलें। तरी तें परम आक्रंदलें। परी अंतर नेणवे ।।४।।**

भूक लागली किंवा देहाला काही पीडा झाली तर ते मोठ्याने रडू लागते, परंतु त्याला अंतरी काय दु:ख होत आहे ते (इतरांना) कळत नाही.

**माता कुरवाळी वरी। परी जे पीडा जाली अंतरीं। ते मायेसी न कळे अभ्यांतरीं। दु:ख होये बाळकासीं ।।५।।**

माता त्याला प्रेमाने कुरवाळते पण बालकाच्या मनातील पीडा त्याला कळू शकत नाही.

**मागुतें मागुतें फुंजे रडे। माता बुझावी[२] घेऊन कडे। वेथा नेणती बापुडें। तळमळी जीवीं ।।६।।**

माता बालकाला कडेवर घेऊन त्याला समजावीत असते. पण त्याची व्यथा नेमकेपणे कळत नाही. ते बापुडे पुन्हा पुन्हा स्फुंदन करते.

**नाना व्याधीचे उमाळे। तेणें दु:खें आंदोळे[३]। रडे पडे कां पोळे। अग्निसंगें ।।७।।**

नाना प्रकारच्या व्याधींमुळे बालकाचा दु:खाने थरकाप होतो. ते (काहीवेळा) पडते किंवा भाजून घेते.

**शरीर रक्षितां न ये। घडती नाना अपाये। खोडी अधांतरीं होये। आवेवहीन[४] बाळक ।।८।।**

स्व:तच्या शरीराचे रक्षण त्याला करता येत नाही. अनेक अपघात घडतात. खोड्या करण्यामध्ये एखादा अवयव व्यंग होतो.

**अथवा अपाय चुकले। पूर्वपुण्य पुढें ठाकलें। मातेस ओळखों लागलें। दिवसेंदिवस ।।९।।**

किंवा हे अपायही पुण्याईमुळे झाले नाहीत तर मग ते आईला हळूहळू ओळखू लागते.

**क्षणभरी मातेस न देखें। तरी आक्रंदें रुदन करी दु:खें। ते समई मातेसारिखें। आणीक कांहींच नाहीं ।।१०।।**

क्षणभर माता दिसली नाही तर ते दु:खाने रडू लागते. या वयात त्याला माता हेच सर्वस्व असते.

**आस करून वास[५] पाहे। मातेविण कदा न राहे। वियोग पळमात्र न साहे। स्मरण जालियांनंतरें ।।११।।**

मोठ्या आशेने बालक आईची वाट बघते. तिचा पळमात्रही वियोग सहन होत नाही. तिची सारखीच आठवण बालकाला होते.

**जरी ब्रह्मादिक देव आले। अथवा लक्ष्मीनें अवलोकिलें। तरी न वचे बुझाविलें। आपले मातेवांचुनी ।।१२ ।।**

प्रत्यक्ष ब्रह्मादिक देव आले किंवा लक्ष्मीने समजाविण्याचा प्रयत्न केला तरी त्याची समजूत होत नाही.

**कुरूप अथवा कुलक्षण। सकळांहूनि करंटेपण। तरी नाही तीसमान। भूमंडळीं कोणी ।।१३।।**

आई जरी कुरूप, कुलक्षणी आणि त्याहीपेक्षा करंटी असली तरी तिच्यासारखे अवघ्या भूमंडळात कोणी नाही (असे त्याला वाटते).

(२) बुझावी - समजावी. (३) आंदोळे - कंपित होते. (४) अवेवहीन - अवयवहीन. (५) वास- वाट.

**ऐसें तें केविलवाणें। मातेविण दिसे उणे। रागें परतें केलें तिनें। तरी आक्रंदोनी मिठी घाली ।।१४।।**
याप्रमाणे ते मातेविना केविलवाणे दीन असते. तिने रागाने त्याला झिडकारले तरी मोठ्याने रडत तिलाच मिठी घालते.

**सुख पावे मातेजवळी। दुरी करितांचि तळमळी। अतिप्रीति तयेकाळीं। मातेवरी लागली ।।१५।।**
आईजवळच त्याला सुख वाटते, तिला दूर केले तर तळमळू लागते बालपणी अशी मातेवर त्याची प्रीती असते.

**तंव ते मातेस मरण आलें। प्राणी पोरटें जालें। दुःखें झुर्णीं लागलें। आई आई ह्मणोनी ।।१६।।**
तितक्यात आई मरण पावली तर ते बालक पोरके होते. ''आई, आई '' म्हणून दुःखाने त्याचे शरीर रोडावू लागते.

**आई पाहतां दिसेना। दीनरूप पाहे जना। आस लागलिसे मना। आई येईल ह्मणोनी ।।१७।।**
आई दिसली नाही तर बापुडवाणे लोकांकडे पाहते. आई येईल अशी आशा त्याला वाटते.

**माता ह्मणौन मुख पाहे। तंव ते आपुली माता नव्हे। मग हिंवासलें[६] राहे। दैन्यवाणें ।।१८।।**
कोणातरी स्त्रीच्या मुखाकडे ते पहाते.पण ती आपली आई नाही हे समजताच बिचारे हिरमुसले होते.

**मातावियोगें कष्टलें। तेणें मानसीं दुःख जालें। देहहि क्षीणत्व पावलें। आतिशयेंसीं ।।१९।।**
मातेच्या वियोगाने कष्टी होऊन मनात बालक दुःखी होते आणि त्याचे शरीर खंगू लागते.

**अथवा माताहि वांचली। मायलेंकुरा भेटी जाली। बाळदशा ते राहिली। दिवसेंदिवस ।।२०।।**
किंवा जर आई वाचली, बालकाची व तिची भेट झाली, पुढे बालपण दिवसें दिवस कमी होत जाते.

**बाळपण जालें उणें। दिवसेंदिवस होय शाहाणें। मग ते मायेचें अत्यंत पेखणें। होतें, तें राहिलें ।।२१।।**
बाळपण निघून जाताच ते शहाणे होते. मग आईची वाट पहाणे ही अत्यंतीक ओढ कमी होते.

**पुढें लो[७] लागला खेळाचा। कळप मेळविला पोरांचा। आल्यागेल्या डायाचा। आनंद शोक वाहे ।।२२।।**
नंतर खेळाची आवड लागते. पोरांचा घोळका जमवून डाव सुरू होतो. आल्या गेल्या डावांचा आनंद किवा दुःख वाटू लागते. (आईबद्दलचा लळा ही पहिली अवस्था जाऊन आता खेळाबद्दल आवड ही पुढची अवस्था सुरू होते.)

**मायबापें सिकविती पोटें[८]। तयाचें परम दुःख वाटे। चट लागली न सुटे। संगती लेंकुरांची ।।२३।।**
आई-बाप पोटच्या तळमळीने शिकवू लागतात. त्याला त्याचे दुःखच वाटते. खेळगड्यांच्या संगतीची लागलेली चट काही सुटत नाही.

**लेकुरांमध्यें खेळतां। नाठवे माता आणि पिता। तंव तेथेंहि अवचिता। दुःख पावला ।।२४।।**
त्यांच्यामध्ये खेळतांना आईवडीलांची आठवणही त्याला होत नाही, तितक्यात त्याला तेथेही दुःख प्राप्त होते.

**पडिले दांत फुटला डोळा। मोडले पाय जाला खुळा। गेला माज अवकळा-। ठाकून**

(६) हिंवासले - हिरमुसलेले. (७) लो - नाद, छंद. (८) पोटें - मन लावून.

**आली ।।२५।।**
खेळतांना दात पडतात, डोळा फुटतो किंवा पाय मोडून लंगडा होतो. शरीरात भरलेली मस्ती जाऊन वाईट अवस्था येते.

**निघाल्या देवी आणी गोवर। उठलें कपाळ लागला ज्वर। पोटसुळीं निरंतर। वायगोळा ।।२६।।**
देवी येतात, गोवर उठतो, डोके दुखते, ताप येतो किंवा वायगोळा उठून पोट दुखू लागते.

**लागलीं भूतें जाली झडपणी। जळीच्या मेसको[९] मायेराणी। मुंज्या झोटिंग करणी। म्हैसोबाची ।।२७।।**
भूतबाधा किंवा पाण्यातील मेसको मायराणीणे झपाटले जाणे, मुंजा, झोटींग किंवा म्हसोबाची करणी बाधते. (याप्रमाणे समर्थकालीन समजुती होत्या त्याचे हे वर्णन आहे)

**वेताळ खंकाळ[१०] लागला। ब्रह्मगिऱ्हो संचरला। नेणो चेडा[११] वोलांडिला। कांहीं कळेना ।।२८।।**
वेताळ, खंकाळ (भुतांची दैवते) लागला, की ब्राम्हण समंध बाधा झाली की मंतरलेल्या वस्तू ओलांडल्यामुळे व्यथा उत्पन्न झाली असे लोक तर्क करतात. पण काही कळेनासे होते.

**येक ह्मणती वीरेदेव। येक ह्मणती खंडेराव। येक ह्मणती सकळ वाव। हा ब्राह्मणसमंध ।।२९।।**
कोणी म्हणतो ही वीरदेवाची करणी कोणी म्हणतो खंडोबाचा कोप तर तर कोणी म्हणतो हे सर्व खोटे असून ब्राम्हणसमंधाचीच ही बाधा आहे.

**येक ह्मणती कोणे केलें। आंगीं दैवत घातलें। येक ह्मणती चुकलें। सटवाईचें ।।३०।।**
कोणी म्हणतो मंत्राने याच्या अंगात देवता सोडली आहे तर कोणी सटवाईचा नवस चुकल्याची ही निशाणी आहे.

**येक म्हणती कर्मभोग। आंगी जडले नाना रोग। वैद्य पंचाक्षरी चांग। बोलाऊन आणिले ।।३१।।** **बोलाऊन आणिले ।।३१।।**
एकजण म्हणतात याच्या अंगात नाना रोग झाले हा कर्मभोग आहे. मग चांगले वैद्य आणि पंचाक्षरी बोलावितात.

**येक ह्मणती हा वांचेना। येक ह्मणती हा मरेना। भोग भोगितो यातना। पापास्तव ।।३२।।**
एक म्हणतात हा जगणार नाही तर दुसरे म्हणतात हा मरणार नाही. पूर्वपातकामुळे हा या यातना भेगतो आहे.

**गर्भदुःख विसरला। तो त्रिविधतापें पोळला। प्राणी बहुत कष्टी जाला। संसारदुःखें ।।३३।।**
पूर्वीचे गर्भवासाचे दुःख विसरला तोच त्रिविध तापाने पोळला. अशा प्रकारे संसारदुःखाने प्राणी बेजार होतो.

**इतुकेंहि चुकोन वाचला। तरी मारमारूं शाहाणा केला। लोकिकीं नेटका जाला। नांव राखे ऐसा ।।३४।।**
इतक्या यातनेतून वाचला आणि मातापित्याने व पंतोजींनी मारपीट करून शिकवून शहाणा केला. पूर्वीचा नावलौकिक जगात राखील असा हुशार झाला.

(९) मेसको - काही जलदेवता. (१०) खंकाळ - दुष्ट. (११) चेडा - चेटूक.

**पुढें मायेबापीं लोभास्तव। संभ्रमें मांडिला विव्हाव[१२]। दाऊनियां सकळ वैभव। नोवरी पाहिली।।३५।।**

पुढे पुत्रप्रेमामुळे (हा संभ्रम) त्याच्या विवाहाचा बेत केला. आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करून मुलगी पाहिली.

**वऱ्हाडीवैभव दाटलें। देखोन परमसुख वाटलें। मन हे रंगोन गेलें। सासुरवाडीकडे।।३६।।**

वऱ्हाडी मंडळींची श्रीमंती पाहून याचे मन रंगून गेले, परम समाधान वाटले. सासुरवाडीकडे चित्त लागले.

**मायबापी भलतैसें असावें। परी सासुरवाडीस नेटकें जावें। द्रव्य नसेल तरी घ्यावें । रुण कळांतरें[१३]।।३७।।**

आईवडीलांनी कशाही आर्थिक स्थितीत असावे पण आपण मात्र सजून तेथे जावे. त्यासाठी पैसा नसेल तर कर्जही काढावे.

**आंतर्भाव ते सासुरवाडीं। मायेबापें राहिलीं बापुडीं। होताती सर्वस्वें कुडकुडी। तितुकेंच कार्य त्यांचें ।।३८।।**

अशा प्रकारे याचा सगळा ओढा तिकडे लागला. आईवडील (थंडीने) कुडकुडत राहीले तरी आता चालतात. त्यांचे तेवढेच कार्य!

**नोवरी आलियां घरा। अती हव्यास वाटे वरा। ह्मणे मजसारिखा दुसरा। कोणीच नाहीं।।३९।।**

पत्नी घरी आली की तिची अतिशय ओढ लागते. माझ्यासारखा मीच अशी धन्यता वाटते.

**मायबाप बंधु बहिणी। नोवरी न दिसतां वाटे काणी[१४]। अत्यंत लोधला पापिणीं। अविद्येनें भुलविला ।।४०।।**

विनापत्नी घरातील अन्य माणसे आईवडील, बंधुभगिनी य:कश्चित वाटतात. अविद्या-मोह यामुळे मनुष्य अशा प्रकारे भुलविला जातो.

**संभोग नस्तां इतुका प्रेमा। योग्य जालिया उलंघी सीमा। प्रीती वाढविती कामा-। करितां प्राणी गुंतला।।४१।।**

प्रत्यक्ष स्त्रीसुख मिळण्यापूर्वीची ही अवस्था ! योग्य वेळी ते मिळताच लाजलज्जाच सोडतो. कामजन्य सुखामुळे परस्परांच्या प्रेमात प्राणी गुंतून जातो.

**जरी न देखे क्षण येक डोळां। तरी जीव होय उतावीळा। प्रीतिपात्र अंतर्कळा। घेऊन गेली।।४२।।**

पत्नी क्षणभर जरी दृष्टीआड गेली तरी त्याचा जीव उतावळा होतो. याचे चित्त सर्वस्व प्रेयसीच होते.

**कोवळे कोवळे शब्द मंजुळ। मर्यादा लज्या मुखकमळ। वक्त्रलोकनें केवळ। ग्रामज्याचे[१५] मैंदावें[१६] ।।४३।।**

तिचे कोवळे, मंजुळ शब्द, सौंदर्य, मर्यादेचे संकोचाने वागणे आणि नेत्रकटाक्ष यामुळे कामवासना पशुतुल्य होऊन मन भारून टाकते.

**कळवळा येतां सांवरेना। शरीर विकळ आवरेना। अनेत्र[१७] वेवसाई क्रमेना। हुरहुर वाटे।।४४।।**

प्रीतीपात्राबद्दलच्या कळवळ्याने स्वत:ला सावरू शकत नाही. प्रेमव्हिवल शरीर आवरले जात नाही.

(१२) विव्हाव - विवाह. (१३) कळांतरे - व्याजाने. (१४) काणी - अप्रिय. (१५) ग्रामज्य - ग्राम्य मनोवृत्ती. (१६) मैंदावें - भुलविणे.

आपल्या व्यवसायात मन रमत नाही.

**वेवसाय करितां बाहेरी। मन लागलेंसे घरीं। क्षणक्षणां अभ्यांतरीं। स्मरण होये कामिनीचें ।।४५।।**

बाहेर उद्योगधंदा करतांना मन घरी धाव घेते. कामिनीचे स्मरण सतत अंतरात होते.

**तुह्मीं माझिया जिवांतील जीव। ह्मणोनि अत्यंत लाघव। दाऊनियां चित्त सर्व। हिरोन घेतलें ।।४६।।**

'तुम्ही माझ्या जीवापेक्षाही प्रिय आहात' अशा लाघवी शब्दांनी तिने त्याचे अंत:करण हिरावून घेतलेले असते.

**मैंद[१८] सोइरीक काढिती। फांसे घालून प्राण घेती। तैसें आयुष्य गेलियां अंतीं। प्राणीयांस होये ।।४७।।**

मैंद किंवा ठगलोग प्रथम नात्याची जवळीक दाखवून मग पाशात अडकवून जीव घेतात. अशाच प्रकारे प्रेमपाशातही आयुष्याच्या अखेरीला माणसाची अवस्था होते.

**प्रीति कामिनीसीं लागली। जरी तयेसी कोणी रागेजली। तरी परम क्षिती वाटली। मानसीं गुप्तरूपें ।।४८।।**

बायकोवर इतके प्रेम बसते की जर घरातील कोणी तिच्यावर रागावले तर याच्या मनाला खंत लागते. पण प्रथम वरकरणी ती दाखवीत नाही.

**तये भार्येचेनि कैवारें। मायेबापासीं नीच उत्तरें। बोलोनियां तिरस्कारें। वेगळा निघे ।।४९।।**

बायकोचा नंतर कैवरा घेऊन आईवडीलांना दुरूत्तरे करून घरातून वेगळा निघतो.

**स्त्रीकारणें लाज सांडिली। स्त्रीकारणें सखी सोडिलीं। स्त्रीकारणें विघडिलीं। सकळहि जिवलगें ।।५०।।**

पूर्वीचे सर्व जिवलग बायकोप्रीत्यर्थ सोडून देतो. तिच्यासाठी निर्लज्ज बनतो. तिच्यासाठी आप्तेष्टांशी वाकडा होतो.

**स्त्रीकारणें देह विकिला। स्त्रीकारणें सेवक जाला। स्त्रीकारणें सांडवला। विवेकासी ।।५१।।**

स्त्रीसाठी आपला देहच जणू विकतो व तिचा सेवक होतो. तिच्यासाठी विवेक नष्ट होतो.

**स्त्रीकारणें लोलंगता[१९]। स्त्रीकारणें अतिनम्रता। स्त्रीकारणें पराधेनता। अंगिकारिली ।।५२।।**

बायकोवर (लोलंगता) आसक्ती असल्याने अतिलीनता धरतो. तिच्यासाठी पराधीनता स्वेच्छेने स्वीकारतो.

**स्त्रीकारणें लोभी जाला। स्त्रीकारणें धर्म सांडिला। स्त्रीकारणें अंतरला। तीर्थयात्रा स्वधर्म ।।५३।।**

तिच्यासाठी लोभी होऊन, दानधर्म, तीर्थयात्रा इ. स्वधर्म यांना तो अंतरतो.

**स्त्रीकारणें सर्वथा कांहीं। शुभाशुभ विचारिलें नाहीं। तनु मनु धनु सर्वही। अनन्यभावें अर्पिलें ।।५४।।**

स्त्रीविषक लंपटपणामुळे कोणत्याही शुभ/अशुभ गोष्टींचा विचार केला नाही. तिच्या चरणी तन, मन, आणि धन अनन्यभावाने अर्पण केले.

(१७) अनेत्र - अन्यत्र. (१८) मैंद - घातकी लोक. (१९) लोलंगता - आसक्ति.

**स्त्रीकारणें परमार्थ बुडविला। प्राणी स्वहितास नाडला। ईश्वरीं कानकोंडा जाला। स्त्रीकारणें कामबुद्धी ।।५५।।**
तिच्यासाठी परमार्थाचा विचार सोडून दिला. त्यामुळे स्वहिताला मुकला. कामवासनेमुळे ईश्वराला तोंड दाखविण्यास लाज वाटू लागली.
**स्त्रीकारणें सोडिली भक्ती। स्त्रीकारणें सोडिली विरक्ती। स्त्रीकारणें सायोज्यमुक्ती। तेहि तुछ्य मानिली ।।५६।।**
स्त्रीमुळे विरक्ती नष्ट झाली, भक्ती सोडून दिली. तिच्यापुढे सायुज्यमुक्ती सुध्दा तुच्छ वाटू लागली.
**येके स्त्रियेचेनि गुणें। ब्रह्मांड मानिलें ठेंगणें। जिवलगें तीं पिसुणें[२०]। ऐसीं वाटलीं।।५७।।**
एका बायकोपायी सगळे ब्रम्हांड त्याला ठेंगणे वाटू लागले. पूर्वीचे जिवलग (पिसुणे) शत्रूप्रमाणे वाटू लागले.
**ऐसी अंतरप्रीति जडली। सर्वस्वाची सांडी केली। तंव ते मरोन गेली। अकस्मात भार्या।।५८।।**
अशा प्रकारे जिच्याबद्दल अंतरात प्रेम होते, जिच्यासाठी सर्वस्वाची सांडी केली ती भार्या एकाएकी मरण पावली.
**तेणें मनीं शोक वाढला। ह्मणे थोर घात झाला। आतां कैंचा बुडाला। संसार माझा।।५९।।**
त्यामुळे मनात शोक वाढून म्हणाला 'माझा घात झाला आता कसला माझा संसार!'
**जिवलगांचा सोडिला संग। अवचिता झाला घरभंग। आतां करूं मायात्याग। ह्मणे दुःखें ।।६०।।**
जिच्यासाठी जिवलगांची संगत सोडली ती गेली आता माझे घरच बसले! आता या (मायारूप) संसाराचा त्याग करतो'' असे दु:खाने म्हणतो.
**स्त्री घेऊन आडवी। ऊर बडवी पोट बडवी। लाज सांडून गौरवी। लोकांदेखतां।।६१।।**
स्त्रीच्या प्रेताला आडवे मांडीवर घेऊन लोकलज्जा सोडून छाती व पोट बडवून घेतो.
**ह्मणे माझें बुडालें घर। आतां न करी हा संसार। दुःखें आक्रंदला थोर। घोर घोषे।।६२।।**
'माझे घर बुडाले आता हा संसार करणार नाही' असे दु:खाने मोठ्याने आक्रंदन करतो.
**तेणें जीव वारयावेधला[२१]। सर्वस्वाचा उबग आला। तेणें दुःखें जाला। जोगी कां महात्मा ।।६३।।**
वात झालेल्या भ्रमिष्टाप्रमाणे तो वागू लागला. सगळ्या गोष्टिंचा उबग येऊन दु:खी झाला. जणू जोगी किंवा महात्मा झाला.
**कां तें निघोन जाणें चुकलें। पुन्हा मागुतें लग्न केलें। तेणें अत्यंतचि मग्न जालें। मन द्वितीय संमंधी ।।६४।।**
(पण हे स्मशानवैराग्यच ठरले त्यामुळे) तो कोठे निघून तर गेला नाहीच पण त्याने पुन्हा लग्नही केले आणि या दुसऱ्या संबंधात त्याचे मन मग्नही झाले.
**जाला द्वितीय संमंध। सर्वेंचि मांडिला आनंद। श्रोतीं व्हावें सावध। पुढिले समासीं।।६५।।**
या प्रकारे द्वितीय विवाहासंबंधाबरोबर पुन्हा आनंदाला सुरूवात झाली. आता श्रोत्यांनी पुढे काय होते

(२०) पिसुणें - पिशुन - दुष्ट. (२१) वारयावेधला - वायुचक्राप्रमाणे भ्रमू लागला.

हे श्रवण करण्यास पुढचा समास ऐकावा.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्वगुणपरीक्षानाम समास द्वितीय ।।२।।

## द. ३ स. ३ स्वगुणपरीक्षा (ब)

दुसरे लग्न झाल्यानंतर तो अत्यंत कंजूषपणे वागण्यास प्रारंभ करतो. नवी बायको वयात आलेली नसते. हा स्त्रीसुखाला चटावलेला असतो. मग तो व्यसनी बनतो. त्यामुळे त्याला अति घाणेरडे रोग होतात. त्यातून तो कसाबसा वाचतो.

बायको वयात येऊन संसार सुरू होतो. मग मूलबाळ नाही म्हणून नाना प्रकारचे नवससायास तो करतो. एकदाचे मूलबाळ होते.

।। श्रीराम ।।

**द्वितीय संमंध जाला। दुःख मागील विसरला। सुख मानून राहिला। संसाराचें।।१।।**

दुसरे लग्न झाले, पूर्वीचे दुःख विसरले, संसारामध्ये सुख मानून राहू लागला.

**जाला अत्यंत कृपण। पोटें न खाय अन्न। रुक्याकारणें सांडी प्राण। येकसरा।।२।।**

आता घरखर्चाकडेही ध्यान देऊ लागला. अत्यंत कंजूसपणे वागताना पोटभर अन्नही खाणे सोडले. पै-पैसा जमा करण्यासाठी एकाएकी जिवांवरही उदार झाला.

**कदा कल्पांतीं न वेची। सांचिलेंचि पुन्हा सांची। अंतरीं असेल कैंचि। सद्वासना।।३।।**

कोणत्याही कारणाने खर्च करीतच नाही. फक्त धनसंचय करण्याची दृष्टी असल्याने चांगली भावना मनात उत्पन्न कशी होईल?

**स्वये धर्म न करी। धर्मकर्त्यासहि वारी। सर्वकाळ निंदा करी। साधुजनाची।।४।।**

स्वःत दानधर्म करत तर नाहीच पण करणाऱ्याला अडवतो. साधुसज्जन यांची सर्वकाळ निंदा करतो. (कारण ते कंजूसपणावर टीका करतात.)

**नेणे तीर्थ नेणे व्रत। नेणे अतित अभ्यागत। मुंगीमुखींचें जें सीत। तेंही वेंचून सांची।।५।।**

तीर्थ, व्रत, आलेला अतिथी यांना ओळखत नाही. मुंगीच्या मुखातले शीतसुध्दा वेचून घेण्याइतका (म्हणजे पराकोटीचा) नष्ट होतो इतकी संचयबुध्दी वाढते.

**स्वयें पुण्य करवेना। केलें तरी देखवेना। उपहास्य करी मना-। न ये ह्मणौनी।।६।।**

स्वतःहून पुण्यकर्म करवत नाही आणि इतरांनी केलेले पाहावत नाही. आपल्या मनाला आवडत नाही म्हणून त्यांची चेष्टा करतो.

**देवां भक्तांस उछेदी। आंगबळें सकळांस खेदी। निष्ठुर शब्दें अंतर भेदी। प्राणीमात्रांचें।।७।।**

श्रद्धाळूंचा उच्छेद मांडतो. अंगबळावर सर्वांना दुःख देतो, निष्ठुरपणे बोलून सर्वांच्या अंतःकरणाचा भेद करतो.

**नीती सांडून मागें। अनीतीनें वर्तो लागे। गर्व धरून फुगे। सर्वकाळ।।८।।**

नीतीमार्ग मागे टाकून अनीतिने वागू लागतो. सदा गर्वाने फुगलेला असतो.

**पूर्वजांस सिंतरिलें[१]। पक्षश्राद्धहि नाहीं केलें। कुळदैवत ठकिलें। कोणेपरी।।९।।**
पितरांना फसवितो. त्यांचे श्राद्धपण करीत नाही. कुलदैवतालाही पुढीलप्रकारे फसवितो.
**आक्षत भरिली भाणा[२]। दुजा ब्राह्मण मेहुणा। आला होता पाहुणा। स्त्रियेस मूळ।।१०।।**
स्व:तच्या बहिणीलाच सुवासिनी म्हणून बसवितो आणि तिला (सासरी) नेण्यासाठी आलेल्या तिच्या नवऱ्यासच ब्राम्हण समजून मेहूण म्हणून (भोजन घालतो) कुलदैवत बोळवितो. (अशा प्रकारे कुलधर्म करण्यातही कंजूसपणा करतो.)
**कदा नावडे हरिकथा। देव नलगे सर्वथा। स्नानसंध्या म्हणे वृथा। कासया करावी।।११।।**
हरिकथा आवडत नाही तर देवाची गरजच त्याला नसते आणि उद्‌गारतो की, उगाच स्नानसंध्या तरी कशाला हवी?
**अभिळाषें सांची वित्त। स्वयें करी विस्वासघात। मदें मातला उन्मत्त। तारुण्यपणें।।१२।।**
दुसऱ्यांचा विश्वासघात करून ठकवून धनाची अभिलाषा धरून संचय करतो. तारूण्याच्या मदाने उन्मत होतो.
**तारुण्य आंगीं भरलें। धारिष्ट न वचे धरिलें। करूं नये तेंचि केलें। माहापाप।।१३।।**
तारूण्य अंगी बाणल्याने करू नये ते पाप (वासनातृप्तीसाठी) करतो कारण संयमाचा धीर धरवत नाही.
**स्त्री केली परी धाकुटी। धीर न धरवेचि पोटीं। विषयलोभें सेवटीं। वोळखी सांडिली।।१४।।**
बायको केली होती पण ती वयात आलेली नसल्याने पोटी धीर धरत नाही. शेवटी कामवासनेने कोणास ओळखेनासा झाला.
**माये बहिण न विचारी। जाला पापी परद्वारी। दंड पावला राजद्वारीं। तऱ्हीं पालटेना।।१५।।**
मायबहिणीसारख्यांचा विचारही मनात व आणता परदारागमन करून पाप करतो. त्यामुळे राजशासनाची शिक्षा भोगतो पण वृत्ती पालटत नाही.
**परस्त्री देखोनि दृष्टीं। अभिळाष उठे पोटीं। अकर्तव्यें हिंपुटी। पुन्हां होये।।१६।।**
परस्त्री पाहताच मनात अभिलाषा उत्पन्न होते आणि तिची प्राप्ती होत नसल्यामुळे पुन्हा कष्टी होतो.
**ऐसें पाप उदंड केलें। शुभाशुभ नाहीं उरलें। तेणें दोषें दुःख भरले। अकस्मात आंगीं।।१७।।**
अशा प्रकारे उदंड पाप केले. बरेवाईट कशाचाही विचार केला नाही. त्यामुळे शरीरामध्ये एकाएकी व्याधी भरली.
**व्याधी भरली सर्वांगीं। प्राणी जाला क्षयरोगी। केले दोष आपुले भोगी। सीघ्र काळें।।१८।।**
प्राणी सर्वांगाने व्याधीग्रस्त झाला. त्याला क्षयाचा विकार झाला. स्वत: केलेल्या पापाची फळे तत्काळ प्राप्त झाली.
**दुःखें सर्वांग फुटलें। नासिक अवघेंचि बैसलें। लक्षण जाऊन जालें। कुलक्षण।।१९।।**
(उपदंशासारखी व्याधी होऊन) सर्वांगी सूज आली, नाक बसले (झडले) आणि पूर्वीचे रूप जाऊन कुरूप झाला.
**देहास क्षीणता आली। नाना वेथा उद्भवली। तारुण्यशक्ती राहिली। खंगला प्राणी।।२०।।**

(१) सिंतरिलें – फसविले. (२) भाणा – बहीण.

देह क्षीण झाला. नाना व्याधी उत्पन्न झाल्या. तारूण्यातील शक्ती जाऊन प्राणी खंगून गेला.

**सर्वांगीं लागल्या कळा। देहास आली अवकळा। प्राणी कांपे चळचळां। शक्ति नाहीं ।।२१।।**

सर्वांगामध्ये कळा येऊ लागल्या, देहाला अवकळा आली. अशक्तपणामुळे प्राणी चळचळा कापू लागला.

**हस्तपादादिक झडले। सर्वांगीं किडे पडिले। देखोन थुंको लागले। लहानथोर ।।२२।।**

हात पाय झडू लागले. साऱ्या अंगात किडे पडले. त्याकडे पाहून लोक थंकू लागले.

**जाली विष्ठेची सारणी। भोवती उठली वर्ढाणी[३]। अत्यंत खंगला प्राणीं। जीव न वचे ।।२३।।**

अन्नपचन होईनासे झाल्यामुळे जुलाब होऊन भोवती विष्ठेचे सारवण झाले. त्यामुळे अतिशय घाण (वर्ढाणी) येऊ लागली. तो अगदीच खंगला, पण जीव मात्र जाईना ही अवस्था आली.

**आतां मरण दे गा देवा। बहुत कष्ट जाले जीवा। जाला नाहीं नेणों ठेवा। पातकाचा ।।२४।।**

''आता मला देवा मरण दे मला खूप यातना झाल्या. माझ्या संचिताचा ठेवा अजून संपला नाही का'' असे म्हणू लागला.

**दु:खें घळघळां रडे। जों जों पाहे आंगाकडे। तों तों दैन्यवाणें बापुडें। तळमळी जीवीं ।।२५।।**

जो जो स्व:तच्या अंगाकडे पाहतो तो तो दु:खाने घळघळा रडू लागतो. आपल्या देहाकडे क्षीणपणे पहात बापुडा तळमळत राहतो.

**ऐसे कष्ट जालें बहुत। सकळ जालें वाताहात। दरवडा घालून वित्त। चोरटीं नेलें ।।२६।।**

अशा प्रकारे बरेच कष्ट झाले. घरसंसाराची वाताहात झाली. तशातच चोरट्यांनी दरवडा घालून धन नेले.

**जालें आरत्र ना परत्र। प्रारब्ध ठाकलें विचित्र। आपला आपण मळमूत्र। सेविला दु:खें ।।२७।।**

ना प्रपंच ना परमार्थ अशी अवस्था झाली.

**पापसामग्री सरली। दिवसेंदिवस वेथा हरली। वैद्यें औषधें दिधलीं। उपचार जाला ।।२८।।**

पुढे पाप (भोगून बहुधा) संपले आणि व्यथा नाहिशी झाली. वैद्याचा उपचार झाला. औषधांचा गुण आला.

**मरत मरत वांचला। यास पुन्हां जन्म जाला। लोक ह्मणती पडिला। माणसांमधें ।।२९।।**

मरतामरता वाचून याचा जणू पुनर्जन्म झाला असे लोक म्हणू लागले. आता हा माणसात आला.

**येरें स्त्री आणिली। बरवी घरवात मांडिली। अति स्वार्थबुद्धी धरिली। पुन्हां मागुती ।।३०।।**

माहेरी गेलेली स्त्री परत आणून गृहस्थी सुरू झाली. पूर्वीची स्वार्थबुद्धी पहिल्याप्रमाणेच धरली.

**कांहीं वैभव मेळविलें। पुन्हां सर्वही संचिलें। परंतु गृह बुडालें। संतान नाहीं ।।३१।।**

काही धन मिळविले. पुन्हा सर्व साठा केला. पण संतान नाही, म्हणून घर बुडाले (असे वाटू लागले).

**पुत्रसंतान नस्तां दु:खी। वांज नांव पडिलें लोकिकीं। तें न फिटे म्हणोनी लेकी। तरी हो आतां ।।३२।।**

पुत्रप्राप्ती नसल्याने प्राणी दु:खी झाला लोक वांझोटा म्हणू लागले. निदान कन्याप्राप्ती झाली तरी

(३) वर्ढाणी – दुर्गंधी.

वांझपणा जाईल

**ह्मणोन नाना सायास। बहुत देवांस केले नवस। तीर्थे व्रतें उपवास। धरणें पारणें मांडिलें।।३३।।**

यासाठी अनेक सायास केले. पुष्कळ देवांना नवस केले. तीर्थे, व्रते, उपवास, पारणे यांचा सपाटा लावला.

**विषयसुख तें राहिलें। वांजपणें दुःखीं केलें। तंव तें कुळदैवत पावलें। जाली वृद्धी।।३४।।**

विषय उपभोगाचे सुख दूरच राहिले. वांझपणाने दुःखी केले. अशा वेळी दैवताची कृपा होऊन एकदाचे मूल झाले.

**त्या लेंकुरावरी अतिप्रीति। दोघेहि क्षण येक न विशंभती। कांहीं जाल्या आक्रंदती। दीर्घस्वरें ।।३५।।**

त्या लेकरावर अत्यंत माया केली. उभयता क्षणभरही विसंबत नाहीत. त्याला काही आजार झाल्यास मोठ्याने आक्रोश करीत.

**ऐसी तें दुःखिस्ते। पूजीत होती नाना दैवतें। तंव तेंहि मेलें अवचितें। पूर्व पापेंकरूनी।।३६।।**

अशी ती दोघे दुःखी होऊन नाना दैवतांची पूजा करीत, पण ते मूलही पूर्वपातकामुळे मरून गेले.

**तेणें बहुत दुःख जालें। घरीं आरंधें[४] पडिलें। ह्मणती आह्मांस कां ठेविलें। देवें वांज करूनी।।३७।।**

त्यामुळे दुःख खूपच झाले. (आरंधे) शोकाचा कोलाहल घरात झाला. देवा आम्हाला वांझ करून जिवंत तरी कशाला ठेवले असे म्हणू लागले.

**आह्मांस द्रव्य काय करावें। तें जावें परी अपत्य व्हावें। अपत्यालागी त्यजावें। लागेल सर्व ।।३८।।**

आम्हाला द्रव्य कशाला हवे? ते गेले तरी चालेल पण अपत्य हवे. मुलासाठी द्रव्य गेले तरी चालेल असे म्हणू लागले.

**वांजपण संदिसें गेलें। तों मरतवांज नांव पडिलें। तें न फिटे कांहीं केलें। तेणें दुःखें आक्रंदती ।।३९।।**

वांझपण नुकतेच गेले होते. इतक्यात मरतवांझ असे लोक म्हणू लागले. यास्तव उभयता आक्रोश करू लागली. वंशवेल वाढावी म्हणून पूर्वीच्या काळी काय केले जात होते ते पुढील ओव्यांवरून समजते.

**आमुची वेली कां खुंटिली। हा हा देवा वृत्ती बुडाली। कुळस्वामीण कां क्षोभली। विझाला कुळदीप।।४०।।**

आमची वंशवेल का खुंटली? देवा आमची (वतनाची) वृत्ती बुडाली. कुलदेवता का कोपली? आमचा कुलदीप मालवला.

**आतां लेंकुराचे मुख देखेन। तरी आनंदें राडी[५] चालेन। आणी गळही टोंचीन। कुळस्वामिणीपासीं ।।४१।।**

पुन्हा लेकराचे मुख पहावयास मिळावे म्हणून आनंदाने निखाऱ्यावरून चालेन, कुलस्वामिनीपाशी

(४) आरंधे - अनपत्यत्त्व दुःख.

स्वत:ला गळ टोचून घेईन.

**आई भुता करीन तुझा। नांव ठेवीन केरपुंजा। वेसणी घालीन, माझा–। मनोरथ पुरवी ।।४२।।**

माझ्या मुलास तुझा वाहिलेला सेवेकरी करीन त्याचे नांव 'केरपुंजा' ठेवीन. त्याच्या नाकात तुझ्या नावाची वेसण घालीन. पण माझा पुत्रप्राप्तीचा नवस पुरव.

**बहुत देवांस नवस केले। बहुत गोसावी धुंडिले। गटगटां गिळिले। सगळे विंचु ।।४३।।**

खूप देवतांना नवस केले. अनेक बैरागी शोधले. (त्यांची मनधरणी केली) सबंध विंचू गटागटा गिळले.

**केले समंधाचे सायास।**

**राहाणे[६] घातलें बहुवस। केळें नारिकेळें ब्राह्मणास। अंब्रदानें दिधलीं ।।४४।।**

पिशाच्यांना प्रसन्न करण्याचे सायास केले. अंगात दैवते आणविण्याचा प्रयोग केला. नारळ, आंबे, केळी यांची दाने ब्राम्हणांना दिली.

**केलीं नाना कवटालें[७]। पुत्रलोभें केलीं ढालें[८]। तरी अदृष्ट फिरलें। पुत्र नाहीं ।।४५।।**

नाना प्रकारे जादूटोणा, (कौटाळे) चेटकाचे प्रयोग केले. व्रत अभिषेकादि (ढाळे) पुत्रप्राप्तीसाठी केली. पण दैवच फिरल्यामुळे पुत्र झाला नाही.

**वृक्षाखालें जाऊन नाहाती। फळतीं झाडें करपती। ऐसे नाना दोष करिती। पुत्रलोभाकारणें ।।४६।।**

अस्पर्श असताना झाडाखाली न्हायला जाणे किंवा अमावस्येला नग्नावस्थेत झाडाखाली आंघोळ करणे. त्यामुळे फळती झाडे करपणे हे प्रकारही केले. अशा प्रकारे अनेक पापे केली.

**सोडून सकळ वैभव। त्यांचा वारयावेधला जीव। तंव तो पावला खंडेराव। आणी कुळस्वामिणी ।।४७।।**

सर्व वैभवाबद्दल उदासीन होऊन त्यांची वृत्ती वाऱ्याच्या वावटळीत सापडल्याप्रमाणे झाली. तेव्हा एकदा खंडेराव आणि कुलस्वामिनी देवता पावली.

**आतां मनोरथ पुरती। स्त्रीपुरुषें आनंदती। सावध होऊन श्रोतीं। पुढें अवधान द्यावें ।।४८।।**

त्या उभयतांचे मनोरथ पूर्ण झाले. दोघे आनंदित झाले. यापुढील वृत्तान्त ऐकण्यासाठी श्रोत्यांनी सावध व्हावे.

**सारांश:** (अविचारी माणसाच्या विषयासक्तीचे व त्याच्या उन्मत्तपणाचे वर्णन वरील समासात आहेच.त्याचे फळ कसे मिळते आणि त्यानंतरही तो कसा वागतो याचे चित्र श्री समर्थांनी रंगविले आहे. विचारी जीवनाच्या सूक्ष्म छटा यात आढळतात. अशा जीवनाचा तिटकारा श्रोत्यांना यावा हा यामागील उद्देश आहे.)

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्वगुणपरीक्षानाम समास तृतीय ।।३।।

---

(५) राडी – निखारा. (६) राहाणे – अंगात दैवत घालणे. (७) कवटालें – कृत्रिम. (८) ढालें – मंत्र प्रयोगांपैकी क्षुद्र साधन.

# द. ३ स. ४ स्वगुणपरीक्षा (क)

मुलाबाळांनी घर भरून गेले, पण पैशाची चणचण भासू लागली. मुलींची लग्ने केली. त्यापायी कर्ज झाले. मग तो दोन वर्षे परदेशी गेला, नोकरीचाकरी करून पैसा मिळविला आणि तो घेऊन घरी आला. पण थोड्या दिवसांत पैसा संपल्याने त्याला पुन्हा परदेशी जावे लागले. घर सोडताना फार दुःख झाले. त्याला आईबापांची आठवण झाली व तो मोठ्याने रडू लागला. पण त्याचा उपयोग नाही हे ओळखून मुकाट्याने मार्गस्थ झाला.

**।।श्रीराम।।**

**लेंकुरें उदंड जालीं। तों ते लक्ष्मी निघोन गेली। बापडीं भिकेसी लागलीं। कांहीं खाया मिळेना।।१।।**

कथेतील करंट्याला उदंड मुले झाली तेव्हा त्याची संपत्ती त्यामुळे हळूहळू निघून गेली. मुलांना अन्नसुद्धा मिळेना. तेव्हा ती भीक मागू लागली.

**लेंकुरें खेळती धाकुटीं। येकें रांगती येकेंपोटीं। ऐसी घरभरी जाली दाटी। कन्या आणी पुत्रांची।।२।।**

घरामध्ये धाकटी लेकरे खेळताहेत, एक आईच्या कडेवर आहे तर एक बाळ तिच्या पोटात आहे. याप्रमाणे घरभर मुलांची दाटी होऊन गेली.

**दिवसेंदिवस खर्च वाढला। यावा होता तो खुंटोन गेला। कन्या उपवरी जाल्या, त्यांला-। उजवावया द्रव्य नाहीं।।३।।**

दिवसेंदिवस त्यांच्या पोषणाचा खर्च वाढला आणि प्राप्ती मात्र व्हावयाची तीही होईना. कन्या लग्नासाठी उपवर झाल्या पण त्यांच्या उजवणीसाठी द्रव्य नाही.

**मायेबापें होतीं संपन्न। त्यांचें उदंड होते धन। तेणेंकरितां प्रतिष्ठा मान। जनीं जाला होता।।४।।**

आईवडील सधन होते. त्यांची संपत्ती पुष्कळ होती. त्यामुळे घराला समाजात सन्मान व प्रतिष्ठा होती.

**भरम आहे लोकाचारीं। पहिली नांदणूक नाहीं घरी। दिवसेंदिवस अभ्यांतरीं। दरिद्र आलें।।५।।**

लोकांमध्ये पूर्वीचाच भ्रम कायम होता. पण आतून मात्र घराला निर्धनता येत होती. पहिल्यासारखी नांदणूक राहिली नव्हती.

**ऐसी घरवात वाढली। खातीं तोंडें मिळालीं। तेणें प्राणीयांस लागली। काळजी उद्वेगाची।।६।।**

याप्रमाणे घरप्रपंच वाढला. खाती तोंडे जास्त झाली. त्यामुहे प्राण्याला संसारिक उद्वेग व काळजी प्राप्त झाली.

**कन्या उपवरी जाल्या। पुत्रास नोवऱ्या आल्या। आतां उजवणी केल्या। पाहिजेत कीं।।७।।**

कन्या उपवर झाल्या, मुलांना नोवऱ्या सांगून आल्या. आता त्यांची लग्नकार्ये केलीच पाहीजेत की

अशी चिंता लागली.

**जरी मुलें तैसींच राहिलीं। तरी पुन्हां लोकलाज जाली। ह्मणती कासया व्यालीं। जन्मदरिद्र्यें ।।८।।**

जर मुले अशीच अववाहित राहिली तर लोकांना तोंड दाखवावयास लाज वाटेल. ''ह्या जन्मदरिद्री माणसाने एवढा पोरवडा कशाला केला'' असे ते म्हणतील.

**ऐसी लोकलाज होईल। वडिलांचें नांव जाईल। आतां रुण कोण देईल। लग्नापुरतें ।।९।।**

याप्रमाणे लाजीरवाणे होईल, वडीलांच्या की कीर्तीला बट्टा लागेल. आता लग्नापुरते तर कोणी कर्ज देईल का? हा विचार मनात आला.

**मागें रुण ज्याचें घेतलें। त्यांचे परतोन नाहीं दिल्हें। ऐसें आभाळ कोसळलें। उद्वेगाचें ।।१०।।**

पण मागे ज्यांचे कर्ज घेतले त्याचीही परतफेड केलेली नसल्यामुळे (पुन्हा नव्याने कर्ज कोण देणार या विचारामुळे) मनात उद्वेगाने जणू आभाळच कोसळले.

**आपण खातों अन्नासी। अन्न खातें आपणासी। सर्वकाळ मानसीं। चिंतातुर ।।११।।**

आपण अन्न खातो आणि अन्न आपणास खाते. (याचा प्रत्यय येऊन) मनात सर्वकाळ चिंता लागून राहिली.

**पती अवघीच मोडली। वस्तभाव गहाण पडिली। अहा देवा वेळ आली। आता डिवाळयाची ।।१२।।**

घरातील वस्तू (सावकाराकडे) गहाण पडल्या, पत राहिली नाही. अरे देवा, आता दिवाळे निघण्याची वेळ आली असे म्हणू लागला.

**कांहीं केला ताडामोडा। विकिला घरींचा पाडारेडा। कांहीं पैका रोकडा। कळांतरें काढिला ।।१३।।**

दागिन्यांची काही तोडमोड केली, गोठ्यातील खोंडे, रेडा विकले आणि काही पैसे कर्जाऊ काढले.

**ऐसें रुण घेतलें। लोकिकीं दंभ केलें। सकळ ह्मणती नांव राखिलें। वडिलांचें ।।१४।।**

असे कर्ज काढून वरकरणी लोकात श्रीमंतीचा दिखावा केला. वडीलांचे नांव राखले, असे लोकही म्हणू लागले. (एकदाची मुलामुलींची उजवणी केली)

**ऐसें रुण उदंड जालें। रिणाइतीं[१] वेढून घेतलें। मग प्रयाण आरंभिलें। विदेशाप्रती ।।१५।।**

त्यासाठी खूप कर्ज झाले. सवकारांनी त्याला वेढा घातला. मग द्रवप्राप्तीसाठी विदेशाला प्रयाण करण्याचे ठरविले.

**दोनी वरुषें बुडी मारिली। नीच सेवा अंगिकारिली। शरीरें आपदा भोगिली।। आतिशयेंसीं ।।१६।।**

दोन वर्षे तेथे बुडी मारली. कनिष्ठ दर्जाची नोकरी पत्करली. शरीराला अत्यंत हालअपेष्ठा सोसाव्या लागल्या.

**कांहीं मेळविलें विदेशीं। जीव लागला मनुष्यांपासीं। मग पुसोनियां स्वामीसी। मुरडता[२]**

(१) रिणाइतीं - सावकारानी.

**जाला ।।१७।।**

परदेशात काही द्रव्य मिळविले पण चित्त मात्र घरच्या माणसांकडे लागले होते. म्हणून मालकाची अनुज्ञा घेऊन परत फिरला.

**तंव तें अत्यंत पीडावलीं। वाट पाहात बैसलीं। म्हणती दिवसगती कां लागली। काये करणें देवा ।।१८।।**

इकडे घरातील मंडळींचे हाल झाले होते. ते त्याची वाट पहात होते. ''याला परत येण्यास उतके दिवस का लागले, देवा आम्ही काय करावे.'' असे ते म्हणत होते.

**आतां आम्ही काये खावें। किती उपवासीं मरावें। ऐसियाचे संगतीस देवें। का पां घातलें आह्मांसी ।।१९।।**

''आता आम्ही काय खावे, उपवास तारी किती काढावे ! अशा माणसाच्या संगतीने देवाने आम्हाला का जन्माला घातले!''

**ऐसें आपुलें सुख पाहाती। परी त्याचें दुःख नेणती। आणी शक्ती गेंलियां अंतीं। कोणीच कामा न येती ।।२०।।**

असे म्हणत घरची माणसे स्वतःचे सुख तेवढे पहात होती. पण याच्या हालअपेष्ठा मात्र जाणत नाहीत. वयपरत्वे शेवटी शक्ती निघून गेली म्हणजे कोणीच उपयोगी पडत नाही.

**असो ऐसी वाट पाहतां। दृष्टि देखिला अवचिता। मुलें धावती, ताता। भागलास ह्मणौनी ।।२१।।**

असो. अशा प्रकारे ते वाट पहात असतांना अवचितपणे हा कुटुंबप्रमुख दृष्टी पडतो. ''बाबा, बाबा तुम्ही खूप थकलात'' असे म्हणून त्याला गराडतात.

**स्त्री देखोन आनंदली। ह्मणे आमुची दैन्ये फिटली। तंव येरें दिधली। गांठोडी हातीं ।।२२।।**

बायको त्याला पाहून आनंदित झाली. आपले दैन्य आता संपले असे वाटले. तेव्हा याने बरोबरची गाठोडी (सामान) त्यांच्या हाती दिले.

**सकळांस आनंद जाला। ह्मणती आमुचा वडील आला। तेणें तरी आह्मांला। आंग्या टोप्या आणिल्या ।।२३।।**

सगळे आनंदित झाले. ''आमचे बाबा आले. त्यांनी आम्हास कपडे-आंगडी टोपडी आणली.'' असे मुले म्हणू लागली.

**ऐसा आनंद च्यारी दिवस। सवेंच मांडिली कुसमुस। ह्मणती हें गेलियां आह्मांस। पुन्हा आपदा लागती ।।२४।।**

हा आनंद चार दिवस (पैसा असेतोवर) टिकला. नंतर पुन्हा कुजबूज सुरू झाली की, द्रव्य संपले की पुन्हा आमचे हाल सुरू होतील.

**ह्मणौनि आणिले तें असावें। येणे मागुतें विदेशास जावें। आम्ही हें खाऊं न तों यावें। द्रव्य मेळऊन ।।२५।।**

(२) मुरडता झाला - परत फिरला.

म्हणून याने आणलेले द्रव्य आमच्याकडे द्यावे. याने पुन्हा परदेशी जावे आमचेकडील पैसा संपण्याच्या आत आणखी द्रव्य मिळवून आणावे.

**ऐसी वासना सकळांची। अवघीं सोइरीं सुखाचीं। स्त्री अत्यंत प्रीतीची। तेहि सुखाच लागली ।।२६।।**

बायकोसकट सर्वांची हीच ईच्छा. सर्वजण सुखाचे सोयरे असतात. अत्यंत प्रेम जिच्यावर केले ती पत्नीसुद्धा स्वसुखामागेच लागली.

**विदेसीं बहु दगदला। विश्रांती घ्यावया आला। स्वासहि नाहीं टाकिला। तों जाणें वोढवलें ।।२७।।**

विदेशात खूप दगदग केली, विश्रांती घेण्यासाठी येऊन जरा श्वासही टाकला नाही तोवरच पुन्हा तेथे परतण्याची पाळी आली.

**पुढें अपेक्षा जोसियांची। केली विवंचना मुहूर्ताची। वृत्ति गुंतली तयाची। जातां प्रशस्त न वटे ।।२८।।**

पुढे जाण्याचा मुहूर्त ज्योतीषाकडून काढविला पण मन घरातच रंगले असल्याने जाणे प्रशस्त वाटेना.

**माया[३] मात्रा[४] सिद्ध केली। कांहीं सामग्री बांधली। लेंकुरें दृष्टीस पाहिलीं । मार्गस्त जाला ।।२९।।**

थोडा पैसा वाटखर्चासाठी एकत्र केला. काही शिदोरी घेतली, मुलाबाळांना डोळे भरून पाहून मार्गस्थ झाला.

**स्त्रीयेस अवलोकिले। वियोगें दुःख बहुत वाटलें। प्रारब्धसूत्र तुकलें[५]। रुणानबंधाचें।।३०।।**

बायकोकडे पाहून वियोगाचे दुःख वाढून कष्टी झाला. एकत्र राहण्याचा ऋणानुबंध प्रारब्धामुळे तुटला.

**कंठ सद्गदित जाला। न संवरेच गहिवरला। लेंकुरा आणी पित्याला। तडातोडी जाली।।३१।।**

त्याचा कंठ दाटून आला. गहिवर काही केल्या आवरेना, मुले आणि पिता यांची ताटातूट झाली.

**जरी रुणानबंध असेल। तरी मागुती भेटी होईल। नाहीं तरी संगती पुरेल। येचि भेटीनें तुमची ।।३२।।**

जर ऋणानुबंध असेल तर तुमच्याशी पुन्हा भेट होईल नाहीतर हीच आपली शेवटची भेट.

**ऐसें बोलोन स्वार होये। मागुता फीरफिरों पाहे। वियोगदुःख न साहे। परंतु कांहीं न चले।।३३।।**

असे बोलून घोड्यावर स्वार झाला. मागे वळून पाहताना वियोगाचे दुःख असह्य होते. पण त्यावर काही उपाय चालत नाही.

**आपुला गांव राहिला मागें। चित्त भ्रमलें संसारउद्वेगें। दुःखवला प्रपंचसंगें। अभिमानास्तव ।।३४।।**

आपला गांव मागे राहिला, प्रापंचिक उद्वेगाने मन भ्रमू लागले. माझा संसार या अभिमानाला चिकटून राहील्याने दुःख प्राप्त झाले.

**ते समईं माता आठवली। म्हणे धन्य धन्य ते माउली। मजकारणें बहुत कष्टली। परी मी**

(३) माया - पैसा. (४) मात्रा - फराळाचे साहित्य. (५) तुकलें - तुटले.

**नेणोंचि मूर्ख ।।३५।।**

त्यावेळी मात्र आपल्या आईचे स्मरण त्याला झाले. ''माझ्यासाठी कष्ट उपसणारी ती धन्य धन्य माऊली!'' मला मूर्खाला त्यावेळी ध्यानांत आले नाही.

**आजी जरी ते असती। तरी मजला कदा न विशंभती। वियोग होतां आक्रंदती। ते पोटागि[६] वेगळीच ।।३६।।**

आज जर ती हयात असती तर ती मला कधीच विसंबली नसती. (तिने मला जाऊ दिले नसते) माझ्या वियोगामुळे तिने हंबरडा फोडला असता. मातेच्या पोटातील (आग) कळवळा वेगळाच असतो.

**पुत्र वैभवहीन भिकारी। माता तैसाचि अंगिकारी। दगदला देखोनि अंतरीं। त्याच्या दुःखें दुःखवे ।।३७।।**

मुलगा जरी दरिद्री असला तरी तसाही त्याचा ती स्विकार करते. त्याला दगदग झाली तर त्याच्या दुःखाने तीसुद्धा दुःखी होते.

**प्रपंचविचारें पाहातां। हें सकळ जोडे न जोडे माता। हे शरीर जयेकरितां। निर्माण जालें ।।३८।।**

या प्रपंचाचा एकूण विचार करता अन्य सर्व काही मिळेल. पण जिच्यामुळे आपणास देह लाभला ती माता पुन्हा मिळणार नाही.

**लांब तरी ते माया। काय कराविया सहश्र जाया। परी भुलोन गेलों वायां। मकरध्वजाचेनी[७]।।३९।।**

आई जरी डाकिणीसारखी असली तरी तिची प्रेम आगळेच असते. हजार बायका असल्या तरी त्या काय करायच्या? पण भोगवासनेमुळे लंपट होऊन मी भुलून गेलो.

**या येका कामाकारणें। जिवलगांसिं द्वंद्व घेणें। सखीं तींच पिसुणें। ऐसीं वाटतीं।।४०।।**

या वासनेपायी खऱ्या जिवलगांशी मी भांडलो (वेगळे घर केले) खऱ्या प्रेमळांनाच शत्रू मानले.

**म्हणौन धन्य धन्य ते प्रपंची जन। जे मायेबापाचें भजन। करिती न करिती, मन-। निष्ठुर जिवलगांसीं ।।४१।।**

म्हणून जे प्रापंचिक लोक आईवडीलांची (भक्ती) सेवा करतात, जे जिवलगांशी निष्ठुरतेने वागत नाहीत ते खरोखरी धन्य आहेत.

**संगती स्त्रीबाळकाची। आहे साठी[८] जन्माची। परी मायेबापें कैंची। मिळतील पुढें ।।४२।।**

पत्नी आणि मुले यांची आपली संगत जन्मभर असते. पण मातापिता (एकदा गेले की) पुन्हा कसे मिळतील? (वरिल दोन ओव्यांमधील विचार तरूणपणीच माणसाच्या कानावर पडण्याची जरूरी आहे.)

**ऐसें पूर्वी होतें ऐकिलें। परी ते समईं नाहीं कळलें। मन हें बुडोन गेलें। रतिसुखाचा डोहीं।।४३।।**

हे सारे पूर्वी ऐकले होते. पण विषयसुखाच्या डोहात त्यावेळी मन बुडून गेले असल्याने त्यावेळी त्याचा

(६) पोटागि - कळवळा, प्रेम. (७) मकरध्वजाचेनि - कामविकाराने.

अर्थ कळला नाही.

**हे सखीं वाटतीं परि पिसुणें। मिळालीं वैभवाकारणें। रितें जातां लाजिरवाणें। अत्यंत वाटे ।।४४।।**

जी जिवलग म्हणून मानली ती पैशाच्या आशेने जवळ आली. पण आता रिकाम्या हाताने जाणे लाजिरवाणे होईल.

**आतां भलतैसें करावें। परि द्रव्य मेळऊन न्यावें। रितें जातां स्वभावें। दु:ख आहे।।४५।।**

आता वाटेल ते कष्टाचे काम करून द्रव्य मिळवून नेले पाहिजे. रिक्त हस्ते जाणे दु:खाला कारणीभूत होईल.''

**ऐसी वेवर्धना[९] करी। दु:ख वाटलें अंतरीं। चिंतेचिये महापुरीं। बुडोन गेला।।४६।।**

अशी विवंचना करताना मनाला फार दु:ख झाले. काळजीच्या महापुरात बुडून गेला.

**ऐसा हा देह आपुला। असतांच पराधेन केला। ईश्वरीं कानकोंडा जाला। कुटुंबकाबाडी ।।४७।।**

अशा प्रकारे आपला नरदेह (मूळचा स्वाधीन असता) पराधीन केला. देवाकडे पाठ फिरवून (विन्मुख होऊन) कुटुंबासाठी मात्र काबाडकष्ट करणारा हमाल झाला.

**या येका कामासाठीं। जन्म गेला आटाटी। वय वेचल्यां सेवटीं। येकलेंचि जावें।।४८।।**

या एका विषयवासनामुळे सर्व जन्म कष्टामध्ये गेला आणि आयुष्य संपल्यावर शेवटी एकट्यालाच जावे लागणार!

**ऐसा मनीं प्रस्तावला। क्षण येक उदास जाला। सर्वेंचि प्राणी झळंबला[१०]। मायाजाळें।।४९।।**

अशा विचारांबरोबर प्राणी पश्चात्तापाने उदास झाला. पण त्याबरोबरच पुन्हा (प्रपंचाच्या) मायाजाळात अडकला.

**कन्यापुत्रें आठवलीं। मनींहुनि क्षिती वाटली। म्हणे लेंकुरें अंतरलीं। माझीं मज।।५०।।**

त्याला कन्यापुत्रांची आठवण झाली, दु:ख झाले. 'माझीच लेकरे मला अंतरली' असे म्हणाला.

**मागील दु:ख आठवलें। जें जें होतें प्राप्त जालें। मग रुदन आरंभिलें। दीर्घ स्वरें।।५१।।**

मागील जे जे दु:ख भोगावे लागले त्याचे स्मरण झाले आणि मोठ्याने गळा काढून रडू लागला.

**आरण्यरुदन करितां। कोणी नाहीं बुझाविता। मग होये विचारिता। आपुले मनीं।।५२।।**

परंतु अरण्यात रडू लागल्यास तेथे सांत्वन कोणी करीत नाही. (अरण्यरूदन - अर्थवाही शब्द) मग स्वत:च्याच मनाशी विचार केला.

**आतां कासया रडावें। प्राप्त होतें तें भोगावें। ऐसें बोलोनिया जीवें। धारिष्ट केलें।।५३।।**

''आता कशाला रडायचे? जे क्रमपाप्त होईल ते भोगावे हेच बरे.''असे म्हणून मनाची तयारी केली.

**ऐसा दु:खें दगदला। मग विदेशाप्रती गेला। पुढे प्रसंग वर्तला। तो सावध ऐका।।५४।।**

याप्रमाणे दु:खाने गांजून गेला. मग विदेशी प्रयाण केले. पुढे जो प्रसंग झाला तो सावधपणे ऐका.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्वगुणपरीक्षानाम समास चतुर्थ।।४।।

---

(८) साठी - सोबत. (९) वेवर्धना - विवंचना. (१०) झळंबला - गुंडाळला गेला.

# द. ३ स. ५ स्वगुणपरीक्षा (ड)

समासाच्या आरंभी श्री समर्थांनी दुष्काळाने कुटुंबाच्या काय हालअपेष्टा होतात याचे मार्मिक वर्णन केले आहे. तुकाराम महाराजांना देखील असेच हाल भोगावे लागले.

परदेशी पैसा कमावून स्वदेशी परत आला तर दुष्काळ पडला होता. त्याच्या कुटुंबाची भयंकर वाताहात झाली. रोज जेवायला मिळेना म्हणून तिसरे लग्न केले. हा वृद्ध होऊन थकलेला, त्यात बायको वयात आलेली, घरात मुले मोठी झालेली. घरात सारखी भांडणे होऊन एक दिवस मुलांनी बापाला मारले. शेवटी चार सज्जनांच्या मदतीने वाटे झाले व हा एका झोपडीत वेगळा राहू लागला. तेवढ्यात परचक्र आले, लुटालूट झाली. याची तरुण बायको पळवून नेली व भ्रष्ट केली. अखेर म्हातारपणामुळे हा अत्यंत थकला आणि केव्हा एकदाचा मरतो अशी अवस्था झाली. अशा प्रकारे तो जन्मभर सुखासाठी धडपडला. पण अगदी अंतकाळपर्यंत दु:खच भोगीत राहिला. तात्पर्य, जन्म हाच अवघा दु:खमूळ आहे. दु:ख नाहीसे करण्यास भक्ती पाहिजे.

॥ श्रीराम ॥

**पुढें गेला विदेशासी। प्राणी लागला व्यासंगासी। आपल्या जिवेसीं सोसी। नाना श्रम ॥१॥**

पुढे विदेशाला जाऊन प्राणी उद्योगाला लागला. त्याच्या जीवाला अनेक प्रकारचे कष्ट सोसावे लागले.

**ऐसा दुस्तर संसार। करितां कष्टला थोर। पुढें दोनी च्यारि संवत्सर। द्रव्य मेळविलें ॥२॥**

हा दुस्तर संसार करताना त्याला थोर कष्ट पडले. दोन – चार वर्ष कष्टपूर्वक द्रव्य जमा केले.

**सवेंचि आला देशासी। तों आवर्षण पडिलें देसीं। तेणें गुणे मनुष्यांसी। बहुत कष्ट जाले ॥३॥**

लगेच स्वदेशी परतला, पहातो तो अवर्षणाने देशात दुष्काळ पडला होता. त्यामुळे घरच्यांचे हाल चालले होते.

**येकांच्या बैसल्या अमृतकळा[1]। येकांस चंद्री लागली डोळां। येकें कांपती चळचळां। दैन्यवाणीं ॥४॥**

कोणाची गालफडे बसली होती. तर कोणा एकाचे प्राण गळ्यात आले होते, तर कोणी केविलवाणी होऊन थराथरा अंग कापत होती.

**येकें दीनरूप बैसलीं। येकें सुजलीं येकें मेलीं। ऐसी कन्यापुत्रें देखिलीं। अकस्मात डोळां ॥५॥**

एक दीन होऊन (निमुटपणे) बसलेले, एक सुजलेले तर एक मृत झालेले, अशी मुलामुलींची अवस्था एकाएकी (अकल्पितपणे) त्याने पाहिली.

**तेणें बहुत दु:खी जाला। देखोनियां उभड[2] आला। प्राणी आक्रंदों लागला। दैन्यवाणा ॥६॥**

हे पाहून दु:खाने गळा भरून आला आणि ओक्साबोक्सी मोठ्याने रडू लागला.

(१) अमृतकळा – गालफड.

**तंव ती अवघीं सावध जालीं। म्हणती बाबा बाबा जेऊं घाली। अन्नालागीं मिडकलीं[३]। झडा घालिती ।।७।।**

तेव्हा ती सगळी मुले सावध होतात. ''बाबा, बाबा आम्हाला जेवायला द्या.'' असे म्हणून अन्नासाठी गाठोड्यावर तुटून पडली.

**गांठोडें सोडून पाहाती। हातां पडिलें तेंचि खाती। कांहीं तोंडीं कांहीं हातीं। प्राण जाती निघोनी ।।८।।**

गाठोडे सोडून पाहून हाती पडेल ते खाऊ लागली. अन्नाचा एक घास हातात तर एक तोंडात असा प्रकार होऊन काही मुले मेली.

**तांतडी तांतडी जेऊं घाली। तों तें जेवितां जेवितां कांहीं मेली। कांहीं होतीं धादावलीं। तेंहि मेलीं अजीर्णे।।९।।**

त्याने त्वरेने जेवणे देण्यास सुरूवात केली तेव्हा अन्न खाताखाताच काही मेली तर काही अधाशी लेकरे अजीर्ण होऊन मेली.

**ऐसीं बहुतेकें मेलीं। येक दोनी मुलें उरली। तेंही दैन्यवाणी जालीं । आपले मातेवांचुनी ।।१०।।**

अशा प्रकारे बहुतेक मरण पावली. एकदोन मुलेच उरली. ती आई मेल्यामुळे बापुडवाणी झाली.

**ऐसें आवर्षण आलें। तेणें घरचित बुडालें। पुढें देसीं सुभिक्ष जालें। आतिशयेंसी।।११।।**

अशा प्रकारे दुष्काळाने त्याचे घर उजाड झाले. पण पुढे पाऊस चांगला होऊन पीकपाणी चांगले आले व सुबत्ता आली.

**लेकुरां नाहीं वाढवितें। अन्न करावें लागे आपुलेन हातें। बहु त्रास घेतला चित्तें। स्वयंपाकाचा ।।१२।।**

पण मुलांना वाढविणारे घरात कोणी नाही. त्यामुळे स्वत: त्याला स्वयंपाक करावा लागला. त्याचा त्रास होऊ लागला.

**लोकीं भरीस घातलें। पुन्हा मागुतें लग्न केलें। द्रव्य होतें तें वेचलें। लग्नाकारणें।।१३।।**

मग लोकांनी त्याला पुन्हा लग्न करण्याच्या भरीस घातले. बरोबर आणलेला पैसा खर्च करून पुन्हा त्याने लग्न केले. (यामध्येही सोयीपेक्षा वासनाच प्रभावी! त्यातून पुन्हा अविचार) .

**पुन्हां विदेशासी गेला। द्रव्य मेळऊन आला। तव घरीं कळहो लागला । सावत्र पुत्रांसी।।१४।।**

पुन्हा परदेशात जाऊन पैसा मिळवून प्राणी परत आला तेव्हा घरी त्याची पत्नी आणि सावत्र मुले यांच्यात कलह झाला.

**स्त्री जाली न्हातीधुती। पुत्र देखों न सकती। भ्रताराची गेली शक्ति। वृद्ध जाला।।१५।।**

ती पत्नी वयात आलेली व घरमालकीण झालेली. मुलांना रूचले नाही. हा स्वत: अशक्त व म्हातारा झालेला!

**सदा भांडण पुत्रांचें। कोणी नायकती कोणाचें। वनिता अति प्रीतीचें । प्रीतिपात्र।।१६।।**

(२) उभड - गहिवर. (३) मिडकली - आशाळभूत झाली.

मुलांशी सदा झगडा होत असे. कोणी कोणाचे ऐकून घेत नव्हते. बायको हे प्रीतीपात्र त्यामुळे त्याला धड कोणाचीच कड घेता येत नाही.

**किंत बैसला मना। येके ठाई पडेना। ह्मणोनियां पांचा जणां। मेळविलें।।१७।।**

उभयतात संशय असल्याने एकत्र नांदणे जमेना. पाचजण पंच म्हणून (लवादासाठी) बोलाविले.

**पांच जण वाटे करिती। तों ते पुत्र नायेकती। निवाडा नव्हेचि अंतीं–। भांडण लागलें।।१८।।**

त्यांनी वाटणी करून दिली. पण ते वाटे मुलांना पसंत पडेनात; त्यामुळे भांडण झाले.

**बापलेकां भांडण जाले। लेंकीं बापास मारिलें। तंव ते मातेनें घेतलें। शंखतीर्थ[४]।।१९।।**

बापलेकांचे भांडणात मुलांनी बापाला झोडपिले. तेव्हा मातेने शंख करण्यास सुरूवात केली.

**ऐकोनि मिळाले लोक। उभे पाहाती कौतुक। ह्मणती बापास लेक। कामा आले।।२०।।**

तो ऐकून बघे लोक हा तमाशा पहाण्यास आले. ''मुले बापाच्या चांगली (कामाला) उपयोगाला आली'' असे ते म्हणू लागले.

**ज्या कारणें केले नवस। ज्या कारणें केले सायास। ते पुत्र पितीयास। मारिती पाहा।।२१।।**

''ज्या पुत्रप्राप्तीसाठी नवस सायास केले तीच मुले बापाला मारत आहे पहा!

**ऐसी आली पापकळी[५]। आश्चिर्य मानिलें सकळीं। उभे तोडिती कळी। नगरलोक।।२२।।**

असे हे कलियुग!'' म्हणून ते आश्चर्य करू लागले. गावकऱ्यांनी मग भांडण सोडविले.

**पुढें बैसोन पांच जण। वांटे केले तत्समान। बापलेकांचें भांडण। तोडिलें तेहीं।।२३।।**

पाच जण त्यांच्या समक्ष बसले आणि समान (मान्य होईल अशी) वाटणी केली.

**बापास वेगळे घातलें। कोंपट बांधोन दिधलें। मन कांतेचे लागलें। स्वार्थबुद्धी।।२४।।**

बापाला बेगळे कोपट (झोपडी) बांधून दिले. तेथे रहात असता बायको संसारस्वार्थ साधू लागली.

**कांता तरुण पुरुष वृद्ध। दोघांस पडिला समंध। खेद सोडून आनंद। मानिला तेही।।२५।।**

तरूण पत्नी आणि वृद्ध पती असा संबंध असूनही ती उभयता आनंद मानून राहू लागली.

**स्त्री सांपडली सुंदर। गुणवंत आणी चतुर। ह्मणे माझें भाग्य थोर। वृद्धपणीं।।२६।।**

पत्नी गुणवंत, सुंदर आणि हुषारही होती. 'माझे म्हातारपणी भाग्य थोर' असे त्याला वाटले.

**ऐसा आनंद मानिला। दु:ख सर्वहि विसरला। तंव तो गल्बला जाला। परचक्र आलें।।२७।।**

पूर्वीचे दु:ख विसरून आनंद मानून रहात असताना एकाएकी परचक्र आल्याचा गलबला झाला.

**अकस्मात धाडी आली। कांता बंदी धरून नेली। वस्तभावहि गेली। प्राणीयाची।।२८।।**

घरावर अचानक धाड आली. (आक्रमकांनी) चोरांनी बायको बंदिवान करून धरून नेली आणि चीजवस्तूही लुटून नेल्या.(समर्थकालिन परिस्थितीचे हे वास्तव चित्र त्यांच्या वाड्.मयातही आले आहे.)

**तेणें दु:ख जालें भारी। दीर्घ स्वरें रुदन करी। मनीं आठवे सुंदरी। गुणवंत।।२९।।**

त्या प्रकाराने त्याला अत्यंत खेद झाला व गळा काढून रडू लागला. सुंदर पत्नीच्या गुणांचे स्मरण त्याला झाले.

(४) शंखतीर्थ घेणे – शंखध्वनी करणे. (५) पापकळी – पापमूलक कलह.

**तंव तिची वार्ता आली। तुमची कांता भ्रष्टली। ऐकोनियां आंग घाली। पृथ्वीवरी ।।३०।।**
इतक्यात तिच्याबद्दल बातमी आली की ''तुमच्या स्त्रीला भ्रष्टविले गेले'' ते ऐकून तो जमिनीवर गडबडा लोळू लागला. (अन्य काय करू शकणार?)
**सव्य अपसव्य लोळे। जळें पाझरती डोळे। आठवितां चित्त पोळे। दु:खानळें।।३१।।**
डोळ्यात दु:खाश्रु वहात असता एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर तो लोळू लागला. पत्नीच्या आठवणीने अंत:करणाला दु:खाची डागणी लागली.
**द्रव्य होतें मेळविलें। तेंहि लग्नास वेचलें। कांतेसिही धरून नेलें। दुराचारीं।।३२।।**
मिळविलेले द्रव्य लग्नात खर्च केले आणि दुराचाऱ्यांनी बायकोही पळवून नेली.
**मजहि वृद्धाप्य आलें। लेंकी वेगळे घातलें। अहा देवा वोढवलें। अदृष्ट माझें।।३३।।**
मला वृद्धत्व आले, मुलांनी घरातून वेगळे घातले. 'अहा! देवा रे माझे कमनशिब ओढविले.'
**द्रव्य नाहीं कांता नाहीं। ठाव नाहीं शक्ति नाहीं। देवा मज कोणीच नाहीं। तुजवेगळें ।।३४।।**
पैसा नाही, पत्नी नाही, घर नाही, शक्ती नाही...... देवा आता तुझ्यावाचून कोणीच मला नाही. (आता या करंट्याला देव आठवला).
**पूर्वी देव नाहीं पुजिला। वैभव देखोन भुलला। सेखीं प्राणी प्रस्तावला। वृद्धपणीं ।।३५।।**
पूर्वी देवाची पूजासुद्धा केली नाही, संसारवैभवाची भूल पडली आणि शेवटी म्हातारपणी याला पश्चाताप झाला.
**देह अत्यंत खंगलें। सर्वांग वाळोन गेलें। वातपीत उसळलें। कंठ दाटला कफें।।३६।।**
देह अत्यंत अशक्त झाला. सारे शरीर वाळून गेले. वातपित्ताची व्यथा झाली. कफाने घसा दाटला.
**बळें जिव्हेची बोबडी। कफें कंठ घडघडी।दुर्गंधी सुटली तोंडीं। नाकीं स्लेष्मा वाहे ।।३७।।**
जिभेची बोबडी वळली. (शब्द उच्चारता येत नाहीत) कफाने घसा घरघरू लागला, तोंडाला घाण येऊ लागली, नाकातून शेंबूड वाहू लागला.
**मान कापे चळचळां। डोळे गळती भळभळां। वृद्धपणीं अवकळा। ठाकून आली।।३८।।**
मान चळाचळा कापू लागली, डोळे भळभळा गळू लागले. अशा प्रकारे म्हातारपणी दुर्दशा, दैना उडाली. (वार्धक्यातील दैन्यावस्थेचे हे वास्तव दर्शन वास्तविक येथेच पुरेसे होते. पण त्याचा अधिक तपशील सांगून श्रोत्यांची प्रवृत्ती वैराग्याकडे तत्पूर्वीच व्हावी असा श्रीसमर्थांचा प्रयत्न दिसतो.)
**दंतपाटी उखळली। तेणें बोचरखिंडी पडिली। मुखीं लाळ गळों लागली। दुर्गंधीची ।।३९।।**
दातांची बत्तीशी पडून तोंडाचे बोळके झाले. तोंडातून दुर्गंधीयुक्त लाळ गळू लागली.
**डोळां पाहतां दिसेना। कानीं शब्द ऐकेना। दीर्घ स्वरें बोलवेना। दमा दाटे।।४०।।**

डोळ्यांना दिसत नाही, कानांना बोलणे ऐकू येत नाही, मोठ्याने बोलता येत नाही, दमा लागतो.

**शक्ती पायांची राहिली। बैसवेना मुरकुंडी घाली। बृहती वाजों लागली। तोंडाच ऐसी ।।४१।।**

चालण्याची शक्ती पायात रहात नाही, नुसते नीट बसता देखील येत नाही. आडवा पडू लागला.अपानवायू सरून गुदद्वार वाजू लागले.

**क्षुधा लागतां आवरेना। अन्न समई मिळेना। मिळालें तरी चावेना। दांत गेले।।४२।।**

भूक लागते ती अनावर असते, वेळेवर अन्न मिळत नाही आणि मिळाले तरी दात नसल्यामुळे ते चावता येत नाही.

**पित्तें जिरेना अन्न। भक्षीतांच होये वमन। तैसेंचि जाये निघोन। अपानद्वारें।।४३।।**

पित्तामुळे अन्न पचत नाही. खाताच ओकून पडते. तसेच अपमानद्वाराने बाहेर पडते.

**विष्ठा मूत्र आणि बळस। भोवता वमनें केला नास। दुरुन जातां कोंडे स्वास। विश्वजनाचा ।।४४।।**

विष्ठा, मूत्र आणि बडके यांची सभोवती घाण झाल्याने दुर्गंधीने दुरून जाणाऱ्या लोकांचाही श्वास कोंडतो.

**नाना दुःखें नाना व्याधी। वृद्धपणीं चळे बुद्धी। तऱ्हीं पुरेना आवधी। आयुष्याची ।।४५।।**

वृद्धपणी नाना दुःख, नाना व्याधी लागतात. तशात बुद्धीला चळ लागतो. तरी आयुष्याची वेळ संपत नाही.

**पापण्या भवयाचे केंश। पिकोन झडले निःशेष। सर्वांगी लोंबलें मांस। चिरकुटासारिखें ।।४६।।**

पापण्या, भुवया यांचे केस पिकून झडतात. कातडी सर्वांगी चिरगुटाप्रमाणे लोंबू लागते.

**देह सर्व पारिखें[६] जालें। सवंगडे निःशेष राहिले। सकळ प्राणीमात्र बोले। मरेना कां ।।४७।।**

बरोबरीचे लोकांपैकी कोणी राहिला नाही. मित्रमंडळी निघून गेली, देह तर पराधीन झाला. ‘‘हा का आता मरत नाही?’’ असे सगळे म्हणतात.

**जें जन्मून पोसलीं। तेंचि फिरोन पडिलीं। अंतीं विषम वेळ आली। प्राणीयासी।।४८।।**

ज्यांचे जन्मापासून लालनपालन केले ते सर्व उलटतात. अशा प्रकारे प्राण्याला दुर्दिन आले.

**गेले तारुण्य गेलें बळ। गेलें संसारीचें सळ। वाताहात जालें सकळ। शरीर आणि संपत्ती ।।४९।।**

तारूण्यातील शक्ती गेली. संसारातील उसळी नष्ट झाली. शरीर आणि संपत्ती यांची वाताहात झाली.

**जन्मवरी स्वार्थ केला। तितुकाहि वेर्थ गेला। कैसा विषम काळ आला। अंतकाळीं ।।५०।।**

(६) पारिखे–परस्वाधीन.

जन्मभर स्वार्थ साधला पण तो सगळा वाया गेला. अंतकाळी अशी विषम वेळ आली.

**सुखाकारणें झुरला। सेखीं दु:खें कष्टी जाला। पुढें मागुता धोका आला। येमयातनेचा ।।५१।।**

सुखासाठी शरीर झिजविले पण शेवटी दु:खीकष्टी झाला आणि त्यापुढे यमयातनांचेही भय उभे ठाकले.

**जन्म अवघा दु:खमूळ। लागती दु:खाचे उंगळ। ह्मणोनियां तत्काळ। स्वहित करावें ।।५२।।**

जन्म घेणे हेच वास्तविक दु:याचे मूळ कारण आहे. तेथे दु:याचे इंगळ लागतात. म्हणून तत्परतेने स्वत:च्या हिताचा विचार करावा.

**असो ऐसें वृद्धपण। सकळांस आहे दारुण। ह्मणोनियां शरण। भगवंतास जावें।।५३।।**

असो अशा प्रकारे वृद्धपण दारूण असते व ते सकळांना येते. म्हणून भगवंताला शरण जावे.

**पुढें वृद्धीस[७] तत्त्वतां। गर्भी प्रस्तावा होता। तोचि आला मागुता। अंतकाळीं।।५४।।**

गर्भावस्थेत असताना बुद्धीला जो पश्चाताप झाला होता तोच पुढे म्हातारपणी अंतकाळ ओढवला.

**ह्मणौनि मागुतें जन्मांतर। प्राप्त मातेचें उदर। संसार हा अतिदुस्तर। तोचि ठाकून आला ।।५५।।**

म्हणून पुन्हा जन्मांतरानंतर मातेच्या उदरात जाणे प्राप्त झाले. अत्यंत दुस्तर असा संसार पुढे येऊन ठाकला.

**भगवद्भजनावांचुनी। चुकेना हे जन्मयोनि। तापत्रयांची जाचणी। सांगिजेल पुढें।।५६।।**

भगवतांच्या भक्तीवीण जन्ममरण फेरा चुकायचा नाही. यातना टाळता येणार नाहीत. पुढील समासांमध्ये माणसाला जीवनामध्ये भोगाव्या लागणाऱ्या त्रिविध तापांच्या यातना सांगणार आहे.

(**उपसंहार :** स्वगुणपरीक्षा नामक चार समासांचा भावार्थ आपण पाहीला. ५२ व्या ओवीमध्ये ''जन्म अवघा दु:खमूळ'' असे म्हटले आहे, त्याचेच विवरण स. २,३,४ व ५ मध्ये झाले आहे. याचा परिणाम म्हणून अत्यंतिक स्वार्थी, आत्मकेंद्रित जीवनपद्धतीने मनुष्य आज जे जीवन जगत आहे त्याला खचितच हादरा बसलेला दिसत आहे.)

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्वगुणपरीक्षानाम समास पंचम।।५।।

# दासबोध परिचय : प्रश्नपत्रिका २ री

(दासबोध द. ३ स. २, ३, ४ व ५ वर आधारित)

प्र. १ एका करंट्याचा जीवनवृत्तांत वरील समासामध्ये समर्थांनी कथन केला आहे. तो सुमारे पंधरा ओळीत लिहा.

प्र. २ माणसाला मातेच्या ममतेचे आणि ईश्वराच्या कृपेचे स्मरण केव्हा येते, असे वरील समासात

(७) वृद्धीस – वृद्धपणी.

दाखविले आहे? फक्त ओव्या लिहा.

प्र. ३ ‘‘बालकाचे मानसशास्त्र’’ समर्थांना अवगत होते, असे या समासांमध्ये कोठे दिसते? ओव्या लिहा.

प्र. ४ पुढील ओव्यांचे चरण ज्यामध्ये आहेत, त्या ओव्या संपूर्ण लिहा.

(१) जन्मवरी स्वार्थ केला। (२) म्हणौन धन्य धन्य ते प्रपंची जन। (३) लेकुरें उदंड जालीं।

## स्वाध्याय ३ रा : (दशक २ मधील समास १ व १० वर आधारित)

**स्वाध्याय सारांश :** मनुष्याला स्वत:चे अवगुण समजले तरच त्यांचा त्याग करण्याचे त्याच्या मनात येऊ शकेल. त्या दृष्टीने मूर्खलक्षणे आणि पढतमूर्ख लक्षणे हे दोन समास दासबोधात आले आहेत. समर्थांना नवा समाज घडवावयाचा होता, माणसांना शहाणे करावयाचे होते म्हणून त्याकाळी त्यांनी हे समास लिहले ते आजच्या काळातही अभ्यासनीय आहेत. आपण सर्वजण लौकिक दृष्टीने साक्षर आहोत, पण आपण सुशिक्षित आहोत किंवा कसे, हे मात्र सांगवत नाही. साक्षरावर सुसंस्कार घडले तरच तो सुशिक्षित होतो असे संस्कार घडविणारा ‘पढतमूर्ख लक्षण निरूपण’ चा समास आहे. न्यायाचे नियम झुगारून मुक्तक्रिया प्रतिपादन करणारा, स्वधर्म आणि उपासना यांची निंदा करणारा, स्वधर्म आणि उपासना यांची निंदा करणारा, सर्व जीवनभर द्रव्य, दारा, यांचाच विचार करणारा, समाजाचा मोठाच वर्ग समर्थांच्या काळामध्ये होता. तो तसा आजही आहे. त्याच्या डोळ्यात दिव्य अंजन घालून विचारप्रवृत्त करणारा हा समास आपणास खचित अभ्यासनीय वाटेल.

## दशक दुसरा : मूर्खलक्षणांचा

जगामध्ये फार पूर्वीपासून मूर्खांना समाजामध्ये मान्यता (?) मिळाली आहे. बरे, असा मानवसमाज नाही की, ज्याच्यामध्ये मूर्खांचे अस्तित्व आढळत नाही. मोठमोठ्या विचावंतांनी, तत्त्ववेत्त्यांनी आणि साहित्यिकांनी मूर्ख माणसाचे वर्णन करून ठेवले आहे. मूर्खाची व मूर्खपणाची सर्वमान्य व्याख्या करणे सोपे नाही. जीवनात आपले हित साधण्याची संधी असून, जो ते साधून घेत नाही तो मूर्ख समजावा. परमार्थ साधणे किंवा आत्मज्ञान करून घेणे, हे मानवी जीवनाचे खरे ध्येय आहे. ते साधण्यास नरदेहच अत्यंत उपयोगी पडतो. या दोन मूलभूत गोष्टी पहिल्या दशकात स्पष्टपणे मांडल्या. परमार्थ किंवा आत्मज्ञान याच्या उलट प्रपंच किंवा अज्ञान होय. अज्ञान नाहीसे करण्यासाठी दासबोध सांगितला आहे. या कारणाने अज्ञानाचे स्वरूप सांगण्यास श्री समर्थांनी दुसऱ्या दशकात आरंभ केला. अज्ञानी माणसांच्या वागण्यातच अखेर अज्ञान प्रगटपणे आढळते. यासाठी मूर्ख, कुविद्या, रजोगुण, तमोगुण व पढतमूर्ख यांच्या एकंदर आचरणांचे सविस्तर वर्णन केले. प्रापंचिक माणसे देहबुद्धीत वावरतात. देहबुद्धी एकदम नाहीशी होत नाही. त्यासाठी नीतीचे आचरण आणि वैराग्याचा अभ्यास दोन्ही अवश्य असतात. म्हणून सद्विद्या, सत्वगुण आणि विरक्त यांची लक्षणे सांगितली. आत्मज्ञानाचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवले, सत्त्वगुणाचा विकास केला आणि विरक्ती अंगी बाणली, तरच परमार्थसाधना नीट चालते. म्हणून या दशकात परमार्थसाधनेचा पाया श्रीसमर्थांनी घातला.

## द. २–१ : मूर्खलक्षण

**प्रास्ताविक :** समाजामध्ये अत्यंत स्वार्थी, आळशी, झोपाळू, हीनलक्षणी माणसे आढळतात.'मी आणि माझे' एवढा एकच विचार त्यांचे चित्तामध्ये असतो. अशांची लक्षणे श्रीसमर्थ येथे सांगत आहेत. जीवनामध्ये खरे हित साधण्याची संधी असूनही तिचा ते उपयोग करून घेऊ शकत नाहीत, त्यांना मूर्ख ही पदवी दिली आहे. त्यांची लक्षणे त्यागार्थ सांगितली आहेत.

श्री समर्थांच्या मते प्रपंचाला सर्वस्वी खरा मानून जीवन जगणारा अज्ञानी माणूस तो मूर्ख होय. हा मूर्ख अत्यंत स्वार्थी असल्याने सगळे जग माझ्या सुखासाठी आहे असे समजतो. मी व माझे यापलीकडे त्याला काही दिसतच नाही. देहच मी आहे, या घट्ट कल्पनेमुळे देहसुखासाठी तो सारखा हापापलेला असतो. अत्यंत विकारवश असल्याने त्याचे मन द्वेषमत्सराने भरून वाहते यात नवल नाही. परंतु भोग भोगताना विकारांच्या पायी तो मनाची किंवा जनाची लाज, मर्यादा बाळगीत नाही. धर्म, नीती किंवा न्याय यांची चाड न धरता, तो अनीतीने खूप द्रव्य मिळवितो आणि निंद्य प्रकारांचा सहज अंगीकार करतो. आईबाप, गुरू, देव, स्वामी यांपैकी कोणीच त्याला पूजनीय वाटत नाहीत. ईश्वरास तर तो विसरलेलाच असतो. पण कधी काळी देव आठवलाच तर प्रपंचात भोग कमी पडला म्हणून तो त्याला शिव्या देतो. चंचल बुद्धीचा हा मूर्ख माणूस मायेच्या जिवलगांना कधी प्रेमाने वागवीत नाही, आळसात वेळ घालवतो व सदासर्वकाळ चिंताग्रस्त असतो. तात्पर्य श्रीसमर्थांचा मूर्ख म्हणजे समाजातील अत्यंत स्वार्थी, विकारवश, कुविचारी, भोगी, हीनलक्षणी आणि आळशी माणूस होय.

**।। श्रीराम ।।**

**ओं नमोजि गजानना। येकदंता त्रिनयना। कृपादृष्टि भक्तजना। अवलोकावें।।१।।**

हे ओंकाररूपी, एकदंत, त्रिनयन असलेल्या गजानना तुला माझे वंदन. भक्तजनांकडे तुझी कृपादृष्टी असो.

**तुज नमूं वेदमाते। श्रीशारदे ब्रह्मसुते। अंतरीं वसे कृपावंते। स्फूर्तिरूपें।।२।।**

वेदांची जननी असलेल्या, ब्रम्हदेवकन्ये, कृपावंत शारदामाते, तू स्फूर्तीदेवता आहेस. माझ्या चित्तामध्ये तू रहावेस.

**वंदून सद्‌गुरुचरण। करून रघुनाथस्मरण। त्यागार्थ मूर्खलक्षण। बोलिजेल।।३।।**

सद्‌गुरूंच्या चरणांना वंदन करून, उपास्य दैवत रघुनाथचे स्मरण करून मूर्ख-लक्षणे सांगतो, ती ऐकावी आणि त्यांचा त्याग करावा, हाच सांगण्याचा हेतू आहे.

**येक मूर्ख येक पढतमूर्ख। उभय लक्षणीं कौतुक। श्रोतीं सादर विवेक। केला पाहिजे।।४।।**

अज्ञान असल्याने एक मूर्ख असतो तर दुसरा ज्ञानी असूनही मूर्खाप्रमाणे वागतो. म्हणून तो पढतमूर्ख असतो. या उभयतांच्या लक्षणांची मौज असते. श्रोत्यानी विचारपूर्वक लक्षणे श्रवण करावीत.

**पढतमूर्खाचें लक्षण। पुढिले समासीं निरूपण। सावध होऊनि विचक्षण। परिसोत पुढें।।५।।**

पढतमूर्ख लक्षणे पुढच्या समासात सांगितली आहेत. ती चिकित्सक वृत्तीने श्रोत्यांनी श्रवण करावी.

**आतां प्रस्तुत विचार। लक्षणें सांगतां अपार। परि कांहीं येक तत्पर। होऊन ऐका।।६।।**

आता येथे मूर्खलक्षणांचा विचार आहे. ती अनंत आहेत. पण त्यातील थोडीफार सांगत आहे. ती सावधतेने ऐकावी.

**जे प्रपंचिक जन। जयांस नाहीं आत्मज्ञान। जे केवळ अज्ञान। त्यांची लक्षणें।।७।।**

जे केवळ प्रपंचाचाच विचार करतात, ज्यांना आत्मज्ञान नसते,जे मूर्तीमंत अज्ञानी असतात त्यांची ही लक्षणे.

**जन्मला जयांचे उदरीं। तयांसि जो विरोध करी। सखी मानिली अंतुरी। तो येक मूर्ख।।८।।**

मातापित्यांच्या उदरी जन्म घेतो व त्यांनाच विरोध करून बायकोचे म्हणणे मनापासून मान्य करतो तो एक मूर्खच असतो.

**सांडून सर्वहि गोत। स्त्रीआधेन जीवित। सांगे अंतरींची मात। तो येक मूर्ख।।९।।**

सर्व आप्तेष्टांना सोडून स्त्रीच्या अधीन होतो तिलाच अंत:करणातील विचार सांगतो. (तो एक मूर्ख, हे शब्द प्रत्येक ओवीच्या अखेरीला आहेत. भावार्थामध्ये ते शब्द पुन्हा लिहिले नाहीत ते गृहीत मानावे.)

**परस्त्रीसीं प्रेमा धरी। श्वशुरगृहीं वास करी। कुळेंविण कन्या वरी। तो येक मूर्ख।।१०।।**

परस्त्रीवर प्रेम (विषयवासनेपोटे) करतो, नित्य सासुरवाडीला मुक्काम करतो, कुलशील घराणे यांचा विचारही न करता लग्न करतो.

**समर्थावरी अहंता। अंतरीं मानी समता। सामर्थ्येविण करी सत्ता। तो येक मूर्ख।।११।।**

आपणाहून जे थोर आहेत, त्यांच्याशी बरोबरी अहंभावनेमुळे करतो. सामर्थ्य (अधिकार) नसताना इतरांवर सत्ता गाजवितो.

**आपली आपण करी स्तुती। स्वदेशीं भोगी विपत्ति। सांगे वडिलांची कीर्ती। तो येक मूर्ख ।।१२।।**

आपली आपणच वाखाणणी करतो, आपल्या देशात, आपल्याच घरी हालअपेष्टा भोगतो, आपल्या वाडवडिलांची तोंडाने किर्ती गातो (आपण नाकर्ते असताना आपल्या पूर्वजांच्या कर्तबगारीबद्दल बढाया मारतो.)

**अकारण हास्य करी। विवेक सांगतां न धरी। जो बहुतांचा वैरी। तो येक मूर्ख।।१३।।**

अकारणच हासत सुटतो, विवेकाच्या गोष्टी कोणी सांगितल्या तर ऐकत नाही, अनेकांशी ज्याचे वैर असते.

**आपुलीं धरूनियां दुरी। पराव्यासीं करी मीत्री। परन्यून बोले रात्रीं। तो येक मूर्ख।।१४।।**

स्वजनांशी तुटकणाणे वागतो, व परक्याशी सलगी करतो, (रात्री जेव्हा मानसिक शांती आवश्यक असते तेव्हा) दुसऱ्यांची निंदा नालस्ती करतो.

**बहुत जागते जन। तयांमध्ये करी शयन। परस्थळी बहु भोजन-। करी तो येक मूर्ख।।१५।।**

अनेक लोक जागत असता आपण मध्येच घोरत पडतो, दुसऱ्याचे घरी गेल्यावर जो खादाडपणा करतो.

**मान अथवा अपमान। स्वयें करी परिच्छिन्न। सप्त वेसनी[१] जयाचें मन। तो येक मूर्ख ।।१६।।**
आपला झालेला सन्मान किंवा कोणी केलेला अपमान जो स्वतःच इतरांना कथन करतो, सात व्यसनांमध्ये ज्याचे मन रंगलेले असते. (सात व्यसने - द्युत, वेश्यागमन, चोरी, चहाडी, परस्त्रीगमन, लघुपक्षीक्रिडा कबुतरे, बुलबुल इ. पक्षांचे खेळ) किन्नरगायन (तमासगीराची गाणी) नायकिणींची गाणी ऐकणे.

**धरून परावी आस[२]। प्रेत्न सांडी सावकास। निसुगाईचा संतोष-। मानी, तो येक मूर्ख ।।१७।।**
दुसऱ्यांवर विसंबून जो स्वत: काहीच यत्न करीत नाही. आळसात सुख मानतो.

**घरीं विवेक उमजे। आणि सभेमध्यें लाजे। शब्द बोलतां निर्बुजे। तो येक मूर्ख ।।१८।।**
घरी शहाणपणाच्या गोष्टी बोलतो पण सभेमध्ये मात्र बोलण्यास लाजतो व बोलताना गांगरतो.

**आपणाहून जो श्रेष्ठ। तयासीं अत्यंत निकट। सिकवणेचा मानी वीट। तो येक मूर्ख ।।१९।।**
आपले जे वरीष्ठ अधिकारी असतील त्यांच्याशी सलगी करतो, कोणी हितप्रद सल्ला दिला तर तिरस्कार करतो.

**नायेकें त्यांसी सिकवी। वडिलांसी जाणीव दावी। जो आरजास[३] गोवी[४]। तो येक मूर्ख ।।२०।।**
जो ऐकतच नाही त्याला शिकविण्याचा यत्न करतो. वरिष्ठांपाशी बेदरकारपणे वागतो, सज्जनांना घोट्याळ्यामध्ये गोवतो.

**यकायेकीं येकसरा। जाला विषईं निलाजिरा। मर्यादा सोडून सैरा-। वर्ते, तो येक मूर्ख ।।२१।।**
अचानकपणे विषयोपभोगांचे सेवन करण्यासाठी निर्लज्ज होतो, मर्यादा सोडून वागतो.

**औषध न घे असोन वेथा। पथ्य न करी सर्वथा। न मिळे आलिया पदार्थां। तो येक मूर्ख ।।२२।।**
आजार असूनही औषधपाण्याचे पथ्य सांभाळीत नाही, औषध घेत नाही, प्राप्त परिस्थितीमध्ये जो संतोष मानत नाही.

**संगेंविण विदेश करी। वोळखीविण संग धरी। उडी घाली महापुरीं। तो येक मूर्ख ।।२३।।**
सोबत पाहिल्याविना जो परदेशात जातो, ओळख नसतानाही संगत करतो, महापुरामध्ये उडी घालतो.

**आपणास जेथें मान। तेथें अखंड करी गमन। रक्षूं नेणे मानाभिमान। तो येक मूर्ख ।।२४।।**
जेथे मान दिला जातो तेथे नेहमीच जाऊ लागतो, आपल्या मानापमाना बद्दल जो जागरूक नसतो.

**सेवक जाला लक्ष्मीवंत। तयाचा होय अंकित। सर्वकाळ जो दुश्चित। तो येक मूर्ख ।।२५।।**
चाकराला श्रीमंती प्राप्त होताच त्याच्या हाताखाली गुलामी करतो, जो नेहमी चित्त थाऱ्यावर नसल्याप्रमाणे वागतो.

**विचार न करीतां कारण। दंड करी अपराधेंविण। स्वल्पासाठीं जो कृपण। तो येक**

(१) सप्त वेसनी - द्यूत, वेश्यागमन, चोरी, चहाडी, परदारागमन, लघुपक्षीक्रीडा, किन्नरी गायन.
(२) परावी आस - परक्याची आशा. (३) आरज - श्रेष्ठ. (४) गोवी - घोटाळ्यात पडणे.

**मूर्ख ।।२६।।**
कारणाचा विचार न करता, अपराधावाचून दंड करतो, क्षुल्लक बाबतीतही तो कंजूषपणा दाखवितो.
**देवलंड पितृलंड। शक्तिवीण करी तोंड। ज्याचे मुखीं भंडउभंड[५]। तो येक मूर्ख ।।२७।।**
कुलदेवतेचे आचार न पाळणारा, पितरांचे श्राद्ध पक्ष न करणारा, ताकद नसतांना मध्येच तोंड घालून वायफळ शिवीगाळ करणारा.
**घरीच्यावरी खाय दाढा। बाहेरी दीन बापुडा। ऐसा जो कां वेडमूढा। तो येक मूर्ख ।।२८।।**
घरच्या लोकांवर कातावतो आणि बाहेर मात्र गोगलगाईसारखा बनतो, असा जो वेडसर, मंदबुद्धी असतो.
**नीत यातीसीं सांगात। परांगनेसी येकांत। मार्गे जाय खात खात। तो येक मूर्ख ।।२९।।**
नीच वृत्तीच्या माणसांची संगत धरतो, परस्त्रीशी एकांत करतो, रस्ता चालताना खात खात जातो.
**स्वयें नेणें परोपकार। उपकाराचा अनोपकार। करी थोडें बोले फार। तो येक मूर्ख ।।३०।।**
आपण परोपकार करीत नाहीच पण उपकारकर्त्यांची अपकाराने फेड करतो. कृती थोडी पण बडबड फार करतो.
**तपीळ खादाड आळसी। कुश्चीळ कुटीळ मानसीं। धारीष्ट नाहीं जयापासीं। तो येक मूर्ख ।।३१।।**
तापट, खादाड, आळशी, नीतीभ्रष्ट, कुटील मनाचा आणि धारिष्ट्य न धरणारा.
**विद्या वैभव ना धन। पुरुषार्थ सामर्थ्य ना मान। कोरडाच वाहें अभिमान। तो येक मूर्ख ।।३२।।**
विद्या, संपत्ती, ऐश्वर्य, पुरूषार्थ, सामर्थ्य किंवा मान यापैकी काहीच नसताना जो फुकटच अभिमानाने वागतो.
**लंडी लटिका लाबाड। कुकर्मी कुटीळ निचाड[६]। निद्रा जयाची वाड। तो येक मूर्ख ।।३३।।**
उद्धट, खोटारडा, लुच्चा, दुष्कर्मी, वक्रमार्गाने जाणारा, निर्लज्ज व अतिशय झोपाळू असतो.
**उंची जाऊन वस्त्र नेसे। चौबारां[७] बाहेरी बैसे। सर्वकाळ नग्न दिसे। तो येक मूर्ख ।।३४।।**
उंचावर उभे राहून वस्त्र नेसतो, चव्हाट्यावर एकटा बसून रहातो, जो सदा सर्वदा अर्धनग्नावस्थेत दिसतो.
**दंत चक्षु आणि घ्राण। पाणी वसन आणी चरण। सर्वकाळ जयाचे मळिण। तो येक मूर्ख ।।३५।।**
ज्याचे दात, डोळे व नाक, (पाणी) = हात, कपडे व पाय अत्यंत मलिन असतात.
**वैधृति आणि वितिपात। नान कुमुहूर्ते जात। अपशकुनें करी घात। तो येक मूर्ख ।।३६।।**
ज्योतीष शास्त्राच्या दृष्टीने अशुभ काळी, व्यक्तिपाताच्या कुमुहूर्तावर प्रवासाला निघतो, व अपशकुनाने दुसऱ्याचा घात करतो.
**क्रोधें अपमानें कुबुद्धि। आपणास आपण वधी। जयास नाहीं दृढ बुद्धि। तो येक**

(५) भंडउभंड - बडबड. (६) निचाड - उर्मट. (७) चौबारां - चव्हाटा.

**मूर्ख ।।३७।।**
रागाच्या भरामध्ये, किंवा अपमानामुळे दुर्बुद्धी होऊन जो आत्महत्या करतो, ज्याला स्थिर राहणारी बुद्धी नाही.

**जिवलगांस परम खेदी। सुखाचा शब्द तोहि नेदी। नीच जनास वंदी। तो येक मूर्ख ।।३८।।**
घरच्या जिवलगांना दु:ख देतो, सुखाचा शब्दही बोलत नाही. नीच लोकांची हांजी हांजी करतो.

**आपणास राखे परोपरी। शरणागतांस अव्हेरी। लक्ष्मीचा भर्वसा धरी। तो येक मूर्ख ।।३९।।**
आपल्या स्व:तचे परोपरीने रक्षण करतो, जो शरणागत आहे त्याला अव्हेरतो (दूर लोटतो), पैशाचा (लक्ष्मीचा) भरवसा धरतो.

**पुत्र कळत्र आणि दारा। उतुकाचि मानुनियां थारा। विसरोन गेला ईश्वरा। तो येक मूर्ख ।।४०।।**
मुलगा, कुंटुंब व पत्नी यांचाच फक्त आश्रय मानून जो ईश्वराला विसरतो.

**जैसें जैसें करावें। तैसें तैसें पावावें। हें जयास नेणवे। तो येक मूर्ख ।।४१।।**
करावे तसे भरावे हे सत्य ज्याला समजत नाही.

**पुरुषाचेनि अष्टगुणें। स्त्रियांस ईश्वरी देणें। ऐशा केल्या बहुत जेणें। तो येक मूर्ख ।।४२।।**
पुरूषाच्या आठ पट आसक्ती स्त्रीयांना ईश्वराने दिली आहे, अशा अनेक बायकांशी लग्न करतो.

**दुर्जनाचेनि बोलें। मर्यादा सांडून चाले। दिवसा झांकिले डोळे। तो येक मूर्ख ।।४३।।**
दुर्जनांच्या सांगण्यावरून अमर्यादेने वागतो, ज्ञान असून जो आंधळा बनतो. (दिवसाढवळ्या डोळे झाकून पापकर्मे करतो हा दुसरा अर्थ)

**देवद्रोही गुरुद्रोही। मातृद्रोही पितृद्रोही। ब्रह्मद्रोही स्वामीद्रोही। तो येक मूर्ख ।।४४।।**
देव, गुरू, माता, पिता, ब्राम्हण व स्वामी यांच्याशी प्रतारणा (द्रोह) करतो.

**परपीडेचें मानी सुख। परसंतोषाचें मानी दु:ख। गेले वस्तूचा करी शोक। तो येक मूर्ख ।।४५।।**
दुसऱ्याला दु:ख झाल्यावर जो आनंदतो आणि परसुख पाहून जो दु:खी होतो, हरवलेल्या वस्तूंबद्दल खेद करीत रहातो.

**आदरेंविण बोलणें। न पुसतां साक्ष देणें। निंद्य वस्तु अंगिकारणें। तो येक मूर्ख ।।४६।।**
दुसऱ्याच्या मनात आदर नसताना बोलणे, विचारले नसतानाही साक्ष देणे, निंद्य वस्तूंचा अंगिकार करणे.

**तुक[८] तोडून बोले। मार्ग सांडून चाले। कुकर्मी मित्र केले। तो येक मूर्ख ।।४७।।**
(तुक =) महत्व जाईल असे बोलतो, सन्मार्ग सोडून चालतो. कुकर्मे करणारांशी मैत्री धरतो.

**पत्य[९] राखों नेणें कदा। विनोद करी सर्वदा। हासतां खिजे पेटे द्वंदा। तो येक मूर्ख ।।४८।।**
आपली पत सांभाळता येत नाही, सर्वदा विनोद करतो. (कधीच गंभीर नसतो) कोणी थट्टामस्करी केली तर चिडतो, मारामारीला येतो (वर्दळीवर येतो).

**होड घाली अवघड। काजेंविण करी बडबड। बोलोंचि नेणे मुखजड। तो येक मूर्ख।।४९।।**
न झेपण्यासारखी पैज घालतो, अकारण बडबड करतो आणि जेथे बोलणे जरूर तेथे मात्र गप्प बसतो.
**वस्त्र शास्त्र दोनी नसे। उंचे स्थळीं जाऊन बैसे। जो गोत्रजांस विस्वासे। तो येक मूर्ख।।५०।।**
अंगावर शोभणारे वस्त्र नाही आणि ज्ञान नाही तरी उच्चासनावर बसतो, भाऊबंदावर (प्रमाणाबाहेर) विश्वास धरतो.
**तश्करासी वोळखी सांगे। देखिली वस्तु तेचि मागे। आपलें आन्हीत[१०] करी रागें। तो येक मूर्ख।।५१।।**
चोराला आपली ओळख सांगतो, दृष्टीस पडेल ती वस्तू मागतो, रागाच्या भरामध्ये आपलेच नुकसान करून घेतो. (चोर उगाचच लाघवीपणा दाखवून सलगी करतात, प्रवासामध्ये त्यांना आपला सगळा परिचय देण्यात आपले नुकसान होते, म्हणून सावधपणे वागावे.)
**हीन जनासी बराबरी। बोल बोले सरोत्तरीं[११]। वामहस्तें प्राशन करी। तो येक मूर्ख।।५२।।**
हलक्या लोकांबरोबर सलगी करणारा, चढेलपणाने (उन्मत्तपणाने) बोलणारा, डाव्या हाताने पिणारा (जेवणासाठी, पिण्यासाठी, उजवा हात वापरण्याची आपली प्रथा आहे.)
**समर्थासीं मत्सर धरी। अलभ्य वस्तूचा हेवा करी। घरीचा घरीं करी चोरी। तो येक मूर्ख।।५३।।**
श्रेष्ठ दर्जाच्या माणसांचा मत्सर करतो, जी गोष्ट अलभ्य आहे तिचा हेवा करतो, घरच्या घरी चोरी करतो.
**सांडूनियां जगदीशा। मनुष्याचा मानी भर्वसा। सार्थकेंविण वेंची वयसा। तो येक मूर्ख।।५४।।**
ईश्वराचा भरवसा सोडून देऊन माणसांचा भरवसा धरणारा, नरदेहाचे सार्थक न करता काळ फुकट घालविणारा.
**संसारदुःखाचेनि गुणें। देवास गाळी देणें। मैत्राचें बोले उणें। तो येक मूर्ख।।५५।।**
प्रपंचात दुःख झाले म्हणून देवाला शिव्या देणारा, मित्राबद्दल उणेपणा दाखविणारा (वास्तविक त्यावर पांघरूण घालणे इष्ट हा मतितार्थ)
**अल्प अन्याय क्ष्मा न करी। सर्वकाळ धारकीं धरी। जो विश्वासघात करी। तो येक मूर्ख।।५६।।**
लहानश्या चुकीबद्दल क्षमा न करणारा, सर्वकाळ इतरांना धारेवर धरणारा (टोचून बोलणारा), विश्वासघात करणारा
**समर्थाचे मनींचे तुटे। जयाचेनि सभा विटे। क्षणा बरा क्षणा पालटे। तो येक मूर्ख।।५७।।**
थोरांच्या मर्जीतून उतरलेला, सभेला (रसभंग करणारा) वीट आणणारा, आता चांगला तर लगेच वाईट होणारा (धरसोडीची वृत्ती असणारा)
**बहुतां दिवसांचे सेवक। त्यागून ठेवी आणिक। ज्याची सभा निर्नायेक। तो येक मूर्ख।।५८।।**
अनेक दिवसांचे विश्वासू सेवक सोडून देऊन नवे ठेवणारा, ज्याची सभा प्रमुखांशिवाय (अध्यक्षाविना सभा म्हणजे भरकटलेले तारू) होते.

(८) तुक - महत्त्व. (९) पत्य - सचोटी. (१०) आन्हीत - अनहित. (११) सरोत्तरीं - बरोबरीन.

**अनीतीनें द्रव्य जोडी। धर्म नीति न्याय सोडी। संगतीचें मनुष्य तोडी। तो येक मूर्ख।।५९।।**
भ्रष्टाचाराने संपत्ती मिळवितो,धर्म, नीती, न्याय मानीत नाही, संगतीच्या लोकांना तोडून वागवतो.
**घरी असोन सुंदरी। जो सदांचा परद्वारी। बहुतांचें उच्छिष्ट अंगीकारी। तो येक मूर्ख।।६०।।**
घरी सुंदर स्त्री असतांना जो परद्वारी (परस्त्रीगमन करणारा) होतो, बहुतांचे उष्टे अंगीकारतो (वेश्यागमनी होतो हा मतितार्थ)
**आपलें अर्थ दुसऱ्यापासीं। आणि दुसऱ्याचें अभिळासी। पर्वत[१२] करी हीनासी। तो येक मूर्ख ।।६१।।**
आपले धन दुसऱ्याकडे ठेवून तिसऱ्याच्या धनाची अभिलाषा धरतो, हलक्या (क्षुद्र मनाच्या) लोकांबरोबर (व्यवहार) देवघेव करतो.
**अतिताचा अंत पाहे। कुग्रामामधें राहे। सर्वकाळ चिंता वाहे। तो येक मूर्ख।।६२।।**
आलेल्या अतिथीचा छळ करतो. कुग्रामात वस्ती करतो, सर्वकाळ चिंतातूर असतो.
**दोघे बोलत असती जेथें। तिसरा जाऊन बैसे तेथें। डोई खाजवी दोही हातें। तो येक मूर्ख ।।६३।।**
दोन वक्ती बोलत असता तेथे जाऊन तिसरा बसतो, (इतरांसमोर) दोन्ही हातांनी डोके खाजवतो
**उदकामधें सांडीं गुरळी[१३]। पायें पाये कांडोळी[१४]। सेवा करी हीन कुळीं। तो येक मूर्ख ।।६४।।**
पाण्याच्या साठ्यामध्ये चूळ भरतो. एका पायाने दुसरा पाय खाजवतो, हीनांची सेवचाकरी करणारा.
**स्त्री बाळका सलगी देणें। पिशाच्यासन्निध बैसणें। मर्यादेविण पाळी सुणें। तो येक मूर्ख ।।६५।।**
स्त्री, लहान मुले, यांच्याशी फाजील बरोबरीने वागतो, पिशाच्याजवळ (पशुतुल्य माणसाबरोबर) बसतो, कुत्र्याला इतरांबरोबर वागण्याची मर्यादा न शिकविता त्याला पाळतो.
**परस्त्रीसीं कळह करी। मुकी वस्तु निघातें मारी। मूर्खाची संगती धरी। तो येक मूर्ख।।६६।।**
परस्त्रीशी भांडण करतो, मुक्या प्राण्यांना शस्त्राने मारतो, मूर्ख लोकांची संगत धरतो.
**कळह पाहात उभा राहे। तोडविना कौतुक पाहे। खरें अस्तां खोटें साहे। तो येक मूर्ख ।।६७।।**
कोठे भांडण चालले असता ते न सोडविता कौतुकाने पाहतो, खरे (वस्तुस्थिती) माहित असताना खोटे मान्य करतो.
**लक्ष्मी आलियावरी। जो मागील वोळखी न धरी। देवीं ब्राह्मणीं सत्ता करी। तो येक मूर्ख ।।६८।।**
वैभव प्राप्त झाले असता पूर्वीच्या लोकांची ओळखही ठेवत नाही. देवब्राम्हणांवर सत्ता गाजवितो.
**आपलें काज होये तंवरी। बहुसाल नम्रता धरी। पुढिलांचें[१५] कार्य न करी। तो येक**

(१२) पर्वत - घेणे देणे. (१३) गुरळी - चूळ. (१४) कांडोळी - खाजवी.

**मूर्ख ।।६९।।**

आपले काम होईपर्यंत खूप नम्रतेने वागतो पण (प्रत्युपकाराची) वेळ आल्यावर दुसऱ्याचे कार्य न करणारा.

**अक्षरें गाळून वाची। कां तें घाली पदरिचीं। नीघा न करी पुस्तकाची। तो येक मूर्ख ।।७०।।**

वाचताना अक्षरे गाळून वाचतो किंवा काही अक्षरे स्वत:च्या पदरची घालतो, पुस्तकांची योग्य ती काळजी घेत नाही. (तेल, पाणी, उघड्यावर पुस्तक टाकणे हा निष्काळजीपणा करणे)

**आपण वांचीना कधीं। कोणास वाचावया नेदी। बांधोन ठेवी बंदीं। तो येक मूर्ख ।।७१।।**

पुस्तके आपण स्वत: वाचत नाही, दुसऱ्याला वाचावयास देत नाही. नुसती बांधून बंद करून ठेवतो. तो मूर्ख असतो.

**ऐसीं हें मूर्खलक्षणें। श्रवणें चातुर्य बाणे। चित्त देउनियां शहाणे। ऐकती सदा ।।७२।।**

अशा प्रकारची ही मूर्खांची लक्षणे आहेत. ती ऐकून सोडून देईल तो चतुर होईल. शहाणे लोक लक्षपूर्वक ती लक्षणे ऐकतात.

**लक्षणें अपार असती। परी कांहीं येक येथामाती। त्यागार्थ बोलिलें श्रोतीं। क्षमा केलें पाहिजे ।।७३।।**

वास्तविक लक्षणे अनंत आहेत. पण त्यातील थोडी यथामति येथे सांगितली आहेत. त्यांचा श्रोत्यांनी त्याग करावा म्हणून सांगितली आहेत. श्रोत्यांनी त्याबद्दल क्षमा करावी.

**उत्तम लक्षणें घ्यावीं। मूर्खलक्षणें त्यागावीं। पुढिले समासीं आघवीं। निरोपिलीं ।।७४।।**

उत्तम लक्षणे स्वीकारावी, मूर्ख लक्षणे टाकावी पुढील समासात उत्तम लक्षणे सांगितली आहेत.

(अल्पसे रसग्रहण - श्री समर्थांच्या सूक्ष्म अवलोकनशक्तीचा प्रत्यय या समासात येतो. दीड-दोनशे मूर्ख लक्षणे एकापाठोपाठ एक ते सांगू लागतात. यातील कित्येक लक्षणे श्रोत्यांना स्वत:मध्येच आढळतात. काळ पुढे जातो आहे आणि या लक्षणांमध्ये भरच पडत आहे. इतरांना उपद्रव होणाऱ्या कुत्र्यांच्या पाळंद्यांची संख्याही वाढतीच आहे. प्रत्येक ओवीबद्दल भावार्थाचा अधिक विचार दासबोध अभ्यास मंडळात व्हावा. पढतमूर्ख लक्षणांचा वेगळा विचार श्रीसमर्थांना मांडणे जरूर वाटले. पढतमूर्खांच्या संख्येमध्येही भरच पडते आहे. ती कमी करण्याचा विचार सर्वांनी करावा. मूर्खांची लक्षणे सांगणारा व त्यांनाही ग्रंथाच्या अभ्यासाचा अधिकार मान्य करणारा दासबोध हा विलक्षण अध्यात्मिक ग्रंथ आहे.)

इति श्रीदासबोधे गुरूशिष्यसंवादे मूर्खलक्षणनाम समास प्रथम ।।१।।

## द. २ स. १० पढतमूर्खलक्षण

माणसाच्या अंत:करणात आत्मबुद्धी आणि देहबुद्धी दोन्ही वास करतात. आत्मबुद्धी नि:पक्षपाती असते

(१५) पुढिलांचें - दुसऱ्याचे.

म्हणून खरे, चांगले व हिताचे काय ते सांगते. देहबुद्धी पक्षपाती असते म्हणून तात्पुरते खरे, दिसायला बरे व देहाला सुख होणारे ते सांगते. प्रापंचिक माणसामध्ये देहबुद्धीचा जोर असतो तर विरक्त पुरुषामध्ये आत्मबुद्धीचा जोर असतो. परिणाम असा होतो की, प्रापंचिक माणसाच्या जीवनात अंतर्गत द्वंद्व आणि विरोध निर्माण होतात. मग असा माणूस सत्कर्म कोणते ते माहीत असून दुष्कर्म करतो, वंद्य काय ते माहीत असून निंद्य स्वीकारतो, सद्गुणांची जाणीव असून दुर्गुण अंगीकारतो. सदाचाराची किंमत ओळखून भ्रष्टाचार करतो, आणि उत्तम लक्षणे जाणूनबुजून सोडतो व हीन लक्षणांना थारा देतो. अशा माणसाला श्री समर्थ पढतमूर्ख म्हणतात. दुसऱ्यावर एखादा प्रसंग आला तर तो उत्तम प्रकारे ज्ञान सांगतो पण तोच प्रसंग स्वत:वर आला असता जो स्वार्थापायी उलट वागतो त्याला पढतमूर्ख म्हणतात. प्रपंचाच्या पसाऱ्यामध्ये सगळा स्वार्थाचाच धुमाकूळ असतो, तेव्हा प्रपंचाच्या क्षेत्रात पढतमूर्ख आढळतात यात नवल नाही. पण वैराग्य, अनासक्ती आणि नि:स्वार्थीपणा हा परमार्थाचा प्राण आहे. अशा परमार्थाच्या क्षेत्रात जेव्हा पढतमूर्खांचा सुळसुळाट होतो तेव्हा समाजाच्या आरोग्याला मोठी कीड लागते. भारतातील अध्यात्माची हीच शोकांतिका आहे. श्री समर्थांना या शोकांतिकेचे गांभीर्य जेवढे बोचले तेवढे इतरांना क्वचितच बोचले. म्हणून त्यासाठी एक सबंध समास त्यांनी लिहिला.

**।। श्रीराम ।।**

**मागां सांगितलीं लक्षणें। मूर्खाआंगीं चातुर्य बाणे। आतां ऐका शाहाणे-। असोनि, मूर्ख ।।१।।**

पूर्वीच्या समासात (द. २-९) उत्तम लक्षणे सांगितली आहेत. त्यामुळे मूर्खांचे अंगी चातुर्य येईल. आता वास्तविक शहाणे असूनही जे मूर्ख असतात (मूर्खासारखे वागतात) ती लक्षणे ऐका.

**तया नांव पढतमूर्ख। श्रोतीं न मनावें दु:ख। अवगुण त्यागितां, सुख। प्राप्त होये।।२।।**

त्यांना पढतमूर्ख म्हणतात. त्यांच्या श्रवणाने श्रोत्यांनी वाईट वाटून घेऊ नये. कारण अवगुन टाकल्यामुळे सुख प्राप्त होते.

**बहुश्रुत आणि वित्पन्न। प्रांजळ बोले ब्रह्मज्ञान। दुराशा आणि अभिमान। धरी, तो येक पढतमूर्ख ।।३।।**

ज्याचे वाचन खूप आहे, विद्वान आहे, ब्रम्हज्ञान उत्तम प्रकारे सांगतो पण दुराशा व अभिमान धरतो तो पढतमूर्ख असतो.

**मुक्तक्रिया प्रतिपादी। सगुणभक्ति उछेदी। स्वधर्म आणि साधन निंदी। तो येक पढतमूर्ख ।।४।।**

मुक्त झालेल्या ज्ञात्यालासुद्धा सामाजिक बंधने असतात. पण हा बंधनरहित आचार प्रतिपादन करतो, सगुनभक्तीचे खंडन करतो, स्वधर्म आणि साधनमार्गाची निंदा करतो.

**आपलेन ज्ञातेपणें। सकलांस शब्द ठेवणें। प्राणीमात्राचें पाहें उणें। तो येक पढतमूर्ख।।५।।**

आपल्या ज्ञातेपणाच्या अहंकारामुळे इतर सर्वांना नावे ठेवतो. प्रत्येकामधील उणिवांकडेच लक्ष देतो.

**शिष्यास अवज्ञा घडे। कां तो संकटी पडे। जयाचेनि शब्दें मन मोडे। तो येक पढतमूर्ख।।६।।**
शिष्यांना आज्ञा मोडण्याची वेळ येईल किंवा ते संकटात सापडतील, असे वागणारा. लोकांची मने दुखावतील असे बोलणारा.
**रजोगुणी तमोगुणी। कपटी कुटिल अंत:कर्णी। वैभव देखोन वाखाणी। तो येक पढतमूर्ख।।७।।**
रजोगुण किंवा तमोगुणांनी जो भरलेला असतो. (या गुणांची लक्षणे पुढच्याच स्वाध्यायात पहावी.) जो अंत:करणाने कपटी, कुटील असतो, श्रीमंतांच्या वैभवाकडे पाहून त्यांची स्तुती करतो.
**समूळ ग्रंथ पाहिल्याविण। उगाच ठेवी जो दूषण। गुण सांगतां अवगुण। पाहे तो येक पढतमूर्ख।।८।।**
पूर्ण ग्रंथ पाहिल्याविनाच जो त्याला दूषणे देतो, सद्गुणांकडे ध्यान देण्याऐवजी दुर्गुणच पाहतो.
**लक्षणें ऐकोन मानी वीट। मत्सरें करी खटपट। नीतिन्याय उद्धट। तो येक पढतमूर्ख।।९।।**
(सद्विद्या) लक्षणे ऐकून त्यांचा तिरस्कार करतो, मत्सरी स्वभावाने नाना उपद्व्याप करतो, नीतीन्याय बाजूला ठेवून जो उद्धटपणे वागतो.
**जाणपणें[1] भरीं भरे। आला क्रोध नावरे। क्रिया शब्दास अंतरे। तो येक पढतमूर्ख।।१०।।**
आपणच शहाणे आहोत या अहंकारापोटी हटवादी असतो, त्याला राग आवरत नाही. बोलल्याप्रमाणे वर्तन नसते.
**वक्ता अधिकारेंवीण। वग्त्रुत्वाचा करी सीण। वचन जयाचें कठीण। तो येक पढतमूर्ख।।११।।**
अधिकार पात्रता नसताना उपदेश करतो, वायफळ वक्तृत्व करतो, आणि तेही कठोर शब्दांत करतो.
**श्रोता बहुश्रुतपणें। वकतयास आणी उणें। वाचाळपणाचेनि गुणें। तो येक पढतमूर्ख।।१२।।**
बहुश्रुतपणाचा आव आणून वाचाळपणा करून एखाद्या वक्त्याचा मानभंग करतो.
**दोष ठेवी पुढिलांसी। तेंचि स्वयें आपणापासीं। ऐसें कळेना जयासी। तो येक पढतमूर्ख।।१३।।**
जे दोष स्वत:मध्येच आहेत याची जाणीव न ठेवता इतरांना दोष देतो.
**अभ्यासाचेनि गुणें। सकळ विद्या जाणे। जनास निवउं नेणें। तो येक पढतमूर्ख।।१४।।**
अभ्यासू वृत्तीमुळे जो सर्व विद्यांचे ज्ञान मिळवितो, (परंतु त्या ज्ञानाचा उपयोग करून) लोकांना तृप्त करीत नाही, त्यांचे मन शांत करीत नाही.
**हस्त[2] बांधीजे ऊर्णतंतें[3]। लोभें मृत्य भ्रमरातें। ऐसा जो प्रपंचीं गुंते। तो येक पढतमूर्ख।।१५।।**
हतीला कोळ्याच्या शरीरातून निघणाऱ्या तंतूच्या जाळ्याने बांधावे हे हास्यास्पद आहे. (बांबू कुरतडू शकणारा) भुंगा कमळाच्या फुलातील नाजूक पाकळ्यांमध्ये बद्ध व्हावा हेही असेच आहे. त्यांना त्या बंधनातून सहज बाहेर पडता येईल. त्याचप्रमाणे माणसाना प्रपंचातून बाहेर पडणे सहज पणे बाहेर निघणे शक्य आहे, असे असतानासुद्धा जो त्यातच अडकून पडतो तो पढतमूर्खच असतो.
**स्त्रियांचा संग धरी। स्त्रियांसी निरूपण करी। निंद्य वस्तु आंगिकारी। तो येक**

(१) जाणपणें भरी भरे – शहाणपणाच्या अभिमानामुळे हट्टास पेटतो.

**पढतमूर्ख ।।१६।।**
स्त्रियांची संगती धरतो, व त्यांना ब्रह्मज्ञान सांगत बसतो (आंतरहेतू शुद्ध नसतो) निंद्य (मादक) गोष्टींचा स्वीकार करतो.
**जेणें उणीव ये आंगासी। तेंचि दृढ धरी मानसीं। देहबुद्धि जयापासीं। तो येक पढतमूर्ख ।।१७।।**
ज्याच्यामुळे स्वत:ला कमीपणा येईल ते मनात घट्टपणे धरतो, देहबुद्धीत जो अडकलेला असतो.
**सांडूनियां श्रीपती। जो करी नरस्तुती। कां दृष्टी पडिल्यांची कीर्ती-। वर्णी, तो येक पढतमूर्ख ।।१८।।**
परमेश्वराची स्तुती न करता जो माणसांचीच कीर्ती वर्णन करतो किंवा दृष्टीस येईल त्यांची वाखाणणी करतो.
**वर्णी स्त्रियांचे आवेव। नाना नाटकें हावभाव। देवा विसरे जो मानव। तो येक पढतमूर्ख ।।१९।।**
स्त्रियांच्या अवयवाचे वर्णन करतो, नाना प्रकारे नाटकी हावभाव करतो. ईश्वराला विसरतो.
**भरोन वैभवाचे भरीं। जीवमात्रास तुछय करी। पाषांडमत थावरी। तो येक पढतमूर्ख ।।२०।।**
वैभव मिळाले असेल तर त्याच्या घमेंडीमध्ये इतरांना तुच्छ लेखतो. (पाखंडी) नास्तिक मताचे प्रतिपादन करतो.
**वित्पन्न आणि वीतरागी। ब्रह्मज्ञानी माहायोगी। भविष्य सांगों लागे जगीं। तो येक पढतमूर्ख ।।२१।।**
विद्वान, विरक्त, ब्रम्हज्ञानी व महायोगी असतील त्यांनी लोकांना भविष्य सांगणे हे युक्त ठरत नाही, पण प्रतिष्ठेपायी भविष्य सांगत सुटतो.
**श्रवण होतां अभ्यांतरीं। गुणदोषाची चाळणा करी। परभूषणें मत्सरी। तो येक पढतमूर्ख ।।२२।।**
कीर्तन, प्रवचनादि श्रवण करताना त्यातील गुणदोष शोधून काढतो व ज्याला वक्त्याच्या आदरसत्काराचा मत्सर वाटतो.
**नाहीं भक्तीचें साधन। नाहीं वैराग्य ना भजन। क्रियेविण ब्रह्मज्ञान-। बोले, तो येक पढतमूर्ख ।।२३।।**
भक्ती, साधना, वैराग्य भजन हे काहीच नसताना क्रियेवीण ब्रम्हज्ञान सांगतो.
**न मनी तीर्थ न मनी क्षेत्र। न मनी वेद न मनी शास्त्र। पवित्रकुळीं जो अपवित्र। तो येक पढतमूर्ख ।।२४।।**
तीर्थक्षेत्रमहिमा मानीत नाही. वेदशास्त्र ज्याला मान्य नाही. पवित्र कुळात जन्म घेऊनही जो अपवित्र राहतो.
**आदर देखोनि मन धरी। कीर्तीविण स्तुती करी। सर्वेचि निंदी अनादरी। तो येक पढतमूर्ख ।।२५।।**

(२) हस्त - हत्ती. (३) ऊर्णतंते - कोळी नावाचा कीटक शरीरातून जो धागा काढतो त्याने.

आपला आदर करतात त्यांच्याविषयीच फक्त मनात आदर धरतो. जो अपात्र आहे त्याची (लोभ धरून) कीर्ती गातो आणि (पदरात काही पडले नाही की) लगेच निंदाही करू लागतो.

**मागें येक पुढें येक। ऐसा जयाचा दंडक। बोले येक करी येक। तो येक पढतमूर्ख ।।२६।।**

एखाद्याच्या समोर एक बोलतो तर त्याच्या मागे दुसरेच मत बोलतो, तसेच बोलतो एक आणि कृती वेगळीच करतो अशी ज्याची वागण्याची पद्धती असते.

**प्रपंचविशीं सादर। परमार्थी ज्याच्या अनादर। जाणपणें घे आधार। तो येक पढतमूर्ख ।।२७।।**

प्रापंचिक गोष्टी तत्परतेने करतो, पारमार्थिक विचारांमध्ये ज्याला अनादर असतो. श्रेयस्कर काय आहे हे ठाऊक असूनही चुकीच्या मार्गाचा आधार घेतो.

**येथार्थ सांडून वचन। जो रक्षून बोले मन। ज्याचें जिणें पराधेन। तो येक पढतमूर्ख ।।२८।।**

दुसऱ्याला बरे वाटावे म्हणून श्रेयस्कर न सांगता अयोग्य ते सांगतो. ज्याचे जीवन पराधीन असते.

**सोंग संपाधी वरीवरी। करूं नये तेंचि करी। मार्ग चुकोन भरे भरीं। तो येक पढतमूर्ख ।।२९।।**

वरकरणी सोंगाची संपादणी करून लोकांना बरा दिसतो पण करू नयेत अशी वाईट कृत्ये स्वत: सन्मार्ग सोडलेला असतानाही स्वत:चाच मार्ग चांगला असा अट्टाहास धरतो.

**रात्रंदिवस करीं श्रवण। न संडी आपले अवगुण। स्वहित आपलें आपण। नेणे तो येक पढतमूर्ख ।।३०।।**

रात्रदिवस सद्शास्त्रांचे श्रवण करतो पण आपले अवगुण सोडून देत नाही. स्वत:चे हित कशात आहे हेच त्याला कळत नाही.

**निरूपणीं भले भले। श्रोते येऊन बैसले। क्षुद्रें लक्षुनी बोले। तो येक पढतमूर्ख ।।३१।।**

थोर लोक निरूपण ऐकण्यास आले असताना, दुसऱ्यांच्या क्षुद्र गोष्टी अगर वर्मे उघडी करून टोचून बोलतो.

**शिष्य जाला अनाधिकारी। आपली अवज्ञा करी। पुन्हां त्याची आशा धरी। तो येक पढतमूर्ख ।।३२।।**

शिष्य अपात्र असला किंवा गुरूची अवज्ञा करीत असला तरी पुन्हा त्याच्याकडूनच सेवेची अपेक्षा धरतो.

**होत असतां श्रवण। देहास आलें उणेपण। क्रोधें करी चिणचिण। तो येक पढतमूर्ख ।।३३।।**

प्रवचन कीर्तनादि श्रवण करीत असता काही वेळा श्रोत्याच्या देहाला काही उणेपण जाणवते. (कोणाचे शरीर अवघडते, कोणाला लघुशंका लागते) अशा वेळी त्याने वास्तविक देहावर चिणचिण करू नये पण जो रागाने चिणचिणू लागतो.

**भरोन वैभवाचें भरीं। सद्गुरूची उपेक्षा करी। गुरूपरंपरा चोरी। तो येक पढतमूर्ख ।।३४।।**

वैभवप्राप्ती झाल्यावर जो सद्गुरूची अवहेलना करतो किंवा कमीपणा येण्याच्या भीतीने गुरूपरंपराच कोणाला सांगत नाही.

**ज्ञान बोलोन करी स्वार्थ। कृपणाऐसा सांची अर्थ। अर्थासाठी लावी परमार्थ। तो येक पढतमूर्ख ।।३५।।**

स्वत: स्वार्थ साधण्यासाठी जो परमार्थांचे ज्ञान इतरांना शिकवीतो, एखाद्या कंजुस माणसाने साठवावे तसे द्रव्य साठवितो, द्रव्य प्राप्तीसाठीच परमार्थज्ञानाचा वापर करतो.

**वर्तल्याविण सिकवी। ब्रह्मज्ञान लावणी लावी। पराधेन गोसावी। तो येक पढतमूर्ख।।३६।।**

स्वत: आचरण न करता इतरांना ते सांगतो. ब्रम्हज्ञानाची अशा प्रकारे पेरणी करतो. (गोसावी) सन्यस्त म्हणवून घेतो, पण परावलंबी असतो. (पराधीनता स्वीकारणे संन्याशाला शोभत नाही)

**भक्तिमार्ग अवघा मोडे। आपणामध्यें उपंढर पडे। ऐसिये कर्मीं पवाडे। तो येक पढतमूर्ख ।।३७।।**

भक्तीमार्ग सगळा नष्ट होईल, आपल्या बोलण्यात व वर्तणुकीत गोंधळ होईल, ढोंगीपणा प्रकट होईल अशी कामे करण्यास सरसावतो.

**प्रपंच गेला हातीचा। लेश नाही परमार्थाचा। द्वेषी देवां ब्राह्मणाचा। तो येक पढतमूर्ख।।३८।।**

प्रपंच अशाश्वत मानून तो करीत नाही आणि परमार्थ थोडासुद्धा साधत नाही, देवा - ब्राम्हणांचा द्वेष तेवढा करतो तो एक पढतमूर्ख होय.

**त्यागावया अवगुण। बोलिलें पढतमूर्खाचें लक्षण। विचक्षणें नीउन पूर्ण। क्ष्मा केलें पाहिजे ।।३९।।**

अवगुणांचा त्याग करावा या दृष्टीने पढतमूर्खाची लक्षणे येथे सांगितली आहेत. त्यात जर काही अधिकउणेआले असेल तर चतुर श्रोत्यांनी क्षमा करावी. (ही परखड शब्दातील वचने ज्यांना लागू होतील त्यांचा कदाचित राग होईल त्याबद्दल श्रीसमर्थांनी कायमपणेच क्षमा मागून ठेवलेली दिसते.)

**परममूर्खांमाजी मूर्ख। जो संसारीं मानी सुख। या संसारदु:खाऐसें दु:ख। आणीक नाहीं।।४०।।**

जो संसारामध्ये सुख आहे असे मानतो तो मूर्खांमध्येही परममूर्खं असतो कारण या संसारातील दु:खासारखी दुसरी तापदायक दु:खेच नाहीत.

**तेंचि पुढें निरूपण। जन्मदु:खाचें लक्षण। गर्भवास हा दारुण। पुढें निरोपिला।।४१।।**

जन्म झाल्यापासून अंत होईपर्यंत संसारामध्ये मरणप्राय भयंकर दु:खे असतात. त्यांची लक्षणे यापुढे सांगितली आहेत. गर्भवासात होणाऱ्या भयंकर दु:खाचे वर्णन पुढील समासात आहे.

(**रसग्रहण :** साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. पण सुसंस्कारितांचे प्रमाण मात्र समाजात घटू लागले आहे. त्यामुळे पढतमूर्खाची लक्षणे सांगणारा हा समास आपणास खूपच वाचनीय आणि प्रबोधनकारी वाटेल.)

इति श्रीदासबोधे गुरूशिष्यसंवादे पढतमूर्खनिरूपणनाम समास दशम ।।१०।।

# दासबोध परिचय प्रश्नपत्रिका ३ री

(दासबोध द. २ स. १ आणि द. २ स. १० वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या ओव्या लिहा.

(१) अहंमन्यतेमुळे जो सर्वांना नावें ठेवतो, तो एक पढतमूर्ख असतो.

(२) अकारण हास्य करणारा; वाजवी सल्ला न मानणारा तो एक मूर्ख असतो.

(३) स्वत: बहुश्रुत असून वाचाळ असल्यामुळे दुसऱ्याच्या वक्तव्याला कमीपणा आणतो, तो एक पढतमूर्ख असतो.

(४) मुलगा, पत्नी यांचा एक आधार मानून जो ईश्वराला विसरून जातो, तो एक मूर्ख असतो.

(५) संसाराबद्दल आस्था बाळगून, परमार्थाचा तिरस्कार करतो, तो एक पढतमूर्ख असतो.

प्र. २ पुढील ओव्यांचा अर्थ स्पष्ट करा.

(१) होत असतां श्रवण। देहास आलें उणेंपण। क्रोधें करी चिणचिण। तो येक पढतमूर्ख।।

(२) हस्त बांधीजे ऊर्णतंतें। लोभें मृत्य भ्रमरातें। ऐसा जो प्रपंचीं गुंते। तो येक पढतमूर्ख।।

प्र. ३ मूर्खांचे दोन प्रकार समर्थांनी सांगितले, त्या दोहोत फरक कोठे आहे?

प्र. ४ विद्यार्थ्यांसमोर बोधप्रद भाषण करताना 'मूर्ख लक्षण' समासातील कोणत्या ओव्यांचे टिपण आपणास करावेसे वाटेल; त्या ओव्या लिहा.

## स्वाध्याय ४ था (द. २ मधील स. ५, ६ व ७ वर आधारित)

**स्वाध्याय सारांश :** सत्त्वगुणी, रजोगुणी आणि तमोगुणी अशी तीनही प्रकारची माणसे समाजात आढळतात. सत्त्वगुणाचे वर्चस्व जेथे असेल तेथे सुख-शांतीचे साम्राज्य असते. त्यादृष्टीने मुळात या त्रिगुणांचे स्वरूप तरी कसे आहे, ते समर्थ येथे तपशीलावर सांगत आहेत असे द. २ मधील ५,६ व ७ हे तीन समास या चवथ्या स्वाध्यायासाठी आहेत. मानसशास्त्राच्या दृष्टीकोनातून पाहिले, तरी दैनंदिन जीवनात या समासातील विवेचनाचा उपयोग होईल. अंतरपरीक्षा करण्याची गुरूकिल्ली या समासात आहे. तीनही गुणांचा तुलनात्मक दृष्टीने विचार करता यावा यादृष्टीने तीन समासांचा एकदम अभ्यास करणे श्रेयस्कर आहे. (उदा. तमोगुणी मनुष्य भांडण लावून देतो आणि आपण मौज पहात उभा राहतो, तर सत्त्वगुणी माणसाची वागणूक त्या उलट असते. तो भांडण सोडविण्याचा आणि समझोता घडवून आणण्यांचा प्रयत्न करतो.) रजोगुणाकडून सत्त्वगुणाकडे जाण्यासाठी काय करावे हा उपायही समर्थ या समासात सांगतात. अशा उपदेशाची आज नितांत गरज आहे.

## द. २ स. ५ : रजोगुणलक्षण

श्री ज्ञानेश्वर महाराजांसारखा किंवा श्री समर्थांसारखा अवतारी संत जरी झाला, तरी देहानें तो अखेर आपल्या स्वभावानुसार वागतो. माणूस म्हणून सर्व माणसे सारखी असली, तरी प्रत्येक माणूस आपापल्या परीने निराळा असतो. पण दृश्य सृष्टीची रचना अशी आहे की प्रत्येक विशेषाच्या मागे

सामान्य असते. तेव्हा माणसांच्या निराळेपणाच्या मागे असणारे सामान्य कोणते याचा शोध प्राचीन कालापासून विचारवंत करीत आहेत. जे जे आकारात येते ते ते त्रिगुणांचे बनलेले असते, असा सिद्धांत भारतामध्ये कपिलाचार्यांनी फार पूर्वी मांडला. वेदान्त तत्वज्ञानाने तो ग्राह्य ठरवून आपलासा करून घेतला. कपिलांचे सांगणे असे की जर सगळे दृश्य विश्व सत्व, रज व तम या तीन गुणांनी विणलेले आहे, तर माणूसदेखील त्रिगुणात्मक असला पाहिजे. प्रकाश, ज्ञान, शांति, समाधान, नि:स्वार्थी प्रेम उत्यादि सत्वगुणांबरोबर येतात. वासना, धडपड, खटपट, उद्योगीपणा, लढाऊ वृत्ति इत्यादि रजोगुणांबरोबर येतात. आळस, निद्रा, सुस्ती, जडत्व, मोह इत्यादि तमोगुणाबरोबर येतात. प्रत्येक माणसामध्ये तिन्ही गुण असतात. पण त्यापैकी एक इतर दोहोपेक्षा वरचढ असतो. त्या वरचढ गुणांप्रमाणे प्रत्येक माणूस सत्त्वगुणी, रजोगुणी किंवा तमोगुणी मानला जातो. ब्रह्मज्ञानाच्या दृष्टीने सगळे संत एकाच भूमिकेवर असतात, हे काही खोटे नाही, पण ज्ञानाचा समान अधिकार भोगणारी ही मंडळी, त्रिगुणातीत असून व्यवहारात वागताना गुणप्रमाणानुसार भिन्न स्वभावाची व वर्तनाची दिसली. सामान्य मनुष्य या त्रिगुणांच्या साम्राज्यातच वावरतो. त्यांच्यामधूनच त्याला परमार्थाची वाटचाल करायची असते. तेव्हां प्रत्येक गुणात शुद्ध व शबल असा भेद केला. शुद्ध गुण परमार्थाकडे नेतो तर तोच गुण शबल असेल तर प्रपंचाकडे खेचतो, असे संतांनी सांगितले. पुढील तीन समासांत या तीन गुणांचे सविस्तर वर्णन श्री समर्थ करीत आहेत.

**।। श्रीराम ।।**

**मुळीं देह त्रिगुणाचा। सत्त्वरजतमाचा। त्यामध्यें सत्त्वाचा। उत्तम गुण ।।१।।**

देह हा सत्व, रज आणि तम या तीन गुणांचाच बनलेला आहे. त्यातील सत्वगुण उत्तम होय.

**सत्त्वगुणें भगवद्भक्ती। रजोगुणें पुनरावृत्ती। तमोगुणें अधोगती। पावति प्राणी ।।२।।**

**श्लोक ।। ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसा:। जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसा: ।।**

सत्वगुणांमुळे भगवंताची भक्ती घडते. रजोगुणामुळे जन्म-मरणाच्या पुनरावृत्ती आणि तमोगुणामुळे जीवाला अधोगती प्राप्त होते. श्लोकाचा अर्थ - सत्वगुणी लोक वरच्या गतीला जातात, रजोगुणी माणसे भूलोकातच राहतात आणि तमोगुणी अधोगतीला जातात. (भगवद्गीतेतील अ. १४ मधील १८ वा श्लोक आधारासाठी या ३ समासांमध्ये घेतला आहे.)

**त्यांतहि शुद्ध आणी सबळ[१]। तेहि बोलिजेति सकळ। शुद्ध तेंचि जें निर्मळ। सबळ बाधक जाणावें ।।३।।**

तीनही गुणांमध्ये शुद्ध आणि शबल असे भेद आहेत . (उदा. शद्ध रजोगुण हा सत्वगुणाकडे झुकलेला तर शबल रजोगुण हा तमोगुणाकडे झुकलेला असतो. शुद्ध रजोगुण हा परमार्थी असतो. तर शबल रजोगुणामुळे माणसाची वृत्ती स्वयंकेंद्रित संसाराकडे वळते.)

**शुद्धसबळाचें लक्षण। सावध परिसा विचक्षण। शुद्ध तो परमार्थी जाण। सबळ तो**

**संसारिक ।।४।।**

शुद्ध आणि शबल गुणांची लक्षणे आता सांगतो, ती चतुर श्रोत्यांनी सावध मनाने ऐकावी. शुद्धगुण पारमार्थीक तर शबल संसारात गुंतविणारा असतो.

**तया संसारिकांची स्थिती। देहीं त्रिगुण वर्तती। येक येतां दोन जाती। निघोनिया।।५।।**

प्रापंचिक माणसाच्या ठिकाणी तीनही गुण मुळातच असतातच. मात्र एका गुणाचा प्रभाव वाढला की उरलेल दोन दबले जातात.

**रज तम आणी सत्व। येणेंचि चाले जीवित्व। रजोगुणाचें कर्तृत्व। दाखऊं आतां।।६।।**

त्रिगुणांच्या योगानेच जीवन गतीमान होते. आता रजोगुणाची कामगिरी दाखवितो.

**रजोगुण येतां शरीरीं। वर्तणूक कैसी करी। सावध होउनी चतुरीं। परिसावें।।७।।**

रजोगुणाचे प्राबल्य शरीरात झाले म्हणजे माणूस कसा वागतो हे चतुरांनी सावधपणे ऐकावे.

**माझें घर माझा संसार। देव कैंचा आणिला थोर। ऐसा करी जो निर्धार। तो रजोगुण।।८।।**

हे घर माझे, संसार माझाच आहे. त्यामध्ये देव थोर म्हणून कोण म्हणते? (मीच थोर आहे) असे निश्चयाने सांगतो तो रजोगुण.

**माता पिता आणी कांता। पुत्र सुना आणी दुहिता। उतुकियांची वाहे चिंता। तो रजोगुण ।।९।।**

आई, वडील, पत्नी, सुना, कन्या इतक्यांचीच जो काळजी करतो. तो रजोगुण

**बरें खावें बरें जेवावें। बरें ल्यावें बरें नेसावें। दुसऱ्याचे अभिळाषावें। तो रजोगुण।।१०।।**

चांगले पदार्थ खावे, भोजन चांगले असावे, चांगले कपडे आणि अलंकार मिळावेत, दुसऱ्याच्या वस्तू आपणास मिळाव्यात अशी इच्छा करतो तो रजोगुण.

**कैंचा धर्म कैंचें दान। कैचा जप कैंचें ध्यान। विचारीना पापपुण्य। तो रजोगुण।।११।।**

परमार्थांमध्ये दान धर्म, जप-ध्यान यांना महत्व असते. पण रजोगुणाला त्यांचा तिरस्कार वाटतो. वरील गोष्टी तो मुळीच मानत नाही.

**नेणें तीर्थ नेणे व्रत। नेणे अतीत अभ्यागत। अनाचारीं मनोगत। तो रजोगुण।।१२।।**

तीर्थ, व्रत, अतिथी, अभ्यागत हे काही जाणतच नाही. त्याच्या मनाचा कल अनाचार करण्याकडे असतो तो रजोगुण.

**धनधान्याचें संचित। मन होयें द्रव्यासक्त। अत्यंत कृपण जीवित्व। तो रजोगुण।।१३।।**

धनधान्य संचयाची इच्छा करतो, जो कंजूसपणाने वागतो.

**मी तरुण मी सुंदर। मी बलाढ्य मी चतुर। मी सकळांमध्यें थोर-। ह्मणे, तो रजोगुण।।१४।।**

देहाभिमानाचा अत्यंत अभिमान असल्यामुळे मी तरूण, मी सुंदर, मी सामर्थ्यवंत, मी चतुर, मीच सकळांमध्ये थोर असे म्हणतो.

**माझा देश माझा गांव। माझा वाडा माझा ठाव। ऐसी मनीं धरी हांव। तो रजोगुण।।१५।।**

मी आणि माझे एवढेच विश्व समजून, माझा देश, गांव, वाडा, माझी जमीन यांचा दुराभिमान धरतो.

(१) सबळ - मायिक.

**दुसऱ्याचें सर्व जावें। माझेंचि बरें असावें। ऐसें आठवें स्वभावें। तो रजोगुण ।।१६।।**
दुसऱ्यांचे नुकसान व्हावे आणि फक्त माझेच बरे व्हावे अशी सहजपणे विचारधारणा असते.
**कपट आणी मत्सर। उठे देहीं तिरस्कार। अथवा कामाचा विकार। तो रजोगुण ।।१७।।**
जेथे कपट, मत्सर, तिरस्कार किंवा कामवासना यांचे प्राबल्य असते.
**बाळकावरी ममता। प्रीतीनें आवडे कांता। लोभ वाटे समस्तां। तो रजोगुण ।।१८।।**
मुलांवर ममता, बायकोवर अतिप्रेम, सर्वांबद्दल लोभाची भावना असते. तो रजोगुण समजावा.
**जिवलगांची खंती। जेणें काळें वाटे चित्तीं। तेणें काळें सीघ्रगती। रजोगुण आला ।।१९।।**
जिवलगांची चिंता मनामध्ये एकाएकी जागृत होते तेव्हा रजोगुण उत्पन्न झाला असे समजावे.
**संसाराचे बहुत कष्ट। कैसा होईल सेवट। मनास आठवें संकट। तो रजोगुण ।।२०।।**
संसारामध्ये कष्ट सोशीत असतो, त्याचा शेवट कसा होईल याची चिंता करतो, त्यामुळे मनामध्ये काळजी लागून राहाते.
**कां मागें जें जें भोगिलें। तें तें मनीं आठवलें। दुःख अत्यंत वाटलें। तो रजोगुण ।।२१।।**
पूर्ण जीवनात जे उपभोग घेतले ते मनामध्ये स्मरतात आणि आता ते दुर्लभ झाले म्हणून दुःख वाटू लागते.
**वैभव देखोनि दृष्टी। आवडी उपजली पोटीं। आशागुणें हिंपुटीं[२]–। करी, तो रजोगुण ।।२२।।**
इतरांचे वैभव पाहून त्याचा त्याचा लोभ वाटतो आणि ते लाभले नाही म्हणून दुःखी होतो.
**जें जें दृष्टी पडिलें। तें तें मनें मागितलें। लभ्य नस्तां दुःख जालें। तो रजोगुण ।।२३।।**
जी चांगली वस्तू पाहतो ती आपणास हवी असे मन म्हणू लागते आणि तिची प्राप्ती झाली नाही की कष्टी होतो.
**विनोदार्थी भरे मन। श्रृंघारिक करी गायेन। राग रंग तान मान। तो रजोगुण ।।२४।।**
हास्यविनोदातच मन रमते, शृंगारिक गाणी (लावण्या वैगरे) गायन करतो. गाण्याचे राग, रंग, ताना व हावभाव यात दंग होतो.
**टवाळी ढवाळी निंदा। सांगणें घडे वेवादा। हास्य विनोद करी सर्वदा। तो रजोगुण ।।२५।।**
टिंगलटवाळी, निंदा करणे, (सुखसंवाद न करता) वादविवाद करणे, नेहमी हास्यविनोदात रमणे.
**आळस उठे प्रबळ। कर्मणुकेचा नाना खेळ। कां उपभोगाचे गोंधळ। तो रजोगुण ।।२६।।**
अंगात सदैव आळस भरलेला असतो, करमणूकीचे खेळात रमतो आणि अनेक प्रकारे विषयोपभोगाच्या गोंधळात कालापव्यय करतो.
**कळावंत बहुरूपी। नटावलोकी साक्षेपी। नाना खेळीं दान अर्पी। तो रजोगुण ।।२७।।**
अनेक सोंगे घेणारा, कलावंत, नाटक्यांची संगती धरणारा, नाना प्रकारच्या खेळात दानार्पण करून खर्च करणारा
**उन्मत्त द्रव्यावरी अति प्रीती। ग्रामज्य[३] आठवे चित्तीं। आवडे नीचाची संगती। तो रजोगुण ।।२८।।**

(२) हिंपुटीं – कष्टी.

मादक द्रव्ये, पेये मनापासून आवडणारा, हलकटपणाच्या गावगुंडीचे स्मरण करणारा, नीचांची (दुष्टांची) संगती आवडणारा

**तश्करविद्या जीवीं उठें। परन्यून बोलावें वाटे। नित्यनेमास मन विटे। तो रजोगुण॥२९॥**

चोरी करण्याची वासना धरणारा, दुसऱ्यांची नालस्ती इतरांपाशी करण्याची इच्छा असलेला आणि नित्यनेमाचा कंटाळा असणारा

**देवकारणीं लाजाळु। उदरालागीं कष्टाळु। प्रपंची जो स्नेहाळु। तो रजोगुण॥३०॥**

देवाच्या सेवेमध्ये लाज वाटणारा, पोटासाठी मात्र वाटेल तसे कष्ट करणारा. प्रपंचामध्ये प्रेमाने रंगून गेलेला

**गोडग्रासीं आळकेपण[४]। अत्यादरें पिंडपोषण। रजोगुणें उपोषण। केलें न वचे॥३१॥**

गोड पदार्थांची आवड असणारा (त्यासाठी) हपापलेला), शरीराचे (अत्यंत खादाडपणे) पोषणास तत्पर असणारा, उपासतापास वर्ज्य असणारा

**श्रृंघारिक तें आवडे। भक्ती वैराग्य नावडे। कळालाघवीं पवाडे[५]। तो रजोगुण॥३२॥**

शृंगारिक विषय मनापासून आवडणारा, भक्ती आणि वैराग्य यांची नावड असणारा, कलाकौश्यल्यात मनी रमणारा

**नेणोनियां परमात्मा। सकळ पदार्थीं प्रेमा। बळात्कारें घालीं जन्मा। तो रजोगुण॥३३॥**

विश्वव्यापक परमेश्वराला न जाणता बाह्य वस्तूमध्येच प्रेम असणारा, त्याच्या लोभामुळे स्वत:ला जन्ममृत्यूच्या फेऱ्यामध्ये गुंतविणारा

**असो ऐसा रजोगुण। लोभें दावी जन्ममरण। प्रपंची तो सबळ जाण। दारुण दु:ख भोगवी॥३४॥**

असो, असा हा रजोगुण, आसक्तीमुळे जन्ममृत्यूचा भोग घेण्यास भाग पाडतो. प्रपंचामध्ये तोच प्रभावी असल्यामुळे दारूण दु:खे भोगावयास लावतो.

**आतां रजोगुण हा सुटेना। संसारिक हें तुटेना। प्रपंचीं गुंतली वासना। यास उपाय कोण॥३५॥**

आता हा रजोगुण काही सुटत नाही आणि (त्यामुळे) संसार पाश तुटत नाही. प्रपंचात वासना गुंतलेली राहते, ती सोडविण्यास उपाय काय करावा?

**उपाये येक भगवद्भक्ती। जरी ठाकेना विरक्ती। तरी येथानुशक्ती। भजन करावें॥३६॥**

भगवंतांचे भजन करणे हाच एक उपाय आहे. विरक्तीमुळे भक्ती सहज घडते तथापी ती मुळात नसेल तरीही यथाशक्ती भजनच करावे.

**काया वाचा आणी मनें। पत्रें पुष्पें फळें जीवनें। ईश्वरीं अर्पूनियां मनें। सार्थक करावें॥३७॥**

शरीर, वाचा, मनाने भजन करावे. पत्र, पुष्प, फळ आणि पाणी यापैकी काहीतरी ईश्वरास मन:पूर्वक अर्पण करावे आणि देह सार्थकी लावावा.

**येथानुशक्ती दानपुण्य। परी भगवंतीं अनन्य। सुखदु:खें परी चिंतन। देवाचेंचि करावें॥३८॥**

(३) ग्रामज्य - शरीरसुख. (४) आळकेपण - आवड. (५) पवाडे-शिरके - आवडीने घुसतो.

भगवंताशी अनन्य भावाने रहावे. यथाशक्ती दानपुण्य करावे. प्रपंचात सुख दुःख काहीही प्राप्त झाले तरीही देवाचेच चिंतन करावे.

**आदिअंतीं येक देव। मध्येंचि लाविली माव[६]। ह्मणोनियां पूर्ण भाव। भगवंतीं असावा।।३९।।**

वास्तविक आदि अंती परमेश्‍वरच आहे. मध्यंतरीच तेवढा मायेचा कारभार आहे. म्हणून भगवंतावरच पूर्ण विश्‍वास धरावा.

**ऐसा सबळ रजोगुण। संक्षेपें केलें कथन। आतां शुद्ध तो तूं जाण। परमार्थिक।।४०।।**

असा हा शबल रजोगुण प्रापंचिक आहे. तो थोडक्यात वर्णन केला आहे. आता यानंतर शुद्ध रजोगुण कसा असतो ते तू ऐक. तो सत्वगुणाप्रमाणे पारमार्थिक असतो.

**त्याचे वोळखीचें चिन्ह। सत्वगुणीं असे जाण। तो रजोगुण परिपूर्ण। भजनमूळ।।४१।।**

शुद्ध रजोगुणाचे साम्य सत्वगुणाशी आहे. भगवंताच्या भजनाचे तो मुख्य कारण आहे. (सत्वगुण कार्यशील झाला असेल तर तो शुद्ध रजोगुणच होय.)

**ऐसा रजोगुण बोलिला। श्रोतीं मनें अनुमानिला। आतां पुढें परिसिला। पाहिजे तमोगुण।।४२।।**

आतापर्यंत रजोगुणाची लक्षणे सांगितली ती श्रोत्यांना समजली असतीलच. आता यापुढे तमोगुणाच्या लक्षणांचे श्रोत्यांनी श्रवण करावे.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे रजोगुणलक्षणनाम समास पंचम।।५।।

## द. २ स. ६ : तमोगुणलक्षण

विश्वविद्यालयातील परीक्षांमध्ये पहिला, दुसरा आणि तिसरा असे पास होणारांचे तीन वर्ग असतात. तिसऱ्या वर्गापलीकडे वर्ग नसतो. त्याचप्रमाणे श्री समर्थांनी सत्त्वगुणी, रजोगुणी आणि तमोगुणी असे माणसाचे तीन वर्ग कल्पिले आहेत. सत्त्वगुणी माणूस खऱ्या अर्थाने माणूस असतो यात शंका नाही. शुद्ध रजोगुणी माणूससुद्धा सत्त्वगुणी म्हणूनच मानायला हरकत नाही. आता उरली दोन, शबल रजोगुणी आणि तमोगुणी माणसे. यांपैकी शबल रजोगुणी माणूस म्हणजे मनापासून प्रपंचात रस घेणारा सामान्य संसारी माणूस होय. त्याच्या जीवनात परमार्थाला स्थान नसते, हे जरी खरे असले तरी तो मोठ्या रसिकतेने जीवन जगतो. खावे, प्यावे, भोग भोगावे, खेळ खेळावे, नाटक पाहावे व करावे, व्यसन करावे, संगीत नृत्यादि कलांचा रस घ्यावा, पैसा मिळवावा आणि चैनीत आयुष्य घालवावे, असा त्याचा दृष्टिकोन असतो. तो उघडपणे भोगी वृत्तीचा असतो. तमोगुणी माणसांचा वर्ग शेवटचा. तमोगुणी माणसामध्ये शबल रजोगुणाचे सगळे दोष आहेत इतकेच नव्हे तर त्यामध्ये प्रत्येक ठिकाणी एकांतिकपणा, आततायीपणा, आणि अघोरीपणा आढळतो. उदा. रजोगुणाप्रमाणे तमोगुणात विकार असतात. पण ते भयंकर प्रमाणात असतात. स्वार्थ असतो, पण तो अमर्याद असतो. आसक्ती असते, पण ती अवास्तव असते. अनुष्ठान असते पण ते आततायी असते, आणि साधन असते पण ते अघोरी

(६) माव – माया.

असते. तमोगुणी माणूस संगती करण्यास कठीण असतो. नाइलाजाने त्याला माणूस म्हणायचे इतकेच.

## द. २ स. ६ तमोगुणलक्षण

**।। श्रीराम ।।**

**मागां बोलिलां रजोगुण। क्रियेसहित लक्षण। आतां ऐका तमोगुण। तोहि सांगिजेल ।।१।।**
मागील समासामध्ये रजोगुणांची लक्षणे व कार्य सांगितले. आता तमोगुणाची लक्षणे ऐका.
**संसारी दुःखसंमंध। प्राप्त होतां उठे खेद। का अद्‌भुत आला क्रोध। तो तमोगुण ।।२।।**
संसार करीत असतांना दुःखे प्राप्त झाली असता उद्विग्नता येते किंवा अत्यंत राग येतो हे तमोगुणाचे लक्षण आहे.
**शेरीरीं क्रोध भरतां। नोळखे माता पिता। बंधु बहिण कांता। ताडी, तो तमोगुण ।।३।।**
एकदा असा क्रोध अंगात भरला की माता, पिता, बंधु, बहिण, पत्नी कशाचीही ओळख व ठेवता त्यांना मारहाण करतो. (हे तमोगुणाचे लक्षण, हे शब्द प्रत्येक वेळी शेवटी वाचावे.)
**दुसऱ्याचा प्राण घ्यावा। आपला आपण स्वयें द्यावा। विसरवी जीवभावा। तो तमोगुण ।।४।।**
दुसऱ्याची हत्या करणे किंवा आत्महत्या करणे, स्वतःची जीवभावना विसरणे आणि बेफाम होणे.
**भरलें क्रोधाचें काविरें[१]। पिशाच्यापरीं वावरे। नाना उपायें नावरे। तो तमोगुण ।।५।।**
अंगामध्ये क्रोध भरल्यामुळे पिशाच्चाप्रमाणे वागणे, कोणत्याही उपायाने राग आवरता न येणे.
**आपला आपण शस्त्रपात। पराचा करी घात। ऐसा समय वर्तत। तो तमोगुण ।।६।।**
आपले शस्त्र स्वतःवर चालविणे किंवा दुसऱ्यावर चालवून त्याला मारणे, असा जो प्रसंगी वागतो.
**डोळां युध्यचि पाहावें। रण पडिलें तेथें जावें। ऐसें घेतलें जीवें। तो तमोगुण ।।७।।**
युद्ध प्रत्यक्ष डोळ्यांनी पहावे किंवा लढाई सुरू असेल तेथे जावे असे वाटणे.
**अखंड भ्रांती पडे। केला निश्चय विघडे। अत्यंत निद्रा आवडे। तो तमोगुण ।।८।।**
नेहमी भ्रमामध्ये वावरतो, ज्याची बुद्धी कधी स्थिर नसते, ज्याला झोप घेणे अत्यंत प्रिय असते.
**क्षुधा जयाची वाड[२]। नेणे कडु अथवा गोड। अत्यंत जो कां मूढ। तो तमोगुण ।।९।।**
अतिशय खादाड असतो, कडू किंवा गोड काहीच ध्यानात घेत नाही. जो अतिशय वेडगळ असतो, तो तमोगुण असतो.
**प्रीतिपात्र गेलें मरणें। तयालागीं जीव देणें। स्वयें आत्महत्या करणें। तो तमोगुण ।।१०।।**
जिवलगाचा मृत्यू झाला म्हणून स्वतःचा जीव देतो, आत्महत्या करून घेतो तो तमोगुण.
**किडा मुंगी आणि स्वापद। यांचा करूं आवडे वध। अत्यंत जो कृपामंद। तो तमोगुण ।।११।।**
किडे, मुंग्या, जंगली जनावरे यांचा वध करणे आवडते, जो दयामाया जाणतच नाही तो तमोगुण.
**स्त्रीहत्या बाळहत्या। द्रव्यालागीं ब्रह्महत्या। करूं आवडे गोहत्या। तो तमोगुण ।।१२।।**
स्त्री, बालके यांची हत्या करणे, पैसा मिळविण्यासाठी ब्राम्हणाचा जीव घेणे, गाईची हत्या करणे हा तमोगुण.

(१) काविरें - वेड.

**विसाळाचेनि[३] नेटें। वीष घ्यावेंसें वाटे। परवध मनीं उठे। तो तमोगुण।।१३।।**
ईर्षेने किंवा चेव येऊन किंवा चीड येऊन विष घ्यावेसे वाटते, दुसऱ्याचाही जीव घेण्याचा संकल्प करतो तो तमोगुण.

**अंतरीं धरूनि कपट। पराचें करी तळपट। सदा मस्त सदा उद्धट। तो तमोगुण।।१४।।**
मनामध्ये कपटीभाव धरून दुसऱ्याचे तळपट करतो (सर्वनाश करतो) जो सदा मस्तीमध्ये आणि उद्धटपणे वागतो तो तमोगुण.

**कळह व्हावा ऐसें वाटे। झोंबी घ्यावी ऐसें उठे। अंतरीं द्वेष प्रगटे। तो तमोगुण।।१५।।**
भांडणे जुंपावी असे वाटते, कुस्ती खेळावी (झोंबाझोंबीची हौस) वाटते, ज्याच्या चित्तात द्वेष उत्पन्न होतो.

**युध्य देखावें ऐकावें। स्वयें युध्यचि करावें। मारावें कीं मरावें। तो तमोगुण।।१६।।**
युद्ध पहावे, त्याची वर्णने ऐकावी, स्वत: लढाई करावी, मारावे किंवा मरावे असे वाटते तो तमोगुण.

**मत्सरें भक्ति मोडावी। देवाळयें विघडावीं। फळतीं झाडें तोडावीं। तो तमोगुण।।१७।।**
दुसऱ्याच्या भक्तीभावनेमध्ये मत्सरापोटी विघ्ने आणावी, देवालये फोडून टाकावी, फळती, फुलती झाडे तोडावी असे वाटते तो तमोगुण.

**सत्कर्में ते नावडती। नाना दोष ते आवडती। पापभय नाहीं चित्तीं। तो तमोगुण।।१८।।**
ज्याला पुण्यदायी कार्ये आवडत नाहीत, अनेक प्रकारची पापे आवडतात, पाप करण्यात ज्याला भयच वाटत नाही तो तमोगुण.

**ब्रह्मवृत्तीचा उछेद। जीवमात्रास देणें खेद। करूं आवडे अप्रमाद। तो तमोगुण।।१९।।**
ब्रम्हवृत्तीचा उच्छेद करणे (ब्राम्हणांचे जीवनपोषणाचे मार्गच बंद करणे किंवा सात्विक प्रवृत्ती पसरविणाऱ्याचे मार्ग बंद करणे.) प्राणिमात्रांना दु:खी करणे, मोठे गुन्हे करण्यात पुरूषार्थ वाटणे हे तमोगुणाचे लक्षण आहे.

**आग्नप्रळये शस्त्रप्रळये। भूतप्रळये वीषप्रळये। मत्सरें करीं जीवक्षये। तो तमोगुण।।२०।।**
(घरांना, पिकांना) आगी लावणे, शस्त्राने मारहाण करणे, भूतबाधेचे प्रयोग, विषप्रयोग करून इतरांचा मत्सराने नाश करणे हा तमोगुण आहे.

**परपीडेचा संतोष। निष्ठुरपणाचा हव्यास। संसाराचा नये त्रास। तो तमोगुण।।२१।।**
परदु:ख पाहून समाधान वाटणे, निर्दयपणाची कृत्ये करण्याचा हव्यास धरणे, प्रपंचाचा कधीच वीट न येणे (त्यातच गोडी वाटणे) हा तमोगुण.

**भांडण लाऊन द्यावें। स्वयें कौतुक पाहावें। कुबुद्धि घेतली जीवें। तो तमोगुण।।२२।।**
लोकांमध्ये भांडणे लावून देणे (कळलावेपणा) आणि ती पहाण्यात सौख्य वाटणे ही कुबुद्धी असणे हा रजोगुण.

**प्राप्त जालियां संपत्ती। जीवांस करी यातायाती। कळवळा नये चित्तीं। तो तमोगुण।।२३।।**
धनप्राप्ती झाली असता तिचा उपयोग इतरांना दु:खी करण्यासाठी करणे, मनात दयाबुद्धी नसणे हा

(२) वाड - मोठी. (३) विसाळ - एक प्रकारची बाधा.

तमोगुण.

**नावडे भक्ति नावडे भाव। नावडे तीर्थ नावडे देव। वेदशास्त्र नलगे सर्व। तो तमोगुण॥२४॥**

भाव, भक्ती, तीर्थ, देव यांच्याबदद्ल तिरस्कार, वेदशास्त्राची गरजच ज्याला वाटत नाही तो तमोगुण.

**स्नानसंध्या नेम नसे। स्वधर्मी भ्रष्टला दिसे। अकर्तव्य करीतसे। तो तमोगुण॥२५॥**

स्नानसंध्यादि (देहशमनशुद्धी करणारे) कोणतेही नेम पाळत नाही, जो आचार धर्मापासून भ्रष्ट असतो (त्यांचे पालन करीत नाही) आणि ज्या गोष्टी निंद्य असल्याने करू नयेत त्याच करतो तो तमोगुण.

**ज्येष्ठ बंधु बाप माये। त्यांचीं वचनें न साहे। सीघ्रकोपी निघोन जाये। तो तमोगुण॥२६॥**

थोरला भाऊ, आईवडील यांचे बोलणे सहन न झाल्याने जो निघून जातो. (गृहत्याग करतो) शीघ्रकोपी (माथेफिरू) असतो तो तमोगुण.

**उगेंचि खावें उगेंचि असावें। स्तब्ध होऊन बैसावें। कांहीच स्मरेना स्वभावें। तो तमोगुण॥२७॥**

भूक लागलेली नसतांनासुद्धा खात सुटतो, उद्योग न करता स्वस्थ बसतो, कोणत्याही गोष्टींचे स्मरण चित्तामध्ये रहात नाही तो तमोगुण.

**चेटकविद्येचा अभ्यास। शस्त्रविद्येचा हव्यास। मल्लविद्या व्हावी ज्यास। तो तमोगुण॥२८॥**

चेटूक करण्याचा अभ्यास करणे, शस्त्रविद्या शिकण्याचा मनापासून छंद असणे, पहिलवाणी यावीशी वाटणे हा तमोगुण.

**केले गळाचे[४] नवस। राडिबेडीचे[५] सायास। काष्ठयंत्र छेदी जिव्हेस। तो तमोगुण॥२९॥**

गळ टोचून घेणे, निखाऱ्यावरून चालणे यासारखे नवस करणे, लाकडी त्रिशुलाने, चिमट्याने जीभ छेदून घेणे हा तमोगुण.

**मस्तकीं भदें जाळावें। पोतें[६] आंग हुरपळावें। स्वयें शस्त्र टोंचून घ्यावें। तो तमोगुण॥३०॥**

मस्तकावर खापर ठेऊन त्यात पेटत्या वस्तू घालून भाजून घेणे, पोत किंवा काकडा पेटवून स्वत:चेच शरीर होरपळून घेणे, किंवा शस्त्राने स्वत:लाच जखम करून घेणे हा तमोगुण.

**देवास सिर वाहावें। कां तें आंग समर्पावें। पडणीवरून घालून घ्यावें। तो तमोगुण॥३१॥**

(रावणाप्रमाणे) स्वत:चे डोके देवाला वाहाणे किंवा देह समर्पण करणे, कडेलोट करून घेऊन आत्महत्या करणे हे तमोगुणाचे लक्षण.

**निग्रह करून धरणें। कां तें टांगून घेणें। देवद्वारीं जीव देणे। तो तमोगुण॥३२॥**

देवापुढे हट्टाग्रहाने धरणे धरून बसणे, किंवा टांगून घेणे, देवळामध्ये आत्महत्या करणे हा तमोगुण आहे.

**निराहार उपोषण। पंचाग्नी धूम्रपान। आपणास घ्यावें पुरुन। तो तमोगुण॥३३॥**

कामना मनात धरून निराहार उपोषण करणे, बाजूला निखारे ठेवून उन्हामध्ये बसणे, उलटे टांगून घेऊन धुरी घेणे किंवा जमिनीमध्ये स्वत:ला पुरून घेणे हा तमोगुण.

**सकाम जें का अनुष्ठान। कां तें वायोनिरोधन। अथवा राहावें पडोन। तो तमोगुण॥३४॥**

कामनेपोटी अनुष्ठाने करणे, श्वासोच्छवास कोंडून धरणे किंवा निपचित पडून राहाणे हा तमोगुण.

(४) गळ - मानेला फास लावून घेण्याचे. (५) राडी - धगधगीत निखाऱ्याची खाई. (६) पोतें - काकडा (पोत)

**नखें केश वाढवावे। हस्तचि वर्तें करावे। अथवा वाग्सुंन्य व्हावें। तो तमोगुण।।३५।।**
केस, नखे वाढविणे, हात वर धरून ठेवणे किंवा मौन धरणे (ही सर्व हटवादी उपासना) तमोगुणाचे लक्षण आहे.

**नाना निग्रहें पिडावें। देहदु:खें चर्फडावें। क्रोधें देवास फोडावे। तो तमोगुण।।३६।।**
देहाविषयी निष्ठूरता धरून त्याला पीडा देणे, देहदु:ख झाल्यावर चरफडत बसणे किंवा रागाच्या आवेशात देवास फोडून टाकावे हा तमोगुण.

**देवाची जो निंदा करी। तो आशाबद्धि अघोरी। जो संतसंग न धरी। तो तमोगुण।।३७।।**
देवाची निंदा करतो, आशाळभूत असतो, अघोरी कृत्ये करतो, संतसंगती मुळीच धरीत नाही तो तमोगुण.

**ऐसा हा तमोगुण। सांगतां तो असाधारण। परी त्यागार्थ निरूपण। कांहीं येक।।३८।।**
अशा प्रकारची ही तमोगुणाची लक्षणे असाधारण आहेत. त्याचा त्याग करावा म्हणून ती सांगितली आहेत.

**ऐसें वर्ते तो तमोगुण। परी हा पतनास कारण। मोक्षप्राप्तीचें लक्षण। नव्हे येणें।।३९।।**
तमोगुणामुळे जे वर्तन घडते ते अधोगतीला नेते. त्यामुळे मोक्षप्राप्ती कधीच होणार नाही.

**केल्या कर्माचें फळ। प्राप्त होईल सकळ। जन्म दु:खाचें मूळ। तुटेना कीं।।४०।।**
तमोगुणामुळे जी कर्मे घडतील त्यांची फळे भोगावीच लागतील आणि त्यामुळे दु:खाचे मूळ (किंवा कारण असा) जन्म चुकणार नाही.

**व्हावया जन्माचें खंडण। पाहिजे तो सत्वगुण। तेंचि असे निरूपण। पुढिले समासीं।।४१।।**
जन्म चुकविण्यासाठी (पुनरावर्तन सुटण्यासाठी) सत्वगुणच पाहिजे त्याचेच निरूपण पुढच्या समासामध्ये केले आहे.

(वरील समासामध्ये प्रारंभीच्या ओव्यात शबल रजोगुणाचे तर नंतरच्या ओव्यात शुद्ध तमोगुणाचे वर्णन आहे. देवाप्रीत्यर्थ घोर तप किंवा सकाम नवस यांचे वर्णन आहे. स्वत:ला देहपीडा करून घेऊन साधू म्हणवून घेणारे बैरागी तमोगुणीच असतात. हे या समासावरून कळून येईल. अज्ञानी लोक त्यामुळे फसतातसुद्धा!)

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तमोगुणनाम समास षष्ठ ।।६।।

## द. २ स. ७ : सत्त्वगुणलक्षण

आपल्याभोवती पसरलेले सगळे विश्व त्रिगुणात्मक आहे, हे जर खरे, तर पृथ्वीवरील मानवी जीवनदेखील त्रिगुणात्मक असले पाहिजे. सत्त्व, रज आणि तम हे तिन्ही शक्तिरूप आहेत. शक्ती स्वत: चांगली नाही आणि वाईटही नाही. वापरणारा तिचा जसा उपयोग करतो त्यावर ती चांगला अथवा वाईट परिणाम घडवून आणते. त्रिगुणामध्ये शुद्ध आणि शबल असा भेद करण्याचे कारण असे की, देहबुद्धीचा पगडा बसलेल्या स्वार्थी जीवनात गुणांचे शबल रूप दिसते, तर आत्मबुद्धीचा पगडा

बसलेल्या नि:स्वार्थी जीवनात त्यांचे शुद्ध रूप आढळते. उदा. युद्ध पाहणे व युद्ध खेळणे किंवा वध करणे, हा तमोगुण आहे. भगवान् श्रीरामचंद्र अस्त्रविद्या शिकले आणि स्वत: मोठ्या उत्साहाने युद्ध खेळले. शिवाय त्यांनी वालीचा, रावणाचा, ताटकेचा देखील वध केला. त्याचप्रमाणे अर्जुन युद्ध नको म्हणत होता. पण एवढी अठरा अध्याय गीता सांगून भगवान श्रीकृष्णांनी अखेर त्याला युद्ध करायला लावले. असे असून सुद्धा या दोन्ही अवतारांना कोणी तमोगुणी मानीत नाही. दोघांनीही केवळ कर्तव्य म्हणून युद्ध केले किंवा वध केला. अर्थात ती कर्मे संपूर्णपणे सात्त्विक होती यात वादच नाही. देहबुद्धीचे किंवा देहाभोवती केंद्रित झालेले जीवन म्हणजे प्रपंच आणि आत्मबुद्धीचे किंवा देवाभोवती केंद्रित झालेले जीवन म्हणजे परमार्थ होय. त्रिगुणांचे प्रापंचिक रूप शबल, तर पारमार्थिक रूप शुद्ध असते. दोन्ही रूपांची थोडक्यात तुलना अशी :

१. प्रापंचिक त्रिगुण : जग माझ्यासाठी आहे ही भावना असल्याने स्वार्थमय असतात.
पारमार्थिक त्रिगुण : मी जगासाठी आहे ही भावना असल्याने नि:स्वार्थी असतात.

२. प्रा.त्रि. : जड अशा दृश्याला सर्वस्व मानून भोगवृत्ती पोसतात.
पा.त्रि. : सूक्ष्म अशा दृश्याला सर्वस्व मानून त्यागवृत्ती पोसतात.

३. प्रा.त्रि. : कामनेच्या आधीनपणामुळे कर्मरत व प्रवृत्तिप्रधान असतात.
पा.त्रि. : नि:कामतेचा आदर्श असल्याने चिंतनशील व निवृत्तिप्रधान असतात.

४. प्रा.त्रि. : वासनातृप्तीच्या नादाने देहातून सुख घेण्याची साधना जन्मभर करतात. त्यातून विज्ञान वाढीस लागते.
पा.त्रि. : वासना निर्मूळ करण्याच्या नादाने भगवंतापासून सुख घेण्याची साधना जन्मभर करतात. त्यातून आत्मज्ञान प्रगटते.

५. प्रा.त्रि. : या जीवनांत काम, क्रोध, द्वेष, मत्सर वगैरे विकारांचा धुमाकूळ चालतो. त्यामुळे सदैव असमाधान राहते.
पा.त्रि. : या जीवनात आत्मानात्मविवेकाचा रम्य विलास चालतो. त्यामुळे मनाला सदैव समाधान राहते.

६. प्रा.त्रि. : सत्ताधारी, श्रीमंत, कलावंत, राजविलासी आणि चैनी पुरुष आदर्श मानले जातात, तसे व्हावेसे वाटते.
पा.त्रि. : साधू, संत, महात्मे, योगी, त्यागी, आत्मज्ञानी व भगवंताचे प्रेमळ भक्त आदर्श असतात. तसे व्हावेसे वाटते.

७. प्रा.त्रि. : आकुंचित वृत्तीमुळे दोषदृष्टी असते. दुसऱ्याची निंदा घडते व त्यामुळे अनेकांशी विरोध येतो.
पा.त्रि. : विशाल वृत्तीमुळे दुसऱ्याबद्दल प्रेम वाटते. त्याचे गुणच दिसतात. दोषांवर पांघरुण घातले जाते. म्हणून अनेकांशी स्नेह जडतो.

८. प्रा.त्रि. : दुसऱ्याच्या दु:खाबद्दल उदासीनता असते, यापेक्षा हलक्या पातळीवर दुसऱ्याच्या

दु:खाने सुख वाटते. परोपकार करण्याची प्रवृत्ती नसते.

पा.त्रि. : दुसऱ्याचे दु:ख पाहवत नाही, परोपकार करण्याची हौस असते. दुसऱ्याच्या सुखाने आपण सुखी होतो.

९. प्रा.त्रि. : प्रपंचातील सुखाने सुखी तर दु:खाने दु:खी होतो. श्रृंगार, संगीत, नाच, नाटक, तमाशा इत्यादि विरंगुळ्याची स्थाने असतात.

पा.त्रि. : प्रपंचातील सुखदु:खांच्या हेलकाव्यांनी मन खालीवर होत नाही. दु:खाचा आघात झाला तरी मन डगमगत नाही. हरिकथा, भजन, कीर्तन, प्रवचन, पुण्यतिथीचा उत्सव इत्यादि विरंगुळ्याची स्थाने असतात.

१०. प्रा.त्रि. : देहाला देव मानल्याने देहाचे अखंड स्मरण आणि अर्थात् भगवंताचे विस्मरण घडते.

पा.त्रि. : देवाला सर्वस्व मानल्याने भगवंताचे अखंड स्मरण आणि त्यामुळे देहाचे आपोआप विस्मरण घडते. असो. या समासात सत्त्वगुणाची लक्षणे सांगताना श्री समर्थांनी त्रिगुणांचे पारमार्थिक रूप सविस्तर सांगितले आहे.

॥ श्रीराम॥

**मागां बोलिला तमोगुण। जो दु:खदायक दारुण। आतां ऐका सत्वगुण। परम दुर्लभ॥१॥**

मागील समासात दारूण, दु:खदायक अशा तमोगुणाची लक्षणे सांगीतली आता अतिशय दुर्लभ अशा सत्वगुणाचे वर्णन ऐका.

**जो भजनाचा आधार। जो योगियांची थार। जो निरसी संसार। दु:खमूळ जो॥२॥**

भजन सत्वगुणामुळे घडते, योग्यांना याच्या आधारामुळे सिद्धी प्राप्त होते. दुख:दायक संसार याच्यामुळे नष्ट होतो.

**जेणें होये उत्तम गती। मार्ग फुटे भगवंती। जेणें पाविजे मुक्ती। सायोज्यता ते॥३॥**

याच्यामुळे सद्गती मिळते. भगवतप्राप्तीचा मार्ग सापडल्यामुळे अशी शाश्वत मुक्ती मिळते की पुन्हा जन्ममरणाच्या फेऱ्यात मानव सापडत नाही.

**जो भक्तांचा कोंवसा[१]। जो भवार्णवींचा भर्वसा। मोक्षलक्ष्मीची दशा। तो सत्वगुण॥४॥**

जो भक्तांचे रक्षण (कोवसा–आधार), भवसागरातून पैलपार नेणारी नौका आणि मोक्षलक्षणांचे चिन्ह आहे

तो सत्वगुण होय.

**जो परमार्थाचें मंडण। महंतांचें भूषण। रजतमाचें निर्शन[२]। जयाचेनि॥५॥**

जो परमार्थ–पोषक आहे, महंताचे भूषण आहे आणि रजोगुण, तमोगुण यांचे निरसन करतो.

**जो परम सुखकरी। जो आनंदाची लहरी। देऊनियां, निवारी। जन्ममृत्य॥६॥**

जो अत्यंत सुख देतो, आनंदाची लाट निर्माण करतो, जन्ममृत्यूचे निवारण करतो, तो सत्वगुण.

**जो अज्ञानाचा सेवट। जो पुण्याचें मूळ पीठ। जयाचेनि सांपडे वाट। परलोकाची॥७॥**

अज्ञान नाहिसे करतो, ज्यामुळे पुण्यप्राप्ती होते, ज्यामुहे परमार्थाचा मार्ग आकलन होतो तो सत्वगुण.

**ऐसा हा सत्वगुण। देहीं उमटतां आपण। तये क्रियेचें लक्षण। ऐसें असे॥८॥**

असा हा सत्वगुण जेव्हा शरीरामध्ये प्रकट होतो तेव्हा माणसाची वर्तणूक कशी घडते ते आता सांगतो.

**ईश्वरीं प्रेमा अधिक। प्रपंच संपादणें लोकिक। सदा सन्निध विवेक। तो सत्वगुण॥९॥**

प्रपंच बाह्यत: लौकिकापुरता (आवश्यक तेवढाच) करीत असताना ईश्वराबद्दल मात्र अधिक प्रेम ज्यामुळे

असते आणि वर्तन विवेकपूर्ण असते तो सत्वगुण.

**संसारदु:ख विसरवी। भक्तिमार्ग विमळ दावी। भजनक्रिया उपजवी। तो सत्वगुण॥१०॥**

संसार दु:खाचे विस्मरण घडवितो, शुद्ध भक्तीमार्गाची दिशा दाखवितो प्रत्यक्ष ईश्वराचे भजन घडवितो तो सत्वगुण.

**परमार्थाची आवडी। उठे भावार्थाची गोडी। परोपकारीं तांतडी। तो सत्वगुण॥११॥**

परमार्थाची आवड उत्पन्न होते, अध्यात्माच्या भावार्थात गोडी लागते, तत्परतेने परोपकार हातून घडतो.

**स्नानसंध्या पुण्यसीळ। अभ्यांतरींचा निर्मळ। शरीर वस्त्रें सोज्वळ। तो सत्वगुण॥१२॥**

स्नानसंध्या करणे इत्यादि पुण्य घडते, मन शुद्ध विचाराने भरून राहते, त्याचप्रमाणे शरीर, वस्त्रप्रावरणे शुद्ध स्वच्छ राखण्याची इच्छा होते ते सत्वगुण.

**येजन आणी याजन। आधेन आणी अध्यापन। स्वयें करी दानपुण्य। तो सत्वगुण॥१३॥**

स्वत: यज्ञ करणे (यजन) व करविणे (याजन), स्वत: शिकणे (अध्ययन), व दुसऱ्यास शिकविणे (अध्यापन) स्वत: दानधर्म करणे ही सत्वगुणाची करणीच आहे.

**निरूपणाची आवडी। जया हरिकथेची गोडी। क्रिया पालटे रोकडीं। तो सत्वगुण॥१४॥**

हरीच्या निरूपणाची व इतरांचे निरूपण ऐकण्याची आवड, ऐकल्यानंतर त्यानुसार स्वत:च्या वर्तनामध्ये इष्ट तो बदल घडविणे ही सत्वगुणाची लक्षणे आहेत.

**अश्वदानें गजदानें। गोदानें भूमिदानें। नाना रत्नांचीं दानें–। करी, तो सत्वगुण॥१५॥**

घोडे, हत्ती, गाई, जमीन, मौल्यवान वस्तू (रत्ने) यांचे दान देणे, द्रव्य, वस्त्रे, अन्न, पाणी इतरांना देणे, ब्राम्हणभोजन घालून अन्नसमर्पण करणे ही सत्वगुणाची करणी आहे.

**धनदान वस्त्रदान। अन्नदान उदकदान। करी ब्राह्मणसंतर्पण। तो सत्वगुण॥१६॥**

घोडे, हत्ती, गाई, जमीन, मौल्यवान वस्तू (रत्ने) यांचे दान घेणे, द्रव्य, वस्त्र, अन्न, पाणी इतरांना देणे, ब्राम्हणभोजन घालून अन्नसमर्पन करणे ही सत्वगुणाची करणी आहे.

**कार्तिकस्नानें माघस्नानें। व्रतें उद्यापनें दानें। नि:काम तीर्थें उपोषणें। तो सत्वगुण॥१७॥**

कार्तिक स्नान, माघ स्नान, व्रते व त्यांची उद्यापने, दाने, देवदर्शनार्थ यात्रा, उपासतापास हे सर्व निष्काम

भावनेने घडते हे सत्वगुणामुळेच.

**सहस्त्रभोजनें लक्षभोजनें। विविध प्रकारींची दानें। नि:काम करी सत्वगुणें। कामना**

(१) कोंवसा – आधार. (२) निर्शन – नाश.

**रजोगुण ।।१८।।**
हजारो, लाखो लोकांना भोजन घालणे, नाना प्रकारची दाने जर निष्काम बुद्धीने दिली तर तो सत्वगुण आणि याच गोष्टी जर सकाम भावनेने केल्या तर तो रजोगुण होय.
**तीर्थी अर्पी जो अग्रारें[३]। बांधे वापीं सरोवरें। बांधे देवाळयें सिखरें। तो सत्वगुण ।।१९।।**
आणि
**देवद्वारीं पडशाळा[४]। पाईरीया दीपमाळा। वृंदावनें पार पिंपळा-। बांधें, तो सत्वगुण ।।२०।।**
तीर्थक्षेत्रांना (अग्रहार) जमिनी इनामे देणे, विहीरी, तलाव, सरोवरे, देवळे व देवालयांची शिखरे, देवळाशेजारी धर्मशाळा, पायऱ्या दिपमाळा, तुळशीची वृदांवने, पिंपळाचे पार बांधणे.....हे सर्व सत्वगुणांमुळे होते. (निर्माता सत्वगुणी असतो.)
**लावी वनें उपवनें। पुष्पवाटिका जीवनें। निववी तापस्यांचीं मनें। तो सत्वगुण ।।२१।।**
झाडे लावणे, फळ पुष्पाच्या बागा लावणे, त्यांना पाणी देणे आणि तपस्वी लोकांना संतोष देणे सत्वगुणामुळे होते.
**संध्यामठ आणि भुयेरी। पाईरीया नदीतीरीं। भांडारगृहें देवद्वारीं। बांधे तो सत्वगुण ।।२२।।**
संध्या करण्यासाठी मठ, एकान्तासाठी भुयारे, नदीकाठी घाट बांधणे, देवालयासाठी कोठ्या सत्वगुणच बांधतो.
**नाना देवांची जे स्थानें। तेथें नंदादीप घालणें। वाहे आळंकार भूषणें। तो सत्वगुण ।।२३।।**
अनेक देवांची जी स्थाने आहेत तेथे नंदादीप सुरू करणे, मूर्तीला अलंकार, वस्त्रे अर्पण करणे हा सत्वगुण.
**जेंगट मृदांग टाळ। दमामे[५] नगारे काहळ[५]। नाना वाद्यांचे कल्लोळ। सुस्वरादिक ।।२४।।**
जेंगट, मृदुंग, टाळ, दमामे, नगारे, कर्णे इत्यादि वाद्ये देवाला अर्पण करून त्यांच्या सुस्वराचे घोष निर्माण करतो.
**नाना सामग्री सुंदर। देवाळई घाली नर। हरिभजनीं जो तत्पर। तो सत्वगुण ।।२५।।**
अशा प्रकारची नाना उपकर्णे देवालयात अर्पण करून तत्परतेने हरीभजन करतो तो सत्वगुण.
**छेत्रें आणि सुखासनें[६]। दिंड्या पताका निशाणें। वाहे चामरें सूर्यापानें[७]। तो सत्वगुण ।।२६।।**
छत्र्या, पालख्या, दिंड्या-पताका, निशाणे अर्पण करतो, देवावर चौऱ्या ढाळतो, अब्दागिरी धारण करतो तो सत्वगुण.
**वृंदावनें तुळसीवनें। रंगमाळा संमार्जनें। ऐसी प्रीति घेतली मनें। तो सत्वगुण ।।२७।।**
समाधी वृंदावनापुढे रांगोळ्या काढणे, सडा संमार्जन करणे यात आवड असणे हा सत्वगुण.
**सुंदरें नाना उपकर्णें। मंडप चांदवे आसनें। देवळाईं समर्पणें। हा सत्वगुण ।।२८।।**
देवासाठी सुंदर उपकरणी, मंडप, चांदवे, आसने अर्पण करतो.
**देवाकारणें खाद्य। नाना प्रकारीं नैवेद्य। अपूर्व फळें अर्पीं सद्य। तो सत्वगुण ।।२९।।**
प्रसादासाठी खाद्य पदार्थ, नाना प्रकारचे नैवेद्य, सुंदर फळे मागवून अर्पण करतो तो सत्वगुण.

(३) अग्रारें - देवस्थानास उमान केलेली जमीन. (४) पडशाळा - धर्मशाळा. (५) दमामे, काहळ - चर्मवाद्ये.

**ऐसी भक्तीची आवडी। नीच दास्यत्वाची गोडी। स्वयें देवद्वार झाडी। तो सत्वगुण ।।३०।।**
ज्याला अशी देवाच्या भक्तीची आवड लागलेली असते की, झाटलोट करण्यासारखी हलकी कामे देवद्वारामध्ये स्वत: करतो.
**तिथी पर्व मोहोत्साव। तेथें ज्याचा अंतर्भाव। काया वाचा मनें सर्व। अर्पी, तो सत्वगुण ।।३१।।**
विशेष तिथी, पर्व किंवा महोत्सव प्रसंगी याला मनापासून आवडीने काया, वाचा, मनाने सेवा कराविशी वाटते.
**हरिकथेसी तत्पर। गंधें माळा आणी धुशरें[८]। घेऊन उभी निरंतर। तो सत्वगुण ।।३२।।**
हरीकथेला तो तत्पर असतो, गंध, माळा, बुक्का हाती घेऊन तो निरंतर उभा राहतो.
**नर अथवा नारी। येथानुशक्ति सामग्री। घेऊन उभीं देवद्वारीं। तो सत्वगुण ।।३३।।**
अशा प्रकारची सामुग्री घेऊन जे स्त्री/पुरूष देवालयात उभे राहून सेवा करतात तो त्यांचा सत्वगुणच असतो.
**महत्कृत्य सांडून मागें। देवास ये लागवेगें। भक्ति निकट आंतरंगें। तो सत्वगुण ।।३४।।**
आपले लौकीकातील मोठेपण (किर्ती) विसरून देवाची हलकीसलकी कामे करीत भक्तीपूर्वक निकट उभा राहतो तो सत्वगुण.
**थोरपण सांडून दुरी। नीच कृत्य आंगीकारी। तिष्ठत उभीं देवद्वारीं। तो सत्वगुण ।।३५।।**
आपले थोरपण बाजूला ठेवून हलकी कामे करतो. त्यासाठी तिष्ठत उभा असतो तो सत्वगुण.
**देवालागीं उपोषण। वर्जी तांबोल भोजन। नित्य नेम जप ध्यान–। करी, तो सत्वगुण ।।३६।।**
देवासाठी उपासतापास करतो, विडा भोजन वर्ज्य करतो, नित्यनियमाने (विशिष्ट वेळी) जप ध्यान करतो तो सत्वगुण.
**शब्द कठीण न बोले। अतिनेमेसीं चाले। योगी जेणें तोषविले। तो सत्वगुण ।।३७।।**
कोणाशीही कठोर शब्दांत बोलत नाही, मर्यादेने वागतो, योगीजनांना संतोष देतो तो सत्वगुण.
**सांडूनिया अभिमान। नि:काम करी कीर्तन। श्वेद रोमांच स्फुराण। तो सत्वगुण ।।३८।।**
देहाभिमान सोडून निष्कामवृत्तीने जो कीर्तन करतो, तो करीत असताना अंगी घाम येणे, शरीर रोमांचित होणे हे भाव उत्पन्न होतात तो सत्वगुण.
**अंतरीं देवाचें ध्यान। तेणें निडारलें[९] नयन। पडे देहाचें विस्मरण। तो सत्वगुण ।।३९।।**
अंतरामध्ये ईश्वराची भक्ती असल्यामुळे डोळे भरून येतात, देहाचे भान राहात नाही.
**हरिकथेची अति प्रीति। सर्वथा नये विकृती। आदिक प्रेमा आदिअंतीं। तो सत्वगुण ।।४०।।**
हरिकथेबद्दल अत्यंत प्रेमामुळे त्याला कंटाळा येण्यासारखी विकृती होत नाही, आरंभापासून शेवटपर्यंत हरिकथेत प्रेम टिकून राहते तो सत्वगुण.
**मुखीं नाम हातीं टाळी। नाचत बोले ब्रीदावळीं[१०]। घेऊन लावी पायधुळीं। तो सत्वगुण ।।४१।।**

(६) सुखासन – पालखी वगैरे. (७) सूर्यापानें – अब्दागिरी. (८) धुशर – बुक्का.

तोंडाने हरिनाम घेतो, हाताने टाळी वाजवत गुणवर्णन करतो, भक्तांची पायधूळ जो आनंदाने मस्तकी लावतो तो सत्वगुण.

**देहाभिमान गळे। विषईं वैराग्य प्रबळे। मिथ्या माया ऐसें कळे। तो सत्वगुण।।४२।।**

देहाचा अभिमान नष्ट होऊन, विषयांबद्दल वैराग्य मनी येते, माया ही असत्य आहे हे ज्यामुळे कळते तो सत्वगुण.

**कांही करावा उपाये। संसारीं गुंतोन काये। उकलवी ऐसें हृदये। तो सत्वगुण।।४३।।**

जन्मफेऱ्यातून सुटण्यासाठी काय उपाय करावा, संसारात आसक्त होण्यात काय अर्थ, अशा प्रकारे मनात विचार उकलू लागतात, तो सत्वगुण.

**संसारासी त्रासे मन। कांहीं करावें भजन। ऐसें मनीं उठे ज्ञान। तो सत्वगुण।।४४।।**

संसाराचा मनाला खरोखरी त्रास वाटून काही भजन करावे असे मनामध्ये ज्ञान होते तो सत्वगुण.

**असतां आपुले आश्रमीं। अत्यादरें नित्यनेमी। सदा प्रीती लागे रामीं। तो सत्वगुण।।४५।।**

प्रापंचिक व्याप असतानासुद्धा आदराने नित्यनेमाने रामाची भक्ती करतो तो सत्वगुण.

**सकळांचा आला वीट। परमार्थी जो निकट। आघातीं उपजे धारिष्ट। तो सत्वगुण।।४६।।**

प्रापंचिक मंडळीबद्दल प्रेमभाव कमी होतो आणि परमार्थाकडे धाव सुरू होते. संकटे आली तर (घाबरून न जाता) सामना करण्याचे धैर्य येते तो सत्वगुण.

**सर्वकाळ उदासीन। नाना भोगीं विटे मन। आठवे भगवद्भजन। तो सत्वगुण।।४७।।**

सर्वकाळ मनाचे उन्नयन झालेले असते. (उदासिन याचा अर्थ खिन्न असा नाही.) नाना प्रकारच्या उपभोगांचा कंटाळा येतो, ईश्वराचे भजन करावेसे वाटते तो सत्वगुण.

**पदार्थी न बैसे चित्त। मनीं आठवे भगवंत। ऐसा दृढ भावार्थ। तो सत्वगुण।।४८।।**

संसारातील कोणत्याही पदार्थाबद्दल मनात आकर्षण नाही, फक्त ईश्वराचे स्मरण रहावे अशी दृढ इच्छा असते, तो सत्वगुणाचा परिणाम.

**लोक बोलती विकारी। तरी आदिक प्रेमा धरी। निश्चय बाणे अंतरीं। तो सत्वगुण।।४९।।**

(एककल्ली वृत्ती झाल्यामुळे) लोक भ्रमिष्टसुद्धा म्हणतात पण याचे ईश्वरानुसंधान वाढते असते आणि ईश्वरप्राप्तीचा निश्चय मनात असतो तो सत्वगुण.

**अंतरीं स्फूर्ती स्फुरे। सस्वरूपीं तर्क भरे। नष्ट संदेह निवारे। तो सत्वगुण।।५०।।**

अंत:करणात एक प्रकारे स्फूर्ती येऊन स्वरूपाबद्दल (खऱ्या 'मी' बद्दल) तर्क भरून राहतो. चुकीच्या संदेहाचे निरसन होते ते सत्वगुणामुळेच.

**शरीर लावावें कारणीं। साक्षेप उठे अंत:कर्णी। सत्वगुणाची करणी। ऐसी असे।।५१।।**

शरीराचे सार्थक होण्यासाठी देवाच्या सेवेत झिजावे असा उद्योग करावासा वाटणे हे सत्वगुणाचे लक्षण आहे.

**शांति क्षमा आणि दया। निश्चय उपजे जया। सत्वगुण जाणावा तया। अंतरीं आला।।५२।।**

शांती, क्षमा आणि दया व ईश्वरप्राप्तीचा निश्चय ज्याच्या चित्तात असतो तो सत्वगुण.

(९) निडारलें - अश्रुपूर्ण झाले. (१०) ब्रीदावळी - गुणानुवाद.

**आले अतीत अभ्यागत। जाऊं नेदी जो भुकिस्त। येथानुशक्ती दान देत। तो सत्वगुण॥५३॥**
अतीत अभ्यागत (पाहुणे) घरी आले असता त्यांना व भुकेलेल्यांना अन्न दिल्याविना जाऊ देत नाही, यथानुशक्ती दान देतो तो सत्वगुण.

**तडितापडी[११] दैन्यवाणें। आलें आश्रमाचेनि गुणें। तयालागीं स्थळ देणें। तो सत्वगुण॥५४॥**
(तडी-तापडी) यात्रेकरूंना, भिक्षेकरी, गरीब लोक आश्रयासाठी आले असतांना त्यांना उतरण्यासाठी जागा देतो.

**आश्रमीं अन्नाची आपदा। विमुख नव्हे कदा। शक्तिनुसार दे सर्वदा। तो सत्वगुण॥५५॥**
घरी पुरेसे अन्न नसताना तो यथाशक्ती लोकांना देतो. कोणाला विन्मुख करीत नाही. तो सत्वगुण.

**जेणें जिंकिली रसना। तृप्त जयाची वासना। जयास नाहीं कामना। तो सत्वगुण॥५६॥**
ज्याने आपली जीभ जिंकली आहे (खाणे आणि बोलणे दोन्हीवर संयमाने ताबा मिळविला आहे.) ज्याची वासना तृप्त झाली आहे, ज्याला कोणतीही कामना राहिली नाही तो सत्वगुण.

**होणार तैसें होत जात। प्रपंचीं जाला आघात। डळमळिना ज्याचें चित्त। तो सत्वगुण॥५७॥**
जे होणार आहे ते भगवंताच्या इच्छेने होणार या भावनेने, जरी प्रपंचामध्ये काही आघात झाला (संकटे आली) तरी ज्याचे धैर्य डळमळत नाही तो सत्वगुण.

**येका भगवंताकारणें। सर्व सुख सोडिलें जेणें। केलें देहाचें सांडणें। तो सत्वगुण॥५८॥**
एका ईश्वरासाठी सर्व सुखे बाजूला सारतो इतकेच नव्हे तर देहही ईश्वरार्पण करतो.

**विषई धांवे वासना। परी तो कदा डळमळिना। ज्याचें धारिष्ट चळेना। तो सत्वगुण॥५९॥**
(इंद्रिये बहिर्मुख असल्यामुळे) विषयाकडे वासना साहजिकच धाव घेते पण जो स्थिर राहतो व धैर्य सोडून देत नाही तो सत्वगुण.

**देह आपदेनें पीडला। क्षुधे तृषेनें वोसावला[१२]। तरी निश्चयो राहिला। तो सत्वगुण॥६०॥**
देहाला संकटामुळे कष्ट झाले, तहान भूक यामुळे देह गलितगात्र (वोसावला) झाला तरी ज्याचा समाधानाचा किंवा साधनेचा निश्चय कायम राहातो तो सत्वगुणी.

**श्रवण आणी मनन। निजध्यासें समाधान। शुद्ध जालें आत्मज्ञान। तो सत्वगुण॥६१॥**
श्रवण-मनन आणि निदिध्यास (सतत चिंतन) यांनी शुद्ध आत्मज्ञान प्राप्त होते.

**जयास अहंकार नसे। नैराशता विलसे। जयापासीं कृपा वसे। तो सत्वगुण॥६२॥**
जो निरहंकारी असतो, ज्याची आशा कोठेच गुंतून रहात नाही, जो कृपा करण्यासच प्रवृत्त होतो तो सत्वगुण.

**सकळांसीं नम्र बोले। मर्यादा धरून चाले। सर्व जन तोषविले। तो सत्वगुण॥६३॥**
सर्वांशी नम्रपणे बोलतो, सदाचाराची मर्यादा सांभाळतो, त्यामुळे सर्वांना समाधान देतो तो सत्वगुण.

**सकळ जनासीं आर्जव। नाहीं विरोधास ठाव। परोपकारीं वेची जीव। तो सत्वगुण॥६४॥**
सकळांशी (आर्जवी) लीनतेने वागतो, त्यामुळे विरोधाला वावर नसतो, परोपकारासाठी जीवन खर्च करतो तो सत्वगुण.

---
(११) तडितापडी – तेजस्वी.

**आपकार्याहून जीवीं। परकार्यसिद्धी करावी। मरोन कीर्ती उरवावी। तो सत्वगुण।।६५।।**
आपल्या स्वत:च्या कामापेक्षा दुसऱ्याचे कार्य सिद्धीला मदत करतो, मेल्यावर किर्ती मागे ठेवून जातो तो सत्वगुण.
**पराव्याचे दोषगुण। दृष्टीस देखे आपण। समुद्राऐसी साठवण। तो सत्वगुण।।६६।।**
दुसऱ्याचे गुण दोष स्वत:ला दिसले तरी समुद्राप्रमाणे सर्व पोटात सामावून घेतो, (इतरांना सांगत सुटत नाही) तो सत्वगुण.
**नीच उत्तर साहाणें। प्रत्योत्तर न देणें। आला क्रोध सावरणें। तो सत्वगुण।।६७।।**
कोणी वावगा बोलला तरी ते सहन करतो प्रत्युत्तर (त्याच शब्दात) देत नाही, राग आला तरी ताब्यात ठेवतो तो सत्वगुण.
**अन्यायेंवीण गांजिती। नानापरी पीडा करिती। तितुकेंहि साठवी चित्तीं। तो सत्वगुण।।६८।।**
आपण अन्याय केला नसतानासुद्धा कोणी छळ केला, अनेक प्रकारे त्रास दिला तरी तो मनातच गिळून टाकतो तो सत्वगुण.
**शरीरें घीस साहाणें। दुर्जनासीं मिळोन जाणें। निंदकास उपकार करणें। हा सत्वगुण।।६९।।**
देहाने इतरांसाठी झिजतो, (सन्मार्ग न सोडताही) दुर्जनास प्रिय होतो, निंदा करणाऱ्यांवरसुद्धा उपकार करतो तो सत्वगुण.
**मन भलतीकडे धावें। तें विवेकें आवरावें। उंद्रियें दमन करावें। तो सत्वगुण।।७०।।**
मन जरी भलतीकडे सैरावैरा धाव घेत असले तरी विवेकाच्या (अंकुशाने) आवरतो, आणि इंद्रिय दमन करतो तो सत्वगुण.
**सत्क्रिया आचरावी। असत्क्रिया त्यागावी। वाट भक्तीची धरावी। तो सत्वगुण।।७१।।**
चांगल्या कर्माचे आचरण करावे, वाईट कर्मांचा त्याग करावा आणि भक्तीमार्गाने जावे हा सत्वगुण.
**जया आवडे प्रात:स्नान। आवडे पुराणश्रवण। नाना मंत्रीं देवतार्चन–। करी तो सत्वगुण।।७२।।**
प्रात:स्नान करणे ज्याला आवडते, पुराण ऐकणे, मंत्रोपराचारासह देवपूजा आवडते तो सत्वगुण.
**पर्वकाळीं अतिसादर। वसंतपूजेस तत्पर। जयंत्यांची प्रीती थोर। तो सत्वगुण।।७३।।**
ग्रहणकाळी जो जपजाप्य करतो, वसंतपूजा तत्परतेने करतो, देवाच्या जयंत्या प्रेमाने साजऱ्या करतो.
**विदेसिं मेलें मरणें। तयास संस्कार देणें। अथवा सादर होणें। तो सत्वगुण।।७४।।**
परदेशी माणूस मरण पावला असता त्याचा संस्कारपूर्वक अंत्यविधी करतो किंवा करण्यास सहाय्य देतो.
**कोणी येकास मारी। तयास जाऊन वारी। जीव बंधनमुक्त करी। तो सत्वगुण।।७५।।**
जर कोणी भांडणामध्ये दुसऱ्याला मारहाण करीत असेल तर त्याला सोडवितो, कोणी बंधनात, दु:खात पडला असेल तर त्याची सुटका करतो.
**लिंगें लाखोलीं अभिशेष। नामस्मरणीं विश्वास। देवदर्शनीं अवकाश। तो सत्वगुण।।७६।।**
कोटी शिवलिंगार्चन, बिल्वदलाची लाखोली वाहणे, अभिषेक करणे (यासारखी व्रते करणे),

(१२) वोसावला – कष्टी झाला.

नामस्मरणावर श्रद्धा असणे, प्रापंचिक अडचणीतून स्वतःला देवदर्शनासाठी वेळ काढणे हा सत्वगुण.

**संत देखोनि धावे। परम सुख हेलावे[१३]। नमस्कारी सर्वभावें। तो सत्वगुण ।।७७।।**

संतदर्शनासाठी त्वरेने धावतो, त्यामध्ये परमसुखाने त्याचे अंतःकरण हेलावते, अत्यादराने त्यांना वंदन करतो तो सत्वगुण.

**संतकृपा होय जयास। तेणें उद्धरिला वंश। तो ईश्वराचा अंश। सत्वगुणें ।।७८।।**

संताचा कृपाशीर्वाद मिळाल्याने ज्याच्या वंशाचा उद्धार होतो, सत्वगुणामुळे तो ईश्वरी अंशच असतो.

**सन्मार्ग दाखवी जना। जो लावी हरिभजना। ज्ञान सिकवी अज्ञाना। तो सत्वगुण ।।७९।।**

जो लोकांना सन्मार्गाची दिशा दाखवितो, ईश्वराच्या भजनाला प्रवृत्त करतो, अज्ञानी जीवांना ज्ञान देतो तो सत्वगुणच होय.

**आवडे पुण्य-संस्कार। प्रदक्षणा नमस्कार। जया राहे पाठांतर। तो सत्वगुण ।।८०।।**

सत् संस्कार आवडतात, देवाला प्रदक्षिणा घालतो, नमस्कार करतो, पाठ केलेले स्मरणात राहते तो सत्वगुण.

**भक्तीचा हव्यास भारी। ग्रंथसामग्री जो करी। धातुमूर्ति नानापरी। पूजी, तो सत्वगुण ।।८१।।**

भक्तीची आवड असते, त्यामुळे धार्मिक ग्रंथाचा संग्रह करतो, नाना प्रकारच्या धातूच्या मूर्तींचे पूजन करतो तो सत्वगुण.

**झळफळित उपकर्णे। माळा गवाळी आसनें। पवित्रें सोज्वळें वसनें। तो सत्वगुण ।।८२।।**

स्वच्छ घासल्यामुळे चकाकणारी पूजेची उपकरणे, माळा, जपमाळ ठेवण्याची गवाळी, शुद्ध स्वच्छ आसने, वस्त्रे यांची आवड असणे हे सत्वगुणाचे लक्षण.

**परपीडेचें वाहे दुःख। परसंतोषाचें सुख। वैराग्य देखोन हरिख-। मानी, तो सत्वगुण ।।८३।।**

दुसऱ्याला दुःख झाले तर स्वतःही दुःखी होतो, दुसऱ्याला संतोष झाला तर सुख वाटते, वैराग्य पाहून आनंदी होतो तो सत्वगुण.

**परभूषणें भूषण। परदूषणें दूषण। परदुःखें सिणे जाण। तो सत्वगुण ।।८४।।**

दुसऱ्यास अलंकार किंवा पदवी मिळाली तर ती स्वतःलाच मिळाल्याप्रमाणे आनंद होतो, दुसऱ्याच्या दुःखामुळे ज्याला दुःख होते तो सत्वगुण.

**आतां असों हें बहुत। देवीं धर्मीं ज्याचें चित्त। भजे कामनारहित। तो सत्वगुण ।।८५।।**

असो आता हे बरेच सांगून झाले. थोडक्यात हेच की देवधर्मात ज्याचे चित्त रंगते जो निष्काम भजन करतो तो सत्वगुण.

**ऐसा हा सत्वगुण सात्विक। संसारसागरीं तारक। येणें उपजे विवेक। ज्ञानमार्गाचा ।।८६।।**

असा हा सत्वगुण सात्विक असल्यामुळे संसारातून तारून नेतो. त्याच्यामुळे सारासार विवेक किंवा विवेक निर्माण होतो. ज्ञानाचा विवेक त्याच्यामुळेच स्फुरण पावतो.

**सत्वगुणें भगवद्भक्ती। सत्वगुणें ज्ञानप्राप्ती। सत्वगुणें सायोज्यमुक्ती। पाविजेते ।।८७।।**

सत्वगुणामुळे ईश्वराची भक्ती घडते, त्याच्यामुळेच ज्ञान प्राप्त होते आणि त्याच्यामुळे शाश्वत

(१३) हेलावे - उचंबळे.

स्वरूपाची मुक्ती (सायुज्यमुक्ती) जीवाला लाभते.

**ऐसी सत्वगुणाची स्थिती। स्वल्प बोलिलें येथामती। सावध होऊन श्रोतीं। पुढें अवधान द्यावें ।।८८।।**

असे हे सत्वगुणाचे वर्णन बुद्धीनुसार केले आहे. श्रोत्यांनी सावध होऊन पुढील निरूपण ऐकाव

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सत्वगुणनाम समास सप्तम।।७।।

# दासबोध परिचय प्रश्नपत्रिका ४ थी

(दासबोध द. २ मधील स. ५, ६ व ७ यावर आधारित)

प्र. १ त्रिगुणांच्या संदर्भात माणसांचे वर्गीकरण कोणत्या प्रमुख गटात करता येते? त्रिगुणाचे निश्चित फल सांगणारी ओवी लिहा.

प्र. २ पुढील ओव्यांच्या विरुद्ध अर्थाच्या ओव्या 'सत्त्वगुण' समासातून शोधून काढा आणि लिहा.

१) भांडण लाऊन द्यावें। स्वयें कौतुक पाहावें।

२) परपीडेचा संतोष। निष्ठुरपणाचा हव्यास। संसाराचा नये त्रास। तो तमोगुण।।

प्र. ३ खाली नमुन्यात दर्शविल्याप्रमाणे स्तंभ पाहून आधारभूत ओवीचा अंक लिहा.

| क्रिया | कोणता गुण | ओवीचा आधार |
|---|---|---|
| १) संतांची पालखी येताच धाव घेऊन दर्शनास जाणे | सत्वगुण | २-७-७७ |
| २) हरिभजन करण्यात तत्पर असणे | | |
| ३) मनाविरुद्ध कांही होताच आत्महत्या करणे | | |
| ४) देवालयाचा जीर्णोद्धार करण्यासाठी धडपड करणे | | |
| ५) फळती झाडे तोडणे, देवालये भ्रष्ट करणे | | |
| ६) प्रात:स्नानाची आवड असणे. | | |
| ७) 'मी चतुर, मी ताकदवान....' अशा बढाया मारणे | | |
| ८) नवसपूर्ती झाली नाही म्हणून देवाची मूर्ती फोडणे | | |
| ९) स्वत:चा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचविणे | | |
| १०) या संसाराचा शेवट कसा होईल अशी चिंता करीत बसणे | | |

प्र. ४ प्रपंच-वासना पेटविणाऱ्या रजोगुणापासून सुटका करून घेण्याचा उपाय समर्थांनी सुचविला आहे त्या तीन ओव्या लिहा.

प्र. ५ 'युद्ध करणे' ही कृती तामसी असली तरी श्रीराम अथवा श्रीकृष्ण यांच्या त्या कृतीबद्दल त्यांना तमोगुणी म्हणता येत नाही याचे कारण काय?

## स्वाध्याय ५ वा (द. २ मधील स. ८ आणि ९ वर आधारित)

**स्वाध्याय सारांश :** द. २ मधील ८ व ९ 'सद्विद्या निरूपण' आणि 'विरक्तलक्षण' हे समास या स्वाध्यायात एकत्रितपणे अभ्यासावयाचे आहेत. समर्थांचा विरक्त म्हणजे समाजाकडे पाठ फिरवलेला आणि भिक्षेकरी नव्हे, तर तो अत्यंत सद्गुणी, लोकसंग्रहकर्ता नेता असतो; हे येथे प्रथम ध्यानात ठेवले पाहिजे. समाजाच्या सर्व थरातील लोकांमध्ये तो मिसळतो. त्यांना सन्मार्गदर्शक असतो. या समासांचा ध्यानपूर्वक अभ्यास करून आत्मपरीक्षण आपण करावयास हवे. त्यासाठी दैनंदिनी लिहिण्याची चांगली सवय लावून घेतली पाहिजे. दासबोधाचा अभ्यास केवळ पुण्य मिळविण्याच्या दृष्टीने न करता स्वत:मध्ये इष्ट बदल करून आपली क्रिया पालटण्यासाठीही तो करावयास हवा. हे विस्ताराने सांगण्याचे कारण हे की, या स्वाध्यायाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये जो ५ वा प्रश्न आहे त्याची पार्श्वभूमी समजावी.

## द. २ स. ८ सद्विद्यानिरूपण

श्रीसमर्थांच्या मते समाजात सामान्यपणे माणसांचे तीन प्रकार आढळतात. एक सत्त्वगुणी माणसांचा वर्ग. मानवी जीवनात जे जे अध्यात्माला पोषक आहे त्याचे मनापासून सेवन करणारी ही माणसे असतात. दुसरा रजोगुणी माणसांचा वर्ग. मानवी जीवनातील देहसुखाला अनुकूल असणारे सगळे या लोकांना मनापासून हवे असते. तिसरा तमोगुणी किंवा कुविद्येच्या माणसांचा वर्ग. मानवी जीवनातील अविवेकीपणाचा अतिरेक हाच या लोकांचा स्थायीभाव असतो. कुविद्येची माणसे अति हीन, स्वार्थी व समाजविध्वंसक असतात. रजोगुणी माणसे घट्ट, स्वार्थी व स्वत:च्या सुखापलीकडे न पाहणारी असतात. सत्त्वगुणी माणसे अगदी मऊ व नरम स्वार्थाची असून नि:स्वार्थीपणाची वाटचाल आरंभ केलेली अशी असतात. या तिन्ही प्रकारच्या माणसांना आत्मसुधारणा होण्यासाठी आदर्श जरूर असतो. सद्विद्या लक्षणे अशा आदर्श पुरुषाची लक्षणे आहेत. श्री समर्थांनी सांगितलेली या समासांतील लक्षणे पाहिली की, प्रभू रामचंद्राची व त्यांचा शिष्योत्तम मारुतिरायाची आपोआप आठवण होते. अशा गुणांचा एक पुरुष ज्या समाजाला लाभतो, त्याचे भाग्य उदयाला आले, असे निश्चितपणे समजावे. त्याचे चरित्र अनेक पिढ्यांना स्फूर्ती देत राहते असे अनुभवास येते.

**।।श्रीराम।।**

**ऐका सद्विद्येचीं लक्षणें। परम शुद्ध सुलक्षणें। विचार घेतां बळेंचि बाणे। सद्विद्या आंगीं।।१।।**

आता सद्विद्येची अत्यंत शुद्ध व चांगली लक्षणे ऐका. त्या लक्षणांबद्दल आपण विचार केला तर आपल्या अंगी ती लक्षणे बलपूर्वक संचार करू लागतात.

**सद्विद्येचा जो पुरुष। तो उत्तमलक्षणी विशेष। त्याचे गुण ऐकतां संतोष। परम वाटे।।२।।**

सद्विद्येचा जो मनुष्य असतो त्याच्या अंगी उत्तम लक्षणे अधिकच असतात. ते गुण ऐकले तरीसुद्धा मनाला फार समाधान वाटते.

**भाविक सात्विक प्रेमळ। शांति क्षमा दयासीळ। लीन तत्पर केवळ। अमृतवचनी।।३।।**

असा मनुष्य श्रद्धाळू, (मागील समासात सांगितल्याप्रमाणे) सात्विक प्रवृत्तीचा, प्रेमळ तसेच शांत, क्षमाशील, दयाळू, नम्र आणि चांगल्या कामासाठी तत्पर, अमृताप्रमाणे उत्साहवर्धक भाषण करणारा असतो. (आता पुढील ६ ओव्यांमध्ये जे गुण सहसा एकत्र आढळत नाहीत अशा गुणांच्या जोड्या दिलेल्या आहेत. यावरून श्रीसमर्थांची निरीक्षण शक्ती किती भेदक होती ते आपल्या ध्यानी येईल.) सद्विद्येचा पुरूष कसा असतो -

**परम सुंदर आणि चतुर। परम सबळ आणी धीर। परम संपन्न आणी उदार। आतिशयेंसीं ।।४।।**

अतिशय सुंदर असून चतुर (बुद्धीवंत), अत्यंत शक्तीशाली असून धिमा (किंवा शांतपणे विचार करणारा), अतिशय श्रीमंत असून उदार असणारा

**परम ज्ञाता आणी भक्त। माहापंडित आणी विरक्त। माहातपस्वी आणी शांत। आतिशयेंसीं ।।५।।**

मोठा ज्ञानी असून भक्त, महापंडीत असूनही विरक्त, मोठा तपस्वी असून शांत वृत्तीचा

**वक्ता आणि नैराशता। सर्वज्ञ आणी सादरता। श्रेष्ठ आणी नम्रता। सर्वत्रांसी ।।६।।**

वक्ता असून मनात लोभ नसणारा, सर्व ज्ञान असूनही इतरांचे आदरपूर्वक ऐकणारा, गुणांमध्ये श्रेष्ठ असूनही सर्वांशी नम्रतेने वागणारा,

**राजा आणी धार्मिक। शूर आणी विवेक। तारूण्य आणी नेमक[१]। आतिशयेंसीं ।।७।।**

राजा असूनही धर्माप्रमाणे वागणारा, शूर असून विचाराने वागणारा, तरूण असून अतिशय नियमबद्धतेने वागणारा.

**वृधाचारी कुळाचारी। युक्ताहारी निर्विकारी। धन्वंतरी परोपकारी। पद्महस्ती[२] ।।८।।**

वाडवडीलांच्या वागण्याच्या रीती पाळणारा, कुलाचार सांभाळणारा, शरीरपोषणासाठी योग्य असा आहार घेणारा कुशल वैद्य असून परोपकाराची दृष्टी असलेला व ज्याच्या हातावर कमलचिन्ह आहे असा (कमलचिन्ह शुभ मानले जाते.)

**कार्यकर्ता निराभिमानी। गायक आणी वैष्णव जनी। वैभव आणी भगवद्भजनी। अत्यादरें ।।९।।**

कार्य यशस्वी करूनसुद्धा त्याबद्दल अहंभाव नसलेला, उत्तम गायक असून भगवत्भक्त असणारा, संपन्न असून देवाची भक्ती करणारा (गायनकलेचा उपयोग शृगांरिक गाणी गाण्याकडे न करणे आणि श्रीमंतीचा माज येऊन ईश्वराचे विस्मरण न होणे अपेक्षित आहे.)

**तत्वज्ञ आणी उदासीन। बहुश्रुत आणी सज्जन। मंत्री आणी सगुण। नीतिवंत ।।१०।।**

तत्वज्ञानी असून आसक्ती नसणारा, बहुश्रुत असून सज्जन असणारा, राजदरबारी मंत्री असून गुणवंत, नीतीवंत असणारा.

**साधु पवित्र पुण्यसीळ। अंतरशुद्ध धर्मात्मा कृपाळ। कर्मनिष्ठ स्वधर्मे निर्मळ। निर्लोभ अनुतापी ।।११।।**

(१) नेमक - नियमबद्ध.

साधु, वर्तनाने पवित्र, पुण्यवान, अंत:करण स्वच्छ असलेला, धर्मनिष्ठ, कृपाळू, कर्मावर निष्ठा असणारा, स्वधर्मपालनामुळे निर्मळ, लोभ किंवा आसक्ती नसणारा आणि ईश्वरमार्गावर सुयोग्य वाटचाल न झाल्याबद्दल पश्चाताप वाटणारा.

**गोडी आवडी परमार्थप्रीती। सन्मार्ग सत्क्रिया धारणा धृती। श्रुति स्मृती लीळा युक्ति। स्तुती मती परीक्षा ।।१२।।**

परमार्थामध्ये अत्यंत गोडी, आवड व प्रीती असणारा, शुद्ध मार्गावर चांगले वर्तन ठेवणारा, ध्येयावर वृत्ती स्थिर असणारा, श्रुतीस्मृती या धार्मिक तत्वांचा अभ्यास, लीला किंवा सहज खेळ केल्याप्रमाणे युक्तीने कर्म करण्याची कला असणारा, ईश्वराची स्तुती करावी याचे ज्ञान असणारा बुद्धीवान, तसेच ऐहिक गोष्टींचा माहितगार असणारा.

**दक्ष धूर्त योग्य तार्किक। सत्यसाहित्य नेमक भेदक। कुशळ चपळ चमत्कारिक। नाना प्रकारें ।।१३।।**

धूर्त व दक्ष (तत्पर) योग्य प्रकारे तर्क करणारा (जगातील लबाड लोकांना तर्काने ओळखून वागणारा.) सत्याने वागणारा, वाड:मयात रूची असणारा, नेमस्तपणे वागणारा, विचारशक्तीने जणू आरपार पाहणारा, कौशल्याने झटपट काम करू शकणारा, आणि लोकांना चमत्कार वाटावा असे वर्तन असणारा.

**आदर सन्मान तार्तम्य जाणे। प्रयोगसमयों प्रसंग जाणे। कार्याकारण चिन्हें जाणे। विचक्षण बोलिका ।।१४।।**

लोकांचा तारतम्य ठेवून आदर ठेवणारा, (नाटक, औषध आणि राजकारणातील कारस्थाने इ.) प्रयोग जाणणारा, वेळप्रसंगाची जाण असणारा, श्रेयस्कर कार्य कोणते याचा ज्ञाता, आणि चिकित्सक भाषण करणारा.

**सावध साक्षेपी साधक। आगम निगम शोधक[३]। ज्ञानविज्ञान बोधक। निश्चयात्मक ।।१५।।**

सावधपणे वागणारा दीर्घ प्रयत्नांचा कंटाळा नसणारा साधक असतो, वेदशास्त्राचा अभ्यास करणारा, परोक्ष आणि अपरोक्ष ज्ञानाचा दृढतेने यथार्थ बोध इतरांना करणारा.

**पुरश्चरणी तीर्थवासी। दृढव्रती कायाक्लेसी। उपासक, निग्रहासी। करूं जाणे ।।१६।।**

तीर्थक्षेत्रात पुरश्चरण करणारा, शरीराला होणारे कष्ट सहन करून दृढतेने एखादे व्रत करणारा

**सत्यवचनी शुभवचनी। कोमळवचनी येकवचनी। निश्चयवचनी सौख्यवचनी। सर्वकाळ ।।१७।।**

सत्य, आणि शुभ बोलणारा, कठोर शब्द न वापरता कोमलतेने बोलणारा, एकदा दिलेला शब्द पाळणारा, निश्चयात्मक (संदेह निर्माण न होईल असे) बोलणारा, नेहमी सौख्यकारक बोलणारा (श्रोत्यांना सुख देणारा)

**वासनातृप्त सखोल योगी। भव्य सुप्रसन्न वीतरागी। सौम्य सात्विक शुद्धमार्गी। नि:कपट निर्वेसनी ।।१८।।**

(२) पद्महस्ती – ज्याच्या क्रियेस हटकून यशच येते असा.

ज्याच्या वासना तृप्त झाल्या आहेत असा, योगाचा सखोल अभ्यास झालेला, विशाल भावनाबुद्धी ठेवणारा, सदोदित प्रसन्न दिसणारा वैराग्यशील, मृदु स्वभावाचा, सत्वशील, शास्त्रशुद्ध आचरण करणारा, कपटभाव नसणारा, निर्व्यसनी.

**सुगड[४] संगीत गुणग्राही। अनापेक्षी लोकसंग्रही। आर्जव सख्य सर्वेहि। प्राणीमात्रासी।।१९।।**

चातुर्याने कामे करणारा, संगीतामधील जाणकार त्यात रस असणारा, निरपेक्षपणे मदत करणारा, लोकसंग्रह करणारा, सर्व प्राणीमात्रांशी विनयपूर्वक वागून सख्य करणारा, सरळपणे वागणारा.

**द्रव्यसुची दारासुची। न्यायसुची अंतरसुची। प्रवत्तिसुची निवृत्तिसुची। सर्वसुची नि:संगपणें ।।२०।।**

द्रव्यव्याप्ती व स्त्रियां याबद्दल पवित्र वर्तन असलेला, नीतीमर्यादेला धरून वागणूक ठेवणारा, अंत:करण शुद्ध असलेला, प्रपंच व परमार्थ यांमध्ये निर्मळ भाव असलेला (परमार्थातसुद्धा अपवित्र भाव ठेवणारे भोंदू असतात), आसक्ती कशातही राहिलेली नसल्यामुळे सर्वच बाबतीत शुद्ध आचार-विचार असणारा.

**मित्रपणें परहितकारी। वाग्माधुर्य परशोकहारी। सामर्थ्यपणें वेत्रधारी[५]। पुरुषार्थे जगमित्र ।।२१।।**

मित्र या दृष्टीने परहित करणारा, मधुर भाषणाने लोकांची दु:खे नाहिशी करणारा, सामर्थ्याने दुर्जनांना दंड देऊन सज्जनांचे रक्षण करणारा, आणि पराक्रमामुळे सर्व जग ज्याला मान देते असा. (वेत्रधारी = काठी धारण करणारा)

**संशयछेदक विशाळ वक्ता। सकळ क्लृप्त असोनि श्रोता। कथानिरूपणीं शब्दार्था। जाऊंच नेदी।।२२।।**

संशयांचे निराकरण करणारा बुद्धिवान वक्ता, जाणकार असूनही श्रवण करणारा, कथा सांगताना (निरूपण करताना) अर्थपूर्ण-वाजवी बोलणारा

**वेवादरति संवादी। संगरहित निरोपाधी। दुराशारहित अक्रोधी। निर्दोष निर्मत्सरी।।२३।।**

वादंग न वाढविता सुसंवाद करणारा, कोणत्याही प्रकारची उपाधी किंवा आसक्ती नसणारा, अनुचित अपेक्षा नसणारा, राग न धरणारा, द्वेष, मत्सर इ. दोषांपासून अलिप्त असणारा.

**विमळज्ञानी निश्चयात्मक। समाधानी आणी भजक। सिद्ध असोनी साधक। साधन रक्षी ।।२४।।**

ज्याला परब्रम्हाचे निश्चित ज्ञान आहे, जो तृप्त असुन भक्ती करणारा, सिद्धावस्थेला जाऊनसुद्धा जो साधना करतो असा उपासनेचे रक्षण करणारा.

**सुखरूप संतोषरूप। आनंदरूप हास्यरूप। ऐक्यरूप आत्मरूप। सर्वत्रांसी।।२५।।**

मूर्तीमंत सुख, संतोष, आनंद, हास्य सर्वभूती एकात्मता आणि आत्मभाव ठेवणारा असतो.

**भाग्यवंत जयवंत। रूपवंत गुणवंत। आचारवंत क्रियावंत। विचारवंत स्थिती।।२६।।**

भाग्य, यश, रूप, गुण यांनी भूषित असतो, आणि आचारशील, क्रियाशील, विचारशील ही त्याची

(३) आगम निगमशोधक - शास्त्रवेदपारंगत. (४) सुगड - चतुर. (५) वेत्रधारी - रक्षक.

स्थिती असते.

**येशवंत कीर्तिवंत। शक्तिवंत सामर्थ्यवंत। वीर्यवंत वरदवंत। सत्यवंत सुकृती।।२७।।**

तो यश, कीर्ती, शक्ती, सामर्थ्य, विरता, वर देण्याचे सामर्थ्य असलेला सत्य सांभाळणारा असतो.

**विद्यावंत कळावंत। लक्ष्मीवंत लक्षणवंत। कुळवंत सुचिष्मंत। बळवंत दयाळु।।२८।।**

विद्या, कला, संपत्ती, सुलक्षणे, कुलशीवान, पवित्र, सामर्थ्यसंपन्न आणि दयाळू असतो.

**युक्तिवंत गुणवंत वरिष्ठ। बुद्धिवंत बहुधारिष्ट। दीक्षावंत सदासंतुष्ट। निस्पृह वीतरागी।।२९।।**

युक्ती, चांगले गुण, बुद्धी, मोठे धारीष्ट्य, संप्रदाय, नेहमी संतुष्टता, निरीच्छ वृत्ती, वैराग्य इत्यादि सद्‌गुणामुळे तो भूषित असतो.

**असो ऐसें उत्तम गुण। हें सद्विद्येचें लक्षण। अभ्यासाया निरूपण। अल्पमात्र बोलिलें।।३०।।**

असो अशा प्रकारचे उत्तम गुण हे सद्‌विद्या असण्याचे लक्षण आहे, त्यांच्या प्राप्तीसाठी अभ्यास करावा म्हणून हे थोडेसे निरूपण केले आहे.

**रूपलावण्य अभ्यासिता न ये। सहजगुणास न चले उपाये। कांही तरी धरावी सोये। अगांतुक गुणांची।।३१।।**

रूप, सौंदर्य हे प्रयत्न करूनही अंगी येऊ शकत नाहीत. (ते निसर्गाचे देणे आहे) उपजत गुण हे कोणत्याही उपायाने बदलत नाहीत. म्हणून काही तरी नवीन सद्‌गुण अंगी आणण्याचा प्रयत्न करावा. (आंगतुक) नवीन सद्‌गुण प्रयत्नसाध्य आहेत.

**ऐसी हे सद्विद्या बरवी। सर्वत्रांपासी असावी। परी विरक्तपुरुषें अभ्यासावी। अगत्यरूप।।३२।।**

अशा प्रकारची ही सद्‌विद्या चांगली असते. ती सर्वांपाशीच असावी पण विरक्त पुरूषाने मात्र तिच्या प्राप्तिसाठी अगत्यूपूर्व जाणीवपूर्वक अभ्यास केला पाहीजे. (हे गुण अंगी बाणविण्याचा विशेष यत्न करावा. निस्पृह कार्यकर्ते समाजात असणे ही निरंतरची सामाजिक गरज आहे.)

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सद्विद्यानिरूपणनाम समास अष्टम।।८।।

## द. २ स. ९ विरक्तलक्षण

मनाच्या श्लोकामध्ये दोन सुरेख अशा ओळी आहेत – 'स्फुरे वीषयीं कल्पना ते अविद्या। स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या।।' अविद्या आणि विद्या या दोन शक्ती जगात अनुभवास येतात. 'मी देहच आहे' अशी भावना निर्माण करून अविद्या आपल्याला या दृश्य, स्थूल, इंद्रियप्रिय व अशाश्वत विश्वाच्या पसाऱ्यात गुंतवते. 'मी आत्माच आहे' अशी भावना निर्माण करून विद्या किंवा सद्विद्या आपल्याला त्या अदृश्य, सूक्ष्म, अतींद्रिय व शाश्वत सच्चिदानंदाचा साक्षात्कार करून देते. अविद्या प्रपंच तर विद्या म्हणजे परमार्थ होय. ''मी देहच आहे'' या भावनेमुळे आपले मन प्रपंचात म्हणजे सर्व दृश्य वस्तूंमध्ये व त्यांच्या द्वारे मिळणाऱ्या देहसुखामध्ये गुंतून राहते. परमार्थ साधायचा असेल, तर मन त्यांतून बाहेर पडले पाहिजे. ते बाहेर पडण्यास दृश्याचे प्रेम क्षीण झाले पाहिजे. दृश्याचे प्रेम क्षीण

होण्यास एका भगवंताकडे प्रेम वळावे तरी, नाही तर दृश्याचे खोटेपण पटावे तरी. भगवंताकडे प्रेम वळणे हा भक्तिमार्ग व दृश्याचे खोटेपण हा ज्ञानमार्ग होय. दोन्ही मार्गांमध्ये मन दृश्याच्या कचाट्यातून बाहेर पडते. मनाच्या या अवस्थेला वैराग्य असे म्हणतात. वैराग्यसंपन्न झाल्यावाचून परमार्थ साधत नाही. असा अटळ नियम आहे. देहबुद्धीच्या माणसाने प्रथम नीतिमान बनणे अवश्य आहे. त्यामध्ये इंद्रियांना आवर घालण्याची सवय होते. म्हणून श्रीसमर्थांनी आधी उत्तम लक्षणे, सत्त्वगुणाची लक्षणे सांगितली. या सर्वांचे पर्यवसान वैराग्याचा उदय होण्यात व्हावे हे परमार्थात योग्य असते. म्हणून आता वैराग्यसंपन्न पुरुषाची लक्षणे ते सांगत आहेत.

(प्रापंचिक उपाधींपासून जो सुटलेला आहे, षड्रिपूंच्या पाशापासून ज्याने विचारपूर्वक सुटका करून घेतलेली आहे तोच खरा लोककल्याणकारी कार्यकर्ता होऊ शकतो. अशांची लक्षणे)

**॥ श्रीराम॥**

**ऐका विरक्तांची लक्षणें। विरक्तें असावें कोण्या गुणें। जेणें आंगीं सामर्थ्य बाणे। योगियाचें ॥१॥**

वैराग्य संपन्नांची किंवा विरक्तांची लक्षणे आता ऐका. योगी पुरूषांच्या अंगी जे सामर्थ्य असते ते प्राप्त होण्यासाठी कोणते गुण असावेत ते ऐका.

**जेणें सत्कीर्ति वाढे। जेणें सार्थकता घडे। जेणेंकरितां महिमा चढे। विरक्तांसी ॥२॥**

या गुणामुळे विरक्ताची सद्कीर्ती वाढेल, जन्माचे सार्थक होईल आणि त्याचा (महीमा) महत्व वाढेल.

**जेणें परमार्थ फावे। जेणें आनंद हेलावे। जेणें विरक्ति दुणावे। विवेकेंसहित ॥३॥**

त्यामुळे परमार्थात यश मिळेल, आनंद उंचबळेल, विवेकयुक्त वैराग्य (जे मुळात असेल) ते दुप्पट होईल.

**जेणें सुख उचंबळें। जेणें सद्विद्या वोळे। जेणें भाग्यश्री प्रबळे। मोक्षेंसहित ॥४॥**

ज्यामुळे आत्मसुख भरपूर मिळेल, सद्विद्या प्रसन्न होईल. मोक्षप्राप्तीसह (ऐहीक) भाग्यही वाढेल.

**मनोरथ पूर्ण होती। सकळ कामना पुरती। मुखीं राहे सरस्वती। मधुर बोलावया ॥५॥**

मनातील इच्छा, अपेक्षा परिपूर्ण होतील आणि गोड बोलण्यातील जणू सरस्वतीच मुखामध्ये प्रवेश करील.

**हे लक्षणें श्रवण कीजे। आणी सदृढ जीवीं धरिजे। तरी मग विख्यात होईजे। भूमंडळीं ॥६॥**

ती लक्षणे ऐकावी आणि मनामध्ये घट्टपणे ठसवून ठेवावी, म्हणजे तो विरक्त जगामध्ये विख्यात होईल.

**विरक्तें विवेकें असावें। विरक्तें अध्यात्म वाढवावें। विरक्तें धारिष्ट धरावें। दमनविषईं॥७॥**

विरक्ताने साधक-बाधक आणि सार-असार विवेक जागृत ठेवावा. त्याने अध्यात्मज्ञानाचा प्रसार करावा, (स्वैर असणारी) इंद्रिये ताब्यात ठेवण्याचे धैर्य साधावे.

**विरक्तें राखावें साधन। विरक्तें लावावें भजन। विरक्तें विशेष ब्रह्मज्ञान। प्रगटवावें ॥८॥**

विरक्ताने स्व:तची अध्यात्मिक साधना सांभाळून इतरांना ईश्वर भजनाला प्रवृत्त करावे. त्याने मुख्यत्वे

ब्रम्हज्ञान लोकांमध्ये प्रगट करावे. साधना कशी करतात ते सांगावे.

**विरक्तें भक्ती वाढवावी। विरक्तें शांती दाखवावी। विरक्तें येत्नें करावी। विरक्ती आपुली ।।९।।**

विरक्ताने भक्तीचा प्रसार करून भक्ती वाढवावी. मनशांती कशी असते ते उदाहरण लोकांपुढे ठेवावे. आपली स्व:तची वैराग्याची स्थिती सांभाळावी, विचलित होऊ नये.

**विरक्तें सदक्रिया प्रतिष्ठावी। विरक्तें निवृत्ति विस्तारावी। विरक्तें नैराशता धरावी। सदृढ जिवेंसी ।।१०।।**

विरक्ताने सत्क्रियेला प्राधान्य द्यावे. त्याने स्व:तची अनासक्ती समाजातही पसरवावी. आपली निर्वासनता, निरीच्छता मनात दृठ ठेवावी.

**विरक्तें धर्मस्थापना करावी। विरक्तें नीति आवलंबावी। विरक्तें क्ष्मा सांभाळावी। अत्यादरेंसी ।।११।।**

विरक्ताने धर्मांचे पुनरूज्जीवन समाजात करावे, नीतीने वागावे आणि क्षमाशीलता सांभाळावी (त्यामुळे लोकसंग्रह होतो)

**विरक्तें परमार्थ उजळावा। विरक्तें विचार शोधावा। विरक्तें सन्निध ठेवावा। सन्मार्ग सत्वगुण ।।१२।।**

मार्गपरमार्थ तेजाने उजळावा. विचारांची चाळणा करावी. सत्वगुण जवळ ठेवून सन्मार्गाने जावे.

**विरक्तें भाविकें सांभाळावीं। विरक्तें प्रेमळें निववावीं। विरक्तें साबडीं[1] नुपेक्षावीं। शरणागतें ।।१३।।**

विरक्ताने भाविकांना सांभाळून जवळ करावे. प्रेमळ भक्तांची मने तृप्त करावी. जी भाबडी (निरागस) माणसे शरण येतील त्यांची उपेक्षा करू नये.

**विरक्तें असावें परमदक्ष। विरक्तें असावें अंतरसाक्ष। विरक्तें वाढावा कैपक्ष[2]। परमार्थाचा ।।१४।।**

विरक्ताने मोठी दक्षता पाळावी. (एरव्ही घसरण्याची शक्यता असते,) आपले मनच साक्षीला घ्यावे.

**विरक्तें अभ्यास करावा। विरक्तें साक्षेप धरावा। विरक्तें वग्त्रृत्वें उभारावा। मोडला परमार्थ ।।१५।।**

विरक्ताने साधनेचा अभ्यास करावा, दृढ उद्योगी व्हावे. विस्कटलेला परमार्थ आपल्या वाचा शक्तीने पुन्हा उभारावा.

**विरक्तें विमळज्ञान बोलावें। विरक्तें वैराग्य स्तवीत जावें। विरक्तें निश्चयाचें करावें। समाधान ।।१६।।**

विरक्ताने शुद्ध ज्ञान सांगावे, वैराग्याची स्तुती करावी आणि सर्वांना निश्चयपूर्वक समाधान द्यावे.

**पर्वे करावीं अचाटें। चालवावीं भक्तांची थाटे। नाना वैभवें कचाटें[3]। उपासनामार्ग।।१७।।**

मोठमोठ्या उत्सवा (जयंत्या आदि) ची पर्वे (अचाट कल्पनातील मोठी) करावी. भक्तमंडळे थाटात

(१) साबडीं - भोळी माणसे.

चालवावी. प्रयत्नपूर्वक (कचाटे) अपासनामार्गाचे (वैभव) महत्व वाढवावे.

**हरिकीर्तनें करावीं। निरूपणें माजवावीं। भक्तिमार्गे लाजवावीं। निंदक दुर्जनें।।१८।।**

हरीकीर्तन करतानासुद्धा अधात्म निरूपण वाढवावे. (सगुणाकडुन निर्गुणाकडे भक्तीची चाल असावी.) निंदा करणारे दुर्जन समाजात असतात त्यांना लाज वाटेल इतक्या उत्तम प्रकारे भक्तीमार्गाचा प्रचार करावा.

**बहुतांस करावे परोपकार। भलेपणाचा जीर्णोद्धार। पुण्यमार्गाचा विस्तार। बळेंचि करावा।।१९।।**

अनेकांवर उपकार करावे. भलेपणाचा जीर्णोद्धार करावा. - (जीर्णोद्धार :- पूर्वी जे होते ते निर्बल झाले. ते पुन्हा सबल करावे. जीर्णोद्धार हा फार अर्थपूर्ण शब्द येथे वापरला आहे.) आणि (बळेचि) स्वसामर्थ्याने सन्मार्गाकडे लोकांना वळवावे. (प्रबोधनाचे सामर्थ्य विरक्तापाशी असावे)

**स्नान संध्या जप ध्यान। तीर्थयात्रा भगवद्भजन। नित्यनेम पवित्रपण। अंतरशुद्ध असावें।।२०।।**

स्नान, संध्या, जप, ध्यान, तीर्थयात्रा, भगवतभजन् नित्यनेम पवित्रपणे करावे व अंत:करण शुद्ध राखावे.

(मनाची मलिनता घालविण्याचा मार्ग येथे दिला आहे.)

**दृढ निश्चयो धरावा। संसार सुखाचा करावा। विश्वजन उद्धरावा। संसर्गमात्रें।।२१।।**

विरक्ताने अतिशय निश्चयी राहून त्यायोगे संसार ईश्वरार्पण बुद्धीने करून सर्वांना सुख द्यावे. आपल्या संगतीत जे येतील त्या सर्वांचा उद्धार करावा. (सन्मार्गाला लावावे)

**विरक्तें असावें धीर। विरक्तें असावें उदार। विरक्तें असावे तत्पर। निरूपणविषई।।२२।।**

विरक्ताने कोणत्याही प्रसंगी धैर्य धरावे. आपल्या ऐहिक वा पारमार्थिक धनाचा उदारपणाने वापर करावा. निरूपण करताना (कंटाळा न करता) तत्परतेने करावे.

**विरक्तें सावध असावें। विरक्तें शुद्ध मार्गे जावें। विरक्तें झिजोन उरवावें। सदकीर्तीसी।।२३।।**

विरक्ताने गाफील राहू नये. सावध असावे. (अशुद्ध मार्ग कदापि न धरता) शुद्ध मार्गाने जावे. आपली काया वाचा झिजवून पश्चात् कीर्ती मागे उरवावी.

**विरक्तें विरक्त धुंडावे। विरक्तें साधु वोळखावे। विरक्तें मित्र करावे। संत योगी सज्जन।।२४।।**

विरक्ताने (आपल्यासारखेच) समधर्मी शोधून काढावे. साधूसंत ओळखावे. संत, योगी, आणि सज्जन यांची मैत्री करावी. (दांभिक व संत यांची पारख करता आली पाहीजे)

**विरक्तें करावीं पुरश्चरणें। विरक्तें फिरावीं तीर्थाटणें। विरक्तें करावी नानास्थानें। परम रमणीय।।२५।।**

विरक्ताने (मंत्रसिद्धीसाठी ठराविक जप) पुरश्चरणे करावी. तीर्थयात्रा कराव्या, नाना ठिकाणी रमणीय (देव) स्थाने करावी. (सौंदर्यदृष्टीचे विरक्ताला वावडे नाही)

**विरक्तें उपाधी करावी। आणि उदासवृत्ति न संडावी। दुराशा जडों नेदावी।**

(२) कैपक्ष - कैवार. (३) कचाटें - खटपट.

**कोणयेकविषई ।।२६।।**

विरक्ताने (लोकसंग्रहाची) उपाधी करावी पण कर्तेपणा आपणाकडे नाही, ही वृत्तीची अलिप्तता सोडू नये. कशाचीही दुराशा चित्तामध्ये ठेवू नये.

**विरक्तें असावें अंतरनिष्ठ। विरक्तें नसावें क्रियाभ्रष्ट। विरक्तें न व्हावें कनिष्ठ। पराधेनपणें ।।२७।।**

विरक्ताने अंतर्मुख राहून आचार ठेवावा. त्याने अनाचार करू नये. (क्रियाभ्रष्ट नसावे) विरक्ताने पराधीनता स्वीकारू नये. (स्वावलंबी असावे) कारण त्यामुळे महत्व नष्ट होते. तसे होऊ देऊ नये.

**विरक्तें समय जाणावा। विरक्तें प्रसंग वोळखावा। विरक्त चतुर असावा। सर्वप्रकारें ।।२८।।**

विरक्त हा प्रत्येक दृष्टीने चतुर असावा, त्याने वेळ-प्रसंग यथार्थपणे समजून वर्तन करावे.

**विरक्तें येकदेसी नसावें। विरक्तें सर्व अभ्यासावें। विरक्तें अवघें जाणावें। ज्याचें त्यापरी ।।२९।।** विरक्ताने एकाच ठिकाणी मुक्काम ठोकू नये. तसेच एकलकोंडेपणा करू नये. सर्व विषयांचा त्याने अभ्यास करावा. सर्व प्रसंगी बरोबर (साधक-बाधक) विचार करून चातुर्याने वागावे.

**हरिकथा निरूपण। सगुणभजन ब्रह्मज्ञान। पिंडज्ञान तत्व ज्ञान। सर्व जाणावें ।।३०।।**

कीर्तन, अध्यात्म निरूपण, सगुण भजन आणि ब्रम्हज्ञान, शरीरज्ञान (देहरचनेचे ज्ञान), तत्वज्ञान हे सर्व विरक्ताला माहिती असावे.

**कर्ममार्ग उपासनामार्ग। ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग। प्रवृत्तिमार्ग निवृत्तीमार्ग। सकळ जाणावें ।।३१।।**

कर्म, उपासना, ज्ञान हे मार्ग ठाऊक असावेत. त्याचप्रमाणे सिद्धांत, प्रवृत्ती निवृत्ती हे सर्व मार्गही त्याला ज्ञात असावेत. (परमार्थ साधनांची लक्षणे ठाऊक असावीत.)

**प्रेमळस्थिती उदासस्थिती। योगस्थिती ध्यानस्थिती। विदेहस्थिती सहजस्थिती। सकळ जाणावें ।।३२।।**

प्रेमळस्थिती (ईश्वराचे गुणवर्णन ऐकताना डोळे पाणावणे इ.) उदासस्थिती (अलिप्तप्रवृत्ती), योग, ध्यान, अवस्था विदेहस्थिती (देहभावना लय पावणेची अवस्था) सहजस्थिती (साक्षीभावाने पहाण्याची स्थिती) यांचे ज्ञान विरक्ताला असावे.

**ध्वनी लक्ष मुद्रा आसनें। मंत्र यंत्र विधी विधानें। नाना मतांचें देखणें। पाहोन सांडावें ।।३३।।**

ध्वनी (अनाहतध्वनी), नाना प्रकारचे प्रकाश व दर्शने (ज्योती, चांदणी, प्रकाश या हृदयातील कल्पित वस्तूंवर लक्ष ठेवणे आणि कल्पनेने तेथेच लय करणे) नाना मुद्रा (खेचरी, भूचरी, चाचरी, अगोचरी (द. ४-१-१४ पहा) व ब्रम्हात्मभाव प्रगटविणारी आसने (पद्मासन, सहजासन, सिद्धासन) अनेक मंत्र, यंत्र (रोग नाहिसे होण्यासाठी यंत्रे) यांचे विधिविधान, अशी अनंत मते पाहून जे आपल्या साधनेसाठी आवश्यक वाटेल ते घ्यावे बाकीचे सोडून द्यावे.(त्यांच्या गुंत्यात सापडू नये)

**विरक्तें असावें जगमित्र। विरक्तें असावें स्वतंत्र। विरक्तें असावें विचित्र। बहुगुणी ।।३४।।**

विरक्ताने सर्वांशी मित्रत्वाने वागावे, पण स्वतंत्र असावे. बहुगुणी असल्याने विचित्र (आश्चर्यकारक) गुण प्रकट करावे (जे गुण सहसा एकत्र येऊ शकत नाही असे गुण असतील तर लोकांना ते विचित्र

वाटते)

**विरक्तें असावें विरक्त। विरक्तें असावें हरिभक्त। विरक्तें असावें नित्यमुक्त। अलिप्तपणें।।३५।।**

विरक्ताने वैराग्यशील असावे त्याने हरीभक्त असावे. अलिप्तपणे वागून नित्यमुक्त (निर्वासन) रहावे.

**विरक्तें शास्त्रें धांडोळावीं। विरक्तें मतें विभांडावी[४]। विरक्तें मुमुक्षें लावावीं। शुद्धमार्गें।।३६।।**

विरक्ताने ग्रंथ अभ्यासावे, मत मतांतराचे खंडन या अभ्यासातून करावे. त्याने मोक्षाची इच्छा असणाऱ्यांना साधनेचा शुद्ध मार्ग दाखवावा.

**विरक्तें शुद्धमार्ग सांगावा। विरक्तें संशय छेदावा। विरक्तें आपला म्हणावा। विश्वजन।।३७।।**

त्याने मुमुक्षुंचे संशय नष्ट करावे व आत्मप्राप्तीची योग्य दिशा दाखवावी. विरक्ताने सर्वांशी आपुलकीने वागावे. (कोणाशी फटकून राहू नये.)

**विरक्तें निंदक वंदावें। विरक्तें साधक बोधावे। विरक्तें बद्ध चेववावे। मुमुक्षनिरूपणें।।३८।।**

त्याने निंदकांनाही वंदन करावे, साधकांना उपदेश करावा. विरक्ताने मुमुक्षुचे संबंधात निरूपण करून प्रपंचामध्ये हरवून गेलेल्या बद्धांना जागृत करावे. (ही केवढी अपेक्षा आहे! ओवीचा हा चरण समजण्यासाठी मुमुक्षनिरूपण हा समासच वाचावा)

**विरक्तें उत्तम गुण घ्यावे। विरक्तें अवगुण त्यागावे। नाना अपाय भंगावे। विवेकबळें।।३९।।**

विरक्ताने सद्गुणांचा अंगिकार करावा, अवगुणांचा त्याग करावा. अवगुणांमुळे जी हानी होते ती विवेकबळावर नाहिशी करावी.

**ऐसीं हे उत्तम लक्षणें। ऐकावीं येकाग्र मनें। यावा अव्हेर न करणें। विरक्तपुरुषें।।४०।।**

अशा प्रकारची ही उत्तम लक्षणे एकाग्र मनाने श्रवण करावी. विरक्त पुरूषाने त्याचा अव्हेर (तिरस्कार वा त्याग) करू नये.

**इतुकें बोलिलें स्वभावें। त्यांत मानेल तितुकें घ्यावें। श्रोतीं उदास न करावें। बहु बोलिलें ह्मणौनी ।।४१।।**

इतके सर्व सहजपणाने सांगितले आहे. त्यातील आपणास जे मान्य होईल ते स्विकारावे. पुष्कळच सांगितले म्हणून श्रोत्यांनी उदास होऊ नये. (कंटाळा करू नये)

**परंतु लक्षणें न घेतां। अवलक्षणें बाष्कळता। तेणें त्यास पढतमूर्खता। येवों पाहे।।४२।।**

पण उत्तम लक्षणे न स्विकारता अवलक्षणेच स्विकारली तर त्यामुळे हलकेपणा (हीनता) पदरी येते. अशामुळे पढतमुर्खता प्राप्त होते.

**त्या पढतमूर्खाचें लक्षण। पुढिले समासीं निरूपण। बोलिलें असे सावधान। होऊन, ऐका ।।४३।।**

तो पढतमूर्ख नेमका कसा असतो त्याचे निरूपण पुढच्या समासामध्ये आहे ते सावधान चित्ताने ऐकावे.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विरक्तलक्षणनाम समास नवम ।।९।।

---

(४) विभांडणे - जिंकणे.

# दासबोध परिचय प्रश्नपत्रिका ५ वी

(दासबोध दशक २ मधील समास ८ आणि ९ वर आधारित)

प्र. १ पुढील ओव्या लिहून त्यांचा संदर्भासहित अर्थ सांगा.
(१) २-८-३१ (२) २-८-१३ (३) २-९-२६

प्र. २ जे सद्गुण जोडीने सहसा आढळत नाहीत असे समर्थांना आढळले त्यांच्या १५ जोड्या लिहा.

प्र. ३ २-८-१६ ते २-८-२३ या ओव्यांच्या आधारे सद्विद्येच्या माणसाचे अंतर्बाह्य वर्णन करा.

प्र. ४ समर्थांचा विरक्त हा समाजाशी फटकून वागणारा एकान्तिक विचाराचा नसून लोकसंग्रहकर्ता नेता असतो. या विधानाची सत्यता स्पष्ट करा.

प्र. ५ १) आपणांस दैनंदिनी लिहिण्याची सवय आहे का?
२) दिवसात अनुभविलेल्या बऱ्या-वाईट घटनाच त्यामध्ये आपण लिहिता की, त्यासोबत आत्मचिंतनही असते.
३) भावी काळात करावयाच्या गोष्टींची टिपणे आपण करता का?
४) दैनंदिनी लिहीत नसल्यास त्यामागील कारणे लिहा.

## स्वाध्याय ६ वा (द. ११ स. १० व द. १५ स. २ वर आधारित)

**स्वाध्याय सारांश :** नि:स्पृहव्याप, निस्पृहवर्तणूक या संबंधीचे दोन समास येथे अभ्यासावयाचे आहेत. जणू समर्थ रामदासांचे आत्मचरित्र आपण वाचीत आहोत असा येथे भास होईल. मारूती मंदिरांची स्थापना आणि फिरते महंत यांच्याद्वारे भक्तीतून शक्तीकडे समाजनौका त्यांनी हाकारली. समर्थांचे जनप्रबोधन त्यांच्याकाळी कल्याणकारी झाले; आणि त्यानंतरच्या महाराष्ट्राने नेतृत्त्वहीन अवस्थेत देखील शत्रूशी यशस्वीरित्या टक्कर दिली. शिव-समर्थांची प्रेरणा त्यामागे होती.

## द. ११ स. १० निस्पृह वर्तणूक

(नि:स्पृह व्यक्तीच समाजाचे खऱ्या अर्थाने कल्याण करू शकते. द. ११-१० हा समास म्हणजे श्रीसमर्थांचे स्वत:चे चरित्र आहे असे स.भ.कै. नानासाहेब देव यांनी म्हटले आहे. निस्पृहाने कसे वागावे त्याने कार्याचा व्याप कसा करावा.)

व्यक्ती, संस्कृती आणि समाजसंस्था अशी तीन मानवी जीवनाची अंगे आहेत. यापैकी व्यक्ती सर्वात अधिक महत्त्वाची असते. सामान्य माणूस स्वार्थी असतो. त्याला नि:स्वार्थीपणाचा आदर्श दाखवण्याचे काम संस्कृती करते तर तो आदर्श प्रत्यक्षात उतरवण्याचे काम समाजसंस्था करतात. श्रीसमर्थांचे म्हणणे असे की एखाद्या व्यक्तीच्या जीवनात जर नि:स्वार्थीपणा साकार झाला तर त्यामुळे समाजाची एकंदर पातळी उंचावते. स्वत: श्रीसमर्थ कमालीचे नि:स्वार्थी होते. त्यांनी जो लोकसंग्रह केला त्याचा प्रत्यक्ष अनुभव या समासामध्ये सांगून ठेवला आहे. समाजाला देहबुद्धीच्या किंवा स्वार्थाच्या जाळ्यातून बाहेर काढण्याचा खटाटोप करणाऱ्या महंताच्या अंगी पुढील गुण असावेत. क्रमाने आणि

महत्त्वाने पहिला गुण हा की महंत स्वत: आत्मसाक्षात्कारी असला पाहिजे. ज्या अंतरात्म्याचा साक्षात्कार त्यास होतो त्याप्रमाणेच तो अत्यंत विशाल आणि अनासक्त असावा. त्यास एकान्ताची अतिशय आवड असावी. फक्त लोकांना मार्गदर्शन करण्यापुरते त्याने समाजात मिसळावे. आपण कोण, कोठले, काय वगैरे माहिती लोकांस नसावी. नित्य नवे नवे लोक शोधून त्यांना शहाणे करावे. हा दुसरा गुण होय. कीर्तीरूपाने सर्वांना माहीत असावे. लोकांशी संबंध आल्यावर लोक परीक्षा घेणारच. तेव्हा स्वत:च्या ठिकाणी यत्किंचितही कसलीही इच्छा लोकांना आढळू नये. भगवंताचे कथाकीर्तन क्षणभरदेखील सोडू नये. हा तिसरा गुण होय. उत्तम गुणांचा अभ्यास करावा व ते लोकांना शिकवावे. मोठमोठे लोकसमूह बनवून कार्यान्वित करावे. हा चौथा गुण होय. आपण आरंभलेले कार्य खूप लोकांना पसंत पडून ठिकठिकाणी लोकसमूह कार्य करू लागले की मोठे काम सिद्ध झाले असे समजावे. स्वत: खूप कष्ट करावे. सदैव काम उरकण्याची लगबग असावी. अनेक लोकांना उपासनेला लावावे. हा पाचवा गुण होय. समाजामध्ये सगळीच माणसे सारख्या लायकीची नसतात. 'मी काय करू?' असे माणूस विचारतो तेव्हा त्याची लायकी बघून त्यास काम सांगावे. भलत्याला भलतेच काम सांगितले तर कार्याचा विचका होतो. म्हणून लायक माणसे शोधून काढावी आणि त्यांना महंतीमध्ये चांगले तयार करून निरनिराळ्या देशांमध्ये लोकसंग्रह करण्यास पाठवून द्यावे. हा सहावा गुण होय.

**।। श्रीराम ।।**

**मूर्ख येकदेसी होतो। चतुर सर्वत्र पाहातो। जैसा बहुधा होऊन भोगितो। नाना सुखें ।।१।।**

मूर्ख संकुचित विचाराचा तर चतुर व्यापकपणे सर्वत्र पहाणारा असतो. जसा काही तो अनेक रूपे घेऊन नाना सुखांचा उपभोग घेतो.

**तोचि अंतरात्मा महंत। तो कां होईल संकोचित। प्रशस्त जाणता समस्त। विख्यात योगी ।।२।।**

चतुर हा अंतरात्म्यामध्ये व्यापक असतो. तो संकुचित कसा बरे होईल? अंतरात्मा (सर्व भूतमात्रात असल्यामुळे), सर्वात जास्त व्यापक व जाणता आहे त्याप्रमाणे महंतही विशाल व ज्ञाता, योगी असतो.

**कर्ता भोक्ता तत्वतां। भूमंडळीं सर्व सत्ता। त्यावेगळा त्यास ज्ञाता। पाहेसा कवणु ।।३।।**

खरोखर भूमंडळावर सत्ता चालविणारा कर्ता व भोक्ता अंतरात्माच असतो. त्याला पाहणारा असा ज्ञाता त्याच्यावाचून कोण आहे?

**ऐसे महंतें असावें। सर्व सार शोधुन घ्यावें। पाहो जातां न संपडावें। येकायेकी ।।४।।**

महंताने अशा प्रकारेच असावे. सर्वत्र जे काही वास्तव (सार) असेल ते त्याने शोधावे, पण कोणी पाहू म्हटले तर सहजी सापडू नये. (तात्पर्य, महंताने सर्वत्र असावे पण कोठेही प्रत्यक्षात नसावे.)

**कीर्तिरूपें उदंड ख्यात। जाणति लाहानथोर समस्त। वेश पाहातां शाश्वत। येकही नाही ।।५।।**

सर्व लहान थोरांना महंत कीर्तीरूपाने विख्यात असल्याने ठावूक असतो. पण त्याचा वेष मात्र (शाश्वत) ठराविक असा कधिच नसतो.

**प्रगट कीर्ति ते ढळेना। बहुत जनास कळेना। पाहों जातां आडळेना। काये कैसें।।६।।**
त्याची पसरलेली सत्कीर्ती कधीच कमी होत नाही. पुष्कळच सामान्य लोकांना त्याचे आकलन होत नाही .पहावयास गेले तर त्याच्या वर्तणुकीचा थांग लागत नाही.

**वेषभूषण तें दूषण। कीर्तिभूषण तें भूषण। चाळणेविण येक क्षण। जाउच नेदी।।७।।**
पेहराव हे काही खरे भूषण नाही तर कीर्ती हेच महंतांचे खरे भूषण आहे. सारासार विचार व तद्नुसार हालचाल याव्यतिरीक्त एक क्षणही तो वाया दवडीत नाही.

**त्यागी वोळखीचे जन। सर्वकाळ नित्य नूतन। लोक शोधून पाहाती मन। परी उच्छा दिसेना।।८।।**
ओळखीच्या लोकांना सोडून देऊन नेहमी नवे नवे लोक मिळवितो. लोक त्याचे अंतरंग शोधून पहातात पण त्याची कसलीही वासना त्यांना आढळत नाही.

**पुर्ते कोणाकडे पाहेना। पुर्ते कोणासि बोलेना। पुर्ते येक स्थळीं राहेना। उठोन जातो।।९।।**
तो धडपणे कोणाकडे पहात नाही, धड कोणाशी मोकळेपणाने बोलत नाही. एके ठिकाणी फार रहात नाही. तेथून निघून जातो.

**जातें स्थळ तें सांगेना। सांगितलें तेथें तरी जायेना। आपुली स्थिती अनुमाना। येवोंच नेदी।।१०।।**
ज्या ठिकाणी जाणार ते ठिकाण कोणास सांगत नाही. आणि सांगितले तरी तेथे जाईलच असे नाही. (त्यामुळे त्याची स्थिती कोणाला अनुमानता येत नाही.)

**लोकीं केलें तें चुकावी। लोकीं भाविलें तें उलथवी। लोकीं तर्किलें तें दावी। निर्फळ करूनी।।११।।**
लोकांनी त्याच्याबद्दल केलेला तर्क चुकीचा होतो. लोकांनी त्याबद्दल धरलेली कल्पना उलटवून टाकतो. लोकांचा तर्क व्यर्थ ठरतो.

**लोकांस पाह्याचा आदर। तेथें याचा अनादर। लोक सर्वकाळ तत्पर। तेथें याची अनिछ्या।।१२।।**
लोकांना ज्या गोष्टी पहाण्याची अत्त्यंत इच्छा असते तेथे याची उत्सुकता नसते. ज्या गोष्टी करण्यासाठी लोकांना अत्यंत आवड असते तेथे याला इच्छाच नसते. (संसारी लोकांच्या भावभावनेपेक्षा निस्पृहाचे भावविश्व वेगळेच असते.)

**एवं कल्पितां कल्पेना। ना तर्कितांहि तर्केना। कदापी भावितां भावेना। योगेश्वर।।१३।।**
अशा प्रकारे नि:स्पृहाची स्थिती लोकांना कल्पनेने कल्पिता येत नाही. तर्क करावयाचा म्हटले तरी तर्कापलीकडे ती असते असा तो महंत योगेश्वर असतो.

**ऐसे अंतर सांपडेना। शरीर ठाईं पडेना। क्षणयेक विशंभेना। कथाकीर्तन।।१४।।**
त्याचा अंतरंग सापडत नाही आणि देहाचाही पत्ता लागत नाही. पण तो कथाकीर्तन करणे कधीही विसरत नाही.

**लोक संकल्प विकल्प करिती। ते अवघेचि निर्फळ होती। जनाची जना लाजवी वृत्ति[१]। तेव्हां**

**योगेश्वर ॥१५॥**
लोक त्याच्या संबंधात तर्कवितर्क (किंवा कुतर्कही) करतात पण तो ते सर्व निष्फळ करून टाकतो. त्यामुळे लोकांनाच त्यांनी केलेल्या तर्काबद्दल हा योगेश्वर लाज वाटावयास लावतो.

**बहुतीं शोधून पाहिलें। बहुतांच्या मनास आलें। तरी मग जाणावें साधिलें। महत्कृत्य ॥१६॥**
अनेक लोकांनी त्याचे म्हणणे शोधून पाहिले आणि बहुतेकांना तेच खरे असल्याचे आढळून आले तर मग फारच मोठे काम झाले असे समजावे.

**अखंड येकांत सेवावा। अभ्यासचि करीत जावा। काळ सार्थकचि करावा। जनासहित ॥१७॥**
नि:स्पृहाने नेहमी एकान्तवास करून अभ्यास करीत जावे. नंतर लोकांमध्ये मिसळून आपला काळ सार्थकी लावावा.(आपली साधना सोडू नये आणि लोकांना ती विद्या देण्यात काळ सार्थकी लावावा)

**उत्तम गुण तितुकें घ्यावे। घेऊन जनास सिकवावे। उदंड समुदाये करावे। परी गुप्तरूपें ॥१८॥**
आपण स्व:त उत्तम गुण अंगी बानवून घ्यावे. नंतर ते लोकांना शिकवावे. पुष्कळ लोकसंग्रह करावा पण आपली वाच्यता होऊ देऊ नये. (प्रसिद्धीची हाव त्यामागे नसावी. परकीय सत्तेला लोकसंग्रहाचा मागमूसही न लागावा हाही गुप्ततेमागचा हेतू असेल)

**अखंड कामाची लगबग। उपासनेस लावावें जग। लोक समजोन मग। आज्ञा इच्छिती ॥१९॥**
महंत अखंडपणे कामाच्या झपाट्यात असतो. सगळे लोक त्याच्यामुळे उपासनेला प्रवृत्त होतात. मग सारेजण त्याची योग्यता जाणून घेऊन त्याच्या आज्ञेची इच्छा करतात.

**आधी कष्ट मग फळ। कष्टचि नाही तें निर्फळ। साक्षेपेंविण केवळ। वृथापुष्ट ॥२०॥**
आधी कष्ट घेतले की मग फळ मिळते. ज्यासाठी कष्ट घेतले नाहीत तर ते निष्फळ होते. दीर्घ किंवा सतत उद्योग न करता फुकटचा गलेलठ्ठपणा येतो तो काय कामाचा?

**लोक बहुत शोधावे। त्यांचे अधिकार जाणावे। जाणजाणोन धरावे। जवळी दुरी ॥२१॥**
अनेक लोकांच्या निरीक्षणाने त्यांची योग्यता ओळखावी. त्यांची कार्य करण्याची पात्रता पाहून त्यांना जवळ करावे किंवा दूर ठेवावे.

**अधिकारपरत्वें कार्य होतें। अधिकार नस्तां वेर्थ जातें। जाणोनि शोधावी चित्तें। नाना प्रकारें ॥२२॥**
अधिकार किंवा पात्रता असेल तरच लोकांच्याकडून कार्य होते. पात्रता नसल्यास कार्य फसते हे ओळखून लोकांच्या चित्ताची पारख करावी.

**अधिकार पाहोन कार्य सांगणें। साक्षेप पाहोन विश्वास धरणें। आपला मगज राखणें। कांहींतरी ॥२३॥**
अधिकार किंवा पात्रता पाहून कार्य सोपवावे, उद्योगीवृत्ती पाहून माणसांवर विश्वास ठेवावा. आपले महत्व किंवा बोज काहीतरी सांभाळून बुद्धीने कार्य करून घ्यावे.

**हे प्रचितीचें बोलिलें। आधीं केलें मग सांगितलें[२]। मानेल तरी पाहिजे घेतलें।**

(१) जनाची जना लाजवी वृत्ति - लोकांनी केलेल्या कुतर्काबद्दल लोकांनाच लाज उत्पन्न व्हावी.

**कोणीयेकें ।।२४।।**
श्रीसमर्थ म्हणतात हे मी प्रचीती घेऊनच सांगितले आहे. मी आधी करून मगच सांगितले आहे. ज्यांना हे मानवेल त्यांनी त्याचा स्वीकार करावा.

**महंतें महंत करावें। युक्तिबुद्धीनें भरावे। जाणते करून विखरावे। नाना देसीं ।।२५।।**
महंताने आपल्यासारखेच महंत तयार करावेत. त्यांना युक्ती, बुद्धी शिकवावी व शहाणे करून त्यांना नाना देशामध्ये (अनेक ठिकाणी) लोकसंग्रह करण्यासाठी पाठवून द्यावे.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निस्पृहवर्तणूकनाम समास दशम ।।१०।।

## द. १५-२ : निस्पृहव्याप

नाशिकजवळ टाकळी येथे श्रीसमर्थांनी बारा वर्षे श्रीरामाची उपासना केली. ध्यानधारणा हा त्या उपासनेचा प्राण होता. आत्सासाक्षात्कार झाल्यावर बारा वर्षे त्यांनी सबंध हिंदुस्थान पायाखाली तुडवला. आपल्या संचारामध्ये त्यांनी एकंदर भारतीय समाजाची दैन्यावस्था प्रत्यक्ष पाहिली. महाराष्ट्रामध्येच थोडे जिवंतपण त्यांना आढळले. त्याकाळच्या गंभीर परिस्थितीचे किंचित वर्णन या समासात सापडते. श्रीसमर्थ सांगतात की, ''जगात असंख्य माणसे आहेत. ह्यांमध्ये एकसारखा एक नाही. भारतीयांपैकी पुष्कळ लोक मुसलमान झाले, पुष्कळ लोक पोर्तुगीज राज्यात खपले, पुष्कळ लोक देशी भाषांच्या भेदाने अडून राहिले. फक्त महाराष्ट्रामध्येच थोडे राजकीय स्वातंत्र्य उरले आहे. काम करणाऱ्या माणसाला जेवायला सवड नाही. इतकी कामे येथे पडली आहेत. कोणी युद्धात गुंतले आहेत; कोणी व्यापारात तर कोणी पोटाच्या धंद्यात गुंतले आहेत. बुद्धीच्या क्षेत्रात असाच गोंधळ आहे. षड्दर्शने आहेत. नाना प्रकारची पाखंड मते आहेत. जगात जिकडेतिकडे उपदेश चालला आहे. उरले सुरले जे लोक आहेत त्यांना स्मार्त आणि वैष्णव आपापल्या संप्रदायांत ओढतात. कित्येक कामनेचे भक्त व्रतवैकल्याच्या नादी लागलेले आहेत. वैदिक लोक त्यांचा द्वेष करतात. त्यांत पुन: हरिदास लोकांना आपल्याकडे ओढतात. अशा रीतीने खरे ज्ञान फारच दुर्लभ झाले आहे.'' पण ही दैन्यावस्था पाहून श्रीसमर्थ गप्प बसले नाहीत. त्यांचा आदेश असा आहे की खरे कळले तर सांगायची सोय नाही. हें जरी खरे तरी विचारवंताला ज्ञान सुलभच असते. कोणी हुशार माणसाने ज्ञान करून घ्यावे आणि पाखंडाचे खंडन करावे. स्वानुभवाच्या बोलाने लोकांना चटक लागते. मग लोक शरण येतात. ज्ञानी पुरुषानें आपली उदासवृत्ती सोडू नये. लोकांना भगवंताच्या मार्गास लावावे; पण आपण शक्य तितके अलिप्त असावे. जंगलात राहावे पण सर्वांची चिंता वाहावी. उपासनेचा गजर करवावा. मोठा लोकसमुदाय बनवून राजकारणाला लावावा. अशा रीतीने लोकांना शहाणे करून कार्य करण्यास समर्थ करावे. असे नाव कमावण्यात मोठा पुरुषार्थ आहे.

## द. १५ स. २ : निस्पृहव्याप

**।। श्रीराम ।।**

(२) आधीं केलें मग सांगितलें - हा समास म्हणजे समर्थ रामदासांचे आत्मचरित्र आहे.

**पृथ्वीमधें मानवी शरीरें। उदंड दाटलीं लाहानथोरें। पालटती मनोविकारें। क्षणक्षणा ।।१।।**
पृथ्वीवर लहानथोर माणसांची शरीरे अनंत आहेत ती त्यांच्या मनोविकारांनी (किंवा विचारतरंगामुळे) सतत बदलत असतात.

**जितुक्या मूर्ती तितुक्या प्रकृती। सारिख्या नस्ती आदिअंतीं। नेमेचि नाहीं पाहावें किती। काये ह्मणोनि ।।२।।**
जितक्या मूर्ती (शरीरे) तितक्या त्यांच्या प्रकृती असतात त्या प्रारंभापासून अंतापर्यंत कधीच सारख्या नसतात. त्यांच्या वर्तनाच्या तऱ्हा किती म्हणून सांगाव्या?

**कित्येक म्लेंच होऊन गेले। कित्येक फिरंगणांत आटले। देशभाषानें रुधिलें। कितीयेक[१] ।।३।।**
कित्येक लोक मुसलमानी धर्मात जाऊन आपल्यातून गेले आहेत. तर कित्येक बाटून फिरग्यांच्या (पोर्तुगीजांच्या) मुलखात ख्रिस्ती झाले आहेत. फिरंगणात नाहिसे झाले आहेत. देशात भिन्न भाषा असल्याने जरी लोकांच्या भावना, विचार समान असले तरी ते दुरावले आहेत. (थोडक्यात असे की सर्वांचा लोकसंग्रह करण्यात अडचणींची गर्दी झाली आहे.)

**मऱ्हाष्टदेश थोडा उरला। राजकारणें लोक रुधिला। अवकाश नाहीं जेवायाला। उदंड कामें ।।४।।**
महाराष्ट्रात जरा तरी चैतन्य किंवा जागृती आहे. पण त्यातही लोक राजकारणामुळे अडले आहेत. त्यांच्यामागे इतकी उदंड कामे आहेत की त्यांना रात्री जेवायलासुद्धा सवड नाही.

**कित्येक युद्धप्रसंगीं गुंतले। तेणें गुणें उन्मत्त जाले। रात्रंदिवस करूं लागले। युद्धचर्चा ।।५।।**
कित्येक युद्धाच्या प्रसंगांमध्ये इतके अडकून पडले आहेत की त्यामुळे रात्रंदिवस त्यांच्यात युद्धाचीच चर्चा सुरू असते. त्यामुळे उन्मत्तपणा त्यांच्यात वाढला आहे. (तमोगुण वाढला आहे. यवनांच्या नोकरीत असलेल्यांबद्दलचे हे वर्णन आहे.)

**उदिम्यास व्यास लागला। अवकाश नाहींसा जाला। अवघा पोटधंदाच लागला। निरंतर ।।६।।**
व्यापारी वर्गाला त्यांचा इतका व्यासंग आहे की त्यांना रिकामा वेळच राहिलेला नाही. निरंतर पोटाच्या पाठीमागे हे लोक लागले आहेत.

**षडदर्शनें नाना मतें। पाषांडें वाढलीं बहुतें। पृथ्वीमधें जेथतेथें। उपदेसिती ।।७।।**
(आता अध्यात्म क्षेत्रातील परिस्थितीचे वर्णन समर्थ करीत आहेत.) षडदर्शने (सहा शास्त्रे आहेत. सांख्य, योग, न्याय, वैशेशिक, मीमांसा, वेदान्त) आहेत पण त्यामध्ये मतभिन्नता आहे. अनेक ऋषींची परस्पर विरूद्ध मते ओहत. याशिवाय कित्येक पाखंडी मते पृथ्वीवर आहेत. (त्यातून नास्तिकवाद उगम पावला ) त्यांचाही उपदेश जगात सुरू आहे.

**स्मार्थी आणि वैष्णवीं। उरलीं सुरलीं नेली आघवीं। ऐसी पाहातां गथागोवी। उदंड जाली ।।८।।**
त्यातूनच जे उरले त्यांना स्मार्त आणि वैष्णव यांनी वेढा टाकला आहे. (शैव विष्णूला मानीत नाहीत. तर वैष्णव शिवाचे द्वेष्टी हा अजब प्रकार समर्थ काळात बळावला होता) अशा प्रकारे महाराष्ट्रामध्ये

(१) कितीयेक - देशभाषेने रूधिले । कितीयेक ।। प्रांताप्रांताची भाषा निरनिराळी असल्याने परस्परांचे मनोगत कळत नाही.

(गथागोवी) गुंतागुंत झाली आहे.

**कित्येक कामनेचे भक्त। ठाई ठाई जाले आसक्त। युक्त अथवा अयुक्त। पाहातो कोण ।।९।।**

काही कामनेपोटी भक्ती करणारे ठिकठिकाणच्या देवदेवतांमध्ये आसक्त झाले आहेत. (विशिष्ट ठिकाणचे विशिष्ट दैवतच जागृत ही त्यांची भावना असते) हे योग्य आहे की अयोग्य हे कोण पहातो!

**या गल्बल्यामधे गल्बला। कोणी कोणी वाढविला। त्यास देखों सकेनासा जाला। वैदिक लोक ।।१०।।**

अशा या मतामतांतराच्या गुंत्यामध्ये आणखीही कोणी (सांप्रदायिक उदा. भागवत, दत्त इ.) आपापली मते वाढविण्याचा (म्हणजे लोक आपल्याकडे ओढण्याचा) प्रयत्न केला, वैदिक लोकांना ते मान्य नाही.

**त्याहिमधें हरिकीर्तन। तेथें वोढले कित्येक जन। प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान। कोण पाहे ।।११।।**

त्यात आणखी हरिकिर्तन करणारे किर्तनकार निघाले (चिमुटभर अध्यात्म बाकी संगीत वा मनोरंजन) तिकडे लोक वळले. ज्या आत्मज्ञानाचा प्रत्यय घ्यावयाचा तिकडे कोणाचे लक्षच नाही.

**याकारणें ज्ञान दुल्लभ। पुण्यें घडे अलभ्य लाभ। विचारवंतां सुल्लभ। सकळ कांहीं ।।१२।।**

यामुळे खरे आत्मज्ञान दुर्लभ झाले. त्याचा अलभ्य लाभ जर सुकृत (पूर्वपुण्याई) असेल तरच घडतो. तथापी जो विचारवंत आहे त्याला सर्व काही साध्य होईल.

**विचार कळला, सांगतां नये। उदंड येती अंतराये[२]। उपाये योजितां, अपाये। आडवे येती ।।१३।।**

आत्मानुभव प्राप्त झाला तरी त्याचा विचार शब्दांत सांगता येत नाही. अनंत विघ्ने आडवी येतात. काही उपाय करावयास जावे तर अपाय होऊन अडचण होते.

**त्याहिमधें जो तिक्षण[३]। रिकामा जाऊं नेदी क्षण। धूर्त तार्किक विचक्षण। सकळां माने ।।१४।।**

परंतु अश्या सगळ्या स्थितीतही तीव्र बुद्धीचा (आत्मदर्शनप्राप्त झालेला) जो असतो तो क्षणभरही विश्रांती घेत नाही. तो धूर्त असतो. तर्कशुद्ध व चिकित्सक असल्यामुळे त्याचे सांगणे सर्वांना मान्य होते.

**नाना जिनस उदंड पाठ। वदों लागला घडघडाट। अव्हाटचि[४] केली वाट। सामर्थ्यबळें।।१५।।**

अनेक(जिन्नस म्हणजे येथे) संतवचने त्याला तोंडपाठ असतात. ती घडाघडा म्हणून दाखवू लागतो. आपल्या प्रबोधनाच्या शक्तीच्या आधाराने तो आडमार्ग (आव्हाट) बंद करतो आणि सन्मार्ग दाखवितो

**प्रबोधशक्तीचीं अनंत द्वारें। जाणें सकळांची अंतरें। निरुपणें तदनंतरें। चटक लागे।।१६।।**

प्रबोधनाचे अनेक मार्ग त्याला ठाऊक असतात. तो सर्वांची अंत:स्थिती ओळखतो. (अंतर्यामीचे विचार ठाऊक असल्यामुळे) त्यानंतर जे निरूपण तो करतो त्याची चटक (तीव्र गोडी) लोकांना लागते

**मतें मतांतरें सगट। प्रत्यये बोलोन करी सपाट। दंडक सांडून, नीट-। वेधी जना।।१७।।**

अनेक मते-मतांतरे त्याला अगोदरच ठाऊक पण प्रत्ययाचे ज्ञान बोलून ती विभिन्न मते तो भुईसपाट करतो (खोडून टाकतो) अज्ञानाच्या पण रूढ झालेल्या विचारमार्गावरून सरळ मार्गावर लोकांना तो

आणतो.

**नेमकें भेदकें वचनें। अखंड पाहे प्रसंगमानें। उदास वृत्तीच्या गुमानें। उठोन जातो।।१८।।**

त्याची वचने (नेमकी) मार्मिक आणि संशयछेदक (भेदक) असतात. तो प्रसंगावधान ठेवून ती मांडतो आणि त्यानंतर निरपेक्षतेच्या डौलात (गुमाने) तेथून उठून चालू लागतो.

**प्रत्यये बोलोन उठोन गेला। चटक लागली लोकांला। नाना मार्ग सांडून, त्याला–। शरण येती ।।१९।।**

प्रत्ययाचे ज्ञान तो बोलून निघून गेला तरी लोकांना त्याच्या निरूपणाची इतकी चटक लागलेली असते की दुसरे अनेक मार्ग सोडून लोक त्याला शरण येतात (नाना वाटेने लोक त्याच्याकडे जातात).

**परी तो कोठें आडळेना। कोणें स्थळीं सांपडेना। वेष पाहातां हीनदीनां–। सारिखा दिसे ।।२०।।**

पण तो सहजपणे कोठेतरी सापडत नाही. (त्याचे निवासस्थळ एकच नसल्याने) विशिष्ट स्थळी मिळू शकत नाही. आणि त्याचा वेष तर अगदी गरिबासारखा दिसतो.

**उदंड करी गुप्तरूपें। भिकाऱ्यासारिखा स्वरूपें। तेथें येशकीर्तिप्रतापें। सीमा सांडिली ।।२१।।**

तो मोठमोठाली अनेक कामे उदंड करतो पण हीती गुप्तपणे! बाहेरून मात्र तो भिकाऱ्यासारखा दिसतो. (स्वरूप आणि वेष यावरून त्याची परिक्षा होत नाही.) अशा पुरूषाचे यश, कीर्ती, आणि प्रताप यांना सीमाच नसते. ती अमर्याद असते. (त्यामुळे लोक त्याला शोधीत येतात.)

**ठाईं ठाईं भजन लावी। आपण तेथून चुकावी। मछरमतांची गोवी। लागोंच नेदी ।।२२।।**

जागोजागी तो लोकसमुहाला भजनाला लावतो पण आपण मात्र तेथून निसटतो. (त्यामुळे) मत्सर व माताभिमानाच्या जाळ्यात तो सापडत नाही.

**खनाळामधें[५] जाऊन राहे। तेथें कोणीच न पाहे। सर्वत्रांची चिंता वाहे। सर्वकाळ ।।२३।।**

तो अशा दुर्गम (खनाळामध्ये) गुहेमध्ये जाऊन रहातो की तेथे त्याला कोणी पाहू शकत नाही. पण तो मात्र सर्वत्र असलेल्या (उपदेशित) लोकांची काळजी करीत असतो.

**अवघडस्थळीं कठीण लोक। तेथें राहाणें नेमक। सृष्टीमधें सकळ लोक। धुंडीत येती ।।२४।।**

बिकट, दुर्गम ठिकाणी आणि वन्य लोकांच्या सानिध्यात त्याचे वास्तव्य असते. पण (आपला उद्धारकर्ता हा महंतच आहे हे समजून) लोकच त्याचा शोध काढीत तेथे येतात.

**तेथें कोणाचें चालेना। अनुमात्र अनुमानेना। कट्ट घालून[६], राजकारणा–। लोक लावी ।।२५।।**

त्याच्यापुढे कोणाचीही मात्रा चालत नाही. त्याचे वर्तन आणि योजना याबद्दल कोणाचाच तर्क चालत नाही. सर्वांचे ऐक्य घडवून आणून (कट्ट घालून) तो लोकांना राजकारणाकडे लावतो.

**लोकीं लोक वाढविले। तेणें अमर्याद जाले। भूमंडळीं सत्ता चाले। गुप्तरूपें ।।२६।।**

(माणसाने माणूस मिळविण्याच्या त्याच्या कार्यपद्धतीमुळे) त्याच्या अनुयायांची संख्या अमर्याद वाढते. त्याची सत्ता गुप्त रूपाने जगभर वाढते.

**ठाईं ठाईं उदंड ताबे[७]। मनुष्यमात्र तितुके झोंबे। चहूंकडे उदंड लांबे। परमार्थबुद्धि ।।२७।।**

(२) अंतराय – विघ्ने. (३) तिक्षण – तीक्ष्ण. (४) अव्हाट – विस्तीर्ण.

ठिकठिकाणी त्याचे असंख्य (ताबे) समुदाय असतात. सारी माणसे त्याच्याकडे आकर्षित होतात आणि (त्यांच्यामार्फत) परमार्थाचा विचार दूरवर फैलावत जातो.

**उपासनेचा गजर। स्थळोस्थळीं थोर थोर। प्रत्ययानें प्राणीमात्र। सोडविले।।२८।।**

लोकांकडून जागोजागी उपासनेचा गजर होतो. प्रत्यय ज्ञानाच्या बळावर तो लोकांचा उद्धार करतो. (लोकांना विविध बंधनातून मुक्तता करतो).

**ऐसे कैवाड[८] उदंड जाणे। तेणें लोक होती शाहाणे। जेथें तेथें प्रत्यये बाणे। प्राणिमात्रांसी।।२९।।**

अनेक प्रकारच्या चातुर्याच्या युक्त्या (कैवाड) त्याला ठाऊक असतात; त्यामुळे लोक शहाणे होतात. प्राणिमात्राला जेथे त्याच्या अनुभवाचा प्रत्यय येतो.

**ऐसी कीर्ति करून जावें। तरीच संसारास यावें। दास म्हणे हें स्वभावें। संकेतें बोलिलें।।३०।।**

अशा प्रकारची कीर्ती नि:स्पृहाने मागे टाकून जावे तरच त्याने जगात जन्म घेतल्याचे सार्थक झाले. दास म्हणतात हे सहजपणे संक्षिप्तपणे ओघात आले म्हणून सांगितले.

(समासातील ध्यानात घ्यावयाची विशेषता अशी आहे की श्रीसमर्थांचे तत्कालीन परिस्थितीचे, लोकस्थितीचे निरीक्षण किती सूक्ष्म आणि अचूक आहे ते पहावे. तथापि निराशाजनक स्थितीमध्ये नि:स्पृहाला त्यातूनही कसा मार्ग काढता येतो हे येथे सांगितले आहे. श्रीसमर्थांचे आत्मचरित्र जणू यात प्रगट झाल्याप्रमाणे वाटते. अभ्युदय आणि नि:श्रेयस ही जीवनाची दोनही अंगे आहेत हे त्यांच्या नित्य चिंतनात होते.)

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निस्पृहव्यापलक्षणनाम समास द्वितीय।।२।।

# दासबोध परिचय : प्रश्नपत्रिका ६ वी

(दासबोध द. ११ स. १० आणि द. १५ स. २ वर आधारित)

प्र. १ 'महंताने अंतरात्म्यासारखे असावें' याबद्दलचे विवरण (द. ११-१० मध्ये) कशा प्रकारे केले आहे?

प्र. २ (द. ११-१०) मध्ये समर्थांचे जणू आत्मचरित्रच असल्याचा भास होतो, अशा पाच निवडक ओव्या लिहा.

प्र. ३ समर्थ संप्रदायाच्या प्रसारकार्यासंबंधी कोणती माहिती (द. ११-१०) मध्ये आपणास मिळते?

प्र. ४ महाराष्ट्रातील तत्कालीन जनस्थितीचे वर्णन (द. १५-२) मध्ये समर्थांनी कसे केले आहे?

प्र. ५ अ) पुढील ओव्यांचा अर्थ लिहा.(१) १५-२-१४, (२) १५-२-२८, (३) १५-२-६

ब) समर्थांचे वास्तव्य असलेल्या घळीतील त्यांच्या प्रतिमेखाली एक ओवी लिहावयाची आहे, अशी कल्पना करून (द. १५-२) मधील नेमकी कोणती ओवी आपणास निवडाविशी वाटेल. ती ओवी

(५) खनाळ - कडेपाट, डोंगरातील घळ. (६) कट्ट घालून - एकोपा करून. (७) ताबे - समुदाय. (८) कैवाड - प्रकार.

लिहा.

## स्वाध्याय ७ वा (द. ३ मधील स. ६, ७ व ८ वर आधारित)

**स्वाध्याय सारांश :** मानवाच्या जीवनात ज्या विविध तापांचा अनुभव त्याला घ्यावा लागतो, त्यांचा एकत्रित अभ्यास ३ समासांच्या द्वारे आपण करणार आहोत. शरीर सामर्थ्य, सत्ता किंवा संपत्ती यांचि ढाल पुढे करूनसुद्धा तापत्रयातून मानवाची मुक्तता होत नाही. 'जगी सर्वसुखी असा कोण आहे?' असा प्रश्न समर्थांनी मनोबोधात विचारला आहे. त्याचे मूळ विविध तापांच्या निरीक्षणात असल्याचे आढळून येईल.

## द. ३ स. ६ : आध्यात्मिक ताप

मानवी जीवनांत दुःख आहे याबद्दल कोणालाच संशय येणे शक्य नाही. या दुःखाचे आधिभौतिक, आध्यात्मिक आणि आधिदैविक असे तीन भेद करण्याची मूळ कल्पना सांख्यांची. पुढे वेदांताने ती आपली करून घेतली. बाह्य विश्वातील वस्तूंचा माणसाच्या इंद्रियांशी संयोग होऊन जी दुःखे भोगावी लागतात, ती आधिभौतिक होत. बाह्य संयोगावाचून उद्‌भवणाऱ्या दुःखांना आध्यात्मिक म्हणतात, आणि देवतांच्या कोपाने भोगाव्या लागणाऱ्या दुःखांना आधिदैविक असे नाव आहे. यांतील मर्म असे की, पिंड आणि परिस्थिती यांच्या परस्पर क्रियाप्रतिक्रियांनी जीवन चालते. आईच्या पोटात आल्यापासून, जीवाचा परिस्थितीशी संबंध येतो. देह सुटेपर्यंत तो राहतो. पिंड व परिस्थिती यांच्या खेचाखेचीत पिंडावर जे प्रतिकूल आघात होतात त्यांना संत ताप असे म्हणतात. माणसाला त्याच्या जीवनात स्वतःच्या देहापासून ताप होतो, मनापासून 'ताप' होतो, इतर प्राण्यांपासून व माणसांपासून ताप होतो. हवा, पाणी, वीज, अग्नी या नैसर्गिक शक्तींपासून ताप होतो. त्यांना तापत्रय म्हणतात. जन्मास आलेला कोणीही माणूस या तापत्रयांच्या कचाट्यातून सुटलेला नाही. माणसाला दुःख नको असते, तरी ते भोगावे लागते. ते किती प्रकारांनी भोगावे लागते, याचे सविस्तर वर्णन श्री समर्थांनी पुढील तीन समासांत केले आहे.

॥ श्रीराम ॥

**तापत्रयाचें लक्षण। आतां सांगिजेल निरूपण। श्रोतीं करावें श्रवण। येकाग्र होऊनी॥१॥**

तापत्रयांच्या लक्षणासंबंधी आता जे निरूपण करीत आहे ते एकाग्र चित्ताने श्रोत्यांनी ऐकावे.

**जो तापत्रैं पोळला। तो संतसंगें निवाला। आर्तभूत[१] तोषला। पदार्थ जेवी॥२॥**

जो तीन प्रकारच्या तापाने पोळला जातो तो संतांच्या सहवासात शांत होतो. इच्छित पदार्थांच्या प्राप्तीमुळे जसा आर्त माणूस तृप्त होतो तसाच हा प्रकार आहे.

**क्षुधाक्रांतास मिळे अन्न। तृषाक्रांतास जीवन। बंदी पडिल्याचें बंधन–। तोडितां, सुख॥३॥**

भूक लागलेल्यांना अन्न, तहान लागल्यास पाणी मिळाल्यास आणि बंदिवान कैद्याला बेड्या तोडल्या असता सुख प्राप्त होते.

**माहापुरें जाजावला। तो पैलतीरास नेला। कां तो स्वप्नींचा चेउला। स्वप्नदु:खी।।४।।**
महापुरामध्ये अडकलेल्यास पलिकडच्या काठास नेले किंवा स्वप्नातील भीषण प्रसंग पाहून दु:खी झालेल्यास जागे केले.
**कोणी येकासी मरण-। येतां, दिलें जीवदान। संकटास निवारण। तोडितां सुख।।५।।**
मृत्युच्या दाढेतून एखाद्याची सुटका केली संकटात सापडलेल्यास संकटमुक्त केले तर सुख मिळते.
**रोगियास औषध। सप्रचित आणी शुद्ध। तयासी होये आनंद। आरोग्य होतां।।६।।**
रोग्याला अनुभवाच्या आणि गुण देणाऱ्या शुद्ध औषधामुळे आरोग्यप्राप्तीचा आनंद होतो.
**तैसा संसारें दु:खवला। त्रिविधतापें पोळला। तोचि येक अधिकारी जाला। परमार्थासी।।७।।**
त्याप्रमाणे जो संसारात दु:खी झाला असेल, त्रिविध दु:खाने पोळला असेल, तर तो परमार्थांचा अधिकारी होतो. (संसारातील दु:खातून परमार्थ तारून नेतो)
**ते त्रिविध ताप ते कैसे। आतां बोलिजेत तैसे। येविषईं येक असे। वाक्याधार।।८।।**
आता ते त्रेविध (तीन प्रकारचे) ताप कसले ते (विस्ताराने) सांगतो. याविषयी एक ग्रंथवचन आहे.
**श्लोक।। देहेंद्रियप्राणेन सुखं दु:खं च प्राप्यते। इमाध्यात्मिकं तापं जायते दु:खं देहिनाम्।।१।।**
देह, इंद्रिये आणि प्राण यांच्यामुळे जे सुखदु:ख प्राप्त होते त्याला आध्यात्मिक ताप असे म्हणतात. यामुळे देहाला दु:ख होते.
**सर्वभूतेन संयोगात् सुखं दु:खं च जायते। द्वितीयतापसंताप: सत्यं चैवाधिभौतिक:।।२।।**
सर्व भूतांच्या संयोगामुळे जे सुखदु:ख प्राप्त होते तो दुसरा संतापजनक ताप आहे तो अधिभौतिक ताप होय.
**शुभाशुभेन कर्मणा देहांते यमयातना। स्वर्गनरकादि भोक्तव्यमिदं चैवाधिदैविकम्।।३।।**
माणसाच्या बऱ्या वाईट कर्माप्रमाणे मेल्यावर यमयातना, स्वर्ग नरक असे जे भोग भोगावे लागतात त्यांना आधिदैविक ताप असे म्हणतात.
**येक ताप आध्यात्मिक। दुजा तो आदिभूतिक। तिसरा आदिदेविक। ताप जाणावा।।९।।**
एक ताप आध्यात्मिक, दुसरा अधिभौतिक तर तिसरा अधिदैविक असे तीन ताप समजावे.
**आध्यात्मिक तो कोण। कैसी त्याची वोळखण। आदिभूतिकाचें लक्षण। जाणिजे कैसें।।१०।।**
आध्यात्मिक ताप कोणता? तो कसा ओळखावा, आधिभौतिक तापाची लक्षणे कोणती हे कसे समजावे?
**आदिदैविक तो कैसा। कवण तयाची दशा। हेंहि विशद कळे ऐसा। विस्तार कीजे।।११।।**
आधिदैविक ताप कसा असतो त्याची अवस्था काय हे सर्व समजेल अशा प्रकारे तपशीलवार सांगावे.
**हां जी ह्मणोनि वक्ता। जाला कथा विस्तारिता। आध्यात्मिक ताप आतां। सावध ऐका।।१२।।**
'ठीक आहे' असे म्हणून वक्त्याने विस्ताराने सांगण्यास सुरूवात केली. आध्यात्मिक तापाबद्दल आता

(१) आर्तभूत - आतूर.

ऐकावे.

**देह इंद्रिये आणी प्राण। यांचेनि योगें आपण। सुखदुःखें सिणे जाण। या नांव आध्यात्मिक ।।१३।।**

देह, इंद्रिये आणि प्राण यांच्यामुळे आपणास सुखदुःखे यांचे जे क्लेश होतात त्याला आध्यात्मिक ताप म्हणतात.

**देहामधून जें आलें। इंद्रियें प्राणें दुःख जालें। तें आध्यात्मिक बोलिलें। तापत्रईं ।।१४।।**

देहामधून जे येते आणि इंद्रिय व प्राण यांच्यामुळे जे दुःख होते त्याला तापयत्रातील आध्यात्मिक ताप म्हणतात.

**देहामधून काये आलें। प्राणें कोण दुःख जालें। आतां हें विशद केलें। पाहिजे कीं ।।१५।।**

देहामधून काय आले, प्राणामुळे कोणते दुःख आले हे आता स्पष्ट केलेच पाहिजे की!

**खरुज खवडे पुळिया नारु। नखरुडें मांजऱ्या देवि गोवरु। देहामधील विकारु। या नांव आध्यात्मिक ।।१६।।**

खरूज, डोक्याला होणारे खवडे, पुळ्या, नारू, नखाला वस्ताऱ्याने होणारी व्याधी (नखुरडे), खाकमांजऱ्या, देवी, गोवर, या देहविकारांना आध्यात्मिक ताप म्हणतात.

**काखमांजरी केशतोड। वोखटें वर्ण काळफोड। व्याधी मूळव्याधी माहाजड[२]। या नांव आध्यात्मिक ।।१७।।**

खाकमांजरी, केसतूड, वाईट दिसणारे त्वचेवरील डाग, काळपुळी, महारोग, दुःसह मूळव्याधी

**अंगुळवेडे गालफुगी। कंड लागे जे वाउगी। हिरडी सुजे भरे बलंगी[३]। या नांव आध्यात्मिक ।।१८।।**

कांडरू, गालगुंड, उगीचच अंग खाजणे, हिरडी सूज, कसपट दातात शिरणे व कळा निघणे

**वाउगे फोड उठती। कां ते सुजे आंगकांती। वात आणी तिडका लागती। या नांव आध्यात्मिक ।।१९।।**

उगाच अंगावर फोड उठणे, शरीराला सूज येते, वात शिरून कळा येणे.

**नाइटे अंदु[४] गजकर्ण। पेहाचें[५] पोट विस्तीर्ण। बैसलें टाळें फुटती कर्ण। या नांव आध्यात्मिक ।।२०।।**

नायटे, हाड्याव्रण, गजकर्ण, (पेहाचे पोट) पोटफुगी, कानठळ्या बसणे, कान फुटणे

**कुष्ट आणि वोला कुष्ट। पंड्यारोग अतिश्रेष्ठ। क्षयरोगाचे कष्ट। या नांव आध्यात्मिक ।।२१।।**

फोड, (ओला कुष्ट) महारोग, असाध्य पंडुरोग, क्षयरोगाच्या यातना

**वाटी[६] वटक[७] वायेगोळा। हातीं पाईं लागती कळा। भोवंडी लागे वेळोवेळां। या नांव आध्यात्मिक ।।२२।।**

(वाटी) गुडघ्यातील वाटी सरकणे, (वटक) डबा, लहान मूल दूध प्याल्यावर त्या दुधाच्या गुठळ्या होऊन होणारा रोग, पोटात होणारा वायगोळा, वेळोवेळी (भोवळ) घेरी येणे

**वोलांडा आणी वळ। पोटसुळाची तळमळ। आर्धशिसी उठे कपाळ। या नांव आध्यात्मिक ।।२३।।**
वोलांडा (उतारा उतरून टाकलेला असताना तो ओलांडून गेल्यामुळे होणारा रोग), वळ, पोटशूळामुळे तळमळ, अर्धशिशी (डोक्याचा अर्धा भाग दुखणे)

**दुःखे माज[८] आणि मान। पुष्ठी ग्रीवा आणि वदन। अस्तिसांदे दुःखती जाण। या नांव आध्यात्मिक ।।२४।।**
कंबर आणि मानदुखी, पाठ, गळा, तोंड, हाडांची सांधेदुखी,

**कुळिक[९] तरळ[१०] कामिणी[११]। मुरमा सुंठरें[१२] माळिणी। विदेसी लागलें पाणी। या नांव आध्यात्मिक ।।२५।।**
(कुळीक) मोडशी, तरळ, (अजीर्णामुळे होणारी व्याधी), कामिनी (कावीळ), मुरमाच्या पुटकुळ्या, ओलांडा फोड (पिवळ्या फडक्यांमध्ये जोंधळे बांधून फोडावरून उतरून टाकतात, ते फडके ओलांडले तर हा रोग होतो ही समजूत), माळीण (नाकातली गळवे), अन्य ठिकाणचे पाणी न सोसणे यामुळे होणारे दुःख

**जळसोस आणी हिवारें। गिरीविरी आणी अंधारें। ज्वर पाचाव[१३] आणी शारें[१४]। या नांव आध्यात्मिक ।।२६।।**
कंठशोष होणे, (हिवारे) हिपताप, घेरी घेऊन डोळ्यापुढे अंधारी येणे, (ज्वरपाचान) ताप उलटलेले दुखणे, (शारे) अंगावर शहारे येणे,

**शैत्य उष्ण आणी तृषा। क्षुधा निद्रा आणी दिशा[१५]। विषयतृष्णेची दुर्दशा। या नांव आध्यात्मिक ।।२७।।**
(शैत्य) सर्दी, उष्णता, तहान, भूक, झोप, शौचाची व्यथा, विषयवासनेपोटी होणारी दैना.

**आळसी मूर्ख आणी अपेसी। भय उद्भवे मानसीं। विसराळु दुश्चित्त आहिर्निशी। या नांव आध्यात्मिक ।।२८।।**
आळशी, मूर्ख, अपेशी, भित्रा, विसराळू, (दुश्चित) मन भरकटणे,

**मूत्रकोड आणी परमें। रक्तपिती रक्तपरमें। खडाचढाचेनि श्रमे[१६]। या नांव आध्यात्मिक ।।२९।।**
लघवी कोंडून रहाणे, परमा, रक्तपिती, शौच्याला खडे होणे, यामुळे होणारे दुःख

**मुरडा हागवण उन्हाळे। दिशा कोंडतां आंदोळे। येक वेथा असोन न कळे। या नांव आध्यात्मिक ।।३०।।**
मुरडा, हगवण, उन्हाळे (लघवीचे वेळी आग), शौच्य बंद झाल्याने बद्धकोष्ठामुळे तडफड, व्यथा असूनही ती न समजणे,

**गांठी ढळली जाले जंत। पडे आंव आणी रक्त। अन्न तैसेंचि पडत। या नांव आध्यात्मिक ।।३१।।**
वाट सरकणे, जंत होणे, आव आणि रक्त शौच्यावाटे पडणे, अन्न न पचता पडणे

(२) महाजड – दुःसह. (३) बलंगी – बाजरीचे कसपट. (४) अंदु – हाड्याव्रण. (५) पेहाचे – पोटफुगीचे. ६) वाटी – वाट किंवा गाठ सरणे. (७) वटक – लहान मुलाची दुग्धपानाचे नंतर होणारी उलटी. ८) माज – कंबर.

**पोटफुगी आणी तडस। भरला हिर[१७] लागला घांस। फोडी लागतां कासावीस। या नांव आध्यात्मिक ।।३२।।**

पोट फुगणे, तडस लागणे, (हिर) लचकणे, घास लागणे (फोडी) लहान फोडामुळे कासावीस होणे,

**उचकी लागली उसित[१८] गेला। पीत उसळलें उलाट झाला। खरे पडसा आणी खोंकला। या नांव आध्यात्मिक।।३३।।**

उचक्या लागणे, (उसित) मानेत घास अडकणे, ठसका लागणे, पित्त उसळणे, (उलाट) उलटी होणे, जिभेला काटे येणे, पडसे, खोकला,

**उसळला दमा आणि धाप। पडजिभ ढासि आणी कफ। मोवाज्वर आणि संताप। या नांव आध्यात्मिक ।।३४।।**

दमा उसळणे, धाप लागणे, (मोवा ज्वर) ताप येणे, संताप येणे

**कोणी सेंदुर घातला। तेणें प्राणी निर्बुजला। घशामध्यें फोड जाला। या नांव आध्यात्मिक ।।३५।।**

कोणी शेंदुर घातल्यामुळे आवाज (निबृजणे) बसणे, घशात फोड येणे,

**गळसोट्या आणी जीभ झडे। सदा मुखीं दुर्गंधी पडे। दंतहीन लागती किडे। या नांव आध्यात्मिक।।३६।।**

(गळसोट्या) घटसर्प होणे, जीभ झडणे, तोंडास नेहमी दुर्गंधी येणे, दात नसणे किंवा असल्यास कीड लागणे.

**जरंडी घोलाणा गंडमाळा। अवचिता स्वयें फुटे डोळा। आपणचि कापी अंगुळा। या नांव आध्यात्मिक ।।३७।।**

(जरंडी) पाणथरी, (घोळणा) घुणा फुटणे, गंडमाळा, एकाएकी डोळा फुटणे, आपल्या हाताने आपली बोटे कापली जाणे,

**कळा तिडका लागती। कां ते दंत उन्मळती। अधर जिव्हा रगडती। या नांव आध्यात्मिक ।।३८।।**

कळा तिडका लागणे, दात उन्मळणे, दाताखाली जीभ सापडणे,

**कर्णदु:ख नेत्रदु:ख। नाना दु:खें घडे शोक। गर्भांध आणी नपुश्यक। या नांव आध्यात्मिक ।।३९।।**

कान, डोळे दुखणे, नाना प्रकारे दुखण्यामुळे शोक होणे, गर्भांध किंवा नपुसंक असणे.

**फुलें वडस आणी पडळें[१९]। कीड गर्ता[२०] रातांधळें। दुश्चित भ्रमिष्ट आणी खुळें। या नांव आध्यात्मिक ।।४०।।**

डोळ्यांचे विकार - फूल, (वडस) मोतीबिंदू, कीड लागणे, खाचा होणे, राताधंळे होणे, चित्त थाऱ्यावर नसणे, भ्रम लागणे,

**मुकें बधीर राखोंडें[२१]। थोटें चळलें आणी वेडें। पांगुळ कुऱ्हें[२२] आणी पावडें[२३]। या नांव**

---

(१५) दिशा - आमांश. (१६) खडाचढाचेनि श्रमे - विष्ठेचा खडा होण्यामुळे होणारी वेदना. (१७) हिर - लचक. (१८) उसित जाणे - घशात घास अडकणे.

**आध्यात्मिक ।।४१।।**

मुकेपणा, बहिरेपणा, (राखोंडे) ओठ तुटकेपणा, थोटेपणा, चळ लागणे, पांगळा, (कुऱ्हे) कुबडेपणा, (पावडे) पाय तुटकेपणा या सर्वांना आध्यात्मिक ताप हे नांव आहे.

**तारसें[२४] घुलें[२५] काणें कैरें[२६]। गारोळें[२७] जामुन[२८] टाफरें[२९]। शडांगुळें गेंगाणें विदरें[३०]। या नांव आध्यात्मिक ।।४२।।**

तारसे (तारवटलेल्या डोळ्याचे) (घुले) मान वाकडी करून पहाणे, काणे, (कैरे) तिरळे, (गारोळे) घारे डोळे, अतिशय ठेंगणे, ठेचाळत चालणारे, (शडांगुळे) सहा बोटे असलेले, गेंगाणे, कुरूप,

**दांतिरें बोचिरें घानाळ। घ्राणहीन श्रोत्रहीन बरळ। अतिकृश अतिस्थूळ। या नांव आध्यात्मिक ।।४३।।**

दात पुढे आलेले, पुढले दात पडलेले, (घानाळ) लांब नाकाचे, नकटे, श्रवणेंद्रिय नसणारे, (बरळ) बडबडे, अति अशक्त, किंवा स्थूल

**तोंतरें बोंबडें निर्बळ। रोगी कुरूप कुटील। मत्सरी खादाड तपीळ। या नांव आध्यात्मिक ।।४४।।**

तोतरे बोलणारे, बोबडे, अशक्त, रोगी, कुरूप, मत्सरी, खादाड, (तपीळ) रागीट,

**संतापी अनुतापी मत्सरी। कामिक हेवा तिरस्कारी। पापी अवगुणी विकारी। या नांव आध्यात्मिक ।।४५।।**

संतापी, पश्चाताप करणारा, विषयलुब्ध, मत्सरी, पापी, अवगुणी, विकारी

**उठवणें ताठा करक। आवटळें आणि लचक। सुजी आणी चालक। या नांव आध्यात्मिक ।।४६।।**

उठवणीला येणे (उठता बसता न येणे) उसण भरणे, मान अवघडणे, सूज येणे आणि चाळपुळी

**सल आडवें गर्भपात। स्तनगुंतें सनपात। संसारकोंडें आपमृत्य। या नांव आध्यात्मिक ।।४७।।**

न वाढणारा गर्भ, मूल आडवे येणे, गर्भपात होणे, स्तनात दुधाच्या गुठळ्या होणे, संनिपात, संसारातील गुंते, अपमृत्यू,

**नखविख आणी हिंगुडें[३१]। बाष्ट आणी वावडे। उगीच दांतखीळ पडे। या नांव आध्यात्मिक ।।४८।।**

नखाचे विष बाधणे, (हिंगर्डे) कान टोचताना होणारी जखम चिघळणे, तुपट शिळे अन्न खाऊन किंवा कुपथ्याने बळावलेली व्याधी, उगीचच दातखीळ बसणे,

**झडती पातीं सुजती भवया। नेत्रीं होती राझणवडीया। चाळसी लागे प्राणियां। या नांव आध्यात्मिक ।।४९।।**

पापण्या झडणे, भुवयांची सूज, डोळ्यात रांजणवाड्या होणे, चष्मा लागणे.

**वांग[३२] तिळ[३३] सुरमे लांसें। चामखिळ गलंडें मसें। चुकुर[३४] होउजे मानसें। या नांव आध्यात्मिक ।।५०।।**

(१९) पडळे - मोतीबिंदू. (२०) गर्ता - डोळे असून न दिसणे. (२१) राखोंडें - जन्मत: ओठतुटके. (२२) कूऱ्हें - कुबडे. (२३) पावडें - पांगळे. (२४) तारसें - तारडोळे. (२५) घुलें - मान वाकडी करून पाहणे.

त्वचेवर काळे डाग, तीळ, पांढरे काळे चट्टे, चामखीळ, खांडून, (मसे) व्रण, मन भ्रमिष्ट होणे.

**नाना फुग आणी आवाळें। आगीं दुर्गंधी प्रबळे। चाईचाटी[३५] लाळ गळे। या नांव आध्यात्मिक ।।५१।।**

शरीराचे भाग सुजणे, आवाळू, अंगाला दुर्गंधी येणे (चाईचाटी) केस गळणे, तोंडतून लाळ गळणे,

**नाना चिंतेची काजळी। नाना दुःखें चित्त पोळी। व्याधीवांचून तळमळी। या नांव आध्यात्मिक ।।५२।।**

अनेक प्रकारच्या चिंतेने काळवंडणे, नाना दुःखाने चित्त होरपळणे, व्याधी नसतानाही तळमळ,

**वृद्धपणीच्या आपदा। नाना रोग होती सदा। देह क्षीण सर्वदा। या नांव आध्यात्मिक ।।५३।।**

वृद्धापणाची दैना, नेहमी रोगीष्ट होणे, नेहमी दुर्बळ होणे,

**नाना व्याधी नाना दुःखें। नाना भोग नाना खांडकें। प्राणी तळमळी शोकें। या नांव आध्यात्मिक ।।५४।।**

अनेक आजार, दुःखे, भोग, अनेक जखमा यामुळे प्राणी दुःखाने तळमळत राहतो हे आध्यात्मिक तापाचे लक्षण आहे.

**ऐसा आध्यात्मिक ताप। पूर्वपापाचा संताप। सांगता सरेना अमूप। दुःखसागर ।।५५।।**

असा हा आध्यात्मिक ताप, पूर्वीच्या पापाचे फळ होय. तो दुःखाचा जणू समुद्रच आहे. तो ताप सांगून संपणार नाही.

**बहुत काय बोलावें। श्रोतीं संकेतें जाणावें। पुढें बोलिजे स्वभावें। आदिभूतिक ।।५६।।**

त्याबद्दल जास्त काय सांगावे श्रोत्यांनी थोडक्यात त्याचे चिन्ह ओळखावे. पुढे आधिभौतिक तापाची लक्षणे सांगितली आहेत.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आध्यात्मिकतापनिरूपणनाम समास षष्ठ ।।६।।

## द. ३–७ : आधिभौतिक ताप

देहाच्या अंतर्यामी होणाऱ्या घडामोडींमुळे जी दुःखे भोगावी लागतात, ती मागच्या समासात सांगितली. आता देहाच्या बाहेरील परिस्थितीमुळे निर्माण होणारी दुःखे कोणती, त्याचे वर्णन करतात. बाहेरील परिस्थितीमध्ये अचेतन आणि सचेतन असा भेद करता येतो. अचेतन दुःखकारणे म्हणजे पंचमहाभूतांपासून होणारा ताप, तर सचेतन म्हणजे जीवजंतु, जनावरे आणि माणसे यांच्याकडून होणारे दुःख समजावे. माणसाला माणसांकडून होणारे दुःख सर्वात दुःसह असते. श्री समर्थांनी अशा काही दुःखांचे जे प्रकार वर्णन केले आहेत, ते पाहून अंगावर काटा उभा राहतो. बाकी विसाव्या शतकातील माणूस या बाबतीत सुधारला आहे, असे म्हणता येत नाही. श्री समर्थांच्या यादीमध्ये त्याने भरच घातली आहे. असो. या समासात देखील श्री समर्थांचे अगाध व्यवहारज्ञान आपल्या प्रत्ययाला येते.

**।। श्रीराम ।।**

(३१) हिंगुडें – कुपथ्यातून जखमेची गाठ होणे. (३२) वांग – काळसर पुळी. (३३) सुरमे – पांढरा चट्टा. (३४) चुकूर – भ्रमिष्ट. (३५) चाईचाटी – केस गळतात तो रोग.

**मागां जालें निरूपण। आध्यात्मिकाचें लक्षण। आतां आदिभूतिक तो कोण। सांगिजेल।।१।।**

श्लोक।। सर्वभूतेन संयोगात् सुखं दुःखं च जायते।। द्वितीयतापसंतापः सत्यं चैवाधिभौतिकः।।१।।

मागील समासामध्ये आध्यात्मिक तापाचे लक्षण सांगितले. आता अतिभौतिक ताप कसा असतो ते सांगत आहे. श्लोकाचा अर्थ - भूतमात्राच्या (बाह्य पदार्थांच्या संयोगाने) जे सुख दुःख निर्माण होते त्या दुसऱ्या ताप-संतापाला आधिभौतिक ताप असे म्हणतात.

**सर्व भूतांचेनि संयोगें। सुखदुःख उपजों लागे। ताप होतां मन भंगे। या नांव आदिभूतिक।।२।।**

सगळ्या भूतांच्या म्हणजे पंचमहाभूतांच्या संयोगाने जे सुखदुःख होते, जो ताप झाला असता मन भंगून जाते, त्याला अधिभौतिक ताप असे म्हणतात.

**तरी या आदिभूतिकाचें लक्षण। प्रांजळ करूं निरूपण। जेणें अनुभवास ये पूर्ण। वोळखी तापत्रयाची।।३।।**

या आधिभौतिक तापाचे लक्षण स्पष्टपणे प्रगट करू त्यामुळे तापत्रयांची ओळख यथार्थ होईल.

**ठेंचा लागती मोडती कांटे। विझती शस्त्रांचें घायटे[1]। सल[2] सिलका आणी सरांटे। या नांव आदिभूतिक।।४।।**

ठेचा लागणे, शरीरात काटे मोडणे, शस्त्रांचे घाव पडणे, शरीरात लाकडाची (सल) बारीक धस घुसणे, (सिलका) चोई घुसणे आणि सराटे बोचणे

**अंग्या[3] आणी काचकुहिरी। आवचटा लागे शरीरीं। गांधील येऊन दंश करी। या नांव आदिभूतिक।।५।।**

(अंग्या) खाजकुयरी किंवा (काचकुहिरी) खाज होणारी शेंग अचानक लागणे, गांधील माशी चावणे,

**मासी गोमासी मोहळमासी। मुंगी तेलमुंगी डांस दसी। सोट जळू लागे यासी। आदिभूतिक बोलिजे।।६।।**

माशी, गोमाशी, मधमाशी, मुंगी, तेलमुंगी किंवा डास चावणे, (सोट) चावरा किडा, किंवा जळवा लागणे

**पिसा पिसोळे चांचण। कुसळें मुगळें ढेंकूण। विसीफ[4] भोवर[5] गोंचिड जाण। या नांव आदिभूतिक।।७।।**

पिसा, पिसोळे, (चाचण) चाचड, (कुसेळ) कुसळे, मुंगळे, ढेकूण, इसब उत्पन्न करणारे किडे, भुंगा, गोचीड चावणे

**गोंबी विंचू आणी विखार। व्याघ्र लांडिगे आणी शूकर। गौसायळ सामर[6]। या नांव आदिभूतिक।।८।।**

गोमी, विंचू, (विखोर) विषारी साप, वाघ, लांडगा आणि डुक्कर, तसेच (गौसाळ) साळू पक्षी, सांबर चावणे,

(१) घायटे - घाव. (२) सल - शरीरात धस घुसणे.

**रानगाई रानहौसे। रानशकट्ट आणी रीसें। रानहाती लांबपिसें। या नांव आदिभूतिक।।९।।**
रानगाई, रानरेडा, रानबैल, (रिसे) अस्वले, रानटी हत्ती, सांबरे, चावणे किंवा डाकिणीने (लावेने) लावलेले वेड
**सुसरीनें वोढून नेलें। कां तें अवचितें बुडालें। आथवा खळाळी पडिलें। या नांव आदिभूतिक ।।१०।।**
सुसरीने ओढून नेणे, पाण्यात अचानक बुडणे, किंवा खळाळणाऱ्या ओढ्यात पडणे
**नाना विखारें आजगर। नाना मगरें जळचर। नाना वनचरें अपार। या नांव आदिभूतिक ।।११।।**
नाना प्रकारचे विषारी साप, अजगर, मगरीसारखे जलचर, अनेक प्रकारची रानटी जनावरे,
**अश्व वृषभ आणी खर। स्वान शूकर जंबुक मार्जर। ऐसीं बहुविध क्रूर। या नांव आदिभूतिक ।।१२।।**
घोडा, बैल, गाढव, कुत्री, डुकरे, कोल्हे, मांजर अशा नाना प्रकारच्या क्रुर प्राण्यांचे त्रास होणे.
**ऐसीं कर्कशें भयानकें। बहुविध दुःखदायकें। दुःखें दारुणें अनेकें। या नांव आदिभूतिक ।।१३।।**
अशा अनेक प्रकारे दुःख देणाऱ्या क्रुर व भयंकर प्राण्यांपासुन अपाय आणि महाभयंकर दुःख याचे नाव आधिभौतिक.
**भिंती माळवंदे पडती। कडे भूयेरी कोंसळती। वृक्ष आंगावरी मोडती। या नांव आदिभूतिक ।।१४।।**
भिंती, घराची धाबी, कडे, भुयारे अंगावर कोसळणे, झाडे मोडून पडणे
**कोणी येकाचा श्राप जडे। कोणी येके केले चेडे। आधांतरी होती वेडे। या नांव आदिभूतिक ।।१५।।**
कोणी एखादा शाप देतो, तर कोणी आपणावर चेटूक करतो, अकारणच वेड लागते.
**कोणी येकें चाळविलें। कोणी येकें भ्रष्टविलें। कोणी येकें धरून नेलें। या नांव आदिभूतिक ।।१६।।**
कोणीतरी फसवितो, कोणी भ्रष्ट करतो, कोणी पकडून नेतो
**कोणी येके दिलें वीष। कोणी येकें लाविले दोष। कोणी येकें घातलें पाश। या नांव आदिभूतिक ।।१७।।**
कोणी विषप्रयोग करतो, कोणी आपणावर आळ घालतो, कोणी गळफास लावतो,
**अवचिता सेर लागला। नेणो बिबवा चिडला। प्राणी धुरें जाजावला। या नांव आदिभूतिक ।।१८।।**
एकाएकी शेर लागणे, किंवा बिब्बा अंगावर उतणे, धुरात सापडून बेजार होणे,
**उंगळावरी पाय पडे। शिळेखालें हात सांपडें। धावतां आडखुळे पडे। या नांव**

(३) अंग्या - अंगाची आग करणारी एक वनस्पति. (४) विसीफ - इसब. (५) भोवर - भुंगा. (६) सामर - सांबर.

**आदिभूतिक ।।१९।।**

मोठ्या विंचवावर किंवा निखाऱ्यावर पाय पडणे, दगडाखाली हात अडकणे, पळत असताना अडखळून पडणे.

**वापी कूप सरोवर। गर्ता कडा नदीतीर। आवचितें पडे शरीर। या नांव आदिभूतिक ।।२०।।**

विहिर, आड, सरोवर, (गर्ता) खड्डा, यात पडणे, कड्यावरून कोसळणे, नदीकाठावर पडणे,

**दुर्गाखालें कोंसळती। झाडावरून पडती। तेणें दुःखें आक्रंदती। या नांव आदिभूतिक ।।२१।।**

किल्ल्यावरून कोसळणे, किंवा झाडावरून पडल्यामुळे होणाऱ्या वेदनेमुळे आक्रोश करणे.

**सीतें वोठ तरकती। हात पाव टांका फुटती। चिखल्या जिव्हाळ्या लागती। या नांव आदिभूतिक ।।२२।।**

थंडीने ओठ तडकणे, हातपाय, टाचा फुटणे, चिखल्या होणे, जिव्हाळ्या लागणे (नखे कापताना जिव्हाळी लागते) तर बोटांच्या सांधीत पाणी राहून चिखली होते. तेथील त्वचा कुजते.

**अशनपानाचिये वेळे। उष्ण रसें जिव्हा पोळे। दांत कस्करे[७] आणी हरळे[८]। या नांव आदिभूतिक ।।२३।।**

खाताना, पिताना, उष्ण रसाने जीभ पोळणे, दाताने जीभ चावली जाणे, (हरळे) (अन्नातील खडा लागून) दातात फटी पडणे.

**पराधेन बाळपणीं। कुशब्दमारजाचणी। अन्नवस्त्रेंवीण आळणी। या नांव आदिभूतिक ।।२४।।**

बाळपणी पराधीन जीवनात शिव्या, मार आणि जाच सहन करावा लागेणे, अन्न,वस्त्र देत नाहीत, आळणी खाऊ घालतात.

**सासुरवास गालोरे[९]। ठुणके[१०] लासणें[११] चिमोरे[१२]। आले रुदन न धरे। या नांव आदिभूतिक ।।२५।।**

मुलीला सासुरवास करताना गालगुच्चे घेणे, ठोसे मारणे, डाग देणे, चिमटे काढणे, त्यामुळे आलेले रडे न आवरता येणे

**चुकतां कान पिळिती। कां तो डोळा हिंग घालिती। सर्वकाळ धारकीं धरिती। या नांव आदिभूतिक ।।२६।।**

चूक झाली तर कान पिळतात, डोळ्यात हिंग घालतात, नेहमी धारेवर धरल्याप्रमाणे बोलतात, जाच करतात.

**नाना प्रकारीचे मार। दुर्जन मारिती अपार। दुरी अंतरे माहेर। या नांव आदिभूतिक ।।२७।।**

दुष्ट लोक नाना प्रकारे मारहाण करतात, माहेर दुरावते.

**कर्णनासिक विंधिलें। बळेंचि धरून गोंधिलें। खोडी जालिया पोळविलें। या नांव आदिभूतिक ।।२८।।**

कान, नाक यांना भोके पाडतात. सक्तीने गोंदतात, खोडीसाठी पोळवितात.

**परचक्रीं धरून नेलें। नीच यातीस दिधलें। दुर्दशा होऊन मेलें। या नांव आदिभूतिक ।।२९।।**

(७) कस्करे – करकरे. (८) हरळे – पडणे.

शत्रू पळवून नेतात, हलक्या जातीत नीचांकडे गुलाम म्हणून विकतात.

**नाना रोग उद्भवले। जे आध्यात्मिकीं बोलिलें। वैद्य पंचाक्षरी आणिले। या नांव आदिभूतिक ।।३०।।**

आध्यात्मिक तापांच्या संदर्भात अनेक रोग सांगितले आहेत त्यावर उतारा म्हणून वैद्य, पंचाक्षरी बोलावितात.

**नाना वेथेचें निर्शन। व्हावया औषध दारूण। बळात्कारें देती जाण। या नांव आदिभूतिक ।।३१।।**

रोग बरा करण्यासाठी ते भयंकर औषधे सक्तीने देतात. (औषधांपेक्षा रोग परवडला असे वाटते)

**नाना वल्लीचे रस। काडे गर्गोड कर्कश। घेता होये कासावीस। या नांव आदिभूतिक।।३२।।**

अनेक वनस्पतींचे रस, काढे तिखट चाटणे हे घेताना जीव कासाविस होतो.

**ढाळ आणि उखाळ[१३] देती। पथ्य कठीण सांगती। अनुपान चुकता विपत्ती। या नांव आदिभूतिक ।।३३।।**

जुलाब आणि (उखाळ) वांती होणारी औषधे देतात. कठीण पथ्य करावयास सांगतात. अनुपान करताना चूक झाली की आपत्तीच येते.

**फाड रक्त फांसणी। गुल्लडागांची[१४] जाचणी। तेणें दुःखें दुःखवें प्राणी। या नांव आदिभूतिक।।३४।।**

शरीर फाडून रक्त काढणे, (फासणी) गाठीवर तीक्ष्ण शस्त्राने चरे पाडणे, तापलेल्या सळीने शरीराला चोचवणे त्यामुळे दुःख होते.

**रुचिक[१५] बिबवे घालिती। नाना दुःखें दडपे देती। सिरा तोडिती जळा[१६] लाविती। या नांव आदिभूतिक ।।३५।।**

रूईचा चीक, बिब्बा घालणे अनेक प्रकारे धाक किंवा आघात होतात. शिरा तोडतात, जळवा लावतात. (जळवा शरीरातील रक्त शोषण करतात)

**बहु रोग बहु औषधें। सांगता अपारें अगाधें। प्राणी दुखवे तेणें खेदें। या नांव आदिभूतिक ।।३६।।**

रोग अनेक आणि औषधेही अनेक आहेत ती अमर्याद आहेत. त्यांच्या त्रासाने माणसाला दुःख होते.

**बोलविला पंचाक्षरी। धूरमार पीडा करी। नाना यातना चतुरी। आदिभूतिक जाणिजे।।३७।।**

पंचाक्षरी (मांत्रिक) बोलावला त्याने धुरात कोंडले, पीडा केली अशा प्रकारच्या यातनांना शहाण्यांनी आधिभौतिक ताप समजावे.

**दरवडे घालूनिया जना। तश्कर करिती यातना। तेणें दुःख होये मना। या नांव आदिभूतिक ।।३८।।**

दरवडे घालून चोरटे लोक लोकांना यातना देतात. त्यामुळे अमर्याद दुःख होते.

**अग्नीचेनि ज्वाळें पोळे। तेणें दुःखें प्राणी हरंबळे[१७]। हानी जालियां विवळे[१८]। या नांव आदिभूतिक ।।३९।।**

---

(९) गालोरे - गालगुच्वे. (१०) ठुणके - ठोसे. (११) लासणें - डाग देणे. (१२) चिमुरे - चिमटे. (१३) उखाळ - वांतीचे औषध.

अग्नित भाजल्यामुळे प्राणी तळमळतो किंवा नुकसानामुळे विव्हळतो.

**नाना मंदिरें सुंदरें। नाना रत्नांचीं भांडारें। दिव्यांबरें मनोहरें। दग्ध होती।।४०।।**

कितीतरी सुंदर घरे, रत्नांची भांडारगृहे, सुंदर उंची वस्त्रे जळून जातात.

**नाना धान्यें नाना पदार्थ। नाना पशु नाना स्वार्थ। नाना पात्रें नाना अर्थ। मनुष्यें भस्म होती।।४१।।**

नाना धान्ये, पदार्थ, पशू आणि अनेक संग्रह, भांडीकुंडी संपत्ती व माणसे जळून भस्म होतात.

**आग्न लागला सेती। धान्ये बणव्या[१९] आणी खडकुती[२०]। युक्षदंड[२१] जळोन जाती। अकस्मात।।४२।।**

पिकाला आग लागल्यामुळे धान्ये कडबा, (खडकुती) धान्य मळून राहिलेले कुटार, ऊस ही एकाएकी जळून जातात.

**ऐसा आग्न लागला। अथवा कोणी लाविला। हानी जाली कां पोळला। या नांव आदिभूतिक।।४३।।**

अशी आग (कोणीतरी दृष्टाव्याने) लावलेली असो वा आपोआप लागलेली असो त्यायोगे नुकसान होते अथवा प्राणी भाजतो.

**ऐसे सांगतां बहुत। होती वन्हीचे आघात। तेणें दुःखें दुःखवे वित्त। या नांव आदिभूतिक।।४४।।**

अशा प्रकारे आगी लागून होणारे अपघात खूपच आहेत त्यामुळे माणसाच्या मनाला फारच दुःख होते.

**हारपे विसरे आणी सांडे। नासे गाहाळे फुटे पडे। असाध्य होये कोणीकडे। या नांव आदिभूतिक।।४५।।**

वस्तू हरवते विसरते आणि सांडते, नासते, गहाळ होते, फुटते पडते व परत मिळणे अशक्य होते.

**प्राणी स्थानभ्रष्ट जालें। नाना पशूतें चुकले। कन्यापुत्र गाहाळले। या नांव आदिभूतिक।।४६।।**

प्राणी स्थानभ्रष्ट होतो (खुर्ची सोडावी लागते), गुरे ढोरे कोठेतरी चुकतात, कन्या पुत्र (पळवुन नेल्यामुळे अगर गर्दीत) बेपता होतात.

**तश्कर अथवा दावेदार। आवचितां करिती संव्हार। लुटिती घरें नेती खिल्लार। या नांव आदिभूतिक।।४७।।**

चोर किंवा वैरी अकस्मितपणे नाश करतात, घरे लुटतात, गाईगुरांचे कळप घेऊन पळवून नेतात.

**नाना धान्यें केळी कापिती। पानमळां मीठ घालिती। ऐसे नाना आघात करिती। या नांव आदिभूतिक।।४८।।**

नाना (धान्ये पिके), केळीच्या बागा कापतात, पानमळ्यात मीठ घालून झाडे करपवितात अशा प्रकारे नाना घात-आघात करतात.

**मैंद[२२] उचले खाणोरी[२३]। सुवर्णपंथी भुरेकरी[२४]। ठकु सिंतरु वरपेकरी[२५]। वरपा घालिती।।४९।।**

ठग, उचले, (दिसली वस्तू उचलून नेणारे), ठेवी उकरून नेणारे (पूर्वी जमिनीत द्रव्ये पुरून ठेवले जात

(१४) गुल्लडाग - चोचे. (१५) रूचिक - रूईचा चीक. (१६) जळा - जळवा. (१७) हरंबळे - तळमळे. (१८) विवळे - विव्हळ होतो. (१९) वणव्या - गवताच्या गंजी. (२०) खडकूत - धान्य मळून शेतात उरलेले कुटार.

असे त्या ठेवी), किमया करणारे (सोने नकळत लुबाडणारे) भूल घालणारे व फसविणारे, लुटारू लुटतात.

**गठीछोडे[२६] द्रव्य सोडिती। नाना आळंकार काढिती। नाना वस्तु मूषक नेती। या नांव आदिभूतिक ।।५०।।**

गाठोडी सोडून आतील द्रव्य नेतात, नाना सुवर्णालंकार काढून नेतात, अनेक वस्तू उंदीरसुद्धा नेतात.

**वीज पडे हिंव पडे। प्राणी प्रजंनीं सापडे। कां तो माहापुरीं बुडे। या नांव आदिभूतिक ।।५१।।**

वीज पडते थंडी कडाक्याची पडते, मनुष्य वावटळीत सापडतो किंवा महापुरात बुडतो.

**भोवरें वळणें आणी धार। वोसाणें लाटा अपार। वृश्चिक गोंबी आजगर। वाहोन जाती ।।५२।।**

पाण्याच्या भोवऱ्यात वळणात किंवा धारेत पुराच्या पाण्यातून वाहणाऱ्या वस्तू लाकडे, मोठ्या लाटा असतात. विंचू, गोमा, अजगरही वाहून येतात.

**तयामधें प्राणी सांपडला। खडकीं बेटीं आडकला। बुडत बुडत वांचला। या नांव आदिभूतिक ।।५३।।**

त्यात सापडणे, वहात असताना एखाद्या बेटावर किंवा खडकावर अडकणे व बुडता बुडता वाचणे या सर्वाला आधिभौतिक ताप असे म्हणतात.

**मनासारिखा नसे संसार। कुरूप कर्कश स्त्री क्रूर। विधवा कन्या मूर्ख पुत्र। या नांव आदिभूतिक ।।५४।।**

संसार मनासारखा नसणे, बायको कुरूप/भांडखोर वा क्रूर असणे, विधवा कन्या किंवा मूर्ख पुत्र पदरी येणे.

**भूत पिशाच्च लागले। आंगावरून वारे गेले। अबद्धमंत्रें प्राणी चळले। या नांव आदिभूतिक ।।५५।।**

भूत पिशाच्च यांची बाधा होणे, अर्धांग होणे, मंत्राचा जप चुकून वेड लागणे.

**ब्राह्मणसमंध शरीरीं। बहुसाल पीडा करी। शनेश्वराचा धोका धरी। या नांव आदिभूतिक ।।५६।।**

एखादा ब्राम्हण समंध शरीरात प्रवेश करून नेहमी पीडा करणे, शनीच्या साडेसातीची भीती वाटणे.

**नाना ग्रहे काळवार। काळतिथी घातचंद्र। काळवेळ घातनक्षत्र। या नांव आदिभूतिक।।५७।।**

राशीला अनेक विरूद्ध ग्रह, घातवार, घाततिथी, घातचंद्र, घातवेळ, घातनक्षत्र अशी स्थिती असणे.

**सिंक पिंगळा आणी पाली। वोखटें होला काक कलाली। चिंता काजळी लागली। या नांव आदिभूतिक ।।५८।।**

शिंक, पिंगळा, पाली, यांचे अपशकून, कावळा, होला यांची अपशकुनी कलकल ऐकू येणे आणि या घटनांमुळे मनामध्ये काळजीरूपी काळोख (उदासीनता) येणे.

**दिवटा[२७] सरवदा[२८] भाकून गेला[२९]। अंतरी धोका लागला। दुःस्वप्नें जाजावला। या नांव**

(२२) मैंद - फासेमार. (२३) खाणोरी - काळीज खाऊ. (२४) भुरेकरि - भुरळ पाडणारे. (२५) वरपेकरी - लुटा. (२६) गठी छोडे - भामटे.

**आदिभूतिक ।।५९।।**

दिवटी घेऊन मशालीच्या प्रकाशात भविष्य सांगणारा (दिवटा) किंवा एखादा सरवटा भविष्य सांगणारा, काही वाईट भविष्य सांगून जातो. त्यामुळे मनामध्ये धोक्याची भीती सतत राहणे, स्वप्नामध्शे काही वाईट आल्यामुळे दु:खी होणे.

**भालु भुंके श्वान रडे। पाली आंगावरी पडे। नाना चिन्हें चिंता पवाडे। या नांव आदिभूतिक ।।६०।।**

कोल्हे भुंकणे, कुत्र्याचे रडणे ऐकू येणे, अंगावर पाल पडणे, अशा अनेक दुश्चिन्हांमुळे मनात चिंता वाटणे.

**बाहेरी निघतां अपशकुन। नाना प्रकारे विछिन्न। तेणें गुणें भंगे मन। या नांव आदिभूतिक ।।६१।।**

घराबाहेर पडताना अपशकुन होणे, अनेक प्रकारे अडथळे येऊन मन अतिशय उद्विग्न होणे.

**प्राणी बंदी सांपडला। यातने वरपडा[३०] जाला। नाना दु:खें दु:खवला। या नांव आदिभूतिक ।।६२।।**

प्राणी बंदीमध्ये सापडून त्याला यातना सोसाव्या लागणे (वरपडा–पात्र होणे) त्यामुळे अनेक प्रकारे दु:खी होणे.

**प्राणी राजदंड पावत। जेरबंद चाबुक वेत। दरेमार[३१] तळवेमार होत। या नांव आदिभूतिक ।।६३।।**

राजाने शिक्षा देणे, घोड्याच्या काढण्या, चाबूक, छड्या यांचा मार मिळणे, तापत्या तव्यावर उभे करून मारणे,

**कोरडे पारंब्या फोक। बहुप्रकारें अनेक। बहुताडिती आदिभूतिक। या नांव बोलिजे ।।६४।।**

कोरडे, पारंब्या, झाडाचे फोक, यांनी अनेक प्रकारे सपाटून मार खाणे.

**मोघरीमार बुधलेमार। चौखुरून डंगारणेमार। बुक्या गचांड्या गुढघेमार। या नांव आदिभूतिक ।।६५।।**

अपानद्वारी मेखा मारणे (मोघरीमार), दारू भरलेल्या बुधल्यांशी बांधून त्या दारूला आग लावून मारणे (बुधलेमार), दोरानी चारी बाजूस ताणून बडग्याने मारणे, बुक्या, गचांड्या, गुडघ्यानी मारणे,

**लाता तपराखा सेणमार। कानखडे दगडमार। नाना प्रकारींचे मार। या नांव आदिभूतिक ।।६६।।**

लाथा, चपराका, शेणमार करणे, कानात खडे घालून मारणे, दगडाने मारणे असे मार सोसावे लागणे हा आतिभौतिक ताप.

**टांगणें टिपऱ्या पिछोडे। बेडी बुधनाल कोलदंडे। रक्षणनिग्रह चहूंकडें। या नांव आदिभूतिक ।।६७।।**

टांगून घालणे, चाप लावणे, हात मागे बांधून बेडी घालणे, बेडी घालणे, झाडाच्या बुध्यांशी नालाप्रमाणे बांधणे (बुधनाल), कोलदांडा घालणे, बंदीत ठेवून सतत पहारा ठेवणे,

(२७) दिवटा – खुडबुड जोशी. (२८) सरवदा – भविष्य सांगणारा. (२९) भाकून गेला – भविष्य सांगून गेला.

**नाकवणी[३२] चुनवणी। मीठवणी रायवणी[३३]। गुळवण्याची जाचणी। या नांव आदिभूतिक।।६८।।**
नाकात तीव्र तीक्ष्ण पदार्थ ओतणे, चुण्याचे पाणी, मिठाचे पाणी, मोहऱ्यांचे पाणी (रायवणी), गुळाचे पाणी इ. ओतुन छळ करणे.
**जळामध्यें बुचकुळिती। हस्तीपुढें बांधोन टाकिती। हाकिती छळिती यातायाती। या नांव आदिभूतिक ।।६९।।**
पाण्यात बुचकळवून मारणे, बांधून हत्तीच्या पुढ्यात टाकणे, गुराप्रमाणे हाकलून यातना देणे.
**कर्णछेद घ्राणछेद। हस्तछेद पादछेद। जिव्हाछेद अधरछेद। या नांव आदिभूतिक।।७०।।**
कान, नाक, हात, पाय, जीभ, ओठ यांचा छेद करणे.
**तीरमार सुळी देती। नेत्र वृषण काढिती। नखोनखीं सुया मारिती। या नांव आदिभूतिक।।७१।।**
अंगावर बाण मारणे, सुळावर चढविणे, डोळे किंवा वृषण काढणे, सर्व नखांमध्ये सुया घुसविणे.
**पारड्यामध्यें घालणें। कां कडेलोट करणें। कां भांड्यामुखें उडवणें। या नांव आदिभूतिक ।।७२।।**
पारड्यामध्ये घालून दररोज वजन कमी होईल असे हाल करणे, डोंगरावरून कडेलोट करणे, तोफेच्या तोंडी देणे.
**कानीं खुंट्या आदळिती। अपानीं मेखा मारिती। खाल[३४] काढून टाकिती। या नांव आदिभूतिक ।।७३।।**
कानामध्ये खुंट्या मारणे, गुदद्वारात मेखा मारणे, अंगाचे कातडे सोलून काढणे.
**भोत आणी बोटबोटी[३५]। अथवा गळ घालणे कंठीं। सांडस लावून आटाटी। या नांव आदिभूतिक ।।७४।।**
पोत्यात भरून मारणे, बोटे ठेचून टाकणे, गळ्याला गळ लावणे, तापलेल्या चिमट्याने वृषण किंवा स्तन दाबणे.
**सिसें पाजणें वीष देणें। अथवा सिरछेद करणें। कां पायातळीं घालणें। या नांव आदिभूतिक ।।७५।।**
उकळते शिसे पाजणे, जालीम विष घालणे, डोके उडविणे, अंगावर माणसे नाचवून मारणे.
**सरड मांजरे भरिती। अथवा फांशीं नेऊन देती। नानापरी पीडा करिती। या नांव आदिभूतिक ।।७६।।**
अंगावरील कपड्यात सरडे सोडणे, बंद खोलीत घालून अंगावर पिसाळलेले मांजर सोडणे, फाशी देणे किंवा अन्य प्रकारे छळ करणे,
**स्वानप्रळये व्याघ्रप्रळये। भूतप्रळये सुसरीप्रळये। शस्त्रप्रळये विझप्रळये। या नांव आदिभूतिक ।।७७।।**
कुत्री, वाघ, भुते, सुसरी, शस्त्रे, वीज यांच्या अतिरेकामुळे मरण येणे.

(३०) वरपडा - पात्र. (३१) दरेमार - दरीत लोटून देणे. (३२) नाकवणी - नाकात ओतण्याचे तीक्ष्ण पदार्थ. (३३) रायवणी - मोहऱ्यांचे पाणी.

**सीरा वोढून घेती। टेंभें लाऊन भाजिती। ऐशा नाना विपत्ती। या नांव आदिभूतिक।।७८।।**
शिरा काढून घेणे, मशाली अंगाला लावून भाजणे, अशा प्रकारचे हाल करणे.
**मनुष्यहानी वित्तहानी। वैभवहानी महत्त्वहानी। पशुहानी पदार्थहानी। या नांव आदिभूतिक।।७९।।**
मनुष्य द्रव्य, वैभव, महत्व, पशु, पदार्थ यांची हानी होणे याचे नाव आधिभौतिक.
**बाळपणीं मरे माता। तारुण्यपणीं मरे कांता। वृद्धपणी मृत्य सुता। या नांव आदिभूतिक।।८०।।**
बालपणी माता, तरूणपणी पत्नी व म्हातारपणी मुलाचा अंत होणे.
**दुःख दारिद्र आणी रुण। विदेशपळणी नागवण। आपदा अनुपत्ति कदान्न। या नांव आदिभूतिक।।८१।।**
दुःख, गरिबी, आणि कर्ज असणे, परदेशी पलायन करण्याचा प्रसंग येणे, सर्वतोपरी फसवणूक होऊन नागवला जाणे. हाल व दरीद्रता भोगणे, वाईट अन्न खाणे भाग पडणे.
**आकांत वाखाप्रळये। युद्ध होतां पराजये। जिवलगांचा होये क्षये। या नांव आदिभूतिक।।८२।।**
संकटामुळे आकांत होणे, महामारीचा प्रलय होणे, युद्धात दारूण पराभव होणे, जिवलगांचा मृत्यू होणे.
**कठीण काळ आणी दुष्काळ। साशंक आणी वोखटी वेळ। उद्वेग चिंतेचे हळाळ। या नांव आदिभूतिक।।८३।।**
आधिच कठीण काळ तशात दुष्काळ येणे, मनात भयाने धाकधुक वाटत असता त्यात वाईट वेळ येणे, उदासिनता उत्पन्न होणे, काळजीने जीवाचे हाल होणे, मनाला हळहळ लागणे,
**घाणा चरखीं सिरकला। चाकाखालें सांपडला। नाना वन्हींत पडिला। या नांव आदिभूतिक।।८४।।**
तेलाच्या घाण्याम किंवा उसाच्या चरकात सापडणे, चाकाखाली चेंगरणे, किंवा आगीत सापडणे.
**नाना शस्त्रें भेदिला। नाना स्वापदीं भक्षिला। नाना बंदीं पडिला। या नांव आदिभूतिक।।८५।।**
अनेक प्रकारच्या शस्त्रांनी तोडणे, नाना श्वापदांनी लचके तोडणे, नाना बंदीमध्ये पडणे.
**नाना कुवासें निर्बुजे। नाना अपमानें लाजे। नाना शोके प्राणी झिजे। या नांव आदिभूतिक।।८६।।**
अनेक प्रकारच्या दुर्गंधीने कोंडमारा होणे, अनेक प्रकारच्या अपमानाने लाज वाटणे, अनेक प्रकारच्या दुःखांनी झिजून-पिचून जाणे हे सर्व आधिभौतिक भोग आहेत.
**ऐसें सांगता अपार। आहेत दुःखाचे डोंगर। श्रोतीं जाणावा विचार। आदिभूतिकाचा।।८७।।**
असे ताप सांगता ते अमर्याद आहेत ते जणू दुःखाचे डोंगर आहेत. श्रोत्यांनी आधिभौतिकाचा विचार एवढ्यावरून समजावा.

इति श्रीदासबोधे गुरूशिष्यसंवादे आदिभूतिकतापनिरूपणनाम समास सप्तम।।७।।

(३४) खाल - शरीराचे कातडे. (३५) बोट-बोटी - टोचून मारणे.

# द. ३ स. ८ : आधिदैविक ताप

मानवी जीवनात अनेक अनादि समस्या आहेत. त्यापैकी एक अशी की ''हे जग कर्मभूमी आहे. जसे करावे तसे त्याचे फळ भोगावे, हा येथील नियम आहे. पण प्रत्यक्ष जीवनात काय आढळते? शरीरशक्तीच्या किंवा द्रव्यशक्तीच्या जोरावर माणूस धडधडीत अनीतीने व अन्यायाने स्वार्थ साधतो. त्याच्या वाईट कर्माचे फळ त्याला येथे मिळत नाही. हे असे का?'' या प्रश्नाचे उत्तर असे की, मनुष्य जे जे कर्म येथे करतो, ते कधीही वाया जात नाही. केव्हातरी, कोठेतरी त्या जीवाला त्याचे फळ मिळालेच पाहिजे. जर या जन्मात ते मिळाले नाही, तर मृत्यूनंतरच्या अवस्थेमध्ये ते मिळते खास. हा फळभोग अतींद्रिय असल्यामुळे श्री समर्थ असे विनवितात की, मृत्यूनंतरच्या अवस्थांची शास्त्रांमधील वर्णने काल्पनिक मानू नयेत. मृत्यूच्या पलीकडे काहीतरी व्यवस्था आहे आणि तेथे या जगामध्ये केलेल्या कर्माचा जाब द्यावा लागतो, हेसुद्धा अगदी खरे आहे. शास्त्रामध्ये त्याला यमयातना असे म्हणतात. ज्याला परमार्थ हवा त्याने या जगातील आपल्या जीवनात सत्कर्मांनाच वाहून घेतले पाहिजे, हे सांगायला हवे?

॥ श्रीराम॥

**मागां बोलिला आध्यात्मिक। त्याउपरीं आदिभूतिक। आतां बोलिजेल आदिदैविक। तो सावध ऐका॥१॥**

मागच्या समासांमध्ये प्रथम आध्यात्मिक नंतर आधिभौतिक असे दोन ताप सांगितले. आता तिसऱ्या आधिदैविक तापाची लक्षणे सांगतो ती श्रोत्यांनी सावधपणे ऐकावी.

**श्लोक॥ शुभाशुभेन कर्मणा देहांते यमयातना। स्वर्गनरकादिभोक्तव्यमिदं चैवाधिदैविकम्॥१॥**

आपल्या बऱ्या वाईट कर्माप्रमाणे आपण मेल्यावर ज्या यमयातना किंवा स्वर्गनरक भोग भोगावे लागतात त्यांना आधिदैविक ताप असे म्हणतात.

**शुभाशुभ कर्मानें जना। देहांती येमयातना। स्वर्ग नर्क भोग नाना। या नांव आदिदैविक॥२॥**

प्राण्यांना आपापल्या शुभ किंवा अशुभ कर्मामुळे देहपातानंतर स्वर्ग किंवा नरकभोग भोगावे लागतात. त्याचे नांव आधिदैविक ताप असे आहे.

**नाना दोष नाना पातकें। मदांधपणें अविवेकें। केलीं, परी तें दुःखदायकें। येमयातना भोगविती॥३॥**

प्राणी उन्मत होऊन अविचाराने अनेक पातके (धर्मबाह्य नीतीबाह्य आचरण) करतो. परिणामस्वरूपाने ती दुःखदायक होऊन यमयातना भोगावयास लावतात.

**आंगबळे द्रव्यबळें। मनुष्यबळें राजबळें। नाना सामर्थ्याचेनि बळें। अकृत्य करिती॥४॥**

अंगातल्या मस्तीने, द्रव्याच्या बळावर, मनुष्यांच्या बळावर, राजसत्तेच्या बळावर (किंवा धुंदीत) अशा अनेक सामर्थ्यांमुळे प्राणी वाईट कृत्ये करतात.

**नीती सांडूनियां तत्त्वतां। करूं नये तेंचि करितां। येमयातना भोगितां। जीव जाये।।५।।**
खरे तर नीती सोडू नये पण ती सोडून देऊन माणूस जे करू नये तेच करतो त्यामुळे मरणतुल्य यातना त्याला भोगाव्या लागतात.

**डोळे झांकून स्वार्थबुद्धीं। नाना अभिळाश कुबुद्धीं। वृत्ति भूमिसिमा सांधी। द्रव्य दारा पदार्थ।।६।।**
स्वार्थी दृष्टी ठेवून डोळे झाकून, अनेक प्रकारचे अभिलाष आणि दुष्ट बुद्धी धरून दुसऱ्याची परंपरागत जमीन, शेताची हद्द गिळंकृत करतात, द्रव्य, दारा आणि पदार्थ यांचे हरण करतात.

**मातलेपणें उन्मत्त। जीवघात कुटुंबघात। अप्रमाण क्रिया करीत। ह्मणौन येमयातना।।७।।**
मस्तीभरात कोणाचा जीव घेणे, कुटुंबघात करणे, अमर्याद कुकर्मे करणे याबद्दल यमयातना योजल्या गेल्या आहेत.

**मर्यादा सांडूनि चालती। ग्रामा दंडी ग्रामाधिपती। देशा दंडी देशाधिपती। नीतिन्याय सांडितां।।८।।**
मर्यादेचे उल्लंघन करून एखादे गाव वागू लागल्यास त्यास गावाचा प्रमुख अधिकारी शिक्षा करतो, देशातील लोक अन्यायाने वागू लागल्यास देशाधिपती शासन करतो.

**देशाधिपतीस दंडिता रावो। रायास दंडिता देवो। राजा न करिता नीति न्यावो। ह्मणौन येमयातना।।९।।**
देशाधिकाऱ्याला राजा शिक्षा करतो, राजा जर नीतीन्यायाने वागला नाही तर त्याला देव शिक्षा देतो. म्हणून यमयातना ठेवल्या आहेत.

**अनीतीनें स्वार्थ पाहे। राजा पापी होऊन राहे। राज्याअंती नर्क आहे। ह्मणौनियां।।१०।।**
राजा अन्यायाने वागून स्वार्थी झाला तर तो पातकी ठरतो म्हणून राज्य करणे संपल्यावर त्याला नरकयातना भोगाव्या लागतात.

**राजा सांडितां राजनीति। तयास येम गांजिती। येम नीति सांडितां धावती। देवगण।।११।।**
राजाने राजनीती सोडली तर त्याला यम शासन करतो आणि यमानेही नीती सोडली तर देवगण धावत येतात आणि त्याला शिक्षा करतात.

**ऐसी मर्यादा लाविली देवें। ह्मणौनि नीतीनें वर्तावें। नीति न्याय सांडितां भोगावें। येमयातनेसी।।१२।।**
ईश्वराने अशी मर्यादा घालून दिली आहे म्हणून सर्वांनी नीतीने वागावे. नीतीन्याय झुगारून दिल्यास यमयातना भोगाव्या लागतात.

**देवें प्रेरिले येम। ह्मणौनि आदिदैविक नाम। तृतीय ताप दुर्गम। येमयातनेचा।।१३।।**
देवाने यमाला प्रेरणा देऊन जिवाला हे भोग भोगावयास लावले असल्याने त्यांना आधिदैविक म्हणतात. यमयातनेचा ताप सोसण्यास फार कठीण असतो.

**येमदंड येमयातना। शास्त्रीं बोलिलें प्रकार नाना। तो भोग कदापि चुकेना। या नांव**

**आदिदैविक ।।१४।।**
शास्त्रामध्ये यमदंडाचे व यातनेचे अनेक प्रकार सांगितले आहेत. तो भोग कधीच चुकत नाही. त्याला आधिदैविक म्हणतात.

**येमयातनेचे खेद। शास्त्रीं बोलिले विशद। शेरीरीं घालून, अप्रमाद। नाना प्रकारें ।।१५।।**
यमयातनेची दु:खे शास्त्रामध्ये विशद केली आहेत. मनुष्याच्या पाप-पुण्यात्मक सूक्ष्म शरीरांमध्ये अनेक गैरसावधपणाचे दोष साठविलेले असतात. (मनुष्य स्थूल देहाने जी दुष्कर्मे करतो ती पापे त्याच्या सूक्ष्म देहात साठविली जातात. त्यानुसार त्याला यातना भोगाव्या लागतात.)

**पापपुण्याचीं शरीरें। स्वर्गी असती कळीवरें[1]। त्यांत घालून नाना प्रकारें। पापपुण्य भोगविती ।।१६।।**
पाप किंवा पुण्य यांची फळे (पापाचे यमलोकात व पुण्याचे स्वर्गलोकात) भोगण्यासाठी तेथे स्थूळ देह असतात. त्यात जिवाच्या सूक्ष्म देहास घालून पाप/पुण्य भोगविले जाते.

**नाना पुण्यें नाना विलास। नाना दोषें नाना यातना कर्कश। शास्त्रीं बोलिलें, अविश्वास। मानूंच नये ।।१७।।**
अनेक पुण्यकर्मे केली असतील तर अनेक विलास आणि दोष केले असतील तर भयंकर यातना भोगणे प्राप्त होते असे शास्त्रात सांगीतले आहे. त्यावर अविश्वास करू नये.

**वेदाज्ञेनें न चालती। हरिभक्ती न करिती। त्यास येमयातना करिती। या नांव आदिदैविक ।।१८।।**
वेदांच्या आज्ञेप्रमाणे जे वागत नाहीत, ईश्वरभक्ती करीत नाहीत त्यांना यमयातना केली जाते.याला आधिदैविक असे म्हणतात.

**अक्षोभ[2] नर्की उदंड जीव। जुनाट किडे करिती रवरव। बांधोन टाकिती हातपाव। या नांव आदिदैविक ।।१९।।**
अक्षोभ नामक नरकात जेथे जुनाट किडे वळवळत असतात, तेथे हातपाय बांधून असंख्य पापी जीवांना फेकले जाते.

**उदंड पैस लाहान मुख। कुंभाकार कुंड येक। दुर्गंधी उकाडा कुंभपाक। या नांव आदिदैविक ।।२०।।**
अत्यंत लहान तोंड असलेल्या पण ज्यात खूप जागा आहे अशा (कुभांकार) घागरीच्या आकाराच्या कुंडात भयंकर उकाडा व दुर्गंधी असते या कुंडाला कुंभपाक म्हणतात.

**तप्तभूमिका ताविती। जळत स्थंभ पोटाळविती। नाना सांडस[3] लाविती। या नांव आदिदैविक ।।२१।।**
तापलेल्या जमीनीवर लोळवितात, जळत्या खांबाला मिठी मारावयास लावतात, अनेक चिमटे किंवा सांडस अंगाला लावतात.

**येमदंडाचे उदंड मार। यातनेची सामग्री अपार। भोग भोगिती पापी नर। या नांव आदिदैविक ।।२२।।**

(१) कळीवरें - देह.

यमाचे शासन करण्याचे पुष्कळ प्रकार आहेत. यातना देण्याची सामग्रीही अमर्याद आहे पापी लोकांना यमयातनेचे भोग भोगावे लागतात.

**पृथ्वीमध्यें मार नाना। त्याहून कठीण येमयातना। मरितां उसंतचि[४] असेना। या नांव आदिदैविक ।।२३।।**

पृथ्वीवर नाना प्रकारचे मार आहेत पण त्याहून यमाचा मार फार भयंकर. त्याला मारताना यमदूतांना फुरसतच नसते.

**चौघे चौंकडे वोढिती। येक ते झोंकून पाडिती। ताणिती मारिता वोढूनि नेती। या नांव आदिदैविक ।।२४।।**

चौघे चार बाजूला खेचून धरतात, कोणी (झोकून) हिसका देऊन पाडतात, ताणतात किंवा फरफटत नेतात.

**उठवेना बसवेना। रडवेना पडवेना। यातनेवरी यातना। या नांव आदिदैविक ।।२५।।**

जेथे उठवत नाही, बसवत नाही रडवत नाही, पडवत नाही. एकामागून एक यातना देणे चालू असते.

**आक्रंदे रडे आणि फुंजे। धकाधकीनें निर्बुजे। झुर्झुरों पंजर होऊन झिजे। या नांव आदिदैविक ।।२६।।**

जीव तेथे आक्रंदन करतो, गहिवरतो, फुसफुस करतो, तेथील धक्काधक्कीने घाबरतो, झुरणीला लागतो, हाडांचा सापळा उरतो तरीही झिजणे सुरू रहाते.

**कर्कश वचनें कर्कश मार। यातनेचे नाना प्रकार। त्रास पावती दोषी नर। या नांव आदिदैविक ।।२७।।**

कर्कश आवाजात ओरडून कठोर (निर्दयपणे) मार देतात. पापी लोकांना भोगविण्यासाठी यातनांचे नाना प्रकार आहेत. त्यांचा फार त्रास होतो.

**मागां बोलिलां राजदंड। त्याहून यमदंड उदंड। तेथील यातना प्रचंड। भीमरूप दारुण ।।२८।।**

यापूर्वी राजा जी शिक्षा करतो त्याबद्दल सांगितले आहे. पण यमाच्या शिक्षा त्याहून उदंड आहेत. भयंकर व फार आक्राळविक्राळ आहेत.

**आध्यात्मिक आदिभूतिक। त्याहूनि विशेष आदिदैविक। अल्प संकेतें कांहींयेक। कळावया बोलिलें ।।२९।।**

आध्यात्मिक, आधिभौतिक आणि त्याहून खडतर असा आधिदैविक ताप आहे. ते तीनही ताप समजण्यासाठी थोड्या लक्षणांसहीत श्रोत्यांना सांगितले.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आधिदैविकतापनाम समास अष्टम ।।८।।

# दासबोध परिचय : प्रश्नपत्रिका ७ वी

(२) अक्षोभ – एका नरकाचे नाव. (३) सांडस – चिमटा. (४) उसंतचि – विसावा.

(दासबोध द. ३ मधील स. ६, ७ आणि ८ यांवर आधारित)

प्र. १ त्रिविध तापांची नावे सांगून त्यांच्या व्याख्या सांगणाऱ्या ओव्या लिहा.

प्र. २ पुढील तक्ता पूर्ण करा. १ ले विधान नमुन्यादाखल दिले आहे.

| अनुक्रमांक | विधान | तापाचा प्रकार | ओवी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | आजोबांचा चष्मा हरवला. | आधिभौतिक | ३-७-४५ |
| २ | उसाच्या मळ्याला दावेदाराने आग लावली. | | |
| ३ | यात्रेकरूचे धन ठगाने लुबाडले. | | |
| ४ | ऐन उमेदीमध्ये माधवराव पेशवे क्षयाने आजारी झाले. | | |
| ५ | स्वा. सावरकर यांना तुरुंगयातना सोसाव्या लागल्या. | | |
| ६ | वार्धक्यामध्ये प्रत्येकाला हा ताप होतो. | | |
| ७ | जन्मत: आंधळेपण नशिबी येणे. | | |

प्र. ३ समर्थांच्या काळातील राजकीय छळ, अपघात आणि सासुरवास निदर्शक प्रत्येकी एकेक ओवी लिहा.

प्र. ४ संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा.

''ऐसी मर्यादा लाविली देवें। म्हणौनि नीतीने वर्तावें।''

प्र. ५ गेल्या दहा वर्षात आपणास उद्वेग आणणाऱ्या एखाद्या तापाचा स्वानुभव असल्यास थोडक्यात लिहा.

(वि.सू. : 'ताप' या शब्दाचा अर्थ या समासाच्या अनुरोधाने घ्यावा. ऋर्शीशी ह्या अर्थी नव्हे.)

## स्वाध्याय ८ वा (दशक ४ स. ४, ५ व ६ वर आधारित)

**स्वाध्याय सारांश :** यामध्ये नवविधाभक्तीमधील पादसेवन, अर्चन आणि वंदनभक्ती यांच्या लक्षणांचा अभ्यास करावयाचा आहे. दासबोधाचा आपला अभ्यास केवळ रूक्ष होता कामा नये. तो भक्तीरसामध्ये रंगलेला असावा भावनेची आर्द्रता त्यात यावी यादृष्टीने हे समास अभ्यासिले जावेत. 'कोणत्याही देवाची आराधना केली तरी ती विश्वचालकशक्तीला पोहोचते' हा गीतेमधील उदार विचारही येथे आला आहे.

## द. ४ स. ४ : पादसेवन-भक्ती

ज्याच्या निकट संगतीमध्यें आपण राहतो त्याच्या देहाचा व मनाचा परिणाम आपल्या देहावर व मनावर घडतो असा जीवनाचा नियम आहे. उदा. नवऱ्याला मधुमेह असेल तर बायकोला मधुमेह जडतो. नवऱ्याला नाटकाची आवड असेल तर बायकोला हळूहळू नाटके आवडू लागतात. भक्तीच्या बाबतीत हा नियम शंभर टक्के लागू पडतो. ज्याला भक्ती हवी त्याने भक्ताची किंवा संताची संगत

धरावी. विवाहित कुलीन स्त्री जसा आपल्या पतीवर मनापासून आपलेपणा ठेवते तसा एखाद्या संतावर अत्यंत आपलेपणा ठेवणे म्हणजे त्याला सद्गुरू मानणे होय. संत ओळखावा कसा? ज्याचा आचार, विचार, उच्चार भगवंताच्या प्रेमाने भरून वाहातो तो संत होय. जागेपणी व झोपेत, सुखात व दुःखात, संपत्तीत व आपत्तीत, एकांतात व लोकांतात जो भगवंतापासून वेगळा राहातच नाही तो संत होय. एकीकडे भगवंताच्या दिव्य आनंदामध्ये डुंबत असलेला आणि दुसरीकडे प्राणीमात्राचा, विशेषतः मानवतेचा, असीम कळवळा असलेला तो संत होय. अमूर्त परमात्मस्वरूपाची अखंड धारणा+मानवतेचा, परमावधीचा विकास = श्रीसद्गुरू. अशा सद्गुरूपाशी निर्लेप आपलेपणा ठेवावा. देह त्याच्या सेवेत गुंतवावा, आणि मन त्याच्याकडून येणाऱ्या सूचना ग्रहण करण्यास निरंतर तयार ठेवावे. या तीन गोष्टी एकत्र आल्या की पादसेवन-भक्ती घडते. पण जगाच्या व्यवहारात ही भक्ती साधणे मोठे कठीण असते. आधी खरा संत भेटणें कठीण. तो भेटला तर आपल्या मनाला पटून त्याच्यावर निष्ठा स्थिर होणे त्याहून कठिण. आणि संत भेटून त्याच्यावर निष्ठा बसली तरी ती अखेरपर्यंत निभावणे सर्वात कठिण असते. परंतु पादसेवनभक्ती भाग्याने ज्याला साधली त्याची अवस्था हां हां म्हणता पालटते व तो तयार होऊन जातो. श्रीसद्गुरूवर चिकाटीने श्रद्धा ठेवून राहणे ही एक मनाची मोठी शक्तीच आहे.

**।।श्रीराम ।।**

**मागां जालें निरूपण। नामस्मरणाचें लक्षण। आतां ऐका पादसेवन। चौथी भक्ती।।१।।**
मागे नामस्मरण भक्तीचे निरूपण झाले आहे. आता पाद सेवनभक्ती ही कशी भक्ती आहे ते ऐकावे.
**पादसेवन तेंचि जाणावें। कायावाचामनोभावें। सद्गुरूचे पाय सेवावे। सद्गतिकारणें।।२।।**
सद्गतीसाठी सद्गुरूचरणी अनन्यभाव ठेवणे याचे नाव पादसेवन.
**या नांव पादसेवन। सद्गुरुपदीं अनन्यपण। निरसावया जन्ममरण। यातायाती।।३।।**
कायावाचामनेकरून सद्गुरूचे चरण सेवावे, पूर्णपणे आपलेपणाने व आदरपूर्वक वागून ज्ञानग्रहण करावे. जन्ममरणाची यातायात त्यामुळे चुकते.
**सद्गुरुकृपेविण कांहीं। भवतरणोपाव तों नाहीं। याकारणें लवलाहीं। सद्गुरुपाय सेवावे।।४।।**
संसारातुन तरून जाण्यासाठी सद्गुरूच्या कृपेशिवाय दुसरा उपाय नाही यासाठी तत्काळ सद्गुरूच्या चरणी लीन होणे आवश्यक आहे.सद्गुरूची सेवा म्हणजे त्यांनी सांगितलेल्या मार्गाने निष्ठापूर्वक जाऊन आपले जीवन ईश्वरकृपेला प्राप्त करणे होय.
**सद्वस्तु[१] दाखवी सद्गुरु। सकळ सारासारविचारु। परब्रह्माचा निर्धारु। अंतरीं बाणे।।५।।**
सद्गुरू सद्वस्तू (परब्रह्म) दाखवितात (वास्तविक परब्रह्म ही काही वस्तू नव्हे पण त्याचा उल्लेख अध्यात्मशास्त्रात वस्तू किंवा सद्वस्तू असाच केला जातो) नंतर सृष्टीमध्ये शाश्वत काय आणि अश्वाश्वत काय हे सांगतात. ब्रह्मस्वरूप हेच अंतिम सत्य असल्याचे शिष्याच्या अंतरंगामध्ये बाणवितात.

**जे वस्तु दृष्टीस दिसेना। आणी मनास तेही भासेना। संगत्यागेंविण[२] येना। अनुभवासी ।।६।।**
परमात्मवस्तू डोळ्यांना दिसत नाही मनाचेही आकलन होत नाही. संगत्यागाशिवाय ब्रह्माचा अनुभव येत नाही. (संगत्याग म्हणजे दृष्य जगताच्या बंधनातून मोकळे करून ते भगवंताखेरीज अन्य कोणत्याही वस्तूला न चिकटू देणे.)

**अनुभव घेतां संगत्याग नसे। संगत्यागें अनुभव न दिसे। हें अनुभवी यासीच भासे। येरा गथागोवी[३]।।७।।**
अनुभव घेण्याची जाणीव जोपर्यंत असते तो पर्यंत संगत्याग झालेलाच नसतो. संगत्यागाच्या अवस्थेत त्रिपुटी नष्ट होते त्यामुळे 'मी' हा ज्ञाताच शिल्लक राहीलेला नसतो. आत्मप्रत्यय घेतला असेल त्यानाच याचा अर्थ समजेल इतरांना हा सगळा शब्दांचा गोंधळच वाटेल.

**संगत्याग आणी निवेदन। विदेहस्थिती अलिप्तपण। सहजस्थिती उन्मनी विज्ञान। हे सप्तहि येकरुप ।।८।।**
संगत्याग, निवेदन (स्वत:च्या अहंभावाचे विसर्जन ईश्वरचरणी करणे) विदेहस्थिती (मी देह नाही ही अवस्था किंवा देहबंधनशून्य अवस्था प्राप्त करणे), अलिप्तपण (दृष्य अश्वाश्वत आहे हे जाणून त्यातून बाहेर पडणे), सहजस्थिती (सुख किंवा दु:ख यांना सहजपणे स्वीकारण्याची वृत्ती), उन्मनी (मनाचा मनपणाच नष्ट होणे ही तूर्यावस्थेपलिकडील अवस्था आहे.) आणि विज्ञान (परमात्मस्वरूपाचे अनुभवसिद्ध ज्ञान) ही सातही नावे एकाच अवस्थेची आहेत.

**याहिवेगळीं नामाभिधानें। समाधानाची संकेतवचनें। सकळ कांहीं पादसेवनें। उमजों लागे ।।९।।**
याशिवाय समाधीसुधाची आणखीही नावे आहेत. ती स्वरूपस्थितीची संकेतचिन्हे आहेत. हे सर्व काही सद्गुरूच्या चरणी लीन झाल्याने समजते.

**वेद वेदगर्भ वेदांत। सिद्ध सिद्धभावगर्भ सिद्धांत। अनुभव अनुर्वाच्य धादांत। सत्य वस्तु ।।१०।।**
वेदांचा अर्थ, वेदाचा अभिप्राय, उपनिषदे (वेदान्त), सिद्भाव, सिद्धलक्षणांचा अभिप्राय, अनुभव (रहस्य), शब्दात व्यक्त न करता येणारे अनुभव, प्रत्यक्ष असले तरी भ्रमासारखे अनुभव (स्वानुभव) ही सुद्धा सद्वस्तू ओळखण्याची अन्य चिन्हे आहेत.

**बहुधा अनुभवाचीं आंगें। सकळ कळती संतसंगें। चौथे भक्तीचे प्रसंगें। गोप्य तें प्रगटे।।११।।**
अनुभवप्राप्तीची ही अंगे संतसंगतीत कळतात. चौथ्या भक्तीच्या (पादसेवनाच्या) योगाने गुप्त रहस्य असते ते कळू लागते.

**प्रगट वसोनि नसे। गोप्य असोनि भासे। भासाअभासाहून अनारिसे। गुरुगम्य मार्ग।।१२।।**
परब्रह्मवस्तू प्रगट असली तरी नसल्यासारखी आहे, ती गुप्त असूनही मनाला भासमान होते परंतु भास किंवा आभास याहून ती स्वतंत्र आहे. ती ज्ञानकक्षेत येण्यासाठी 'मीपण' टाकून तिला कसे पहावे हे सद्गुरूच्या पादसेवनाने कळते.

(१) सद्वस्तु - ब्रह्म. (२) संगत्याग - अहंकार, अभिमान व देहबुद्धी, त्याग. (३) गंथागोवी - गोंधळ.

**मार्ग होये परी अंतरिक्ष। जेथें सर्वही पूर्वपक्ष। पाहों जातां अलक्ष। लक्षवेना।।१३।।**

हा मार्ग अंतर्मुख होऊन आत शिरण्याचा आहे. दिसते ते सर्व मायेच्या राज्यातील आहे. मीपणा शिल्लक ठेवून वस्तूला पहाता येत नाही. साधने शास्त्रे पूर्वपक्षात येतात. साक्षी होऊन वस्तूला पहाता येत नाही.

**लक्षें जयासी लक्षावें। ध्यानें जयासी ध्यावें। तें गे तेंचि आपण व्हावें। त्रिविधा प्रचिती[४] ।।१४।।**

पाहणाऱ्यांनी ज्या लक्ष्याकडे पहावयाचे ते लक्ष्यच पाहणाऱ्याने स्वत: व्हावे ध्यानामध्ये ज्या वस्तूंचे ध्यान करावे ती वस्तूच आपण स्वत: व्हावे आणि त्रिविधाप्रचितीचा (म्हणजे गुरू, शास्त्र व आत्मप्रचिती यांचा मेळ घालावा. ''ते गे तेची आपण व्हावे'') असा याचा खोल भावार्थ आहे.

**असो हीं अनुभवाचीं द्वारें। कळती सारासारविचारें। सत्संगेकरून सत्योत्तरें। प्रत्ययासि येतीं ।।१५।।**

ही स्वानुभवाची द्वारे संत संगतीच्या योगाने, सार–असार यांच्या विचाराने प्रत्ययाला येतात.

**सत्य पाहातां नाहीं असत्य। असत्य पाहातां नाही सत्य। सत्याअसत्याचें कृत्य। पाहाणारापासीं ।।१६।।**

अंतीम सत्य म्हणजे ब्रह्म ते पाहू गेले तर असत्य म्हणजे माया ही नाहीशी होते. (मिथ्या किंवा) असत्य असलेले दृष्य पाहू गेले तर ब्रह्मप्राप्ती होत नाही. म्हणून परब्रह्म अनुभवावे की माया अनुभवावी हे कृत्य पाहणाऱ्यावरच अवलंबुन आहे.

**पाहाणार पाहाणें जया लागलें। तें तद्रूपत्वें प्राप्त जालें। तरी मग जाणावें बाणलें। समाधान ।।१७।।**

ज्या कोणाला परमात्मवस्तू पहावयाची आहे तो त्या वस्तूशी एकरूप किंवा अभिन्न झाला तरच ती वस्तू (म्ह.परब्रह्म) त्याला अनुभवाला येईल. तद्रुपतेनेच समाधान मिळते हे समजून असावे (दृष्य) द्रष्टा व दर्शन ही त्रिपुटी संपुष्टात आली पाहिजे).

**नाना समाधानें पाहातां। बाणती सद्‌गुरुकरितां। सद्‌गुरुविण सर्वथा। सन्मार्ग नसे।।१८।।**

नाना प्रकारची साधने सद्‌गुरूपाशीच आहेत. सद्‌गुरूकृपेने ती सफल होतात. सद्‌गुरूवाचून सन्मार्ग लाभत नाही.

**प्रयोग साधनें सायास। नाना साक्षेपें विद्याअभ्यास। अभ्यासें कांही गुरुगम्यास। पाविजेत नाहीं ।।१९।।**

गुरूकृपेमुळे जे प्राप्त होते ते विविध प्रयोग, साधनांचे सायास, प्रयत्नपूर्वक विद्येचा अभ्यास यातून प्राप्त होत नाही. व्यवहारामध्ये वरील साधने चांगीलीच आहेत. पण गुरूच्या सत्संगात राहून जे प्राप्त होते त्याच्याशी तुलना करताच येणार नाही.

**जें अभ्यासें अभ्यासितां न ये। जें साधनें असाध्य होये। तें हें सद्‌गुरुविण काये। उमजों जाणे ।।२०।।**

(४) त्रिविधा प्रचिती – शास्त्र, गुरू आणि आत्मप्रचिती.

परमात्म वस्तू अभ्यासाने प्राप्त होत नाही, साधना करून असाध्य राहते हे सत्यही सद्गुरूशिवाय कळत नाही (अभ्यास करण्यासाठी अहंभावाची जरूरी असते पण तो सुटल्याविना तर परब्रह्म असाध्य आहे. साधना करून त्याची प्राप्ती करावी म्हटले तर साधन करणारा अल्प, त्याचा साधनकाळ व शक्ती अल्प आणि जे प्राप्तव्य ते अमर्याद, अनंत, अपार आहे. बेडूक कितीही फुगला तरी बैल होऊ शकणार नाही अशी म्हण आहे! म्हणून सद्गुरूच्या सेवेतच सर्व आकलन होते)

**याकारणें ज्ञानमार्ग–। कळाया, धरावा सत्संग। सत्संगेंविण प्रसंग। बोलोंचि नये।।२१।।**

म्हणून ज्ञानमार्ग समजण्यासाठी सत्संग धरणे आवश्यक आहे. त्याविना आत्मज्ञानाची गोष्टच अशक्य. साक्षात्काराचे नावच नको!

**सेवावे सद्गुरुचे चरण। या नांव पादसेवन। चौथे भक्तीचें लक्षण। तें हें निरोपिलें।।२२।।**

सद्गुरू चरणसेवा करणे यास पादसेवन म्हणतात. चौथ्या प्रकारच्या भक्तीचे लक्षण येथे सांगितले आहे.

**देव ब्राह्मण माहानुभाव। सत्पात्र भजनाचे ठाव। ऐसिये ठाउं सद्भाव। दृढ धरावा।।२३।।**

देव, ब्राह्मण, महात्मे पुण्यपुरूष हे सुद्धा सेवेला पात्र आहेत त्यांच्या ठिकाणी सद्भाव ठेवावे.

**हें प्रवृत्तीचें बोलणें। बोलिलें रक्षाया कारणें। परंतु सद्गुरुपाय सेवणें। या नांव पादसेवन।।२४।।**

पण हे सांगणे म्हणजे जन्मरूढीचे पालन किंवा लोकव्यवहार सांभाळणे म्हणून सांगितले.पण मुद्याची सद्गुरूचरणसेवा हीच खरी. तिलाच पादसेवन भक्ती म्हणतात.

**पादसेवन चौथी भक्ती। पावन करितसें त्रिजगतीं। जयेकरितां सायोज्यमुक्ती। साधकास होये।।२५।।**

पादसेवन ही चौथी त्रैलोक्याला पावन करणारी आहे कारण तिच्यामुळे सायुज्यमुक्ती साधकाला प्राप्त होते.

**म्हणौनि थोराहून थोर। चौथे भक्तीचा निर्धार। जयेकरितां पैलपार। बहुत प्राणी पावती।।२६।।**

म्हणून निश्चयपूर्वक केलेली पादसेवनभक्ती थोराहून थोर आहे कारण तिच्यामुळेच पुष्कळ प्राणी भवनदीच्या पैलपार गेले आहेत. चौथी भक्ती सर्वांत थोर भक्ती आहेत.

इति श्रीदासबोधे गुरूशिष्यसंवादे पादसेवनभक्तिनिरूपणनाम समास चतुर्थ।।४।।

## द. ४ स. ५ : अर्चनभक्ती

परमात्म्याचा साक्षात्कार होण्यास माणसाला स्वत:मधील माणूसपणाच्या पलीकडे उडी मारावी लागते. असे पलीकडे जाण्यास मार्ग दोन. माणूसपणा नाहीसा करून परमात्म्याला झोंबायचे हा एक मार्ग; तर माणूसपणाला परमात्म्याकडे सर्वस्वी वळवायचे हा दुसरा मार्ग होय. ज्ञानमार्ग आणि योगमार्ग पहिल्या

प्रकारात मोडतात तर भक्तिमार्ग दुसऱ्या प्रकारात मोडतो. माणसाच्या स्वभावाचा असा एक गुण आहे की ज्याच्यावर आपले प्रेम असते, त्याचा सत्कार केल्याशिवाय, त्याची पूजा केल्याशिवाय आपल्याला चैन पडत नाही. यामध्ये अर्चनभक्तीचे मूळ सापडते. जगात जे जे कांहीं उत्तम व पवित्र आहे ते ते भगवंताला अर्पण करणे हे अर्चनभक्तीचे प्रधान लक्षण आहे. पण परमात्मा किंवा भगवंत अत्यंत सूक्ष्म आहे. म्हणून अर्चनाचे सुद्धा स्थूल व सूक्ष्म, बाहेरील व आतील असे दोन प्रकार असतात. प्रथम बाहेरील अर्चन कसे ते पाहा. आपली उपास्य देवता आधी निश्चित करावी. सद्गुरुसुद्धा उपास्यदेवता होऊ शकते. तिची सुरेख मूर्ती किंवा तसबीर असावी. रोज तिला स्नान घालावे. त्यानंतर उत्तम वस्त्र, चंदन, सुगंधी द्रव्ये व फुले तिला वाहावी. तिला सुग्रास नैवेद्य दाखवून तिची आरती करावी. आणि अगदी मनापासून साष्टांग नमस्कार घालून अत्यंत प्रेमदृष्टीने एकदा तिच्याकडे बघावे. आता आतील अर्चन कसे ते पाहा. माणसाच्या अंगी कल्पना नावाची एक विलक्षण शक्ती आहे. आपण ज्ञानसाधना करीत असता कल्पनेची फार मदत होते. भक्तीमध्ये सुद्धा तिचा उत्तम उपयोग होऊ शकतो. प्रथम आपली उपास्य देवता किंवा सद्गुरुमाऊली आपल्या हृदयात आहे अशी भावना करावी. ती मूर्ति सजीव कल्पावी. नंतर स्थूल किंवा बाहेरच्या मूर्तीला अर्चनामध्ये जे उपचार आपण करतो ते सगळे आतील मूर्तीला मनाने, कल्पनेने करावे. पूजा आटोपली की देवतेला हृदयातच विश्रांती द्यावी. अशा रीतीने आपण भगवंताचे कल्पनाचित्र रोज रंगविण्याचा अभ्यास केला तर मनाला सूक्ष्मात विहार करण्याची सवय लागते. ते अधिकाधिक अमूर्ताशी रमू लागते. या अभ्यासात प्रगती झाल्यास प्रतिभा जागी होणे सुलभ होऊन भगवंत माझ्याजवळ आहे; अगदी माझ्यामध्ये आहे ही भावना जिवंतपणे काम करू लागते. माणसाने चिकाटीने मानसपूजा मात्र चालू ठेवली पाहिजे. मानसपूजा चांगली झाली तर मनास मोठी प्रसन्नता वाटते हा भक्तांचा अनुभव ध्यानात ठेवावा.

॥ श्रीराम ॥

**मागां जालें निरूपण। चौथे भक्तीचें लक्षण। आतां ऐका सावधान। पांचवी भक्ती॥१॥**

मागे चौथ्या भक्तीचे लक्षण सांगितले आता पाचवी भक्ती ऐका.

**पांचवी भक्ती तें आर्चन। आर्चन ह्मणिजे देवतार्चन। शास्त्रोक्त पूजाविधान। केले पाहिजे ॥२॥**

पाचवी भक्ती, अर्चन म्हणजे देवांची पूजा ती पूजा शास्त्रात सांगितल्याप्रमाणे केली पाहिजे.

**नाना आसनें उपकरणें। वस्त्रें आळंकार भूषणें। मानसपूजा मूर्तिध्यानें। या नांव पांचवी भक्ती ॥३॥**

बसण्यासाठी अनेक प्रकारची आसने (उदा. दर्भासन, मृगाजीन) पूजेची उपकरणे, वस्त्रे, अलंकार, दागिने (आणि हे नसल्यास) मूर्तीचे ध्यान करणे, (मानसपूजा) ही पाचवी भक्ती होय.

**देवब्राह्मणअग्नीपूजन। साधुसंतअतीतपूजन। इति महानुभावगाउत्रीपूजन। या नांव पांचवी भक्ती ॥४॥**

देव, ब्राह्मण, अग्नीपूजन, साधूसंत, अतिथी, संन्यासी, महात्मा, गोमाता यांचे पूजन.

**धातुपाषाणमृत्तिकापूजन[१]। चित्र लेप[२] सत्पात्रपूजन। आपलें गृहींचें देवतार्चन। या नांव पांचवी भक्ती।।५।।**

दगड, धातू, माती यांच्या देवाच्या मूर्ती किंवा देवांच्या तसबिरी व घरातील देवदेवता याचे पूजन ही अर्चनभक्ती.

**सीळा सप्तांकित नवांकित। शालिग्राम शकलें चक्रांकित। लिंगें सूर्यकांत सोमकांत। बाण तांदळे नर्बदे।।६।।**

साप्तांकित, नवांकित शिळा, शाळीग्राम किंवा त्याची शकले, लिंगे, सूर्यकांत, चंद्रकांत, बाण, तांदळे, नर्मदेतील बाण किंवा गणपती यांची पूजा करावी.

**भैरव भगवती मल्लारी। मुंज्या नृसिंह वनशंकरी। नाग नाणी नानापरी। पंचायेत्नपूजा।।७।।**

भैरव, देवी, मल्हारी, मुंजा, नरसोबा, नाग, अनेक प्रकारची नाणी, पंचायतने

**गणेशशारदाविठ्ठलमूर्ती। रंगनाथजगंनाथतांडवमूर्ती। श्रीरंगहनुमंतगरुडमूर्ती। देवतार्चनीं पूजाव्या।।८।।**

**मत्छकूर्मवऱ्हावमूर्ती। नृसिंहवामनभार्गवमूर्ती। रामकृष्णहयग्रीवमूर्ती। देवतार्चनीं पूजाव्या।।९।।**

**केशवनारायणमाधवमूर्ती। गोविंदविष्णुमदसूदनमूर्ती। त्रिविक्रमवामनश्रीधरमूर्ती। रुषीकेश पद्मनाभि।।१०।।दामोदरसंकर्षणवासुदेवमूर्ती।प्रद्युम्नअनुरधपुरुषोत्तममूर्ती। अधोक्षजनारसिंहअच्युतमूर्ती। जनार्दन आणि उपेंद्र।।११।।**

गणपती, सरस्वती, विठोबा, ते शेवटी उपेंद्रपर्यंत सर्व नावे दिली आहेत, त्यांचे पूजन करीत जावे.

**हरिहरांच्या अनंतमूर्ती। भगवंतजगदात्माजगदीशमूर्ती। शिवशक्तीच्या बहुधा मूर्ती। देवतार्चनीं पूजाव्या।।१२।।**

अशा हरिहरांच्या असंख्य मूर्ती भगवंत, जगदात्मा, जगदीश यांच्या यांच्या मूर्ती शिव-शक्तीच्या अनेक मूर्तींचे पूजन करावे.

**अश्वत्थनारायेण सूर्यनारायेण लक्ष्मीनारायेण त्रिमल्लनारायेण। श्रीहरीनारायण आदिनारायण। शेषशाई परमात्मा।।१३।।**

अश्वत्थनारायण, सूर्यनारायण, लक्ष्मीनारायण, त्रिमल्लनारायण, श्रीहरीनारायण आदिनारायण शेषशायी परमात्मा

**ऐश्या परमेश्वराच्या मूर्ती। पाहों जातां उदंड असती। त्यांचें आर्चन करावें, भक्ती-। पांचवी ऐसी।।१४।।**

अशा परमेश्वराच्या मूर्ती पहावयास गेलो तर पुष्कळ आहेत त्यांचे पूजन करणे ही पाचवी भक्ती होय.

**याहि वेगळे कुळधर्म। सोडूं नये अनुक्रम । उत्तम अथवा मध्यम। करीत जावें।।१५।।**

त्या वेगळे परंपरागत जे उत्तम वा मध्यम कुळधर्म असतील ते पाळावे.

**जाखमाता मायराणी। बाळा बगुळा मानविणी। पूजा मांगिणी जोगिणी। कुळधर्मे**

(१) धातुपाषाणमृत्तिकापूजन - धातू, दगड, माती यांच्या मूर्तींचे पूजन. (२) चित्रलेप - तसबीर.

**करावीं ।।१६।।**

जाखमाता, मायराणी, बाळा, बगुळा, माानविनी, मांगिणी, जोगिणी इत्यादि क्षुद्र देवतांची पूजा कुळामध्ये असल्यास ती करावी.

**नाना तीर्थाक्षत्रांस जावें। तेथें त्या देवाचें पूजन करावें। नाना उपचारीं आर्चावें। परमेश्वरासी ।।१७।।**

नाना तीर्थक्षेत्रास जावे. तेथील देवतांचे पूजन करावे. नाना उपचारांनी परमेश्वराचे पूजन श्रद्धापूर्वक करावे

**पंचामृतें गंधाक्षतें। पुष्पें परिमळद्रव्यें बहुतें। धूपदीप असंख्यातें। नीरांजनें कर्पुराचीं।।१८।।**

पंचामृत, गंधाक्षदा, फुले, सुगंधी अत्तरे, धूपदीप, निरांजने, कापूर

**नाना खाद्य नैवेद्य सुंदर। नाना फळें तांबोलप्रकार। दक्षणा नाना आळंकार। दिव्यांबरें वनमाळा ।।१९।।**

पंचखाद्ये, इ. अनेक खाद्यपदार्थाचा नैवद्य, अनेक प्रकारची फळे, विडे, दक्षिणा, अनेक दागिने, उंची वस्त्रे, वनफुलांच्या माळा इत्यादि उपचारांनी पूजन करावे.

**सिबिका[3] छत्रें सुखासनें। माहि मेघडंब्रें सूर्यापानें। दिंड्या पताका निशाणें। टाळ घोळ मृदांग ।।२०।।**

पालखी, छत्री, अब्दागिरी, दिंड्यासारखी तंतुवाद्ये, पताका, निशाणे, टाळ, घोळ, मृदंग

**नाना वाद्यें नाना उत्साव। नाना भक्तसमुदाव। गाती हरिदास सद्भाव। लागला भगवंतीं ।।२१।।**

अशाप्रकारे वाघ, साहित्यात कमतरता असू नये. ज्यात हरिदास, सद्भाव धरून गायन करीत आहेत असे उत्सव असावे.

**वापी कूप सरोवरें। नाना देवळयें सिखरें। राजांगणें मनोहरें। वृंदावनें भुयरीं।।२२।।**

(मंदिरापाशी वातावरण कसे असावे याबद्दल मनोहर वर्णन पुढे आले आहे) विहिरी, आड, सरोवरे, अनेक देवळे, मनोहर पटांगणे व शिखरे, वृंदावणे, भुयारे

**मठ मंड्या धर्मशाळा। देवद्वारीं पडशाळा। नाना उपकर्णे नक्षत्रमाळा। नाना वस्त्रसामग्री ।।२३।।**

मठ, मंडप, धर्मशाळा, देवळानजीक पडव्या, अनेक उपकरणे, नक्षत्रमाळा, नाना वस्त्र सामग्री

**नाना पडदे मंडप चांदोबे[4]। नाना रत्नघोष लोंबती बरवे। नाना देवळईं समर्पावे। हस्थि घोडे शक्कटें।।२४।।**

अनेक पडदे मंडपाचे चांदवे असावे. त्यांना रत्नांचे घोस लोंबत असावे. हत्ती, घोडे, गाड्या इत्यादि जे शक्य असेल ते देवालयास अर्पण करावे.

**आळंकार आणि आळंकारपात्रें। द्रव्य आणी द्रव्यपात्रें। अन्नोदक आणी अन्नोदकपात्रें। नाना प्रकारींची ।।२५।।**

अलंकार, वस्त्रे, अन्नपाणी ठेवण्यासाठी विविध पात्रे असावी. (द्रव्यादि सर्व बाबतीत मंदिर वैभवशाली असावे)

**वनें उपवनें पुष्पवाटिका। तापस्यांच्या पर्णकुटिका। ऐसी पूजा जगन्नायका। येथासांग समर्पावी ।।२६।।**

वने, बागा, पुष्पवाटिका तपस्वी लोकांसाठी पर्णकुट्याही उभारावीत. ही जगन्नायकाची पूजाच आहे.

**शुक शारिका मयोरें। बदकें चक्रवाकें चकोरें। कोकिळा चितळें सामरें। देवाळईं समर्पावीं ।।२७।।**

पोपट, मैना, मोर, बदके, चक्रवाक, चकोर, कोकिळा इत्यादि पक्षी चितळे, सांबरे देवालयाला अर्पावी.

**सुगंधमृगें आणी मार्जरें। गाई म्हैसी वृषभ वानरें। नाना पदार्थ आणी लेंकुरें। देवळाईं समर्पावी ।।२८।।**

कस्तुरी मृग, मांजरे, गाई, बैल, वानरे इत्यादि प्राणी आणि लहान मुले ईश्वरसेवेसाठी देवालयाला अर्पण करावीत.

**काया वाचा आणी मनें। चित्तें वित्तें जीवें प्राणें। सद्भावें भगवंतआर्चनें। या नांव आर्चन भक्ती ।।२९।।**

काया, वाचा, मन, चित्त, वित्त, प्राण हे भगवंताच्या चरणी लावावे याचे नाव अर्चनभक्ती.

**ऐसेंचि सद्गुरूचें भजन–। करून, असावें अनन्य। या नांव भगवद्भजन। पांचवी भक्ती ।।३०।।**

याचप्रकारे अनन्य भक्तीने सद्गुरूची सेवा करावी ही सुद्धा अर्चनभक्तीच.

**ऐसी पूजा न घडे बरवी। तरी मानसपूजा करावी। मानसपूजा अगत्य व्हावी। परमेश्वरासी ।।३१।।**

अशी चांगल्या प्रकारे व साधन सामग्री उपयोगात आणून पूजा करता आली नाही तर परमेश्वराची मानसपूजा तरी अवश्य कारावी.

**मनें भगवंतास पूजावें। कल्पून सर्वहि समर्पावें। मानसपूजेचें जाणावें। लक्षण ऐसें।।३२।।**

मनातल्या मनात कल्पना करून अर्पण करावे, अशा प्रकारे मानसपूजेचे लक्षण आहे.

**जें जें आपणांस पाहिजे। तें तें कल्पून वाहिजे। येणें प्रकारें कीजे। मानसपूजा।।३३।।**

आपल्या आवडीप्रमाणे जे काही देवाला अर्पण करावयाचे असेल त्याची कल्पना करावी आणि देवाला अर्पण करावे, अशा प्रकारे मानसपूजा करावी.

(समासाचे रसग्रहण–श्रीसमर्थांच्या मनामध्ये स्वच्छ आणि सुंदर देवालयाची कल्पना अशी आहे की बालापासून वृद्धापर्यंत सर्वांना तेथे आकर्षण वाटावे आणि समाधान लाभावे. मूर्तीपूजा हे हिंदू धर्मातील महत्वाचे साधन मानले आहे. पूजा व मानसपूजा यांचे यांचे विधीविधान या समासात आहे.)

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आर्चनभक्तिनाम समास पंचम ।।५।।

---

(३) सिबिका – पालखी. (४) चांदोबे – जाळीदार रुमाल.

# द. ४ स. ६ वंदनभक्ती

वंदन म्हणजे नमस्कार करणें. नमस्कार करणें हे चरणी लीन होण्याचे, शरण जाण्याचे चिन्ह आहे. देहाचा अभिमान मारण्यासाठी परमार्थाची सगळी साधने करायची असतात. नम्रता अंगी आली तर अभिमान फार क्षीण होतो आणि साष्टांग नमस्कार घालण्याचा अभ्यास केला तर नम्रता सहज साध्य होते. म्हणून सर्व साधुसंत भगवंताला अगदी मनापासून साष्टांग नमस्कार घालतात. वंदनाची तात्त्विक चिकित्सा अशी की साधकाला प्रथम संतामध्ये विलसणारा अनंत शोधावा लागतो. आपल्या भोवती वावरणाऱ्या प्राणिमात्रांमध्ये भगवंत अंतर्यामीरूपाने वास करतो. हे जर खरे तर ज्या ज्या जीवाशी आपला संबंध येईल त्या त्या जीवाच्या अवगुणाकडे दुर्लक्ष करून त्याच्या गुणांनाच तेवढे पाहण्याची कला आपल्याला शिकली पाहिजे. ही कला साध्य झाली की त्या गुणांचे अधिष्ठान असणारा भगवंत आपोआप मनाला भासायला लागतो. मग या प्राण्याला नमस्कार करताना त्यांच्या बाह्यांगाला ते वंदन नसून त्याच्या अंतरंगातील अनंताला ते असते. अशी दृष्टी प्राप्त झाल्यावर जगात जिकडेतिकडे भगवंताचा खेळ चालला आहे असा प्रत्यक्ष अनुभव येतो. स्वत: आपण त्या खेळातील पात्र आहोत ही मनोमन खात्री पटते. देहाभिमान गलित होऊन तो सर्वांशी अगदी लीनपणाने, समरसपणाने वागतो. वंदनभक्ती ज्याला साधते त्याच्या जीवनात एवढा मोठा चमत्कार घडून येतो. म्हणून या समासात नमस्कारासारखे अप्रतिम परमार्थसाधन नाही असा आपला स्वच्छ निर्णय श्री समर्थांनी दिला आहे.

॥ श्रीराम ॥

**मागां जालें निरूपण। पांचवे भक्तीचें लक्षण। आता ऐका सावधान। साहावी भक्ती ॥१॥**

पाचव्या भक्तीचे लक्षण पूर्वी सांगितले आता सहावी भक्ती सावधपणे ऐकावी.

**साहावी भक्ती तें वंदन। करावें देवासी नमन। संत साधु आणी सज्जन। नमस्कारीत जावे ॥२॥**

सहावी वंदनाभक्ती होय. देव, संत, साधू, आणि सज्जन यांना नमस्कार करावा.

**सूर्यासि करावे नमस्कार। देवासी करावे नमस्कार। सद्गुरूस करावे नमस्कार। साष्टांग भावें ॥३॥**

सूर्य, देव आणि सद्गुरू यांना साष्टांग नमस्कार घालावा.

**साष्टांग नमस्कारास अधिकारु। नानाप्रतिमा देव गुरु। अन्यत्र नमनाचा विचारु। अधिकारें करावा ॥४॥**

अनेक देवांच्या प्रतिमा देव आणि गुरू हेच साष्टांग नमस्कार करून घेण्यास अधिकारी आहेत. अन्यत्र इतरांना अधिकार पात्रता पाहून नमस्कार करावा.

**छपन्न कोटी वसुमती। मधें विष्णुमूर्ती असती। तयांस नमस्कार प्रीतीं। साष्टांग घालावे ॥५॥**

पृथ्वी छपन्न कोटी योजने विस्तारली आहे. तिच्यावर विष्णुच्या मूर्ती आहेत त्यांना साष्टांग नमस्कार करावा.

**पशुपति श्रीपति आणी गभस्ती[१]। यांच्या दर्शनें दोष जाती। तैसाचि नमावा मारुती। नित्य नेमें विशेष ।।६।।**

शंकर, विष्णू आणि सूर्य यांच्या दर्शनाने नाना प्रकारची पापे नष्ट होतात म्हणून त्यांना व मारूतीला नित्यनेमाने नमस्कार करावा. श्लोकाचा अर्थ : शंकर, शेषशायी विष्णु, सूर्य तसाच मारूती यांचे दर्शन नित्यनेमाने घ्यावे ते विशेष पुण्यप्रद असते.

**श्लोक।। शंकर: शेषशायी च मार्तंडो मारुतिस्तथा। एतेषां दर्शनं पुण्यं नित्यनेमे विशेषत: ।।१।। भक्त ज्ञानी आणी वीतरागी[२]। माहानुभाव तापसी योगी। सत्पात्रें देखोनि वेगीं। नमस्कार घालावें ।।७।।**

भक्ती, ज्ञानी, वैरागी, स्वानुभवी, तपस्वी, योगी आणि श्रेष्ठ व्यक्ती पाहून सत्वर नमस्कार करावे.

**वेदज्ञ शास्त्रज्ञ आणी सर्वज्ञ। पंडित पुराणिक आणी विद्वज्जन। याज्ञिक वैदिक पवित्रजन। नमस्कारीत जावे ।।८।।**

वेदज्ञ, शास्त्रजाणकार, सर्व विद्यांचे जाणकार असणारे पंडीत, पुराणिक, विद्वान, याज्ञिक, वैदिक आणि पवित्रजन या सगळ्यांना नमस्कार करावा.

**जेथें दिसती विशेष गुण। तें सद्गुरूचें अधिष्ठान। याकरणें तयासी नमन। अत्यादरें करावें ।।९।।**

ज्या व्यक्तीच्या ठिकाणी विशेष गुण असतील तेथे सद्गुरूचे अधिष्ठान आहे. म्हणून त्यांना अत्यंत आदराने वंदन करावे.

**गणेश शारदा नाना शक्ती। हरिहरांच्या अवतारमूर्ती। नाना देव सांगों किती। पृथकाकारें[३] ।।१०।।**

गणेश, शारदा, नाना शक्तीदेवता, हरिहरांच्या अवतारमूर्ती अशा प्रकारे किती देव म्हणून सांगावे.

**सर्व देवांस नमस्कारिलें। ते येका भगवंतास पावलें। येदर्थी येक वचन बोलिलें–। आहे, तें ऐका ।।११।।**

या सर्व देवांना नमस्कार केला तरी तो एकाच केशवाला (परमात्म्याला) पोहोचतो याबद्दल एक वचन आहे ते ऐका.

आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम्। सर्वदेवनमस्कार: केशवं प्रतिगच्छति ।।१।।

श्लोकाचा अर्थ – आकाशातून पडलेले पाणी ज्याप्रमाणे समुद्रालाच जाऊन मिळते, त्याप्रमाणे सर्व देवांना केलेला नमस्कार केशवाला पोहोचतो.

**याकारणें सर्व देवांसी। नमस्कारावें अत्यादरेंसीं। अधिष्ठान मानितां, देवांसी–। परम सौख्य वाटे ।।१२।।**

म्हणून सर्व देवतांना अतिशय आदरपूर्वक नमस्कार करावा. देवांचे अधिष्ठान परमात्मस्वरूप देव मानल्यास अत्यंत समाधान मिळते. (वरील श्लोक व त्यांचा अर्थ भारतीय मनामध्ये खोलवर रूजला असल्याने त्यांची वृत्ती सहिष्णू किंवा उदार झाली आहे.)

(१) गभस्ती – सूर्य. २) वीतरागी – विरागी.

**देव देवाचीं अधिष्ठानें। सत्पात्रें सद्गुरूची स्थानें। याकारणें नमस्कार करणें। उभय मार्गी।।१३।।**
देव हे भगवंताची अधिष्ठाने व सत्पात्रे म्हणजे अधिकारी साधूजन यांच्यामध्ये सद्गुरूचे अधिष्ठान आहे ही भावना ठेवून देवांना व संतांना आदराने नमस्कार करावा.
**नमस्कारें लीनता घडे। नमस्कारें विकल्प मोडे। नमस्कारें सख्य घडे। नाना सत्पात्रासीं।।१४।।**
नमस्काराची महति-नमस्काराने अंगी नम्रता येते, विकल्प नाहिसा होतो. आणि सज्जनांशी सख्य घडते.
**नमस्कारें दोष जाती। नमस्कारें अन्याय क्ष्मती। नमस्कारें मोडलीं जडतीं। समाधानें।।१५।।**
नमस्काराने चित्ताचे दोष नाहिसे होतात, अन्याय क्षमा केले जातात आणि असमाधान नाहिसे होऊन पुन्हा समाधान लाभते.
**सिसापरता[४] नाहीं दंड। ऐसें बोलती उदंड। याकारणें अखंड। देव भक्त वंदावे।।१६।।**
(मस्तक हा शरीराचा सर्वात महत्वाचा अवयव आहे त्यामुळे) मस्तक (शीर्ष) नमविण्याइतकी मोठी शिक्षा नाही असे अनेकजण म्हणतात, म्हणून देव आणि भक्त यांना नेहमी नमस्कार करीत जावे.
**नमस्कारें कृपा उचंबळे। नमस्कारें प्रसन्नता प्रबळे। नमस्कारें गुरुदेव वोळे। साधकांवरी।।१७।।**
नमस्कारामुळे साधकावर गुरूकृपा उचंबळते, प्रसन्नता प्रबळ होते,
**निशेष[५] करितां नमस्कार। नासती दोषांचे गिरिवर। आणी मुख्य परमेश्वर। कृपा करी।।१८।।**
कोणताही विकल्प मनात न आणता नमस्कार केला तर दोषांचे पर्वत नाहिसे होतात आणि मुख्य ईश्वराची कृपा होते.
**नमस्कारें पतित पावन। नमस्कारें संतांसी शरण। नमस्कारें जन्ममरण। दुरी दुऱ्हावे।।१९।।**
पतित असतात ते पावन होतात. नमस्कार लीनतापूर्वक करून संतांना शरण गेल्यास जन्म मृत्यू दूर निघून जातात.
**परम अन्याय करूनि आला। आणी साष्टांग नमस्कार घातला। तरी तो अन्याये क्ष्मा केला। पाहिजे श्रेष्ठीं।।२०।।**
एखाद्याने मोठाच अन्याय केला असला तरी त्याने साष्टांग नमस्कार घातल्यास श्रेष्ठ व्यक्तीने त्याला क्षमा केलीच पाहिजे.
**याकारणें नमस्कारापरतें। आणीक नाहीं अनुसरतें। नमस्कारें प्राणीयातें। सद्बुद्धि लागे।।२१।।**
म्हणून साधकास नमस्कार करण्याखेरीज सद्गुरूकृपा प्राप्त करण्याचा दुसरा मार्ग नाही.
**नमस्कारास वेचावें नलगे। नमस्कारास कष्टावें नलगे। नमस्कारास कांहींच नलगे। उपकर्ण सामग्री।।२२।।**
नमस्कारासाठी काही खर्च करावा लागत नाही. काही कष्ट करावे लागत नाहीत तसेच उपकरण किंवा अन्य सामग्री काहीच लागत नाही.
**नमस्कारा ऐसें नाहीं सोपें। नमस्कारा करावा अनन्यरूपें। नाना साधनीं साक्षपें। कासया**

(३) पृथकाकारें - भिन्न आकाराने.

**सिणावें ।।२३।।**
नमस्काराइतके सोपे काही नाही मात्र तो नमस्कार एकनिष्ठेने (अंतरपडदा बाजूस सारून) करावा. साधनांचे नाना प्रयत्न करून उगीच का कष्टावे?

**साधक भावें नमस्कार घाली। त्याची चिंता साधूस लागली। सुगम पंथें नेऊन घाली। जेथील तेथें ।।२४।।**
साधक जेव्हा सद्भावपूर्वक साधूला नमस्कार करतो तेव्हा त्याच्या हिताची चिंता साधूला लागते आणि मग सोप्या वाटेने ते त्याला पूर्वी तो ज्या स्वरूपात (सत्‌चित्‌आनंद रूपात) होता व जेथून तो घसरला तेथे नेऊन पोहचवितात.

**याकारणें नमस्कार श्रेष्ठ। नमस्कारें वोळती वरिष्ठ। येथे सांगितली पष्ट[६]। साहावी भक्ती ।।२५।।**
म्हणून नमस्कार हे श्रेष्ठ साधन आहे. नमस्करांमुळे श्रेष्ठांची कृपा होते, (ते कृपावंत झाल्याने ईश्वरप्राप्ती होते) अशी ही सहावी भक्ती येथे स्पष्ट करून सांगितली आहे.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे वंदनभक्तिनाम समास षष्ठ ।।६।।

# दासबोध परिचय प्रश्नपत्रिका ८ वी

(दासबोध द. ४ स. ४, ५ आणि ६ वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाचा ओवीचरण ज्यात आहे, त्या ओव्या पूर्ण लिहा.
- १) साधकाने श्रद्धापूर्वक अभिवादन केले की त्याच्या हिताची चिंता साधूला लागते.
- २) पूजासाहित्य आपणापाशी आहे असे मनाने कल्पून ते भगवंताच्या चरणी अर्पण करावे.
- ३) शास्त्र, गुरु आणि आत्मप्रचिती या विविध कसोट्या लावून आपण तेच ब्रह्म व्हावे.
- ४) राने, बागा, तापसी लोकांसाठी पर्णकुटिका निर्माण करणे ही जगन्नायकाची पूजा त्याला अर्पण करावी.

प्र. २ वंदनभक्ती समासामध्ये हिंदुधर्माची विशेषता जी सहिष्णुवृत्ती, तिची शिकवण कशा प्रकारे व्यक्त झाली आहे ते सांगा.

प्र. ३ सद्गुरुचरणी अनन्यभाव असावा हे समर्थांनी आग्रहाने प्रतिपादन केले आहे, ते का?

प्र. ४ ‘‘नमस्कार महती’’ संबंधात समर्थांनी काय म्हटले आहे?

प्र. ५ खालील विधाने चूक की बरोबर ते स्पष्टीकरणासह लिहा.
- १) नमस्कार आणि साष्टांग नमस्कार यात तारतम्य बाळगावे.
- २) अर्चनभक्ती म्हटली की पूजासाहित्य प्रत्यक्ष रूपात हवेच.
- ३) आपले दैवत विशिष्ट असताना कोणत्याही देवाला नमस्कार करणे हा ढोंगीपणा आहे.

(४) सिसापरता - मस्तकापासून निराळा. (५) निशेष - मनोभावे.

## स्वाध्याय ९ वा (द. ८ स. ६ वर आधारित)

**स्वाध्याय सारांश : दुश्चीतनिरूपण** द. ८-६ हा समास येथे अभ्यासावयाचा आहे. दुश्चीतपणा, आळस, अतिनिद्रा हे दुर्गुण घालवून सावध साक्षेपी आणि दक्ष अशा माणसांची निर्मिती करणे हे समर्थांचे कार्य आहे. समर्थांची व्यवहारवादी शिकवण राजकारण-निरूपणामध्ये प्रत्ययाला येते.

## द. ८ स. ६ दुश्चीतनिरूपण

परमार्थामधील एका खोल प्रश्नाला हा समास वाहिलेला आहे. तो प्रश्न असा : ब्रह्मदर्शन होण्यास सत्समागम अत्यंत अवश्य आहे यात शंका नाही. पण सत्समागम लाभला तर किती दिवसात ब्रह्मदर्शन होते? प्रश्न उत्पन्न होण्याचे कारण हे की, पुष्कळांना संतसंगती लाभते, ती बराच काळ टिकते. असे असून फारच थोड्या पुरुषांना ब्रह्मदर्शन घडते. याचे कारण श्रीसमर्थांनी या समासात फारच स्पष्टपणे सांगितले आहे. जगामध्ये समता जर कोठे आढळत असेल तर ती फ़क्त संतांपाशीच आढळते. आपण भोगीत असलेला ब्रह्मानंद प्रत्येक संत अगदी मुक्त हस्ताने उधळत असतो. तो घेण्याला आणि घेऊन पचविण्याची ताकद येण्याला जी मनाची तयारी लागते ती फारच थोड्या माणसांमध्ये दिसते. म्हणून सत्समागम घडून देखील ब्रह्मदर्शनाचा सोहळा सगळ्यांना भोगता येत नाही. ती तयारी कोणती याबद्दल बृहदारण्यक उपनिषदामध्ये याज्ञवल्क्य जनकराजाला सांगतो की, ''तस्मात् एवंविद् शान्तः दान्तः उपरतः तितिक्षुः समाहितः भूत्वा आत्मनि एव आत्मानं पश्यति'' अर्थ - म्हणून आत्मा कसा आहे हे समजून जो मनाने शान्त होतो, जो इंद्रिय-संयमन करतो, जो अंतर्मुख होतो, जो सहनशील बनतो, आणि जो एकाग्रचित्त होतो, त्यास स्वतःच्या अंतर्यामी आत्मदर्शन होते'' अर्थात् ब्रह्मदर्शन घडण्यास माणूस मोठा एकाग्रचित्त आणि प्रयत्नशील असायला पाहिजे. जो एकाग्रचित्त नसतो तो व्यग्रचित्त असतो. व्यग्रचित्ताला श्री समर्थ दुश्चितपणा असे नाव वापरतात. जो प्रयत्नशील नसतो तो आळशी असतो. आळशीपणाला श्री समर्थ आळस म्हणतात. दुश्चितपणा आणि आळस यामध्ये निद्रेची भर घालून श्रीसमर्थांनी भ्रष्ट करणारी त्रयी वर्णन केली आहे. तात्पर्य, परमार्थी माणूस एकाग्र अवधान असणारा, इंद्रियांना सदैव ताब्यात ठेवणारा आणि आळस व निद्रा यांच्यापासून दूर असणारा असा पाहिजे. या गुणांनी संपन्न माणूस सत्समागमांत राहिला तर पाहतां पाहतां तयार होतो, त्याची बुद्धी अत्यंत सूक्ष्म बनते व ती एकाग्र झाली की मायेचा पडदा फाडून स्वस्वरूपाशी तदाकार होते.

मानव म्हणजे मननशील प्राणी. मनाच्या विचार शक्तीमुळेच मानवाला प्राणीमात्रामध्ये श्रेष्ठत्व प्राप्त झाले आहे. 'इंद्रियाणां मनश्चास्मि'असे प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णांनी सांगितले आहे. हे मन नीट ठिकाणावर असेल तरच जीवन सुरळीत चालते. पण तेच थाऱ्यावर नसेल तर मनुष्य अकार्यक्षम होतो. अशा माणसाला 'दु:श्चित' हा शब्द श्रीसमर्थांनी वापरला आहे. यालाच व्यग्रचित्त असा दुसरा शब्द आहे. इंद्रियांच्या पलिकडे मन, मनापलिकडे बुध्दी व बुध्दीच्या पलिकडे परब्रह्म आहे. बुध्दीवर पडदा पडल्यामुळे निर्विकल्प वस्तुचे आकलन होत नाही. मन अत्यंत बलाढ्य आहे त्याच्याच अनुकूलतेमुळे

(६) पष्ट - स्पष्ट.

स्वस्वरूपाचे दर्शन मानवाला होते. निद्रा, आळस, व दुश्चितपण सोडून देऊन सावध, साक्षेपी व दक्ष होण्याचा उपदेश या समासात आहे.

**।। श्रीराम ।।**

**श्रोता विनवी वक्तयासी। सत्संगाची महिमा कैसी। मोक्ष लाभे कितां दिवसीं। हें मज निरोपावें ।।१।।**

वक्ता श्रोत्याला प्रश्न करतो सत्संगाचे महत्व कसे आहे. व सत्संग धरल्यापासून किती दिवसात माणसाला मुक्ती मिळते? हे मला सांगावे.

**धरितां साधूची संगती। कितां दिवसां होते मुक्ती। हा निश्चय कृपामूर्ती। मज दीनास करावा ।।२।।**

संताची संगती धरल्यावर किती दिवसात मुक्ती मिळते याचे उत्तर द्यावे आपण मूर्तीमंत कृपाच आहात

**मुक्ती लाभे तत्क्षणीं। विश्वासतां निरूपणीं। दुश्चीतपणें हानी। होतसे ।।३।।**

वक्ता उत्तर देतो – संतांनी केलेल्या निरूपणावर विश्वास ठेवलात की त्याच क्षणी मुक्ती लाभते पण निरूपणाचे वेळी दु:श्चित झाले तर मात्र हानी होते (साधूचा उपदेश एकाग्र चित्तांने श्रवण केला तर आत्मज्ञान होते पण चित्तच जर श्रवणात नसेल तर मोक्षप्राप्ती दूरच राहणार हे तात्पर्य)

**सुचितपणें दुश्चीत[१]। मन होतें अकस्मात। त्यास करावें निवांत। कोणे परी ।।४।।**

श्रोता प्रतिप्रश्न करतो – मन जरी लक्षपूर्वक श्रवणी लावले तरी एकाएकी दुर्लक्ष होते. मन भरकटते त्याला सावचित्त (अव्यग्र) कसे करावे?

**मनाच्या तोडून वोढी। श्रवणी बैसावें आवडी। सावधपणे घडीनें घडीं। काळ सार्थक करावा।।५।।**

वक्ता म्हणतो – मनाला लागलेल्या (बाह्यसृष्टी व विषयासक्ती यांच्या) ओढण्या तोडून टाकाव्या. आवडीने मनापासून श्रवण करावे सावधपणाने घडीने घडी काळ सार्थक करावा.

**अर्थप्रमय[२] ग्रंथांतरी। शोधून घ्यावें अभ्यांतरीं। दुश्चीतपण आलें तरी। पुन्हां श्रवण करावें ।।६।।**

ग्रंथामध्ये असलेल्या शब्दांचा अर्थ व सिद्धांत शोधून काढून मनात साठवावे काही दुर्लक्ष झाले तरी पुन्हा श्रवण करावे.

**अर्थांतर पाहिल्यावीण। उगेंचि करी जो श्रवण। तो श्राता नव्हे पाषाण। मनुष्यवेषें।।७।।**

अर्थांन्तर (शब्दातून प्रकट होणाऱ्या विषयाचा आशय) मनाने समजावून घेतल्याशिवाय जो नुसतेच श्रवण करतो तो श्रोता नव्हे मनुष्य रूपाने तो पाषाणच समजावा. (दगड ज्याप्रमाणे वर्षानुवर्षे पाण्यात राहूनसुद्धा आतून कोरडा असतो तसाच तो श्रोता नव्हे मनुष्य रूपाने तो पाषाणच समजावा.)

**येथें श्रोते मानितील सीण। आम्हांस केलें पाषाण। तरी पाषाणाचें लक्षण। सावध ऐका ।।८।।**

येथे श्रोत्यांना दगडाची उपमा दिल्याबद्दल त्यांना वाईट वाटेल 'आम्हाला पाषाण का केले' असे वाटेल पण दगडसुद्धा कसा असतो ते सावधपणे ऐका.

**वांकुडा तिकडा फोडिला। पाषाण घडून नीट केला। दुसरे वेळेसी पाहिला। तरी तो तैसाचि असे ।।९।।**
वेडावाकडा असलेला दगड जर (छिन्नी हातोडीने) घडवून नीट केला तर तो पुन्हा केव्हाही पाहिला तरी तो तसाच दिसतो.

**टांकीनें खपली फोडली। ते मागुती नाहीं जडली। मनुष्याची कुबुद्धि झाडिली। तरी ते पुन्हां लागे ।।१०।।**
छिन्नीने त्याचा टवका काढला तर तो पुन्हा चिकटून बसत नाही. पण मनुष्याची वाईट बुद्धी काढुन टाकली तरी (कालांतराने) पुन्हा ती चिकटून बसते.

**सांगतां अवगुण गेला। पुन्हा मागुता जडला। याकारणें माहांभला। पाषाणगोटा ।।११।।**
(उपदेशामुळे) एकदा सांगून दुर्गुण गेला तरी पुन्हा (मनाला) चिकटतो म्हणून दगडाचा गोटा माणसापेक्षा चांगला.

**ज्याचा अवगुण झडेना। तो पाषाणाहून उणा। पाषाण आगळा जाणा। कोटिगुणें ।।१२।।**
म्हणून त्याचे अवगुण जात नाहीत तो पाषाणापेक्षा कमी दर्जाचा आणि त्याच्यापेक्षा पाषाण कितीतरी पटीने चांगला असतो.

**कोटिगुणें कैसा पाषाण। त्याचेंहि ऐका लक्षण। श्रोतीं करावें श्रवण। सावध होउनी ।।१३।।**
दगड कोटीपटीने चांगला असतो त्याचेही लक्षण श्रोत्यांनी सावधपणे ऐकावे.

**माणीक मोतीं प्रवाळ। पाचि वैडूर्य वज्रनीळ[३]। गोमेदमणी परिस केवळ। पाषाण बोलिजे ।।१४।।**
माणिक, मोती, प्रवाळ, पाचू, वैडुर्य, हिरा, इंद्रनीळमणी, गोमेदमणी इत्यादि सगळे पाषाणच म्हणविले जातात.

**याहिवेगळें बहुत। सूर्यकांत सोमकांत। नाना मोहरे[४] सप्रचित। औषधाकारणें ।।१५।।**
त्यापेक्षा निराळे सूर्यकांत, सोमकान्त, नाना प्रकारचे औषधी गुण असणारे मणि (मोहरे) इत्यादि श्रेष्ठ पाषाण आहेत.

**याहि वेगळे पाषाण भले। नाना तीर्थीं जे लागले। वापी कूप सेखीं जाले। हरिहरमूर्ती ।।१६।।**
त्याच्यापेक्षा श्रेष्ठ जे भाग्यवान पाषाण असतात त्यांचा तीर्थक्षेत्रात किंवा विहिरीस व कूपांना लावण्यासाठी उपयोग झालेला असतो. शेवटी हरिहरांच्या मूर्तीच ज्यांच्या बनविल्या जातात ते उत्तम पाषाण असतात.

**याचा पाहातां विचार। पाषाणऐसें नाहीं सार। मनुष्य तें काये पामर। पाषाणापुढें ।।१७।।**
असा जर विचार केला तर पाषाणासारखे भले कोणी नाही. दगडापुढे मनुष्यच पामराप्रमाणे आहे.

**तरी तो ऐसा नव्हे पाषाण। जो अपवित्र निःकारण। तयासारिखा देह जाण। दुश्चीत अभक्तांचा ।।१८।।**
म्हणून दुश्चित व अभक्त त्यांचा देह वरील प्रकारच्या दगडांसारखा नसतो तर अपवित्र व निरूपयोगी दगडाप्रमाणेच समजावा.

(१) सुचितपणे दुश्चीत – काही वेळ सुचित पुन्हा काही वेळ दुश्चीत – आपण काय करीत आहो, याचे भान न राहाणे. (२) प्रमय – सिद्धान्त.

**आतां असो हें बोलणें। घात होतो दुश्चीतपणें।। दुश्चीतपणाचेनि गुणें। प्रपंच ना परमार्थ।।१९।।**
आता हे बोलणे पुरे, दु:श्चित्तपणामुळे घात होतो. प्रपंच किंवा परमार्थ यापैकी काहीच साधत नाही.
**दुश्चीतपणें कार्य नासे। दुश्चीतपणें चिंता वसे। दुश्चीतपणें स्मरण नसे। क्षण येक पाहातां।।२०।।**
दु:श्चित्तपणामुळे कार्य बिघडते, चिंता मनात राहते आणि बघता बघता स्मरण नाहीसे होते (विस्मरण दोषांची जननीच आहे.)
**दुश्चीतपणें शत्रुजिणें [५]। दुश्चीतपणें जन्ममरणें। दुश्चीतपणाचेनि गुणें। हानी होये।।।२१।।**
चित्त ठिकाण्यावर नसल्यास शत्रूकडून पराभव होतो, दुश्चित्तपणामुळे जन्ममरणाचा फेरा झडत रहातो, अशी हानी होते.
**दुश्चीतपणें नव्हे साधन। दुश्चीतपणें न घडे भजन। दुश्चीतपणें नव्हे ज्ञान। साधकांसी।।२२।।**
दूश्चित्तपणामुळे साधना, भक्ती, ज्ञान साधकांना घडत नाही.
**दुश्चीतपणें नव्हे निश्चयो। दुश्चीतपणें न घडे जयो। दुश्चीतपणें होये क्षयो। आपुल्या स्वहिताचा।।२३।।**
दुश्चित्तपणामुळे मनाचा निश्चय ध्येयसिद्धीसाठी होत नाही. आणि स्वहित ओहोटीला लागते.
**दुश्चीतपणें न घडे श्रवण। दुश्चीतपणें न घडे विवरण। दुश्चीतपणें निरूपण। हातीचें जाये।।२४।।**
दुश्चित्तपणामुळे श्रवण घडत नाही (त्यात विक्षेप येतो), दुश्चित्तपणामुळे (विवरण) अर्थ स्पष्ट करणे घडत नाही हाती आलेले निरूपण व्यर्थ जाते.
**दुश्चीत बैसलाचि दिसे। परी तो असतचि नसे। चंचळ चक्रीं पडिलें असें। मानस तयाचें।।२५।।**
दुश्चित माणूस श्रवणास बसल्यासारखा नुसताच दिसतो पण त्याचे मन विचारांच्या चंचळ चक्रामध्ये अडकलेले असल्यामुळे तो निरूपणात असूनही तेथे नसतो.
**वेडें पिशाच्य निरंतर। अंध मुकें आणी बधिर। तैसा जाणावा संसार। दुश्चीत प्राणियांचा।।२६।।**
वेड्या माणसाच्या, पिशाच्चबाधा झालेल्या माणसाच्या किंवा एखाद्या आंधळ्या, मुक्या आणि बहिऱ्या माणसाच्या संसारासारखा कळाहीन संसार दुश्चित माणसाचा होतो.
**सावध असोन उमजेना। श्रवण असोन ऐकेना। ज्ञान असोन कळेना। सारासारविचार।।२७।।**
तो वरून सावध दिसतो पण त्याला (निरूपण) समजत नाही. तो ऐकत आहे असे वरकरणी दिसते पण त्याला ऐकू येत नाही, ज्ञान आहे असे त्याला वाटते पण सार काय आणि असार काय हे त्याला कळत नाही.
**ऐसा जो दुश्चीत आळसी। परलोक कैंचा त्यासी। जयाचे जिवीं अहर्निशी। आळस वसे।।२८।।**
असा दुश्चित आणि आळशी असतो त्याला परलोकप्राप्ती (किंवा मुक्ती) कशी मिळणार? त्याच्या

(३) वज्रनीळ - हिरा. (४) मोहरे - औषधी मणी.

चित्तामध्ये आळस सदैव भरून राहतो.

**दुश्चीतपणापासूनि सुटला। तरी तो सवेंच आळस आला। आळसाहाती प्राणीयांला। उसंतचि नाहीं।।२९।।**

जर एखाद्याने-दुश्चित्तपणातून सुटका करून घेतली तरी आळस सहजपणाने त्याला येतो. आळसामुळे त्याला अन्य काही करण्यास सवडच होत नाही इतका तो आळसाच्या तावडीत सापडतो.

**आळसें राहिला विचार। आळसें बुडाला आचार। आळसें नव्हें पाठांतर। कांहीं केल्या।।३०।।**

आळसाने विचार सुचत नाही, आचार बिघडतो, पाठांतर काही केले तरी होतच नाही. पाठ करण्याचा कंटाळा येतो.

**आळसें घडेना श्रवण। आळसें नव्हे निरूपण। आळसें परमार्थाची खूण। मळिण जाली।।३१।।**

आळसामुळे श्रवण, निरूपण घडत नसल्याने परमार्थाची वाट मलीन होते (बुजून जाते).

**आळसें नित्यनेम राहिला। आळसें अभ्यास बुडाला। आळसें आळस वाढला। असंभाव्य।।३२।।**

आळसामुळे नित्यनेमाने करण्याच्या गोष्टी राहून जातात, अभ्यास बुडतो, व आळसाने आळस अमर्याद वाढतो. (आळस ही जणू वाढणारी वेल आहे ती उपटून टाकण्यासाठी तरी आळस टाकला पाहिजे नाहितर ती वेल वाढणारच असा आशय)

**आळसें गेली धारणा धृती। आळसें मळिण जाली वृत्ती। आळसें विवेकाची गती। मंद जाली।।३३।।**

आळसाने ग्रहणशक्ती व धैर्य नाहिशी होतात वृत्ती मलिन होते आणि विचार शक्ती खुंटीत होते.

**आळसें निद्रा वाढली।। आळसें वासना विस्तारली। आळसें सुन्याकार जाली। सद्‌बुद्धि निश्चयाची।।३४।।**

आळसामुळे झोपाळूपणा वाढतो. वासना बळावते आणि सद्‌बुद्धी लोप पावल्याने निश्चय होत नाही.

**दुश्चितपणासवें आळस। आळसें निद्राविलास। निद्राविलासे केवळ नास। आयुष्याचा।।३५।।**

दुश्चित्तपणाबरोबर आळस येतो. आळसामुळे निद्रेचा विलास सुरू होतो. आणि झोपाळूपणाच्या गोडीमुळे आयुष्याचा सर्वनाश होतो (असे हे चक्र आहे.)

**निद्रा आळस दुश्चीतपण। हेंचि मूर्खाचें लक्षण। येणेकरितां निरूपण। उमजेचिना।।३६।।**

झोपाळूपणा, आळस आणि दुश्चित्तपणा हेच मूर्खाचे लक्षण आहे. त्यामुळे (श्रवण मनन नसल्यामुळे) निरूपण काही केल्या उमगत नाही.

**हें तिन्हीं लक्षणें जेथें। विवेक कैंचा असेल तेथें । अज्ञानास यापरतें। सुखचि नाहीं।।३७।।**

ही तीनही लक्षणे जेथे असतील तेथे विवेक कसा असेल? अज्ञानी माणसाला तीनही लक्षणांमध्ये सुख वाटते.

(५) शत्रुजिणें - शत्रुकडून जिंकले जाणे.

**क्षुधा लागतांच जेविला। जेऊन उठतां आळस आला। आळस येतां निजेला। सावकास ।।३८।।**
भूक लागली की जेवला. जेवून उठताच आळस अंगात भरला, आळस येताच झोपेने घेरल्यामुळे (सावकाश) स्वस्थपणे झोपला.

**निजोन उठतांच दुश्चीत। कदा नाहीं सावचित। तेथें कैचें आत्महित। निरूपणीं।।३९।।**
झोपेतुन उठल्यावर कधीच एकाएकी चित्त सावध होत नाही म्हणून दुश्चित होतो त्यामुळे असा माणूस निरूपणास गेला तरी आत्महित त्याला साधता येणार नाही.

**मर्कटापासीं दिल्हें रत्न। पिशाच्याहातीं निधान[६]। दुश्चीतापुढें निरूपण। तयापरी होये।।४०।।**
माकडापाधी रत्न दिले किंवा पिशाच्या हाती द्रव्याच्या ठेवा दिला तरी जसे व्यर्थ जाते तसेच दुश्चितांपुढे केलेले निरूपण व्यर्थ होय.

**आतां असो हे उपपत्ती। आशंकेची कोण गती। कितां दिवसा होते मुक्ती। सज्जनाचेनि संगें ।।४१।।**
असो आता अज्ञानलक्षणांचे हे प्रतिपादन पुरे. सज्जनसंगतीमध्ये साधकाला किती दिवसात मुक्ती लाभते या प्रश्नांचे उत्तर काय?

**ऐका याचें प्रत्योत्तर। कथेसि व्हावें निरोत्तर। संतसंगाचा विचार। ऐसा असे ।।४२।।**
याचे उत्तर आता ऐका. श्रोत्यांनी निरूत्तर व्हावे (त्यांचे समाधान व्हावे) याबद्ल संत्संगाबद्दल विचार असा आहे.

**लोहो परीसेसीं लागला। थेंबुटा सागरीं मिळाला। गंगे सरिते संगम जाला। तत्क्षणीं।।४३।।**
लोखंड परिसाला लागले किंवा थेंब समुद्रात मिसळावा, किंवा गंगेशी नदीचा संगम व्हावा त्याप्रमाणे ताबडतोब मोक्ष प्राप्त होतो. (लोखंडाचे परिसस्पर्शाने तत्काळ सोने होते, थेंब सागरात तत्काळ लुप्त होतो.)

**सावध साक्षपी आणी दक्ष। तयास तत्काळचि मोक्ष। उतरांस तें अलक्ष। लक्षिलें नवचे ।।४४।।**
त्याप्रमाणे जो आत्महित साधण्यास तत्पर, साक्षेपी (दिर्घोद्योगी) आणि दक्ष (तत्पर) आहे त्याला मोक्षप्राप्ती तत्काळ होते. ज्या साधकापाशी हे गुण नाहीत त्याला सूक्ष्म साधनेतील अनुभव प्राप्त होत नाहीत.

**येथें शिष्यप्रज्ञाच केवळ। प्रज्ञावंतां नलगे वेळ। अनन्यास तत्काळ। मोक्ष लाभे।।४५।।**
येथे अनुभवासाठी शिष्याची बुद्धीच तयार व्हावी लागते. अशी सूक्ष्मात प्रवेश करणारी बुद्धी असेल त्यास वेळ लागत नाही. अनन्यास मोक्षप्राप्ती होण्यास वेळ लागत नाही.

**प्रज्ञावंत आणी अनन्य। तयास नलगे येक क्षण। अनन्य भावार्थेविण। प्रज्ञा खोटी।।४६।।**
ज्याची बुद्धी सूक्ष्म आहे व जो एकनिष्ठ आहे त्याला मोक्षप्राप्तीसाठी एक क्षण सुद्धा लागत नाही. एकनिष्ठ भावना नसेल तर मात्र प्रज्ञेचेही काही चालत नाही.

**प्रज्ञेविण अर्थ न कळे। विश्वासेंविण वस्तु ना कळे। प्रज्ञाविश्वासें गळे। देहाभिमान।।४७।।**

बुद्धी तयार नसेल तर सद्‌गुरू जे सांगतात त्याचा अर्थ समजत नाही. आणि श्रद्धा दृढ नसेल तर आत्मवस्तूचे आकलन होत नाही. प्रज्ञा आणि विश्वास हे दोन्ही असतील तर देहाभिमान (देहबुद्धी) गळून जातो.

**देहाभिमानाचे अंतीं। सहजचि वस्तुप्राप्ती। सत्संगें सद्‌गती। विलंबचि नाहीं।।४८।।**

देहबुद्धी गळून गेली की वस्तूची प्राप्ती अनायासे होते. सत्संगामुळे उत्तम गति लाभण्यास वेळ लागत नाही.

**सावध साक्षपी विशेष। प्रज्ञावंत आणी विश्वास। तयास साधनीं सायास। करणेंचि नलगे ।।४९।।**

जो सावध, दीर्घोद्योगी, विशेष प्रज्ञावंत असेल आणि दृढ श्रद्धावंत असेल त्याला साधनांचे फार कष्ट करावे लागत नाही.

**उतर भाविक साबडे। तयांसहि साधनें मोक्ष जोडे। साधुसंगें तत्काळ, उडे। विवेकदृष्टी।।५०।।**

इतर जे भोळे भाबडे भाविक असतील त्यांनाही साधनामुळे मोक्ष प्राप्ती होईल मात्र त्या जोडीला सत्संगही असेल तर त्यामुळे साधकाची विवेकदृष्टी प्रकट होईल.

**परी तें साधन मोडूं नये। निरूपणाचा उपाये। निरूपणें लागे सोय।। सर्वत्रांसी।।५१।।**

त्याने नित्याची साधना सोडू नये. निरूपण (अध्यात्मावरील विवरण व श्रवण) सोडू नये. निरूपणामुळे सर्वांनाच लाभ होतो.

**आतां मोक्ष आहे कैसा। कैसी स्वरूपाची दशा। त्याचे प्राप्तीचा भर्वसा। सत्संगें केवी।।५२।।**

पण तो मोक्ष कसा असतो, स्वरूपाची लक्षणे कोणती, आणि सत्संगाने मोक्षाची खात्रीने प्राप्ती होते का?

**ऐसें निरूपण प्रांजळ। पुढें बोलिलें असे सकळ। श्रोतीं होऊनियां निश्चळ। अवधान द्यावें ।।५३।।**

या बद्दल सविस्तर विवेचन पुढे सांगितले आहे. श्रोत्यांनी मनाने निश्चळ होऊन लक्ष द्यावे.

**अवगुण त्यागावयाकारणें। न्यायनिष्ठुर लागे बोलणें। श्रोती कोप न धरणें। ऐसिया वचनाचा ।।५४।।**

अवगुणांचा त्याग व्हावा या दृष्टीने योग्य असेल ते निष्ठूरपणे बोलावे लागते (या समसामध्ये श्रोत्यांना पाषाणाची उपमा द्यावी लागली याबद्दल हा उल्लेख असावा) अशा भाषणाचा श्रोत्यांनी राग मानू नये.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दुश्चीतनिरूपणनाम समास षष्ठ।।६।।

# दासबोध परिचय प्रश्नपत्रिका ९ वी

(दासबोध द. ८ स. ६ वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या ओव्या पूर्ण लिहा.

(६) निधान - खजिना.

१) दुश्चितपणाच्या सोबतीला आळस असेल तर माणसाच्या निद्राविलासाला काय तोटा?

२) दुश्चित माणसाचा संसार एखाद्या वेड्या पिसाटाच्या संसारासारखा किंवा आंधळ्या, मुक्या, बहिऱ्या माणसासारखा होतो.

३) जो सावध, यत्नशील आणि दक्ष असेल त्याला मोक्षश्री सहजपणे प्राप्त होते.

प्र. २ दुश्चितपणाच्या प्रभावामुळे प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही आघाड्यांवर होणाऱ्या हानीची कल्पना देणारे तुमच्या दृष्टीने महत्त्वाचे चार मुद्दे सांगा.

प्र. ३ संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

१) लोहो परीसेसीं लागला। थेंबुटा सागरी मिळाला।।

२) दुश्चीत बैसलासि दिसे। परी तो असतचि नसे।।

प्र. ४ आळसाला उसंत नाही या एरव्ही विरोधाभासासारख्या वाटणाऱ्या गोष्टीतील सत्य समर्थांनी कसे उकलून दाखविले आहे?

प्र. ५ अर्थांतर न पाहाता नुसतेच श्रवण करणाऱ्यांना समर्थांनी प्रथम कशाची उपमा दिली आहे? ती उपमासुद्धा कमी पडते हे त्यांनीच कसे दाखवून दिले आहे

## स्वाध्याय १० वा (द. ११ स. ५ व द. १९ स. ९ वर आधारित)

**स्वाध्याय सारांश :** वास्तविक पाहिले असता धर्मचरणामुळे समाज ताठ मानेने उभा राहिला पाहिजे त्या उलट धर्माचा चुकीचा अर्थं लावल्याने समाजाच्या पाठीचा कणाच मोडल्यासारखा होतो. समर्थांनी हे पाहिले होते. अत्यंतिक निवृत्तिवादाचे जणू काही सारवणच विचारांवर घातले गेल्यामुळे लोक निष्क्रीय झाले होते. लोकांचे व्यक्तिगत संसार दिवाळखोरीचे झाले होते आणि परकी आक्रमण, जुलूम आणि जबरदस्ती हा आपला कर्मभोग समजून लोक शरण जात होते. अशा वेळी लोकांना स्वाभिमानी, शूर बनविणे आणि संकटाशी चांगल्या रीतीने मुकाबला करण्यास त्यांना प्रवृत्त करणे जरूर होते. समर्थांनी हे सर्व केले. परमार्थाची कड घेणारा शूर राजा समर्थांना हवा होता. तो शिवरायांच्या स्वरूपात त्यांना त्या काळी मिळाला. तथापि समर्थांची शिकवण आजही उपयुक्त ठरते.

## द. ११ स. ५ राजकारणनिरूपण

या समासाचे नाव आहे राजकारणनिरूपण. राजकारण हा शब्द श्रीसमर्थ कोणत्या अर्थाने वापरतात

ते सांगणे आवश्यक आहे. लोकसंग्रह करणाऱ्या पुरुषाचा समाजाच्या सर्व अंगांशी संबंध येतो. त्यातले त्यात आपल्या देशामध्ये धर्माला आणि अध्यात्माला विशेष मान असल्यामुळे लोकसंग्रही पुरुषाचा साधुसंत, धर्मसंस्था, राज्यसंस्था आणि अर्थसंस्था यांच्याशी अधिक निकट संबंध येतो. तेव्हा काय आणि आता काय आपल्या देशातील राजकीय पुढाऱ्यांना, मुत्सद्यांना आणि मोठ्या सेनानींना इतकेच नव्हे, तर थोर क्रांतिकारकांना सुद्धा साधुसंतांच्या पाठिंब्याची व आशीर्वादाची गरज भासते, अर्थात एखादा राजकीय पुढारी किंवा मोठा सेनानी एखाद्या साधूकडे वारंवार जाऊ लागला म्हणजे शासनाचे

लक्ष त्या साधुकडे आपोआप जाते. विशेषत: राजा परका असेल तर त्या साधूला राजकीय उपसर्ग सोसण्याची पाळी येणे अशक्य नसते. श्रीसमर्थांच्या काळी राजकीय सत्ता परकी होती. राजे व राजकीय अधिकारी असहिष्णू, क्रूर व अडाणी होते. त्यांच्याशी झुंज देणाऱ्या लोकसंग्रही पुरुषांना श्रीसमर्थांचा पूर्ण पाठिंबा होता. अशा पुरुषांनी कसे वागावे ते सांगताना श्रीसमर्थ राजकारण हा शब्द वापरतात. लोकसंग्रह करण्यास, समाजाचे पुढारीपण गाजविण्यास लागणारे व्यवहारचातुर्य म्हणजे राजकारण होय. राजकीय हालचाल या पुढारीपणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. समाजातील नि:स्वार्थी व चतुर पुरुषांना श्रीसमर्थांनी प्रेरणा दिली आणि लोकसंग्रह कसा करावा, हे समजावून दिले. त्यांपैकी जे राजकारणी बनले त्यांना राजनीतीचा उपदेश करावा लागला. त्यामधील काही भाग दासबोधामध्ये आला आहे.

**द. ११–५ आणि १९–९** या दोन समासांचा गट अभ्यासासाठी निवडण्यात आला आहे. ‘राजकारणनिरूपण’ हे नाव या समासांना आहे. ‘‘समाजातील भिन्न पातळीवरची आणि भिन्न आवाक्याची माणसे एकत्र गोळा करून प्रत्येकाकडून काहीतरी कार्य करून घेण्याच्या कलेला श्रीसमर्थ ‘राजकारण’ हे नाव देतात. अशा अर्थाचे राजकारण हा या समासाचा विषय आहे’’ असे प्रा.के.वि. बेलसरे यांनी समर्थ दासबोधात म्हटले आहे. निस्पृह महंत हा जेव्हा अशा प्रकारे राजकारण करतो तेव्हा तो स्वत: अलिप्त असतो पण त्याच्या कार्यामुळे समाज जीवन निरोगी होते.

॥ श्रीराम ॥

**कर्म केलेंचि करावें। ध्यान धरिलेंचि धरावें। विवरलेंचि विवरावें। पुन्हां निरूपण ॥१॥**

पूर्वी केलेले काम पुन्हा करावे, ईश्वराचे ध्यान पुन्हा करावे आणि निरूपण पूर्वी केले तेच पुन्हा करावे,

**तैसें आम्हांस घडलें। बोलिलेंचि बोलणें पडिलें। कां जें विघडलेंचि, घडले–। पाहिजे समाधान ॥२॥**

तसे आमच्या बाबतीत घडले आहे जे पूर्वी सांगितले तेच बोलावे लागत आहे, त्यामुळे बिघडलेले समाधान श्रोत्यांना पुन्हा लाभावे. ऐकणाऱ्याचे समाधान तात्पुरते असेल तर श्रवणाने पुन्हा त्यांना मिळावे.

**अनन्य राहे समुदाव। उतर जनास उपजे भाव। ऐसा आहे अभिप्राव। उपायाचा ॥३॥**

आपला लोकसंग्रह आपणापाशी एकनिष्ठ राहिला पाहिजे आणि त्या समुहाबाहेरील लोकांच्या मनातही तसा सद्भाव निर्माण झाला पाहिजे असा उपाययोजनेचा हेतू असावा (लोकसंग्रहाचे एक सूत्रच येथे सांगितले आहे).

**मुख्य हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण। तिसरें तें सावधपण। सर्वविषईं ॥४॥**

पहिली मुख्य गोष्ट हरिकथानिरूपण (यामुळे ईश्वरावर लोकांची श्रद्धा बसते) दुसरा क्रम स्वधर्माच्या रक्षणासाठी राजकारणास आणि तिसरी बाब म्हणजे सर्व बाबतीत सावधपणा (महंताने आचार, विचार आणि उच्चार यात गाफील होऊन चालणार नाही नीतीमर्यादा राखणे हेही यात समाविष्ट झाले आहे.)

**चौथा अत्यंत साक्षप। फेडावे नाना आक्षप। अन्याये थोर अथवा अल्प। क्षमा करीत जावे ।।५।।**
न कंटाळता दीर्घउद्योग करणे हे चौथे लक्षण आहे. सत्कार्य करीत असतानासुद्धा लोक नाना प्रकारचे त्याबद्दल आक्षेप घेतात. ते फेटाळून लावू नये तर फेडावे, म्हणजे त्यांनाही समाधान होईल असे पटवून द्यावे. लहान मोठे अन्याय असतील तर त्याबद्दल लोकांना क्षमा करावी. क्षमाशील वृत्ती हा सद्‌गुण लोकसंग्रहाला पोषक आहे.
**जाणावें पराचें अंतर। उदासीनता निरंतर। नीतिन्यायासी अंतर। पडोंच नेदावें।।६।।**
दुसऱ्याचे मनोगत ओळखावे आपण नेहमी अनासक्ती राखावी, न्याय, नीती सोडून आपण कधीच वागू नये.
**संकेतें लोक वेधावा। येकूनयेक बोधावा। प्रपंचहि सांवरावा। येथानशक्त्या ।।७।।**
आपल्या निर्वाज्यवृत्तीची खूण पटून माणूस आकर्षित व्हावा आणि येणाऱ्या प्रत्येकाला यथायोग्य बोध करावा. आपला प्रपंचही सावरून धरावा. दुर्लक्ष करून तो कोसळून देऊ नये.
**प्रपंचसमयो वोळखावा। धीर बहुत असावा। संमंध पडों नेदावा। अति परी तयाचा ।।८।।**
प्रपंचातील कमी जास्त प्रसंग ओळखावे बहूत धैर्याने मार्ग काढावा. गडबडून जाऊ नये पण त्या प्रपंचाचा अतिसंबंध असू नये. अलिप्तता राखावी आपण त्यात वाहून जावू नये.
**उपाधीसी विस्तारावें। उपाधींत न संपडावें। नीचत्व पहिलेंच घ्यावें। आणि मूर्खपण ।।९।।**
आपले व्यापाचे क्षेत्र वाढवावे पण त्या उपाधीत आपण सापडू नये. नेहमी आपणाकडे कमीपणा व अजाणपणा घ्यावा.
**दोष देखोन झांकावे। अवगुण अखंड न बोलावे। दुर्जन सांपडोन सोडावे। परोपकार करूनी ।।१०।।**
इतरांचे दुर्गुण सतत इतरांना सांगत बसू नये. दुर्जन अपराध करताना सापडले तरी त्यांना सोडून द्यावे. मिंधे झाल्यामुळे ते उपद्रव करीत नाहीत (काही वेळा ते सुधारतात हाही भाग आहे.)
**तऱ्हे भरोंच नये। सुचावे नाना उपाये। नव्हे तेंचि करावें कार्ये। दीर्घ प्रेत्नें ।।११।।**
तऱ्हेवाईकपणा करू नये. एककल्लीपणा नसावा. संकटप्रसंगी बाहेर पडण्यासाठी अनेक उपाय विचारपूर्वक शोधावे. जे कार्य घडून येणे अशक्य आहे असे वाटते ते अवघड कार्य मोठा प्रयत्न करून (चिकाटीने) घडवावे.
**फड नासोंचि नेदावा। पडिला प्रसंग सांवरावा। अतिवाद न करावा। कोणीयेकासी ।।१२।।**
सत्कार्यासाठी जमलेल्या समुहात फूट पडू देऊ नये आणि कोसळलेला प्रसंग सावरून धरावा. हे करताना कोणाशीही अतिशय वादावादी करू नये. मर्यादित राहून बाजू मांडावी.
**दुसऱ्याचें अभिष्ट जाणावें। बहुतांचें बहुत सोसावें। न सोसे तरी, जावें–। दिगांतराप्रती ।।१३।।**
दुसऱ्याचे कल्याण कशात आहे ते ओळखावे त्याचे चिंतन करावे. अनेकांसाठी कष्ट सोसावे लोकांचे त्रास सोसवेनासे झाले तर दूर कोठेतरी निघून जावे.

**दु:ख दुसऱ्याचें जाणावें। ऐकोन तरी वांटून घ्यावें। बरें वाईट सोसावें। समुदायाचें ।।१४।।**
दुसऱ्या व्यक्तीला झालेले दु:ख ओळखावे आणि ते ओळखल्यावर त्या दु:खाबद्दल आपल्याही मनात कणव निर्माण होऊन त्या दु:खात वाटेकरी व्हावे. एकंदर समुदायला – समाजाला जे बरेवाईट भोगावयाला लागते त्यामध्ये आपणही भागीदार व्हावे. सामाजिक बांधिलकीची ही भावना महंतात हवीच.

**अपार असावें पाठांतर। सन्निधचि असावा विचार। सदा सर्वदा तत्पर। परोपकारासी ।।१५।।**
पाठान्तर खूप असावे आणि विचारशक्ती जवळ असावी. (पाठ केलेला भाग प्रसंगी आठवला पाहिजे) परोपकार करण्यास सतत तयार असले पाहिजे. (व्यंकटेश स्तोत्रामध्ये तर 'मजलागी देई असा वर । जेणे घडेल पोरपकार।' हे देवाला मागणे मागितले आहे.)

**शांति करून करवावी। तऱ्हे सांडून सांडवावी। क्रिया करूनी करवावी। बहुतांकरवी ।।१६।।**
आपण शांत (तृप्त) असावे आणि लोकांमध्येही शांती पसरवावी आपण चांगली क्रिया करावी पण केवळ आपणापाशीच ही वृत्ती ठेवू नये तर दुसऱ्यालाही सदाचरण करण्यास प्रवृत्त करावे. (सामाजिक बांधिलकीतून अशी क्रिया घडावी **प.दा.अ. उपक्रमाचे ब्रीद वाक्य हाच ओवीचरण आहे.)**

**करणें असेल अपाये। तरी बोलोन दाखऊं नये। परस्परेंचि प्रत्यये। प्रचितीस आणावा ।।१७।।**
एखाद्याच्या घोर अपराधाबद्दल त्याला अपाय घडविणेच असेल तर तसे बोलून दाखवू नये. त्या व्यक्तीला परभारेच तसा प्रत्यय येईल अशी कृती घडावी.

**जो बहुतांचें सोसीना। त्यास बहुत लोक मिळेना। बहुत सोसितां, उरेना–। महत्व आपुलें [१] ।।१८।।**
जो पुष्कळ लोकांचे सोशीत नाही त्याला लोक अनुकूल होत नाहीत पण सर्वच जर सोशीत राहिले तर आपले महत्वच उरत नाही हेही ओळखावे.

**राजकारण बहुत करावें। परंतु कळोंच नेदावें। परपीडेवरी नसावें। अंत:करण ।।१९।।**
राजकारण पुष्कळ करावे पण ते उघडपणाचे नसावे त्यामागे दुसऱ्याचे दु:ख देण्याचा हेतू असता कामा नये.

**लोक पारखून सांडावें। राजकारणें अभिमान झाडावे। पुन्हा मेळवून घ्यावें। दुरील दोरें ।।२०।।**
लोकांचे अंतरंग ओळखावे आणि दुराभिमान राजकारणाने (धूर्तपणाने वागून) घालवावे आणि पुन्हा युक्तीने दूरच्या धाग्याने ओढून त्यांना जवळ करावे.

**हिरवटासी दुरी धरावें। कचरटासी न बोलावें। समंध पडतां, सोडून जावें–। येकीकडे ।।२१।।**
भांडकुदळ असेल तर आपणापासून दूर ठेवावे. घाबरटाशी मनसुबे बोलू नयेत. अशांचा संबंध येऊ लागला तर आपणच तेथून प्रस्थान करावे.

**ऐसें असो राजकारण। सांगतां ते असाधारण। सुचित अस्तां अंत:करण। राजकारण जाणे ।।२२।।**

अशा प्रकारचे राजकारण असावे. ते सांगू लागल्यास संपतच नाही. अंत:करण जर सावध असेल तरच राजकारणाचा विचार समजतो.

**वृक्षींरूढासी उचलावें। युद्धकर्त्यास ढकलून द्यावें। कारबाराचें सांगावें। आंग कैसें।।२३।।**

जो प्राण भयाने वृक्षावर चढून बसला असेल तर त्याला तेथून सोडवावे. आणि जे युद्धकर्ते असतील त्यांना दूर करावे. अशा कारभाराची लक्षणे कशी सांगता येतील.

**पाहातां तरी सांपडेना। कीर्ति करूं तरी राहेना। आलें वैभव अभिळासीना। कांहीं केल्या।।२४।।**

पण हे सर्व घडविणारा महंत असा असावा की त्याचा शोध घेतला तरी तो सापडत नाही पण तो किर्ती प्राप्त केल्याविना राहत नाही. त्याची निरपेक्षता अशी असते की जर वैभव त्याच्याकडे आपोआप पायाशी लोळण घालू लागले तरी त्याची अभिलाषा त्याला होत नाही.

**येकांची पाठी राखणें। येकांस देखों न सकणें। ऐसीं नव्हेत कीं लक्षणें चातुर्याचीं।।२५।।**

एखाद्याची सारखी पाठराखण करणे आणि दुसऱ्या एखाद्याला डोळ्यासमोर देखील येऊ द्यावयाचेच नाही हे चातुर्याचे लक्षण नव्हे. (लोकसंग्रह करण्याची अशी कितीतरी सूत्रे श्रीसमर्थ सांगून जातात.)

**न्याय बोलतांहि मानेना। हित तेंचि न ये मना। येथें कांहींच चालेना। त्यागेंविण।।२६।।**

ज्याला न्यायाची बाजू सांगितली तरी तो मानत नाही, हिताचा मार्ग हा न्यायमार्ग असतो पण तो ज्याला आवडत नाही अशाची गाठ पडली असता त्याचा त्याग करावा त्याविना गत्यंतरच नसते.

**श्रोतीं कळोन आक्षेपिलें। म्हणोन बोलिलेंचि बोलिलें। न्यूनपूर्ण क्ष्मा केलें। पाहिजे श्रोतीं।।२७।।**

श्रोत्यांना हे ठाऊक असूनसुद्धा त्यांनी शंका घेतली म्हणुन पूर्वी सांगितलेलेच पुन्हा सांगितले त्यात काही कमी अधिक असल्यास श्रोत्यांनी क्षमा करावी.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे राजकारणनिरूपणनाम समास पंचम।।५।।

## द. १९ स. ९ : राजकारणनिरूपण

जगामध्ये अनेक कला आहेत, त्यांचे दोन विभाग करता येतात. (पहिला विभाग) निर्जीव पदार्थ हाताशी धरायचा, त्यावर आपल्या कलेचा संस्कार करायचा आणि त्यातून सुंदर कलाकृती निर्माण करायची. उदा. एखादा शिल्पकार एक मोठा ओबडधोबड काळा पाषाण घेतो, त्यावर आपल्या हत्याराचे आघात करतो आणि काही दिवसांनी त्या पाषाणामधून पांडुरंगाची मनोहर मूर्ती साकार करतो. (दुसरा विभाग) सजीव प्राणी हाताशी धरायचा, त्याच्या मनावर आपल्याला हवे ते आणि हवे तसे संस्कार करायचे आणि त्याच्या मनात व शरीराच्या वागणुकीत कौतुक निर्माण करतील असे बदल घडवून आणायचे. प्राण्यांपैकी हत्ती, घोडे, कुत्री, मांजरे, माकडे, अस्वले आणि वाघ व सिंह हे हिंस्त्र पशूदेखील आपल्या हाताखाली वागवणे सोपे नसले तरी कांही कठीण नाही, पण आपल्यासारखीच विचारशक्तीने संपन्न असलेली माणसे आपल्याला हवी तशी वागवून आपल्या व त्यांच्या जीवनात

(१) बहुत सोसिता उरेना महत्त्व आपुले – फारच सहनशीलता दाखविली तर तिकडूनही आपले महत्त्व कमी होण्याचा संभव असतो.

खेळाचा आनंद निर्माण करणे, हे मात्र अतिशय कठीण आहे. समाजामधील भिन्न प्रकृतीची, भिन्न पातळीवरची आणि भिन्न आवाक्याची माणसे एकत्र गोळा करून प्रत्येकाकडून काहीतरी कार्य करून घेण्याच्या कलेला श्रीसमर्थ राजकारण असे नाव देतात. अशा अर्थाचे राजकारण हा या समासाचा विषय आहे. श्रीसमर्थ सांगतात की, जो ज्ञानी आहे, अगदी निष्काम आहे, तसेच जो अलिप्त वृत्तीचा आहे, त्याला जर समूहजीवनाची हौस असेल, तर त्याने लोकसमुदाय बनवावा. प्रथम एकांतामध्ये बसून कोणते कार्य करायचे, त्याची योजना आखावी. जनतेमध्ये उपासना खूप वाढवावी. नष्टाला नष्ट म्हणून हिणवू नये, वाचाळाला वाचाळ म्हणू नये. दुर्जनाला अपलासा करून सन्मार्गाला लावावे. चोरालाच भांडारावर मुख्य नेमावे. कांही ठिकाणी परस्पर काट्याने काटा काढावा, पण आपण अलिप्त राहावे. आपण स्वत: कष्ट करावे व इतरांना कष्ट करण्यास शिकवावे. जशास तसा भेटवून प्रकरणे निकालात काढावी. समाजामधील गुंडगिरी साफ मोडून काढावी. अशा रीतीने मोठ्या धूर्तपणाने राजकारण करावे; परंतु आपण मात्र सर्वातून अलिप्तपणे अलग राहावे.

।।श्रीराम ।।

**ज्ञानी आणी उदास। समुदायाचा हव्यास। तेणें अखंड सावकाश। येकांत सेवावा ।।१।।**
एखादा आत्मज्ञानी असून अलिप्त वृत्तीचा पुरूष असेल तर बहुधा लोकसंग्रह करण्याची हौस त्याला नसते. पण एखाद्याला तशी हौस असेल तर त्याने एकान्ताचे सेवन अखंड करावे.

**जेथें तजवीजा कळती। अखंड चाळणा निघती। प्राणीमात्रांची स्थिती गती। कळों येते ।।२।।**
कारण एकान्तामध्ये विचार करताना अनेक श्रेयस्कर मार्ग सुचतात (विचारांच्या चाळणीतून मार्ग सापडतात) प्राणीमात्रांची आजची स्थिती काय? व भावी गति काय याची नीट समजूत येते.

**जरी हा चाळणाचि करीना। तरी कांहींच उमजेना। हिसेबझाडाचि पाहीना। दिवाळखोर ।।३।।**
अशा प्रकारे जर त्याने विचार केला नाही तर त्याला काहिच उमजणार नाही. पण जमा-खर्चाचा विचार न करणाऱ्या दिवाळखोरासारखी त्याची अवस्था होईल. महंताला वैचारिक दिवाळखोरी प्राप्त होईल.

**येक मिरासी साधिती। येक सीध्या गवाविती[१]। व्यापकपणाची स्थिती। ऐसी आहे ।।४।।**
कोणी विचारपूर्वक वागू न जमिनीचे हक्क मिळवितात तर कोणी असलेले हक्कही गमावून बसतात. व्यापकपणे उद्योग करणाऱ्यांची स्थिती पुढीलप्रमाणे असते. (काहिजण व्यवस्थापन शास्त्र जमून ते उद्योगपती होतात तर काही धंद्यात ठोकर खातात.)

**जेणें जें जें मनीं धरिलें। तें तें आधींच समजलें। कृत्रिम अवघेंचि खुंटलें। सहजचि येणें ।।५।।**
दुसऱ्याच्या मनातील विचार जर आधिच समजले तर त्याचा कपट करण्याचा मार्ग साहजिकच खुंटतो.)

**अखंड राहातां सलगी होते। अतिपरिचयें अवज्ञा घडते। याकारणे विश्रांतीते। घेतां नये ।।६।।**
लोकांच्या संगतीत अखंडपणे राहिल्यास अतिसलगी होते. त्यामुळे अतिपरीचयाने अवज्ञा घडते. यासाठी महंताने एकाच ठिकाणी विश्रांती घेत राहू नये.

**आळसें आळस केला। तरी मग कारबारचि बुडाला। अंतरहेत चुकत गेला। समुदायाचा ।।७।।**

एखादी गोष्ट सतत केल्याने सवय होते त्याप्रमाणे आळसाने आळसही वाढतो. त्यामुळे कारभार बिघडून जातो. लोकसंग्रह करण्याचा जो अंतरामध्ये हेतू असतो तो साधत नाही.

**उदंड उपासनेचीं कामें। लावीत जावीं नित्यनेमें। अवकाश कैंचा, कृत्रिमें–। करावयासी ।।८।।**

महंताने समुदायाच्या मागे नित्य उपासनेची इतकी काही कामे सोपवून द्यावीत की खरेखोटे (किंवा गैरसमज) वाढविण्यास कोणास वेळच राहणार नाही. रिकामटेकडी माणसे लोकसंग्रहाला घातक ठरतात.

**चोर भांडारी करावा। घसरतांच सांभाळावा। गोवा मूर्खपणाचा काढावा। हळु हळु ।।९।।**

चोरालाच भांडारगृहाचे काम सांगावे आणि तेथे तो घसरू लागला तर समज देऊन पुन्हा सांभाळून घ्यावे त्याच्या चित्तातील मूर्खपणाच्या स्वार्थी विचारांचे गुंते सोडवावे.

**या अवघ्या पहिल्याच गोष्टी। प्राणी कोणी नव्हता कष्टी। राजकारणें मंडळ वेष्टी। चहुंकडे ।।१०।।**

या सर्व गोष्टी जुन्याच आहेत त्यात नवे असे काहिच नाही. कोणालाही पीडा न देता त्याला राजकारणात युक्तीने गुंतवावे. (भिन्न प्रकृतीची वा प्रवृत्तीची माणसे असणारच पण राजकारणात त्यांचा उपयोग असतो असे पुढे सुचविले आहे.)

**नष्टासी नष्ट योजावे। वाचाळासी वाचाळ आणावे। आपणावरी विकल्पाचे गोवे। पडोंच नेदी ।।११।।**

नष्टावर नष्ट नेमावे. वाचाळांची तोंडे बंद करण्यास तसे वाचाळच उभे करावे (आपण स्वत: दुष्ट होऊ नये किंवा वाचाळही होण्याची गरज नाही. आपणावर कोणाचाही संशय येऊ नये असे अलिप्तपण सांभाळावे).

**काटीने कांटी झाडावी। झाडावी परी तें कळों नेदावी। कळकटेपणाची पदवी। असों द्यावी ।।१२।।**

काट्याने काटा इतक्या सहजपणे काढावा की त्याची जाणही कोणास येऊ नये. आपणावर भांडकुदळपणाची पदवी लागू नये.

**न कळतां करी कार्य जें तें। तें काम तत्काळचि होतें। गचगचेंत पडतां तें। चमत्कारें नव्हे ।।१३।।**

फारशी वाच्यता न करता जे काम होते, त्याला विलंब लागत नाही. एखाद्या गोष्टीची चवाट्यावर चर्चा झाली की कामातली नवलाई निघून जाते.

**ऐकोनी आवडी लागावी। देखोनि बळकटचि व्हावी। सलगीनें आपली पदवी। सेवकांमधें ।।१४।।**

महंताबद्दलची किर्ती येकून लोकांना (आकर्षण किंवा) प्रेम निर्माण व्हावे आणि त्याला पाहून ते वाढीला

(१) गवाविती – गमाविती.

लागावे. त्याची संगती वाढता वाढता आपणही त्याच्या सेवकात सामावले जावे असे लोकांना वाटावे अशा प्रकारे लोकसंग्रह वाढविण्याचे आणखी एक सूत्र येथे दिले आहे.

**कोणी येक काम करितां होतें। न करितां तें मागें पडतें। याकारणें ढिलेपण तें। असोंचि नये ।।१५।।**

कोणतेही लहान मोठे काम केले तरच ते होते, केलेच नाही तर मागे राहून जाते म्हणून कोठेही कामात ढिलेपणा ठेवू नये.

**जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला। जो आपणचि कष्टत गेला। तोचि भला ।।१६।।**

जो इतरांवर कामासाठी विसंबून राहतो त्याचा कार्यभाग होत नाही. जो आपण स्वत: कष्ट घेतो तोच शहाणा समजावा. या ओवीतील अर्धा भाग मराठीतील एक वाक्प्रचार झाला आहे.

**अवघ्यास अवघें कळलें। तेव्हा तें रितें पडिलें। याकारणें ऐसें घडलें। न पाहिजे कीं ।।१७।।**

एखाद्या कामाचा जेवढा भाग एखाद्याकडून करून घ्यावयाचा तेवढीच माहिती त्याला द्यावी. कामाच्या सर्व भागांची माहिती सर्वांना दिली जाणे जरूरी नाही. तसे घडले तर ते काम मागे पडते. म्हणजे काम पद्धतशीर होत नाही. कार्यव्यवस्थापनेचे हे एक तत्व जाणत्याने माहिती करून घ्यावे.

**मुख्य सूत्र हातीं घ्यावें। करणें तें लोकांकरवीं करवावें। कित्तेक खलक[२] उगवावें[३]। राजकारणामधें ।।१८।।**

जे महत्कार्य करावयाचे असेल त्याचे मुख्य सूत्र आपल्या हाती ठेवावे आणि जे करावयाचे असेल ते लोकांकरवी करावे. किती तरी सामान्य माणसे हाती धरावी त्यांना धूर्तपणाने वागून कार्य करण्याचे धडे द्यावेत

**बोलके पहिलवान कळकटे। तयासीच घ्यावे झटे। दुर्जनें राजकारण दांटे। ऐसें न करावें ।।१९।।**

जे भांडखोर बडबड करणारे पहिलवान असतील त्यांच्याशी हिंमतीने झुंज देऊन त्यांना पराभूत करावे. दुर्जन लोकांच्या विरोधामुळे आपले राजकारण अडून पडू देऊ नये. (बडबड्या माणसाच्या हातून कृती फारशी होत नाही अशा पोकळ लोकांचा विरोध नष्ट करावयास हवा)

**ग्रामण्य[४] वर्मी सांपडावें। रगडून पीठचि करावें। करूनि मागुती सांवरावें। बुडऊं नये ।।२०।।**

ग्रामकंटक किंवा गावगुंड लोकांचे वर्म ओळखून त्यांना कैचीत सापडवावे त्यांना निस्तेज करावे पण पूर्णपणे बुडवून न टाकता पुन्हा सावरावे, ऋणी करून आपलेसे करावे.

**खळदुर्जनासी भ्यालें। राजकारण नाहीं राखिलें। तेणें अवघें प्रगट जालें। बरें वाईट ।।२१।।**

खळदुर्जनांना भिऊन जाऊन जर आपले राजकारण (समाजउन्नयाचे कार्य किंवा धर्मरक्षणाचे कार्य) सांभाळले नाही तर बरेवाईट उघडकीला येऊन कार्यनाश होईल, असा या ओवीचा अर्थ होतो. दुसरा अर्थ असाही निघतो दुर्जनांना घाबरून लोकांनी धूर्तपणाने त्यांना तोंड दिले नाही म्हणूनच देशाची ही दुरावस्था झाली आहे, असे श्री समर्थांना म्हणावयाचे आहे. (बरेवाईट हा शब्द 'वाईट' या अर्थीच

वापरला जातो उदा. विमा एजंट म्हणतात माणसाचे बरेवाईट कोणत्या क्षणी होईल सांगता येत नाही म्हणून विमापॉलिसी खरेदी करावी.)

**समुदाव पाहिजे मोठा। तरी तनावा[५] असाव्या बळकटा। मठ करुनी, ताठा–। धरूं नये ।।२२।।**

मोठा लोकसंग्रह करावयाचा असेल तर सावरून धरणारे नियम रूपी (तणाव) रज्जू बळकट असले पाहिजेत मठ करून राहून तोऱ्यात राहून चालणार नाही.

**दुर्जन प्राणी समजावे। परी ते प्रगट न करावे। सज्जनापरीस आळवावे। महत्त्व देउनी।।२३।।**

दुर्जन लोक कोण आहेत हे मनात ओळखून ठेवावे पण समाजात उघड करू नये. उलट सज्जनांपेक्षा त्यानाच महत्व देऊन त्यांची (नाट्यमय) आळवणी करावी.

**जनामधें दुर्जन प्रगट। तरी मग अखंड खटखट। याकारणें ते वाट। बुझून टाकावी।।२४।।**

कारण लोकांमध्ये ते दुर्जन असल्याचे सांगितले तर नेहमीच आपल्या मार्गात कटकटी आणतात म्हणून त्यांची ती वाटच बुजवून टाकावी.

**गनीमाच्या देखतां फौजा। रणशूरांच्या फुर्फुरिती भुजा। ऐसा पाहिजे कीं राजा। कैपक्षी परमार्थी ।।२५।।**

दुर्जन शत्रुंच्या फौजा पाहून रणशूराचे बाहू सामना देण्यासाठी स्फुरण पावू लागतात. राजासुद्धा असाच परमार्थी सज्जनांचा कैवार घेणारा असला पाहिजे. त्याच्यापाशी हिंमत हवी.

**तयास देखतां दुर्जन धाके। बैसवी प्रचीतीचे तडाखे। बंड पाषांडाचे वाखे[६]। सहजचि होती ।।२६।।**

त्याला पाहताच दुर्जनांना धाक वाटावा. तो आपल्या शक्तीची प्रचीती येईल असे तडाखे देतो त्यामुळे नास्तिकांचा किंवा बंडाचा पाडाव होतो.

**हे धूर्तपणाची कामें। राजकारण करावें नेमें। ढिलेपणाच्या संभ्रमें। जाऊं नये।।२७।।**

ही कामे धूर्तपणाने करावयाची आहेत. राजकारण अगदी व्यवस्थितपणाणे महंताने करावे. उगीच ढिलेपणाच्या संभ्रमाने वागू नये.

**कोठेंच पडेना दृष्टीं। ठाईं ठाईं त्याच्या गोष्टी। वाग्विळासें सकळ सृष्टी। वेधिली तेणें।।२८।।**

असा तो महंत सर्व परिवर्तन घडवीत असूनही लोकांना सहज आढळत नाही, तरीपण जागोजागी त्याच्या सद्गुणाबद्दल लोक बोलत असतात. आपल्या मधुर वाणीने तो सर्व लोकांना आकृष्ट करून घेतो.

**हुंब्यासीं हुंबा लाऊन द्यावा। टोणप्यास टोणपा आणावा। लौंदास पुढें करावा। दुसरा लौंद ।।२९।।**

रडक्याची जोड रडक्याशी, मुर्खाची जोड मुर्खाशी घालून द्यावी. धटिंगणापुढे दुसरा धटिंगणच उभा करावा.

**धटासी आणावा धट। उत्धटासी पाहिजे उत्धट। खटनटासी खटनट। अगत्य करी।।३०।।**

---

(२) खलक – कारस्थानी लोक. (३) उगवावे – राजकारणात ज्याचा जितका उपयोग करून घेण्यासारखा असेल तितका घ्यावा. (४) ग्रामण्य – गावगुंड.

दांडग्यापुढे तसलाच दांडगा, उद्धटापुढे उद्धटच पाहिजे, दुष्ट भांडखोरापुढे तसलाच दुष्ट भांडखोर अवश्य उभा केला पाहिजे.

**जैशास तैसा जेव्हां भेटे। तेव्हां मज्यालसी थाटे। इतुकें होतें परी धनी कोठें। दृष्टीस न पडे ।।३१।।**

थोडक्यात जशास तसा भेटला म्हणजे त्यांची सभा रंगतदार होते पण इतके झाले तरी ते परस्परच होते. मुख्यकर्ता धनी मात्र कोठेच दिसत नाही. (महंताने स्वत: योजनापूर्वक अशा व्यवहारामध्ये अलिप्तपणा राखला पाहिजे.)

**रसग्रहण :** श्रीसमर्थांच्या काळी राजकीय सत्ता यवनांच्या हाती गेली होती त्यांच्या असहिष्णू, क्रूर, पाताळयंत्री अंमलामध्ये हिंदूची उपासना पध्दती धोक्यात आली होती. त्यामुळे महंतांच्या समुहाला काहीसा वेगळा उपदेश द्यावा लागला. लोकसंग्रह गुप्तपणे करून त्याला मार्गदर्शन करण्यास महंताने कसे वागावे याचे परखड मार्गदर्शन येथे घडते.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे राजकारणनिरूपणनाम समास नवम।।९।।

# दासबोध परिचय : प्रश्नपत्रिका १० वी

(दासबोध द. ११ स. ५ आणि द. १९ स. ९ वर आधारित)

प्र. १ समर्थांच्या जीवनविषयक चतु:सूत्रीमधील राजकारणाचा क्रम सांगणारी ओवी लिहा.

प्र. २ दासबोधातील ओव्यांचे आधारेच, राजकारण कसे असावे आणि कसे नसावे ते स्पष्ट करा.

प्र. ३ समुदायाच्या हव्यासासाठी एकांतसेवन आवश्यक असते, हे प्रमेय समर्थांनी कसे मांडले आहे?

प्र. ४ ''येक मिरासी साधिती। येक सीध्या गवाविती। व्यापकपणाची स्थिती। ऐसी आहे।'' या ओवीचा अर्थ पाच ओळीत स्पष्ट करा.

प्र. ५ समर्थ रामदास हे केवळ भक्तिमार्गी होते की राजकारणी महंत होते? की या दोहोंपेक्षा वेगळेच त्यांचे व्यक्तिमत्व होते? आपणास या संबंधात काय वाटते, ते लिहा.

## स्वाध्याय ११ वा (द. १८ स. ७ आणि १८ स. ८ वर आधारित)

**स्वाध्याय सारांश :** या स्वाध्यायासाठी द. १८-७ जनस्वभावनिरूपण आणि द. १८-८ अंतर्देवनिरूपण हे दोन समास आहेत. श्रीसमर्थांनी जनस्वभावाचे परीक्षण प्रारंभीच अगदी मोजक्या शब्दात केले आहे. देवाची उपासना करावयाची नाही आणि त्याच्याकडे 'मागण्या' मात्र मागावयाच्या; नवस करावयाचे ही वृत्ती समर्थकालीन लोकांमध्ये वाढली होती, तशी आजही वाढलेली आहे तिचे निराकरण करणे आणि खऱ्या देवाला ओळखून त्याचे ध्यान करावयाचा उपदेश या दोन समासांमध्ये आहे. केवळ तीर्थाटन करून समाधान मिळत नाही. सत्संग, सद्विचार यांचा अवलंब करण्याचा मार्ग

(५) तनावा – ताणदोर. (६) वाखे होती – नाहीसे होतात.

येथे सांगितला आहे. या दोन समासांमध्ये इहलोक आणि परलोक या दोहोंसंबंधी श्रीसमर्थांचे अत्यंत बहुमोल मार्गदर्शन आपणास लाभणार आहे.

## द. १८ स. ७ : जनस्वभावनिरूपण

सामान्य माणूस अत्यंत स्वार्थी असतो. देवदेखील त्याला आपल्या स्वार्थासाठी हवा असतो. माणसाचा स्वभाव असा की, त्याला कष्ट करायला नकोत, पण त्याचे फळ तेवढे हवे. या कर्मभूमीचा नियम असा आहे की, येथे कष्टावाचून फळ मिळत नाही. ज्यांनी सपाटून कष्ट केले व जे विवेकाने वागले, तेच भाग्य भोगून गेले. प्रपंचात व परमार्थात दोन्हीकडे विवेक सारखा आहे. देवाचे कर्तेपण खरे कसे आहे, ते विवेकाने नीट समजून घ्यावे. ज्या माणसात विचार नाही, त्याच्यामध्ये काही अर्थ नाही. विचाराने प्रपंच व परमार्थ दोन्ही साधता येतात. विवेकाने देवाची प्राप्ति होते.

लोकांना देव हवा पण तो कशाकरिता? तर चित्तांतील काहीतरी अभिलाषा पूर्ण करण्याकरिताच! हे प्रथम श्रीसमर्थ येथे सांगतात आणि मागाहून सज्जनांच्या संगतीमध्ये विवेकजागृती करून घ्यावी व खऱ्या देवाचा शोध घ्यावा असे सांगत आहेत.

॥ श्रीराम ॥

**जनाचा लालची स्वभाव। आरंभींच ह्मणती देव[१]। ह्मणिजे मला कांही देव। ऐसी वासना ॥१॥**

लोकांचा स्वभाव लोभी असतो ते कार्याच्या आरंभी 'देव' म्हणतात. देवाचे स्मरण करतात पण तेव्हा देवाने मला काही द्यावे हीच वासना त्यामागे असते.

**कांहींच भक्ती केली नस्तां। आणी उछिती प्रसन्नता। जैसें कांहीच सेवा न करितां। स्वामीस मागती ॥२॥**

देवाची भक्ती करीत नाहित आणि प्रसन्नता (कृपा) आपल्यावर रहावी अशी इच्छा धरतात. धन्याची काहीच चाकरी न करता पगार मागण्याप्रमाणेच हे आहे.

**कष्टेंविण फळ नाहीं। कष्टेंविण राज्य नाहीं। केल्याविण होत नाहीं॥ साध्य जनीं॥३॥**

वास्तविकपणे कष्ट केल्यावाचून फळ मिळत नाही. कष्टावाचून राज्य मिळविता येत नाही. कष्ट केल्याविना जगात काहीच साध्य होत नाही असा नियम आहे.

**आळसें काम नासतें। हें तों प्रत्ययास येतें। कष्टाकडे चुकावितें। हीन जन॥४॥**

आळसामुळे काम नीट होत नाही याचा प्रत्यय येतो पण हीन वृत्तीची माणसे आळसामुळे कष्ट करणे चुकवितात

**आधीं कष्टाचें दुःख सोसिती। ते पुढें सुखाचें फळ भोगिती। आधीं आळसें सुखावती। त्यासीं पुढे दुःख॥५॥**

आधी कष्ट करण्याचे दु:ख सोसतात त्यांनाच नंतर सुखाचे फळ मिळते. आधीच जे आळस करतात

आणि सुखावतात त्यांना नंतर दु:खाचे ताट वाढून ठेवलेले आहेच.

**येहलोक अथवा परलोक। दोहिंकडे सारिखाचि विवेक। दीर्घसूचनेचें कौतुक। कळलें पाहिजे ।।६।।**

इहलोक असो किंवा परलोक दोन्हीकडे विवेक सारखाच हवा तरच यश मिळेल दूरदर्शीपणा (दिर्घसूचना) राखून वागण्यामध्ये मिळणारा आनंद समजला पाहिजे. दूरदृष्टी (म्हणजे दूरवरचा विचार) महत्वाचा असतो.

**मेळविती तितुकें भक्षिती। ते कठीण काळीं मरोन जाती। दीर्घसूचनेनें वर्तती। तेचि भले ।।७।।**

जेवढे मिळवले तेवढे सगळेच खाऊन संपविले अशी माणसे कठीण प्रसंगी मरून जातात. जे दूरदृष्टी ठेवतात तेच शहाणे होत.

**येहलोकींचा संचितार्थ[२]। परलोकींचा परमार्थ। संचितेंविण[३] वेर्थ। जीत मेलें[४] ।।८।।**

इहलोकांमध्ये जीवनात द्रव्यसंचय उपयुक्त ठरतो, तर परलोक साधण्यासाठी परमार्थ उपयोगी असतो. (परमार्थातूनच पुण्यसंचय होतो.) अशा दोन्ही प्रकारे संचय जो करीत नाही त्याचे जीवन व्यर्थ होय! तो जिवंत असून मृतवत् आहे.

**येकदां मेल्यानें सुटेना। पुन्हां जन्मोजन्मीं यातना। आपणांस मारी, वांचविना–। तो आत्महत्यारा ।।९।।**

एकदा मरून मनुष्य फेऱ्यातून सुटत नाही. जन्मोजन्मी त्याला यातना भोगाव्या लागतात. स्वत:ला वाचवीत नाही म्हणून त्याला आत्महत्यारा किंवा आत्मघातकीच म्हटले पाहिजे.

**प्रतिजन्मीं आत्मघात। कोणें करावें गणीत। याकारणें जन्ममृत्य। केंवी चुके ।।१०।।**

प्रत्येक जन्मात तो आत्मघात करतो त्यामुळे त्याच्या या पापांची मोजदाद कशी करावी ? त्यामुळे त्याचे जन्म-मरण कसे चुकेल, त्याला मुक्ती कशी लाभेल बरे!

**देव सकळ कांहीं करितो। ऐसें प्राणिमात्र बोलतो। त्याचे भेटींचा लाभ तो। अकस्मात जाला ।।११।।**

देव सर्वकर्ता असल्याचे प्रत्येकजण म्हणतो पण अशा वागण्याने त्याच्या भेटीचा एकाएकी लाभ कसा होणार?

**विवेकाचा लाभ घडे। जेणें परमात्मा ठाउं पडे। विवेक पाहातां सांपडे। विवेकी जनीं ।।१२।।**

विवेकाचा लाभ झाला तर त्यामुळेच परमात्म्याची भेट होईल. विवेकी सज्जन्नांच्या संगतीतच विवेकाची दृष्टी येते.

**देव पाहातां आहे येक। परंतु करितो अनेक। त्या अनेकांस येक। म्हणों नये कीं ।।१३।।**

तसे पाहता देव एकच आहे पण तो अनेक दैवते निर्माण करतो त्या अनेकांना मुख्य देव मानू नये.

**देवाचें कर्तुत्व आणि देव। कळला पाहिजे अभिप्राव। कळल्याविण कितेक जीव। उगेच बोलती ।।१४।।**

(१) देव - द्यावे.

देव आणि त्याने केलेली निर्मिती किंवा कर्तृत्व त्यातील अंतर समजले पाहिजे. ते न समजताच कितीतरी माणसे उगाचच मुख्य देवाबद्दल मूर्खाप्रमाणे बोलतात.

**उगेच बोलती मूर्खपणें। शाहाणपण वाढायाकारणें। त्रुप्तिलागीं उपाव करणें। ऐसें जालें ।।१५।।**

आपला शहाणपणा मिरविण्यासाठी लोक मुख्य देवाबद्दल वेड्यासारखं बोलतात. भूक तृप्त होण्यासाठी अन्न खावे हा उपाय सोडून अन्य काहीतरी उपाय करावेत तसेच हे घडते.

**जेहिं उदंड कष्ट केले। ते भाग्य भोगून ठेले। येर ते बोलतचि राहिले। करंटे जन।।१६।।**

जे उदंड कष्ट करतात ते भाग्य भोगतात, भाग्यवान होतात. बाकीचे करंटे लोक नुसते बडबडतच राहतात. हे एक त्रिकालाबाधीत सत्य श्रीसमर्थ येथे सांगत आहेत.

**करंट्याचें करंट लक्षण। समजोन जाती विचक्षण। भल्याचें उत्तम लक्षण। करंट्यास कळेना ।।१७।।**

शहाणे लोक करंट्याचे लक्षण किंवा तो करंटा होण्याचे कारण समजतात, पण भाग्यवंतांचे लक्षण करंट्यास कळत नाही.

**त्याची पैसावली[५] कुबुद्धी। तेथें कैंची असेल शुद्धी। कुबुद्धी तेचि सुबुद्धी। ऐसी वाटे।।१८।।**

कारण त्याची दुर्बुद्धी खूपच विस्तारलेली असते तेथे शुद्धता कशी असणार? आणि जी वाईट बुद्धी तीच चांगली आहे असे त्यास वाटते.

**मनुष्यशुद्धीस[६] सांडावें। त्याचें काये खरें मानावें। जेथें विचाराच्या नांवें। सुन्याकार।।१९।।**

ज्याची बुद्धी शुद्धीवर नाही त्याचे बरळणे खरे कसे मानावे? कारण तथे विचाराच्या नावे शून्यच असते.

**विचारें यहलोक परलोक। विचारें होतसे सार्थक। विचारें नित्यानित्यविवेक। पाहिला पाहिजे ।।२०।।**

केवळ विचारांच्या योगाने इहलोक व परलोक साधतो. विचारांनेच जीवनाचे सार्थक होते. शाश्वत काय आणि अशाश्वत काय याचा विचार केला पाहिजे. विवेकाची महती अशा शब्दात सांगून हा समास संपवितात.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे जनस्वभावनिरूपणनाम समास सप्तम।।७।।

## द. १८ स. ८ : अंतर्देवनिरूपण

देव शोधायला जावे तर देवाचा पत्ता लागत नाही. क्षेत्रातील देव झाले, प्रतिमा झाल्या, अवतार झाले. या सर्वांवर एका अंतरात्म्याची सत्ता चालते. तोच खरा कर्ता व भोक्ता आहे. विचाराने त्याचा शोध घ्यावा. माणसाच्या अंतर्यामी जी शुद्ध जाणीव असते, तोच खरा देव होय. तीर्थामध्ये अखेर धोंडापाणीच असते. देव सत्संगात सापडतो. आपल्या अंतरंगाचा वेध घेणारा माणूस असावा. आपण आपले अंतरंग शोधीत जावे. आकार असलेले दृश्य सारे नाशवंत आहे, हे समजून मनाने ते बाजूस सारावे. त्याच्या पलीकडे परब्रह्म आहे. तेथे भ्रम नाही, कर्म नाही, मीपण नाही. कर्माच्या कचाट्यातून

(२) संचितार्थ – धनधान्याचा संग्रह. (३) संचितेविण – पुण्याईशिवाय. (४) जीत मेलें – जिवंत असूनही मृतवत्.

सुटून जगदांतरी भरलेला देव शोधावा व अनुभवावा. सगुणाची उपासना करावी म्हणजे त्याने मीपणा नाहीसा होतो. हाच संगत्याग होय. मीपणा त्यागून परमेश्वरी अनुसंधान लावावे. अशा रीतीने सगुणाच्या उपासनेने निर्गुण ब्रह्म सापडते. आपण स्वत: पावन होऊन जगाचा उद्धार करावा.

अंतमुर्ख व्हावे आणि 'मुख्य' देवाचा शोध घ्यावा हे सांगणारा केवळ २५ ओव्यांचा **द. १८-८ अंतर्देव निरूपण** हा समास आहे त्याचे चिंतन मनन नित्य करावे.

॥ श्रीराम ॥

**ब्रह्म निराकार निश्चळ। आत्म्यास विकार चंचळ। तयास म्हणती सकळ। देव ऐसें ॥१॥**
ब्रह्माला आकार नाही ते निश्चळ आहे आणि आत्मा (येथे अंतरात्मा या अर्थी) विकारवंत आणि चंचळ आहे. त्यालाच सर्वजण देव असे म्हणतात.

**देवाचा ठावचि लागेना। येक देव नेमस्त कळेना। बहुत देवीं अनुमानेना। येक देव ॥२॥**
देवाचा पत्ताच लागत नाही आणि एक 'थोरला' देव निश्चितपणे कळत नाही. अनेक देवांच्या गर्दीमध्ये एक देव कोणता याचा तर्क करता येत नाही

**म्हणोनि विचार असावा। विचारें देव शोधावा। बहुत देवांचा गोवा। पडोंचि नये ॥३॥**
म्हणून विचाराने मुख्य देव शोधावा. खूप देव पृथ्वीवर दिसतात. त्यांच्या गोंधळात पडू नये.

**देव क्षत्रीं[१] पाहिला। त्यासारिखा धातूचा केला। पृथ्वीमधें दंडक चालिला। येणें रीती ॥४॥**
या अनेक देवदेतांचा उगम कसा झाला ते समर्थ सांगतात. क्षेत्रामध्ये एकाने देवाची मूर्ती पाहिली त्या मूर्ती सारखी धातूची मूर्ती केली त्याची पूजा अर्चा सुरू झाली. अशाप्रकारे जगरूढी सर्वत्र सुरू झाली.

**नाना प्रतिमादेवांचें मूळ। तो हा क्षत्रदेवचि केवळ। नाना क्षत्रें भूमंडळ। शोधून पाहावें ॥५॥**
अशा प्रकारे अनेक देवदेवतांच्या प्रतिमांचे मूळ क्षेत्रातील देव-प्रतिमा आहेत. नाना क्षेत्र शोधून पाहिल्यावर हे कळेल.

**क्षत्रदेव पाषाणाचा। विचार पाहातां तयाचा। तंत[२] लागला मुळाचा। अवताराकडे ॥६॥**
क्षेत्रातील देवाची मूर्ती पाषाणाची असते पण तिच्या मूळाचा विचार पाहिला तर त्याचा धागा कोणत्यातरी अवताराशी पोहोचतो.

**अवतारी देव संपले। देहे धरुनी वर्तोन गेले। त्याहून थोर अनुमानले। ब्रह्मा विष्णू महेश ॥७॥**
अवतारी लोक देह धारण करून वावरले आणि नंतर निजधामला गेले. विशिष्ट अवतारी कार्य पूर्ण होताच निमाले.

**त्या तिही देवांस ज्याची सत्ता। तो अंतरात्माचि पाहातां। कर्ता भोक्ता तत्वतां। प्रतक्ष आहे ॥८॥**
या तीनही देवांवर ज्याची सत्ता चालते तो अंतरात्माच होय. वास्तविक पाहता तो खरा कर्ता व भोक्ता आहे.

**युगानुयुगें तिन्हीं लोक। येकचि चालवी अनेक। हा निश्चयाचा विवेक। वेदशास्त्रीं पाहावा ॥९॥**
तो एकटाच युगानुयुगे तीनही लोकावर (स्वर्ग, मृत्यू, पाताळ) सत्ता चालवीत आहे. हेच निश्चयपूर्वक

(५) पैसावली - वाढली. (६) मनुष्यशुद्धीस - मनुष्यत्त्वाच्या जाणिवेला.

वेदशास्त्रात सांगितले आहे ते पहावे.

**आत्मा वर्तवितो शरीर। तोचि देव उत्तरोत्तर[३]। जाणीवरूपें कळिवर। विवेक वर्तवी।।१०।।**

शरीराचे संचालन आत्म्यामुळे होते तोच पुढे चढत्या पायरीने देव समजला पाहिजे. जाणीव रूपाने (विवेकाने) तोच शरीराचे व्यापार चालवितो.

**तो अंतर्देव चुकती। धांवा घेऊन तीर्था जाती। प्राणी बापुडे कष्टती। देवास नेणतां।।११।।**

त्या अंतर्देवाला लोक विसरतात आणि तीर्थक्षेत्राकडे धाव घेतात. खऱ्या देवाची तेथे भेट न झाल्याने बिचारे कष्टी होतात.

**मग विचारिती अंत:कर्णीं। जेथें तेथें धोंडा पाणी। उगेंचि वणवण हिंडोनी। काये होतें।।१२।।**

मग मनात सतत विचार करतात की क्षेत्रात जिकडे तिकडे धोंडा आणि पाणी यांचीच भेट होते. यात्रा करून थकल्यावर असे म्हणतात, उगीच वणवण हिंडून देवाची भेट होत नाही,

**ऐसा ज्यासी विचार कळला। तेणें सत्संग धरिला। सत्संगें देव सापडला। बहुत जनांसी।।१३।।**

असा विचार ज्यांना समजतो ते सत्संग धरतात. संतसंगतीने अनेक लोकांना खरा देव सापडला आहे.

**ऐसीं हे विवेकाची कामें। विवेकी जाणतील नेमें। अविवेकी भुलले भ्रमें। त्यांस हें कळेना।।१४।।**

असे हे विवेकाचे काम आहे आणि विचारवंतानाच ती कामे समजतात ज्यांच्यापाशी विवेक नाही ते भ्रमिष्टाप्रमाणे तीर्थक्षेत्रात भुलून जातात. त्यांना हे काही कळत नाही.

**अंतरवेधी अंतर जाणे। बाहेरमुद्रा कांहींच नेणें। म्हणोन विवेकी शाहाणे। अंतर शोधिती।।१५।।**

अंतर्मुख होऊन जो अंतरंगात पहावयास जातो त्याला सूक्ष्माची जाणीव व ज्ञान होते. जो बहिर्मुख असतो त्याला हे काहीच कळत नाही म्हणून शहाणे विचारवंत अंतरंगात देवाचा शोध घेतात. अंतराचा शोध घेणे ही कला आहे. संतसज्जन तेथे मार्गदर्शन करतात म्हणून सत्संगाचा महिमा विशेषच असल्याचे श्रीसमर्थ सांगतात.

**विवेकेंविण जो भाव। तो भावचि अभाव। मूर्खस्य प्रतिमा देव। ऐसें वचन।।१६।।**

विवेकाने तपासणी करून मगच श्रद्धा किंवा भाव ठेवणे जरूर आहे. विवेकाच्या अभावी कोठेतरी ठेवलेला भाव हा अभावच आहे. प्रतिमा हा मूर्खांचा देव असतो असे वचन आहे.

**पाहात समजत सेवटा गेला। तोचि विवेकी भला। तत्वें सांडुनी पावला-। निरंजनीं।।१७।।**

देवाच्या मूर्ती पाहून त्यांचे मूळ समजून पाहात पाहात जो आत्म्यापर्यंत पोहोचतो तोच चांगला विवेकी होय. (ब्रह्मांड रचना जेथुन झाली तेथपर्यंत विवेकाने पोहचणे हा भावार्थ) अशाश्वत तत्वांना मागे टाकून तो निरंजनपदापर्यंत पोहोचतो.

**आरे जें आकारासी येतें। तें अवघेंचि नासोन जातें। मग गल्बल्यावेगळें तें। परब्रह्म जाणावें।।१८।।**

अरे शिष्या जे काही विश्वात आकार धारण करते ते सर्व लयाला जाते या नश्वराच्या गोंधळाहून

(१) क्षत्रीं- क्षेत्रात. (२) तंत - तंतू किंवा ओघ.

परब्रम्ह निराळे आहे.

**चंचळ देव निश्चळ ब्रह्म। परब्रह्मीं नाहीं भ्रम। प्रत्ययज्ञानें निभ्रम[४]। होईजेतें ।।१९।।**

तो अंतरात्मा देव चंचळ आहे तर परब्रह्म तेवढे निश्चळ आहे. ते संशयातीत आहे. आपण भ्रामक समजुतीमध्ये आहोत पण प्रत्ययाचे ज्ञान मिळवून भ्रमरहित व्हावे.

**प्रचीतीविण जें केलें। तें तें अवघें वेर्थ गेलें। प्राणी कष्टाकष्टींचि मेले। कर्मकचाटें ।।२०।।**

प्रचिती आल्याविना आपण जे काही तर्काने करतो ते व्यर्थ जाते. (विज्ञानाप्रमाणेच अध्यात्म हेही प्रचितीचे शास्त्र असल्याचे येथे सांगतात!) प्राणी प्रचिती न घेता कर्माच्या कचाट्यात सापडून राहतो. कर्माचे बंध सैल केव्हा होतात? ब्रह्माची प्रचिती आल्यावर, सर्व कर्मे गौण ठरतात.

**कर्मावेगळें न व्हावें। तरी देवास कासया भजावें। विवेकी जाणती स्वभावें। मूर्ख नेणे ।।२१।।**

कर्मापासून जर आपणाला सुटका करून घ्यावयाची नाही तर देवाचे भजन तरी का करावयाचे हे मूर्खांना कळत नाही विवेकी लोकांना मात्र समजते.दृष्य स्थूल असते. साधकाला तर दृष्याचे विश्व ओलांडून जाऊन निर्विकार अशा परब्रह्माशी एकरूप व्हावयाचे आहे. उपासनेमुळे मीपणा लय पावला तर निर्गुण, निर्विकार, निराकारामध्ये प्रवेश होऊन साधकाच्या कर्माचा लेप जीवाला लागत नाही.

**कांहीं आनुमानलें विचारें। देव आहे जगदांतरें। सगुणाकरिता निर्धारें। निर्गुण पाविजे ।।२२।।**

विवेकाने असे अनुमान निघते की देव जगाच्या अंतर्यामी भरून राहिला आहे त्याच्या प्राप्तीसाठी सगुणाच्या उपासनेचा आधार घेतला तर निर्गुण निराकार प्राप्ती होते.

**सगुण पाहातां मुळास[५] गेला। सहजचि निर्गुण पावला। संगत्यागें[६] मोकळा जाला। वस्तुरूप ।।२३।।**

संगत्यागाने निर्गुणपद प्राप्त होते. दृष्य विश्वाशी चिकटलेले मन जेव्हा त्यातून बाहेर पडते तेव्हाच ब्रह्मरूपाचा अनुभव येतो.

**परमेश्वरीं अनुसंधान-। लावितां, होईजे पावन। मुख्य ज्ञानेंचि विज्ञान। पाविजेतें ।।२४।।**

परमेश्वराचे (आत्मरूपाचे) अनुसंधान लावले असता मनुष्य पावन होतो. हेच मुख्य ज्ञान अनुभवताना प्रत्यक्ष अनुभवामुळे ज्ञानाचे विज्ञानात रूपांतर होते.

**ऐसीं हें विवेकाचीं विवर्णे। पाहावीं सुचित अंत:करणें। नित्यानित्यविवेकश्रवणें। जगदोधार ।।२५।।**

असे विवेकाचे विवरण एकाग्र अंतकरणाने पहावे. नित्यानित्य विवेकाचे श्रवण केले असता लोकांचा उद्धार होतो.

रसग्रहण : द. १८-७ मध्ये जनस्वभाव कसा स्वार्थी आहे याचे प्रारंभी विवरण केले आहे. असा वासनांच्या संकल्पाने मनुष्य आत्महत्यारा आहे असे म्हटले आहे कारण सारासार विवेक किंवा हित-अहित विवेकच नष्ट झाला तर त्याची कृती माणसाला किंवा समाजाला अधोगतीस नेईल. माणसे देवदर्शनासाठी तीर्थक्षेत्रामध्ये जातात पण तेथे जाऊनही मन:शांती लाभत नाही. ''तीर्थी धोंडा आणि पाणी । देव टत्याला रोकडा सज्जनी ।।'' संत तुकाराम यांच्या या विचाराचे विवरण या समासात

(३) उत्तरोत्तर देव - जीवात्मा, शिवात्मा, विश्वात्मा व निर्मळात्मा.

लाभते. ह्या समासाचा मुख्य अभ्यास करावयाचा तर द. ८-१, ८-८,११-१,१५-३ हे समासही वाचावेत.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अंतर्देवनिरूपणनाम समास अष्टम ।।८।।

# दासबोध परिचय : प्रश्नपत्रिका ११ वी

(द. १८ स. ७ आणि १८ स. ८ वर आधारित)

प्र. १ पुढील ओव्यांचा अर्थ लिहा.
(१) १८-७-६ (२) १८-७-२० (३) १८-८-१६ (४) १८-८-२०

प्र. २ ''द. १८-७ मध्ये मानवाच्या पारलौकिक कल्याणाइतकाच ऐहिक कल्याणाचा विचार प्रभावीपणे मांडलेला दिसतो'' या विधानाची सत्यता दहा ओळीत स्पष्ट करा.

प्र. ३ तीर्थयात्रेपेक्षा सत्संगाची महति अधिक असल्याचा विचार द. १८-८ मध्ये कशाप्रकारे मांडण्यात आला आहे? (१० ओळी)

प्र. ४ ''खरा देव कोणता'' याबद्दल द. १८-८ मध्ये श्रीसमर्थांनी व्यक्त केलेले विचार लिहा.

प्र. ५ ज्या ओव्यांचे तक्ते करून ठेवावेत अशा तीन ओव्यांची निवड द. १८-७ मधून करा. याच ओव्या आपणास का निवडाव्याशा वाटल्या ते लिहा.

## स्वाध्याय १२ वा (द. ९ स. ४ वर आधारित)

**स्वाध्याय सारांश :** ''काही लोक संपन्न तर काही दरिद्री, काही निर्मळ तर काही ओंगळ, काहींची स्थिती उत्तम तर काहींची खालच्या दर्जाची असे या दुनियेत का दिसते?'' असा प्रश्न समर्थांना कोणी तरी विचारला. त्याचे उत्तर समर्थांनी येथे दिले आहे, ते मननीय आहे. अवगुणामुळे दारिद्र्यप्राप्ती होते, म्हणून सद्गुणांची प्राप्ती करून घेऊन करंटेपणाचा त्याग करावा. आपले जीवन वैभवसंपन्न करावे, असे समर्थांचे विवेचन आहे. त्याचा अभ्यास करताना ध्यानात येते की, दैववाद किंवा प्रारब्धवाद पुसून टाकण्याचा यत्न समर्थांनी केला. विद्येचे, प्रयत्नांचे, कष्टाचे विवेकाचे महत्त्व या समासात ते सांगतात विद्या नाहीं, बुद्धी नाहीं । म्हणोन प्राणी करंटा ।।

अभ्यासार्थीनीं, विचारप्रवृत्त करणाऱ्या ह्या समासाचा सूक्ष्म अभ्यास करावा.

## द. ९ स. ४ : जाणपणनिरूपण

श्रीसमर्थांचा परमार्थ अत्यंत विवेकप्रधान आहे. ज्ञानाच्या सामर्थ्यावर त्यांचा फार विश्वास आहे. प्रापंचिक असो की पारमार्थिक साधक असो, दोघांनाही कर्म करावे लागतेच. पण जो समजून किंवा जाणतेपणाने कर्म करतो, त्याच्या कर्मास उत्तम फल मिळते. जो तेच कर्म न समजून किंवा

(४) निभ्रम - निर्भ्रम. (५) मुळास - मूळमायेच्या मुळास. (६) संगत्यागें - मीपणाच्या त्यागाने.

अजाणतेपणाने करतो, त्यास गौण फल मिळते. छांदोग्य उपनिषदामध्ये असा मंत्र आहे, ''नाना तु विद्या च अविद्या। यदेव विद्यया करोति... तदेव वीर्यवत्तरं भवति।। अर्थ - विद्या आणि अविद्या किंवा ज्ञान आणि अज्ञान दोन्ही भिन्न आहेत. जो जाणतेपणाने, ज्ञानाने युक्त कर्म करतो, त्याचे कर्म मोठे सामर्थ्यवान होते. ते उत्तम फल देते.'' एक पाऊल पुढे जाऊन श्री समर्थ असे सांगतात की, आपल्या जीवनात भाग्य निर्माण करणे, आपल्या हातात आहे. जाणतेपणाने कर्म करून आपण गुणांचा विकास केला, तर भाग्य मागे लागते. याच्या उलट अवगुणी माणूस करंटा असतो. म्हणून प्रपंचात काय आणि परमार्थात काय, माणसाने जाणतेपणाने वागावे म्हणजे त्याचे जीवन सर्व बाजूंनी धन्य होते.

''जो जाणतेपणाने कर्म करतो, त्याचे कर्म मोठे सामर्थ्यवान होते. ते उत्तम फल देते'' छांदोग्यपनिषद. ज्ञानाचे सामर्थ्य सांगणारा 'जाणपणनिरूपण' हा एकच समास १२ व्या स्वाध्यायासाठी आभ्यासावयाचा आहे.

**।। श्रीराम ।।**

**पृथ्वीमधें लोक सकळ। येक संपन्न येक दुर्बळ। येक निर्मळ येक वोंगळ। काय निमित्य ।।१।।**

पृथ्वीवर जे सगळे लोक आहेत त्यात एक बलवान तर एक दुर्बळ, एक निर्मळ तर दुसरा घाणेरडा.

**कित्येक राजे नांदती। कित्येक दरिद्र भोगिती।। कितीयेकांची उत्तम स्थिती। कित्येक अधमोद्धम ।।२।।**

कित्येक राजे आहेत तर कित्येक दरिद्री, कोणाची स्थिती उत्तम तर कोणी खालच्या अवस्थेत.

**ऐसें काय निमित्य जालें। हे मज पाहिजे निरोपिलें। याचें उत्तर ऐकिलें। पाहिजे श्रोतीं ।।३।।**

हे असे कोणत्या कारणाने झाले याचे उत्तर सांगावे, याचे उत्तर श्रोत्यांनी ऐकावे असे वक्ता म्हणतो.

**हे सकळ गुणापासी गती। सगुण भाग्यश्री भोगिती। अवगुणास दरिद्रप्राप्ती। येदर्थी संदेह नाहीं।।४।।**

ही सर्व भिन्नता दिसते तो गुणांचा परिणाम आहे. जे सद्गुणी असतात ते वैभव भोगतात जे अवगुणी असतात त्यांना गरिबी प्राप्त होते. यात मुळीच शंका नाही.

**जो जो जेथें उपजला। तो ते वेवसाई उमजला। तयास लोक म्हणती भला। कार्यकर्ता ।।५।।**

जो ज्या व्यवसायामध्ये जन्मला तो व्यवसाय त्याने उत्तम प्रकारे समजून केला तर त्या माणसाला लोक चांगला कार्यकर्ता म्हणतात.

**जाणता तो कार्य करी। नेणता कांहींच न करी। जाणता तो पोट भरी। नेणता भीक मागे ।।६।।**

जो धंद्यामध्ये जाणकार असतो, तो धंदा उत्तम प्रकारे करतो. अजाण असतो तो काहीच करत नाही. म्हणून जाणता माणूस पोट भरतो तर नेणता भीक मागतो. भुकेकंगाल होतो.

**हें तों प्रगटचि असे। जनीं पाहातां प्रत्यक्ष दिसे। विद्येविण करंटा वसे। विद्या तो**

**भाग्यवंत ।।७।।**

हे सर्व उघडच आहे जगामध्ये प्रत्यक्षपणे दिसते. विद्या नसेल तो भाग्यहीन होतो तर विद्या शिकेल तो भाग्याला चढतो.

**आपुली विद्या न सिकसी। तरी काये भीक मागसी। जेथें तेथें बुद्धी ऐसी। वडिलें सांगती ।।८।।**

'' आपली विद्या (व्यवसाय विद्या) तू जर शिकला नाहीस तर भीक मागावी लागेल. तुला भीक मागावयाची आहे का?'' अशी बुद्धी वडीलधारी माणसे शिकवीत असतात.

**वडिल आहे करंटा। आणी समर्थ होये धाकुटा। कां जे विद्येनें मोठा। म्हणोनियां ।।९।।**

वडील (भाऊ) करंटा तर धाकटा भाग्यवंत असे घडते. त्याचे कारण धाकटा व्यवसाय विद्येने मोठा असतो.

**विद्या नाहीं बुद्धि नाहीं। विवेक नाहीं। साक्षेप नाहीं। कुशळता नाहीं व्याप नाहीं। म्हणौन प्राणी करंटा ।।१०।।**

विद्या, बुद्धी, विवेक, दीर्घोद्योग, कौशल्य, आणि त्याग नसेल तर मनुष्य करंटा होतो. असे अनेक सद्‌गुण येथे सांगितले आहेत.

**इतुकेंहि जेथें वसे। तेथें वैभवास उणें नसे। वैभव[१] सांडितां अपैसें। पाठीं लागे ।।११।।**

हे गुण जेथे असतात तेथे तेथे वैभवाला काही उणे रहात नाही. उलट नको म्हटले तरी वैभव पाठीशीच आपोआप लागते.

**वडिल समर्थ धाकुटा भिकारी। ऐका याची कैसी परी। वडिला ऐसा व्याप न करी। म्हणोनियां ।।१२।।**

वडील श्रीमंत आणि धाकटा दारिद्रि, याचे कारण ऐका, कारण तो वडीलांप्रमाणे धंद्याचा व्याप करीत नाही

**जैसी विद्या तैसी हांव। जैसा व्याप तैसें वैभव। तोलासारिखा हावभाव। लोक करिती ।।१३।।**

जशी माणसाची विद्या अधिक तशीच त्याची हाव किंवा महत्वकांक्षा वाढते. विद्या आणि महत्वकांक्षा यांच्या तोलाप्रमाणे माणसाची कर्तबगारी वाढते.

**विद्या नसे वैभव नसे। तेथें निर्मळ कैंचा असे। करंटपणें वोखटा दिसे। वोंगळ आणि विकारी ।।१४।।**

ज्याच्यापाशी विद्‌या नाही तेथे वैभव नाही. तेथे निर्मळपणा कसा असणार? करंटेपणामुळे तो वाईट, ओंगळ दिसतो आणि विकारी असतो. (नाना विकार, व्यसने, अस्वच्छता याचे आगर तेथे असते.)

**पशु पक्षी गुणवंत। त्यास कृपा करी समर्थ। गुण नस्तां जिणें वेर्थ। प्राणीमात्रांचें ।।१५।।**

पशु पक्षी सुद्धा जर गुणवान असतील तर ते पाहून लोक त्यांच्यावर लोभ करतात. प्राणीमात्रांपाशी काही गुण हेच नसतील तर त्यांचे जिणे व्यर्थ होते.

**गुण नाहीं गौरव नाहीं। सामर्थ्य नाहीं महत्व नाहीं। कुशळता नाहीं तर्क नाहीं। प्राणीमात्रांसी ।।१६।।**
कोणत्याही प्राण्यापाशी गुण नसतील तर गौरव होत नाही. सामर्थ्य नसेल तर महत्व नाही. व्याप नसेल तर वैभव नाही.

**याकारणें उत्तम गुण। तेंचि भाग्याचें लक्षण। लक्षणेंविण अवलक्षण। सहजचि जालें ।।१७।।**
म्हणून उत्तम गुण हेच भाग्याचे लक्षण आहेत. तशी गुणांची लक्षणे नसतील तर तो अवलक्षणी किंवा करंटा साहजिकच होतो.

**जनामधें जो जाणता। त्यास आहे मान्यता। कोणी येक विद्या असतां। महत्व पावे ।।१८।।**
जगात विद्येत जो जाणता असेल त्याला मान्यता लाभते, मान मिळतो कोणतीतरी विद्या असेल तरच मोठेपणा प्राप्त होतो.

**प्रपंच अथवा परमार्थ। जाणता तोचि समर्थ। नेणता जाणिजे वेर्थ। निःकारण ।।१९।।**
प्रपंच असो वा परमार्थ त्यात जो जाणता असेल तोच समर्थ होतो नेणता प्राणी व्यर्थ जातो.

**नेणतां विंचु सर्प डसे। नेणतां जीवघात असे। नेणतां कार्य नासे। कोणी येक ।।२०।।**
न जाणल्यामुळे साप, विंचू चावतात (दुर्जनांना न ओळखल्यामुळे त्यांचा त्रास होतो, हाही एक भावार्थ) अपघात होतात, कार्यनाश होतो.

**नेणतां प्राणी सिंतरे[१]। नेणपणें तऱ्हे भरे। नेणपणें ठकें विसरें। पदार्थ कांहीं ।।२१।।**
नेणतेपणाने मनुष्य फसतो. तऱ्हेकवाईपणा अज्ञानामुळेच येतो. प्राणी पदार्थ गमावतो, असा हा दुर्गुण आहे.

**नेणतां वैरी जिंकिती। नेणतां अपाई पडती। नेणतां संहारती, घडती–। जीव नास ।।२२।।**
योग्य मार्ग न सापडल्यामुळे शत्रूचा प्रतिकार होत नाही शत्रूंचा त्यामुळे जय होतो. संकटे ओढावतात. फडशा पडतो. प्राणांची हानी घडते.

**आपुलें स्वहित न कळे जना। तेणें भोगिती यातना। ज्ञान नेणतां अज्ञाना। अधोगती ।।२३।।**
आपल्या हिताचा मार्ग सापडत नाही. त्यामुळे यातना भोगाव्या लागतात. ज्ञान नसल्यामुळे अज्ञानी माणसांना अधोगती प्राप्त होते.

**मायाब्रह्म जीवशिव। सारासार भावाभाव। जाटिल्यासाठी[३] होतें वाव। जन्ममरण ।।२४।।**
शुद्ध ज्ञान मिळाले तरच मुक्ती लाभते. माया–ब्रह्म, जीव–शिव, सार–असार, भाव आणि अभाव हे यथायोग्य जाणले म्हणजे जन्ममरणाची यातायात संपते.

**कोण कर्ता निश्चयेंसीं। बद्ध मोक्ष तो कोणासी। ऐसें जाणतां प्राणियांसीं। सुटिका घडे ।।२५।।**
खरा कर्ता कोण हे निश्चितपणे कळले, बंध व मोक्ष कोणाला असतात हे जाणले असता सुटका होते.

**जाणिजे देव निर्गुण। जाणिजे मी तो कोण। जाणिजे अनन्यलक्षण[४]। म्हणिजे मुक्त ।।२६।।**
खरा कर्ता देव निर्गुण कसा आहे. मी कोण आहे याचे ज्ञान करून घ्यावे. देव आणि आपण यात भिन्नता नाही. दोन्हीतील अनन्यपणाचा अनुभव आला म्हणजे माणूस मुक्त होतो.

**जितुकें जाणोन सांडिलें। तितुकें दृश्य वोलांडिलें। जाणत्यास जाणतां तुटलें। मूळ**

(१) वैभव सांडितां अपैसें। पाठी लागे।। – वैभव नको म्हटले तरी मग ते पाठीस लागते.

**मीपणाचें ।।२७।।**

जितके काही दृष्य सृष्टीतील जाणले ते सर्व मिथ्या आहे म्हणून बाजूला सारले, त्याप्रमाणात दृष्य ओलांडून साधक पुढे गेला असे समजावे. सर्व जाणणारा आत्मा (त्यालाच उद्देशून 'जाणता' हा शब्द या ओवीत आहे) त्याला साधकाने जाणून घेतले की मीपणा किंवा अहंकार नि:शेष नाहिसा होतो. मीपणाचे मूळच तुटून जाते. सृष्टीतील ज्ञानप्राप्तींमध्ये दृष्य वस्तू, आणि ज्ञाता यांच्यात द्वैत असते. दृष्याचे ज्ञान होते पण दृष्य जगत हे मिथ्याच असल्याने साधकाचे समाधान होऊच शकत नाही. मग आत्मस्वरूपाचे ज्ञान करून घेण्याचा साधक प्रयत्न करतो त्यावेळी सारी दृष्य सृष्टी ओलांडुन व अहंभावाचाही लोप होऊन त्याला 'जाणत्या' आत्म्याचे सत्यज्ञान होते, त्यात तो एकरूप होतो. हा वरील ओवीचा भावार्थ आहे.

**न जाणता कोटीवरी। साधनें केलीं परोपरीं। तरी मोक्षास अधिकारी। होणार नाहीं।।२८।।**

अशा प्रकारे आत्म्याला न जाणता कोट्यावधी साधने जरी अगदी परोपरीने केली तरी माणूस मोक्षाचा अधिकारी होणार नाही.

**मायाब्रह्म वोळखावें। आपणास आपण जाणावें। उतुक्यासाठीं स्वभावें। चुके जन्म ।।२९।।**

माया आणि ब्रह्म यांची ओळख करून घ्यावी आणि आपणास आपणच जाणावे (आत्मस्वरूपाचे ज्ञान मिळवावे) इतके केले की जन्म मृत्यू साहजिकपणे चुकतो.

**जाणतां समर्थांचें अंतर। प्रसंगें वर्ते तदनंतर। भाग्य वैभव अपार। तेणेंचि पावे ।।३०।।**

समर्थांचे अंत:करण जाणून घेतल्यानंतर प्रसंग पडल्यावर (जो वागतो) त्याला अपार भाग्य व संपत्ती मिळते.

**म्हणौन जाणणें नव्हे सामान्य। जाणतां होईजे सर्वमान्य। कांहींच नेणतां अमान्य। सर्वत्र करिती ।।३१।।**

यासाठी जाणणे हे सामान्य समजू नये. ज्ञानामुळेच सर्वमान्यता लाभते. ज्याला काहीच कळत नाही त्याला लोक झिडकारतात सगळीकडे त्याचा अपमान होतो.

**पदार्थ देखोन भूत भावी। नेणतें झडपोन प्राण ठेवी। मिथ्या आहे उठाठेवी। जाणते जाणती ।।३२।।**

एखादा पदार्थ पाहून माणसाला तो भूत असल्याची कल्पना होते व त्याने आपणास झडपले आहे असे समजून तो मरून जातो पण भूताची ही कल्पना मुळातच खोटी आहे आणि तो कल्पनेचा खेळ आहे हे जाणत्याला समजते.

**जाणत्यास कळे वर्म। नेणत्याचें खोटें कर्म। सकळ कांहीं धर्माधर्म। जाणतां कळें।।३३।।**

जाणत्याला एखाद्या गोष्टीतील मर्म समजते. नेणत्याचे कर्मच खोटे असते तो अज्ञानीच राहतो. धर्म कोणता अधर्म कोणता हे जाणत्या किंवा ज्ञानी माणसास कळते.

**नेणत्यास येमयातना। जाणत्यास कांहींच लागेना। सकळ जाणोन, विवंचना। करी, तो मुक्त ।।३४।।**

(२) सिंतरे - फसतो. (३) जाटिल्यासाठी - जाणल्याने.

नेणत्याना यमयातना भोगाव्या लागतात पण ज्ञाताला त्याचा स्पर्श होत नाही. ज्ञाता होऊन विचार करतो तो मुक्त असतो.

**नेणतां कांहीं राजकारण। अपमान करून घेती प्राण। नेणतां कठीण वर्तमान। समस्तांस होये ।।३५।।**

शत्रूने केलेले राजकारण जाणून घेतले नाही तर अपमान करून तो प्राणही घेतो. नेणतेपणामुळे सर्वांवर कठीण प्रसंग येतो.

**म्हणोनियां नेणणें खोटें। नेणते प्राणी ते करंटे। जाणतां विवरतां तुटे। जन्ममरण।।३६।।**

म्हणून अज्ञान हे खोटे असून अज्ञानी करंटे असतात.

**म्हणोन अलक्ष करूं नये। जाणणें हाचि उपायें। जाणतां सांपडे सोये। परलोकाची।।३७।।**

यासाठी ज्ञानप्राप्तीकडे दुर्लक्ष करू नये. जाणणे हाच उपाय आहे. परलोकप्राप्तीचा किंवा आत्मोद्धाराचा मार्ग ज्ञानामुळेच गवसतो.

**जाणणें सकळांस प्रमाण। मूर्खास वाटे अप्रमाण। परंतु अलिप्तपणाची खूण। जाणतां कळे ।।३८।।**

ज्ञानाची महती सर्वांना पटते पण मूर्खांला ती अप्रमाण वाटते. सर्व करून अकर्ता राहण्याची (नैष्कर्म्य सिद्धीची) खूण ज्ञानी माणसालाच कळते.

**येक जाणणें करून परतें[४]। कोण सोडी प्राणीयांतें। कोणी येक कार्य जें तें। जाटिल्याविण न कळे।।३९।।**

ज्ञानाला बाजूला सारले तर माणसाची अज्ञानापासून सुटका कोण करणार आहे? कोणतेही कार्य असो ते जाणतेपणाखेरीज कळणार नाही. ज्ञानाच्या सामर्थ्यांवर श्रीसमर्थांचा विशेष भर दिसतो.

**जाणणें म्हणिजे स्मरण। नेणणें म्हणिजे विस्मरण। दोहींमधें कोण प्रमाण। शाहाणे जाणती ।।४०।।**

ज्ञान हे स्वस्वरूपाचे स्मरण आहे व नेणते हे देहबुद्धीचे स्मरण आहे यात कोणते प्रमाण मानावे हे जाणत्यानांच समजते.

**जाणते लोक ते शाहाणे। नेणते वेडे दैन्यवाणे। विज्ञान तेंहि जाणपणें। कळों आलें।।४१।।**

जाणते लोक शहाणे असतात नेणते लोक मूर्ख व दरिद्री असतात. आत्मस्वरूपाचा साक्षात अनुभव, तोही ज्ञानानेच कळू लागतो.

**जेथें जाणपण खुंटलें। तेथें बोलणेंही तुटलें। हेतुरहित जालें। समाधान।।४२।।**

ज्या अवस्थेमध्ये जाणपणाही लयाला जातो तेथे शब्दातीत अवस्था येते, तेथे बोलणे संपते आणि कल्पना / वासना रहित समाधान प्राप्त होते. (अधिक स्पष्टीकरण : 'मी ब्रह्म आहे' या वृत्तीच्या अंतर्गत असणाऱ्या तूर्येमध्ये प्रवेश करतो. तूर्येमध्ये देहाचे व दृष्याचे भान उरत नाही परंतु 'मी द्रष्टा आहे,साक्षी आहे') असे भान शिल्लक राहते. तेही नाहिसे होऊन मन जेव्हा उन्मन होते तेव्हा निर्विकार, निर्मळ परब्रह्माशी तदाकारिता प्राप्त होते. या स्थितीला विज्ञान असे म्हणतात. येथे कल्पनारहित

(४) अनन्य लक्षण – देव तोच मी हा अनन्यभाव.

समाधान प्राप्त होते.

**श्रोते म्हणती हें प्रमाण। जालें परम समाधान। परी पिंडब्रह्मांडऐक्यलक्षण। मज निरोपावें ।।४३।।**

यावर श्रोते म्हणाले हे म्हणणे पटले व पूर्ण समाधान झाले पण आता पिंडब्रह्मांड ऐक्य लक्षणे आम्हाला सांगावी.

**ब्रह्मांडी तेंचि पिंडीं असे। बहुत बोलती ऐसें। परंतु याचा प्रत्यय विलसे। ऐसें केलें पाहिजे ।।४४।।**

'पिंडी ते ब्रह्मांडी' अशी म्हण आहे, असे लोक म्हणतात. त्याचा प्रत्यय येईल असे निरूपण आपण करावे.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे जाणपणनिरूपणनाम समास चतुर्थ ।।४।।

# दासबोध परिचय : प्रश्नपत्रिका १२ वी

(दासबोध दशक ९ समास ४ ''जाणपणनिरुपण'' वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या ओव्या वरील समासात आहेत त्या शोधून काढा.

(१) प्रपंच असो वा परमार्थ असो, जाणता मनुष्यच त्यात यश मिळविण्यास पात्र ठरतो. नेणता हा व्यर्थ जिणे जगतो.

(२) उत्तम गुण हेच भाग्याचे लक्षण असते. हे लक्षण नसेल; तो अवलक्षणी हे सरळच आहे.

(३) ज्ञान न मिळविता करोडो साधने परोपरीने केली तरी माणसाला मोक्षाचा अधिकारी होता येणार नाही.

प्र. २ काही लोक संपन्न तर काही दुबळे, काही स्वच्छ तर काही ओंगळ, हा भेद समर्थांच्या मते का दिसतो? मनुष्य भाग्यहीन होण्याची मीमांसा समर्थांनी कशी केली आहे?

प्र. ३ 'व्याप तितका संताप' ही म्हण समर्थांना मान्य आहे का? ओवीच्या आधारे उत्तर लिहा.

प्र. ४ अज्ञानामुळे माणसांची होणारी हानी ओवी क्र. २० ते २३ अखेर कशी वर्णन केली आहे?

प्र. ५ (अ) दासबोध वाचनासाठी दैनंदिन जीवनातला किती वेळ आपण देऊ शकता? स्वतंत्र वहीत आपण टिपणे काढता का?

(ब) आपला स्वभाव आणि वर्तन यामध्ये दासबोधातील विचारांमुळे काही बदल होत आहे असे आपणास वाटते का?

(क) 'पत्रद्वारा दासबोध अभ्यास' या उपक्रमामुळे समर्थांचे विचार समजावून घेण्यास आपणास साहाय्य मिळाले का?

(ड) आपल्या या उपक्रमाचा तसेच दासबोध ग्रंथाचा प्रसार वाढावा, यासाठी आपण स्वत:

(५) जाणणें करून परतें - ज्ञानावाचून.

कोणत्या प्रकारे यत्न करू शकाल?

(उ) समर्थांची जी क्षेत्रे आहेत त्यापैकी कोठे आपण स्वत: जाऊन आला आहात?

(फ) दासबोध अभ्यास वर्गात आपण भाग घेतला आहे का?

(ग) आपले सर्व स्वाध्याय (१२ स्वाध्याय) पूर्ण झालेत का? 'दासबोध प्रबोध' हा पुढील अभ्यासक्रम आपण पूर्ण करणार का?

।। जय जय रघुवीर समर्थ।।

## दैनंदिन दासबोध-वाचनानंतर म्हणावयाच्या (द. २०-१० मधील) ओव्या

**जालें साधनाचें फळ। संसार जाला सफळ। निर्गुण ब्रह्म तें निश्चळ। अंतरीं बिंबलें।।२६।। हिसेब जाला मायेचा। जाला निवाडा तत्त्वांचा। साध्य होतां, साधनाचा-। ठाव नाहीं।।२७।। स्वप्नीं जें जें देखिलें। तें तें जागृतीस उडालें। सहजचि अनुर्वाच्य जालें। बोलतां नये।।२८।। ऐसें हें विवेकें जाणावें। प्रत्ययें खुणेसी बाणावें। जन्ममृत्याच्या नांवें। सुन्याकार।।२९।। भक्तांचेनि साभिमानें। कृपा केली दाशरथीनें। समर्थकृपेचीं वचनें। तो हा दासबोध।।३०।। वीस दशक दासबोध। श्रवणद्वारें घेता शोध। मननकर्त्यास विशद। परमार्थ होतो।।३१।। वीस दशक दोनीसें समास। साधकें पाहावें सावकास। विवरतां विशेषाविशेष। कळों लागे।।३२।। ग्रंथाचें करावें स्तवन। स्तवनाचें काये प्रयोजन। येथें प्रत्ययास कारण। प्रत्ययो पाहावा।।३३।। देहे तंव पांचा भूतांचा। कर्ता आत्मा तेथीचा। आणी कवित्वप्रकार मनुशाचा। काशावरुनी।।३४।। सकळ करणें जगदीशाचें। आणी कवित्वचि काय मानुशाचें। ऐशा अप्रमाण बोलण्याचें। काये घ्यावें।।३५।। सकळ देह्याचा झाडा केला। तत्त्वसमुदाव उडाला। तेथें कोण्या पदार्थाला।। आपुलें म्हणावें।।३६।। ऐसीं हें विचाराचीं कामें। उगेंच भ्रमों नये भ्रमें। जगदेश्वरें अनुक्रमें। सकळ केलें।।३७।।**

## "क्रिया करूनी करवावी। बहुतांकरवीं"

'श्री.दा.अ.' उपक्रमाचे हे ब्रीदवाक्य वर उधृत केले आहे. व्यक्तिगत साधने इतकाच श्रीसमर्थांचा भर जनप्रबोधनावर होता.

"विवेकें क्रिया आपुली पालटावी। अति आदरें शुद्ध क्रिया धरावी।।"

यानुसार ज्यांचे वर्तन आहे, त्यांनाच इतरांना मार्गदर्शन करण्याचाही अधिकार आहे.

"आपण करावें, करवावें। आपण विवरावें विवरवावें।<br>आपण धरावें धरवावें। भजनमार्गासी।।"

हा श्रीसमर्थांचा आग्रह आहे. त्यानुसार दासबोधाचा प्रसार करण्याचे कार्य आपण निष्ठेने करू. ही

सध्याच्या काळाची गरज आहे. या संबंधात या उपक्रमाचे एक सहसंयोजक डॉ. व. ना. वैद्य (चाफळ) यांनी आपले विचार 'समीक्षकाचे नवनीत' या हस्तलिखित अंकात पुढील शब्दात व्यक्त केले आहेत. ''दासबोध हा ग्रंथ म्हणजे मृतप्राय झालेल्या महाराष्ट्राला संजीवनी प्राप्त करून देणाऱ्या समर्थांची वाङ्मयमूर्ती आहे. काळाला कलाटणी देण्याचे सामर्थ्य अशा तेजस्वी वाङ्मयात असते. शिवछत्रपतींच्या हिंदवी स्वराज्यासाठी माणसे घडविण्याचे महान् ऐतिहासिक कार्य या ग्रंथाने केले आणि आजही सुराज्य घडविण्यासाठी याच ग्रंथाचा प्रसार करण्याची जरूरी आहे.

समर्थ स्वभावत: प्रवृत्तिपर होते. त्यामुळे आपण विवरण केले; ते इतरांकडून विवरवावे व आपण जो भजनमार्ग धरला तो इतरांनीही धरावा, यासाठी त्यांनी अविश्रांत व जीवापाड परिश्रम केले. गीतेतील कर्मयोगच त्यांनी स्वत:च्या जीवनात बाणविला व तोच दासबोधात विवेक, चातुर्य, राजकारण इत्यादि लक्षणांच्या रूपाने साकार झाला. हा नवा युगधर्म दासबोधातून आपल्याला शिकावयाचा आहे. नीतिमान, प्रामाणिक व परोपकारी प्रपंचाच्या पायावर आपल्याला परमार्थाचा कळस चढवायचा आहे. स्वार्थ, दंभ, दर्प, दुराभिमान इत्यादी आसुरी संपत्तीला दासबोध अभ्यासकांच्या जीवनात स्थान नाही. दैवी संपत्तीच्या विवेक, वैराग्य, प्रत्यय व प्रबोध यांचे मार्गाने आपण जाण्याचा निर्धार करू या. आजच्या काळाची ही गरज आहे. चार वर्षांमध्ये प.दा.अ. उपक्रमाने चांगलेच बाळसे धरले असले तरी आत्मसंतुष्ट राहून चालणार नाही. समाजातील ढासळत चाललेली नीतिमूल्ये, द्वेष, मत्सर व घोर निराशेचा अंधार सभोवती दाटून राहिला आहे. दासबोधाची मशाल हाती घेऊन हा अंधार उजळून टाकण्याची युगप्रवर्तक कामगिरी नियतीने आपल्यावर सोपविली आहे; अशा निर्धाराने आपण कार्यरत राहू या. बलाढ्य, शस्त्रसंपन्न, जुलमी यावनी सत्तेविरुद्ध लढून महाराष्ट्राची प्राणप्रतिष्ठा करणाऱ्या शिवछत्रपतींचे सुवर्ण सिंहासन निर्माण करणाऱ्या महामानवाचे आपण वारसदार आहोत. यशसिद्धीसाठी योगेश्वर समर्थांचा आशीर्वाद आपण मागू या.''

**श्री. मारुतीबुवा भोसले,** चिटणीस, 'श्रीसमर्थ सेवा मंडळ' यांचा संदेश

## ''मनीं धरावें तें होतें''

संयोजक श्री. द्वा. वा. केळकर हे पत्रद्वाराच्या माध्यमातून दासबोध अभ्यासवर्ग चालवितात, ही फार आनंदाची गोष्ट आहे. परमार्थामध्ये मोक्षमार्ग दाखविणारे श्रीगुरु आणि शिष्य हे दोघे परस्पर दूर अंतरावर असताना शक्तिपात दिक्षा देऊन परमार्थ केला जातो. अशाच प्रकारचा हा दासबोध अभ्यासवर्ग चालू आहे. अभ्यासाचे मार्गदर्शन करणारे संयोजक दूर असताना अभ्यासक्रम करून घेतला जातो, हे मोठे कौशल्यच आहे. दासबोधाच्या अभ्यासाने, चिंतनाने अभ्यासात एकरूप झालेल्या ध्येयवेड्या गुरुजींना ह्या उपक्रमात उत्तम यश येते ही ईश्वरी कृपा म्हणावी लागेल.

दासबोधाचा अभ्यास हा 'विवरता विशेषा विशेष। कळों लागे' ही श्रीसमर्थांची वाक्योक्ती अगदी खरी आहे. केल्याने होत आहे रे। आधी केंलेचि पाहिजे।। कोणतेही लहान काम अथवा महान कार्य मन

लावून केले की, त्यात सुयश हे मिळतेच. श्रीसमर्थांचा ग्रंथराज समजण्याकरिता सतत अभ्यासच करावा, हीच एक ग्रंथ समजण्याची खरी गुरुकिल्ली आहे.

आम्ही श्रीसमर्थांचा पादुका-प्रचारदौरा ज्या ज्या ठिकाणी घेऊन जातो, त्या त्या ठिकाणी पत्राद्वारा-अभ्यासवर्गाचे विद्यार्थी उपस्थित असतात. दासबोध अभ्यासकांचे देशव्यापी एक विशाल जाळेच पसरलेले अनुभवास येते. महाराष्ट्रात आहेतच पण गुजराथ, मध्यप्रदेश, कर्नाटक, गोमान्तक अशा चारही प्रांतात असंख्य मंडळी आहेत. दासबोध-अभ्यास-वर्ग उत्तरोत्तर उत्कर्षस्वरूपाने चालावा अशी सदिच्छा.

(सज्जनगड डिसेंबर १९८३ च्या अंकातून पुनर्मुद्रण)

**मा. अण्णाबुवा कालगावकर, अध्यक्ष, श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड यांचा संदेश**

## 'श्रीमत् दासबोध : एक महान् प्रेरक शक्ती'

स.भ. श्री. द्वा. वा. केळकर यांनी पाच वर्षांपूर्वी पत्रद्वारा दासबोध अभ्यास उपक्रम चालू केला; आणि तो अगदी योग्य वेळी सुरू झाला असे आज अनुभवाने वाटते. मृतप्राय राष्ट्राला जिवंत करण्याचे सामर्थ्य या लहान ग्रंथात आहे. ह्यामध्ये हरिकथा निरूपण तर आहेच, पण त्याच बरोबर मानवी जीवनमूल्यांची योग्य ती कदर आहे.

श्रीसमर्थांनी आपल्यापुढे श्रीरामाचा आदर्श ठेवला. त्यांनी अनन्य सेवा करून त्यांचे साक्षात् दर्शन घेतले आणि त्यांची जीवनमूल्ये स्वत:च्या परिणत अवस्थेत नेऊन जणू काय आपले चरित्रच ह्या ग्रंथात ग्रथित केले आहे. म्हणून जीवनात कसे वागावे याचा जणू धडाच या ग्रंथात आहे. प.दा.अ. उपक्रमामुळे अनेक भगिनी-बांधव यांना आपले आयुष्य योग्य पथावर कसे नेता येईल, याचा मार्ग बराचसा खुला झाला आहे. अंतर्मुखवृत्तीला प्राधान्य नसेल, तर बाहेरच्या वृत्ती आटोपणार नाहीत, त्याला अंकुश अंतर्वृत्तीचाच हवा. हा अभ्यास करावा याचे अचूक मार्गदर्शन दासबोध करतो. अंतर्मुखतेत कार्याच्या फलाचे सामर्थ्य सामावलेले आहे, हा श्रीसमर्थांचा सिद्धान्त आहे. 'माझे काही नाही' ही नम्रता दासबोधात पदोपदी आपणास दिसेल हा दासबोधाचा विचार-गाभा आमचे 'प.दा.अ.'चे वाचक, अभ्यासार्थी, प्रचारक, संघटक, प्रयोजक आदि सर्वांना समजो आणि ती शक्ती त्यांना श्रीसमर्थकृपेने प्राप्त होवो, एवढीच प्रभु रामचंद्रांचे चरणी प्रार्थना आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ।।

**।। श्री।।**

## ।। आरती दासबोधाची।।

वेदांतसंमतीचा काव्यसिंधु भरला। श्रुतिशास्त्रग्रन्थगीता साक्ष संगम केला। महानुभाव संतजनीं अनुभव चाखीला। अज्ञान जड जीवा मार्ग सुगम जाला।।१।। जय जया दासबोधा ग्रन्थराज प्रसिद्धा।। आरति वोवाळीन विमलज्ञान बाळबोधा।।धृ०।। नवविधा भक्तिपंथें रामरूप अनुभवी। चातुर्यनिधी मोठा मायाचक्र उगवी। हरिहरहृदयींचें गुह्य प्रगट दावी। बद्धचि सिद्ध जाले असंख्यात मानवी।।२।। वीसहि दशकींचा अनुभव जो पाहे। नित्यनेम विवरितां स्वयें ब्रह्मचि होये। अपार पुण्य गांठीं तरी श्रवण लाहे। 'कल्याण' लेखकाचें भावगर्भ हृदईं ।।३।।

## ।। आरती श्रीसमर्थांची ।।

आरती रामदासा। सद्गुरु सर्वेशा। कायावाचामनोंभावें। वोवाळूं परेशा।।१।। रामदास मूर्तिमंत। रामचंद्र अवतार। कलियुगीं अवतरोनी। केला भक्तांचा उद्धार।।२।। वैराग्य भक्ति ज्ञान। शांति क्षमा विरक्ती। विवेक सालंकृत। क्षमा दया सर्वभूतीं।।३।। सच्चिदानंदघन। रामदास केवळ। दिनकरकृपायोगें। 'रामचंद्र' निर्मळ।।४।।

## ।। जनकल्याण कारिणी ।।

### समर्थ रामदासकृत श्रीरामप्रार्थना

कल्याण करी रामराया । जनहित विवरी ।।धृ।।
तळमळ तळमळ होतचि आहे । हे जन हातिं घरी ।।१।।
अपराधी जन चुकतचि गेले तुझा तूंचि सांवरी ।।२।।
कठीण त्यावरील कठीण जालें । आतां न दिसे उरी ।।३।।
कोठें जावें काय करावें । आरंभिली बोहरी ।।४।।
दास म्हणे आम्ही केले पावलों । दयेसि नाही सरी ।।५।।

।। श्रीरामचंद्रार्पणमस्तु ।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

# परिशिष्ट १

(आपल्या पाठ्यपुस्तकात स्वाध्याय १० वा 'राजकारण निरूपण' असा आहे. श्री शिवाजी महाराज यांच्याशी श्रीसमर्थांचे संबंध कशा प्रकारे होते यावर प्रकाश टाकणारे एक पत्र शके १६०० च्या विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर महाराजांनी लिहिले. त्यावर शिक्कामोर्तब होऊन राजमुद्रा उमटली. त्या ऐतिहासिक पत्राला चाफळ येथील श्रीराम देवस्थानला मिळालेली सनद असे स्वरूप प्राप्त झाले.)

**।। श्री ।।**

**श्री रघुपती श्रीमारूती**

**श्रीसद्‌गुरूवर्य 'श्रीसकलतीथरूप श्रीकैवल्यधाम श्रीमहाराज श्रींस्वामी**

स्वामींचे सेवेसीं,

चरणरज शिवाजी राजे यांनी चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना जे मजवर कृपा करूनु सनाथ केले आज्ञा केली कीं तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करूनु धर्म स्थापना देव ब्राह्मणांची सेवा प्रजेची पीडा दूर करून पाळण रक्षण करावे हे व्रत संपादून त्यात परमार्थ करावा तुम्ही जें मनी धराल तें श्री सिध्दीस पाववील त्याजवरून जो जो उद्योग केला व दुष्ट तुरूक लोकांचा नाश करावा विपुल द्रव्य करूनु राज्यपरंपरा अक्षई चालेल ऐशीं स्थळे दुर्घट करावी ऐसें जें जें मनी धरिलें तें तें स्वामींनी आशीर्वादप्रतापे मनोरथ पूर्ण केलें याउपरि राज्य सर्व संपादिले तें चरणीं अर्पण करूनु सर्वकाळ सेवा घडावी ऐसा विचार मनीं आणिला तेंव्हा आज्ञा जाहली कीं तुम्हांस पूर्वी धर्म सांगितले तेच करावेस तीच सेवा होय ऐंसें आज्ञापिले यावरून निकटवास घडुनु वारंवार दर्शन घडावें श्रींची स्थापना कोठे तरी होऊन सांप्रदाय शिष्य व भक्तीं दिगंत विस्तीर्ण घडावी ऐसी प्रार्थना केली तेही आसमंतात गिरिगव्हरीं वास करूनु चाफळी श्रींची स्थापना करून सांप्रदाय शिष्य दिगंत विस्तीर्णता घडली त्यास चाफळी श्रींची पूजा मोहाछाव ब्राह्मणभोजन अतिथि इमारत सर्व यथासांग घडावें जेथें श्रींची मूर्तिस्थापना जाहाली तेथें उछाव पूजा घडावी यास राज्य संपादिले यांतील ग्रामभूमी कोठे काय नेमावी ते आज्ञा व्हावी तेंव्हा आज्ञा जाहली कीं विशेष उपाधींचे कारण काय तथापि तुमचें मनीं श्रींचीं सेवा घडावी हा निश्चय जाहला त्यास यथा अवकाश जेथे जें नेमावेसें वाटेल ते नेमावे व पुढें जसा सांप्रदायाचा व राज्याचा व वंशाचा विस्तार होईल तैसे करीत जावें याप्रकारे आज्ञा जाहली यावरूनु देशांतरी सांप्रदाय व श्रींच्या स्थापना जाहल्या त्यास ग्रामभूमीची पत्रें करून पाठविली श्रीसंनिध चाफळी एकवीस गांव सर्वमान्य व एकशे एकवीस गांवी अकरा बिघेप्रमाणे भूमि व अकरा स्थळी श्रींची स्थापना जाहाली तेथें नैवेद्यपूजेस भूमि अकरा बिघेंप्रमाणे नेमिले आहेती ऐसा संकल्प केला आहे तो सिध्दीस नेण्याविषयीं विनंती केली तेंव्हा तो परंपरेने सेवटास न्याहावा ऐसी आज्ञा जाहली त्याजवरून सांप्रत गांऊ व भूमि नेमिले तपशील.

(तेथे तेहतीस गांवे, ४१९ बिघे जमीन, एक कुरण व १२१ खंडी धान्य यांचा सविस्तर तपशील आहे.)

येकुण दरोबस्त सर्वमान्य गांऊ तेहेतीस व जमीन बिघे गाउगना चारशे येकोणीस व कुरण येक व गल्ला खंडी एकशेंएकवीस श्रीचे पूजा उछाहाबद्दल संकल्पातील सांप्रत नेमिले व उछाहाचे दिवसास व इमारतीस नक्ती ऐवज व धान्य समयाचे समयास प्रविष्ट करीन येणे करोन अक्षई उछाहादि चालविण्याविषीं आज्ञा असावी ५ कालयुक्ताक्षी नाम संवत्सरे आश्विन शुद्ध १० दशंमी बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

## परिशिष्ट २

### श्रीसमर्थ संप्रदाय आणि आपण

स्वरूप संप्रदाय अयोध्या मठ । जानकी देव रघुनाथ दैवत ।
मारूती उपासना नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासी ।।

श्रीसमर्थ स्वत:च येथे सांगत आहे की आपल्या स्वरूप संप्रदाय असुन त्यामध्ये प्रभू रामचंद्र आणि सीतामाई ही मूळ दैवते आहेत. अयोध्यानगरी हा संप्रदायाचा आद्य मठ आहे. शक्तीची देवता मारूतीराय यांची उपासना म्हणजे शरीरिक बलसंपादन हे एक वैशिष्ठ्यपूर्ण अंग या संप्रदायात आहे. समर्थ रामदासांनी जीवनसर्वस्व अर्पण करून भक्तीमार्गाचाच प्रसार केला, धर्मरक्षणासाठी राजकारण आणि समाजप्रबोधनासाठी असंख्य ठिकाणी मठस्थापना केली.

नमो आदिबोधात्मरूपा परेशा । नमो हंसनारायणा निर्जरेशा ।
नमो ब्रह्मदेवा वसिष्ठा श्रीरामा । नमो मारूती रामदासाभिरामा ।।

सज्जनगडावर आरतीनंतर म्हटल्या जाणाऱ्या या श्लोकात गुरूपरंपरा दिली आहे. आदिनारायणापासून श्रीसमर्थांपर्यंत परंपरा अखंड चालत आली आहे. मनोबोध व दासबोध हे या संप्रदायाचे मुख्य ग्रंथ ठरले.

जन्म ग्राम जांब-समर्थ, तपश्चर्याभूमी टाकळी, पुण्यभूमी शिवथरघळ, कर्मभूमी चाफळ आणि समाधीस्थळ सज्जनगड ही संप्रदायाची तीर्थक्षेत्रेच झाली आहेत.

**संप्रदायाची चतु:सूत्री**

मुख्य हरीकथानिरूपण । दुसरें ते राजकारण ।
तिसरें ते सावधपण । सर्व विषई ।। ११-५-४ ।।
चौथा अत्यंत साक्षप । फेडावे नाना आक्षेप ।
अन्याये थोर अथवा अल्प । क्ष्मा करीत जावे ।। ११-५-५ ।।

हरिकथानिरूपणाच्या पाठोपाठ समर्थांनी राजकारणाला स्थान दिले; कारण त्याकाळची परिस्थितीच तशी होती. हिंदूंची उपासनापद्धती जिवंत ठेवावयाची असेल तर असहिष्णू, अडाणी आणि क्रूर अशा यावनी सत्तेशी झुंज देणे अपरिहार्यच होते. स्वधर्माचे संवर्धन होण्यासाठी

परमार्थाचा कैवारी (कैपक्षी परमार्थी) राजा असावा लागतो हा विचार समर्थांनी स्पष्ट मांडला. ऐहिक जीवनातील प्रश्न केवळ जपजाप्याने सुटत नाही तर त्यासाठी ऐहिकातील साधनांचा उपयोग करून उपययोजना करावी लागते. त्यासाठी प्रचंड प्रमाणात जनप्रबोधन श्रीसमर्थांनी केले.

**कार्य :**

समर्थ संप्रदायाने शिवकालामध्ये ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाचे कार्य केले आहे. रामोपासना आणि बलोपासना यांच्याद्वारा समाज संघटित केला. धार्मिक, नैतिक, आणि वैचारिक जागृती करून लोकांची मानसिकता, श्रीशिवाजी महाराजांच्या स्वराज्य संपादनाच्या कार्यासाठी अनुकुल बनविली.

महंतें महंत करावें । युक्तिबुध्दीनें भरावे ।
जाणते करून विखरावे । नाना देसीं ।। ११-१०-२५ ।।

ही ओवी खूपच काही सांगून जाते.

**अभिमान हवा पण दुराभिमान नको !**

समर्थ संप्रदाय यालाच धारकरी संप्रदाय असेही म्हटले जाते. वारकरी संप्रदाय आणि धारकरी संप्रदाय हे आपापल्या वैशिष्ठयांसह महाराष्ट्रात कार्य करीत आहेत. त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारे दुरावा नसावा. दोन्ही संप्रदायातील मंडळी पूर्वी कधीही नव्हती तितकी आज सामंजस्याने एकत्र आली आहेत. संत ज्ञानेश्वर, नामदेव यांच्यापासून तुकाराम, रामदास या संत मालिकेबद्दल महाराष्ट्राला अभिमान आहे. श्री.दा.अ. उपक्रमातील अभ्यासार्थींनी सामंजस्याच्या भावनेला गति दिली पाहिजे.

**दासबोध अभ्यास मंडळे**

१) दासबोध अभ्यासार्थींनी आपल्या परिसरातील अभ्यासार्थींचे पत्ते मिळवून त्यांचे अभ्यासमंडळ तयार करावे. २) दर आठवड्यामध्ये किमान एक तास तरी सर्वांनी एकत्र यावे. ३) मंडळाच्या सभेच्या ठिकाणी श्रीराम, समर्थ यांच्या प्रतिमा असाव्यात. त्यांना फुले वाहून, सुवासिक उदबत्ती लावून सभेचा प्रारंभ व्हावा. ४) प्रारंभी तीन श्लोक (१) शुकासारखे (२) उपासनेला (३) सदासर्वदा योग, हे म्हटले जावेत. ५) दासबोधातील विशिष्ट समासाचा अभ्यास करावयाचा असेल त्याचा सारांश वाचावा. प्रत्येक सदस्याने पाच ओव्या वाचाव्या. अर्थाबद्दल चर्चा व्हावी. नंतर प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे शोधून काढावी. ६) प्रत्येक सभेचे शेवटी 'कल्याण करी देवराया' ही प्रार्थना व्हावी. प्रसाद दिला जावा. खऱ्या अर्थाने दासबोधामध्ये गोडी लावण्यासाठी दासबोध अभ्यास मंडळे आवश्यक आहेत.

# ❊ सर्वांसाठी समर्थांचा बोध ❊

**बरें सत्य बोला यथातथ्य चाला । बहू मानिती लोक तेणें तुम्हाला ।।**
**धरा बुध्दि पोटीं विवेकें मुलें हो । बरा गूण तो अंतरामाजि राहो ।।१।।**

नेहमी हितकारक, गोड व सत्य बोला. योग्य प्रकारे, सदाचाराने वागा. असे केलेत तर लोक तुमचा बहुमान करतील. मुलांनो, विवेकाने वागा, मनात बुद्धीचा विकास होऊ द्या. अंत:करणात, खरोखरच सद्गुणी राहा.

**सदा दांत घासोनि तोंडा धुवावें । कळाहीन तें शूद्रमूखी नसावें ।।**
**सदा सर्वदा यत्न सोडूं नये रे । बहूसाळ हा खेळ कामा नये रे ।।२।।**

प्रतिदिनी दात घासावे, तोंड धुवावे. आपले तोंड उदास किंवा दुर्मुखलेले केव्हाही असू देऊ नये. प्रयत्न कधीही सोडू नये. खेळ सर्वांना आवडतात, पण अती खेळ उपयोगी नाही.

**दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें । प्रसंगी अखंडीत वाचीत जावें ।।**
**गुणश्रेष्ठ ऊपास्य त्यांचें करावें । बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ।।३।।**

प्रतिदिनी, काहीतरी लेखन करावे. त्याप्रमाणे, सतत सद्ग्रंथांचे वाचन करावे. जे गुणांत श्रेष्ठ असतील त्यांची उपासना करावी. जे काही खरे व हितकारक बोलणे असते ते मनापासून ऐकावे व चित्तावर ठसवून घ्यावे.

**बहू खेळ खोटा सदालस्य खोटा । समस्तांसि भांडेल तोची करंटा ।।**
**बहुतां जनांलागिं जीवीं भजावें । भल्यासंगतीं न्याय तेथें भजावें ।।४।।**

खेळाचा अतिरेक तसेच आळशीपणा करणेही वाईट असते. सर्वांशी जो भांडतो तो वाईट असतो. लोकांच्या अंत:करणाला संतोष होईल असे वागावे आणि संतांच्या संगतीत रहावे, नेहमी न्यायाचीच बाजू घ्यावी.

**हिशोबीं सदा न्याय सांडूं नये रे । कदाचीत अन्याय होतां धका रे ।।**
**जनीं सांडितां न्याय रे दु:ख होतें । महसूख तेंही अकस्मात जातें ।।५।।**

हिशेब करताना न्यायाने करावा, न्याय सोडू नये. कदाचित अन्याय झाला तर फार त्रास होतो. लोकांना अन्यायामुळे फार दु:ख होते. सुखाचे, सलोख्याचे असणारे संबंधही अन्यायाने बिघडून जातात व सुख नष्ट होते.

**प्रचीतीविणें बोलणें व्यर्थ वायां । विवेकेविणें सर्वही दंभ जाला ।।**
**बहू सज्जला नेटका साज केला । विचाराविणें सर्वही व्यर्थ गेला ।।६।।**

प्रत्यक्ष अनुभवाशिवाय बोलणे व्यर्थ असते. विवेक, तारतम्य नसेल तर सर्वच खोटेपणा होता. जरी बाह्यत: कितीही वस्त्रेभूषणे घालून माणूस सजला तरी, मन जर विचारी नसेल तर तो सर्व साज फुकट जातो.

**वरी चांगला अंतरीं गोड नाहीं । तया मानवाचें जिणें व्यर्थ पाहीं ।।**
**वरी चांगला अंतरीं गोड आहे । तयालागिं कोणीतरी शोधिताहे ।।७।।**

बाह्य वेष, बोलणे, वगैरे चांगले असते, पण मन मात्र चांगले नसते, त्या माणसाचे जिणे व्यर्थ होते. पण जो वरूनही चांगला असतो व मनानेही चांगला असतो, तो लोकांना आवडतो, त्याला लोक शोधीत येतात.

**सदा अंतरी गोड तें सांडवेना । कदा अंतरीं ओखटें देखवेना ।।**
**म्हणूनी बरा गुण आधीं धरावा । महाघोर संसार हा नीरसावा ।।८।।**

जो माणूस चांगल्या मनाचा असतो आणि ते आतून, परिणामी चांगले असते. आपण उत्तम गुणांचे संपादन करावे. हा संसार अतिशय घोर, त्रासदायक आहे. सद्गुणी माणसालाच संसार सुखप्रद होऊ शकतो.

**भला रे भला बोलती तें करावें । बहूतां जनांचे मुखें येश घ्यावें ।।**
**परी शेवटीं सर्व सोडोनि द्यावें । मरावें परी कीर्तिरूपें उरावें ।।९।।**

लोक आपल्याला चांगला म्हणतील असे कार्य करावे व लोकांच्या तोंडी आपली कीर्ती असावी, यशाची प्रशंसा असावी पण एवढे केले तरी शेवटी सर्व सोडून द्यावे ! आपल्यामागे आपली सत्कीर्ती राहील असे जगावे.

**बरा ओखटा सर्व संसार जाला । अकस्मात येईल रे काळघाला ।।**
**म्हणोनी भले संगतीं सत्य चाला । जनीं दास तो बोधिताहे मुलांला ।।१०।।**

संसार नीट होवो किंवा अर्धवट होवो, काळाचा घाला अकस्मात येईल आणि सारे सोडून जावे लागेल; म्हणून संतांची संगत धरा आणि खरेपणाने वागणूक ठेवा. असा उपदेश रामदास मुलांना करीत आहेत.

# अभ्यासार्थींना व्यावहारिक पण आवश्यक सूचना

१. दरमहा वीस तारखेपर्यंत स्वाध्याय समीक्षकांकडे पाठविण्याचा आटोकाट यत्न करावा. त्यासाठी स्वत:च्या वेळाचे नियोजन करणे आवश्यक आहे.

२. प्रत्येक स्वाध्यायासमवेत स्वत:चा पत्ता लिहिलेले आंतर्देशीय पत्र समीक्षकांकडे समीक्षणासाठी पाठवावे. १२ व्या स्वाध्यायाचे वेळी मात्र पोस्टाचे पाकीट पाठवावे. त्यातून आपणास प्रमाणपत्र पाठविले जाईल.

३. प्रत्येक स्वाध्यायाचे प्रारंभी स्वत:चे नांव, अभ्यासार्थी क्रमांक आणि स्वाध्यायाचा क्रमांक व स्तर (प्रवेश / परिचय / प्रबोध) लिहावा.

४. स्वाध्यायाच्या पाकिटावर समीक्षकांचे नाव सुवाच्य अक्षरात लिहावे, डाव्या कोपऱ्यामध्ये आपले नांव व पत्ता घालण्यास विसरू नये. त्यामुळे काही कारणाने समीक्षकांना स्वाध्याय पोहोचला नाही तर पुन्हा आपणास परत मिळतो. पत्ता लिहिताना गावाचा 'पिन' घालण्यास विसरू नये.

५. एखाद्या महिन्यात स्वाध्याय पाठविणे शक्य नसल्यास समीक्षकांना त्याबद्दल पूर्वसूचना देणारे कार्ड पाठवावे.

६. आपणास कोठल्याही प्रकारची अडचण आली तरच पुणे केंद्राकडे जोडकार्ड (किंवा रिप्लाय कार्ड) पाठवावे. नुसती जोडलेली कार्डे म्हणजे जोड-कार्ड नव्हे. जोडकार्डांना पिन मारणे किंवा टाका घालणे जरूर आहे. असे न केल्यास दुसऱ्या कार्डावरही शिक्का पडून ते रद्द होते.

७. स्वाध्यायाच्या पाकिटाला योग्य ते पोस्टेज लावावे. समीक्षकांना दंड पडू नये याची दक्षता घ्यावी.

८. स्वाध्याय लेखन ही श्रीसमर्थांची पूजा आहे अशा भावनेतून उत्तरे लिहावीत. स्वाध्यायाबरोबर समीक्षकांना प्रेषणपत्र नेहमी लिहावे. पूर्वीच्या समीक्षणाची पोहोच त्यातून अवश्य द्यावी.

**अभ्यासार्थींसाठी उपयुक्त पुस्तके :**

- दासबोध प्रवेश + भावार्थ ८ रु. (ट.ख.सह १० रु.) किंवा (रजि. पोस्टेज रु. ३०)
- दासबोध परिचय + भावार्थ १८ रु. (ट.ख.सह २० रु.) किंवा (रजि. पोस्टेज रु. ४०)
- दासबोध प्रबोध + भावार्थ ३० रु. (ट.ख.सह ३५ रु.) किंवा (रजि. पोस्टेज रु. ५०)

**श्री.द्वा.वा.केळकर यांची पुस्तके :**

- प्रगटले श्रीराम चाफळी : २० रू. (ट.ख.सह २३ रु.)

**पुणे केंद्राचा पत्ता :** व्यवस्थापक,
श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन
श्रीसमर्थ सोसायटी, पटवर्धन बाग,
धन्वंतरी सभागृहामागे, एरंडवणे,
पुणे - ४११ ००४.
फोन. : (०२०) - २५४५४३०७.

**प्राप्तीस्थळ :**
व्यवस्थापक,
श्रीसमर्थ सेवा मंडळ,
सज्जनगड,
(जि.सातारा) ४१५ ०१३.
फोन : (०२१६२) २७८०१९